**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९२१

निर्णय दिनांक ०१-०३-२००८

श्री. अशोक नानासाहेब चंदनशिव : अपिलार्थी
(सरपंच), मु. हाणुमंत पिंपरी पो.
काळेगाव (घाट), तालुका केज,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा कार्यकारी अभियंता,
ल. पा. (स्था.स्तर) विभाग, बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
ल. पा. (स्था.स्तर) मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अशोक नानासाहेब चंदनशिव यांचे प्रतिनिधी श्री. लक्ष्मण माणिकराव चंदनशिव रा. हनुमंत पिंपरी पो. काळेगाव (घाट) तालुका केज जिल्हा बीड (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ल. पा. (स्था.स्तर) विभाग, बीड श्री. रघुनाथ बबनराव करपे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात

येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, ल. पा. (स्था.स्तर) मंडळ, औरंगाबाद श्री. जगदीश मारोतराव लिहीतकर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २०-०७-२००६ रोजी-च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील हनुमंत पिंपरी तालुका केज जिल्हा बीड येथील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधा-याच्या संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ १. वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्दीचा दिनांक,

२. निविदा स्वीकारण्याचा दिनांक

३. निविदा उघडल्याचा दिनांक

४. निविदा ज्या ठेकेदाराच्या नांवाने मंजूर झाली त्यांचे नांव

५. निविदेचा प्रकार (ए-१, बी-१)

६. कार्यरंभ आदेशाची सत्यप्रत

७. काम पूर्ण करण्याचा कालावधी

८. ठेकेदाराने मुदतवाढीसाठी केलेल्या आर्जाच्या सत्यप्रती

९. आपण दिलेल्या मुदतवाढीच्या सत्यप्रती

१० ठेकेदाराला एकूण किती रकमेचा धनादेश देण्यात आला, नंबर व दिनांक

११. एकूण दिलेले सिमेंट पोती

१२ ज्या मोजमाप पुस्तीकेतील नोंदीच्या आधारे धनादेश देण्यात आला त्या मोजमाप पुस्तीकेतील नोंदीच्या सत्यप्रती.

१३. झालेले एकूण काम क्युबीक मीटर

१४. मूळ किंमत व सुधारीत किंमत. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक २५-०७-२००६ रोजी प्राप्त झाला.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३१-०७-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती प्राप्त करुन घेणसाठी आवश्यक ते शुल्क रुपये ५० इतके त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने सदर शुल्क यांच्या कार्यालयात भरले किंवा कसे याची काहीही माहिती नाही तर अपिलार्थी यांचे प्रतिनिधीने आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये भरल्याचा कोणताही पुरावा आज रोजी आणला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या कडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-१०-२००६ रोजी प्रथम अपील केल्याचे म्हटले आहे. तथापि अपिलार्थीने या अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांना माहिती अधिकारी असे संबोधून त्यांच्याकडे वेगळी व उपरोक्त माहिती मागविल्याचे दिसून येते. त्याचबरोबर या अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या ज्या निर्णयाविरुध्द त्यांना अपील करावयाचे होते त्या निर्णयाचा उल्लेख नाही. अपिलाची कारणे देखील या अपील अर्जात नमूद केलेली नाहीत. सदर अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जामध्ये त्यांनी उपस्थित केलेल्या माहिती संदर्भात त्यांच्याकडील दिनांक १६-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून अतिरिक्त माहिती मागविल्याचे दिसून येत आहे. तदनंतर

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीस अनुसरुन राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अपूर्ण माहिती मिळाल्याचे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी श्री. लक्ष्मण माणिकराव चंदनशिव हे हजर आहेत. त्यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी प्रथमतः मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक १२ च्या संदर्भात त्यांना अर्धवट माहिती पुरविली असून या कामाच्या प्रथम देयकाच्या प्रती व प्रथम देयक ज्या मोजमाप पुस्तिकावरुन तयार केले आहे त्या मोजमाप पुस्तिकेची सत्यप्रत त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही. त्याचबरोबर त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १३ च्या संदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नाही. सदर माहिती त्यांना आजही हवी आहे. हे काम ब-याच काळ बंद असल्याने काम पूर्ण करुन घेण्यासंदर्भात त्यांना या माहितीची आवश्यकता होती.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी संबंधीत ठेकेदाराला ज्या मोजमाप पुस्तिका मध्ये नोंदविल्या गेलेल्या मापाच्या आधारे देयकाचे प्रदान करण्यात आले ती मोजमाप पुस्तिका क्रमांक ७३४ आज रोजी त्यांच्या कार्यालयात व त्यांच्याकडे उपलब्ध नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक १३ संदर्भातील माहिती मोजमाप पुस्तिका त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने ते अपिलार्थीस ती माहिती देऊ शकले नाहीत. अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क केव्हा भरले हे त्यांना स्मरत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे त्यांनी, प्रथमतः त्यांना कोणत्याही युक्तिवाद करावयाचा नाही असे सांगितले. तथापि नंतर जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांचा त्यांना प्राप्त झालेला दिनांक

०९-१०-२००६ रोजीचा अपील अर्ज नसून या अर्जाव्दारे त्यांच्याकडे या अतिरिक्त व वेगळी माहिती मागविली होती.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, उक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) मध्ये विहित केल्याप्रमाणे आवश्यक ती कारवाई विहित मुदतीत केली आहे. तथापि अपिलार्थीने सदर माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी निश्चितपणे आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधी भरले याची जन माहिती अधिकारी यांना कल्पना नाही. आयोगासमोर सुनावणीस येतांना देखील त्यांनी एवढ्या महत्वाच्या मुद्दाकडे दुर्लक्ष करावे याचे आयोगास आश्चर्य वाटते. त्यांनी अपिलार्थीस दिलेली दिनांक १२-०९-२००६ रोजीच्या पत्रामधील सदर माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी या नात्याने दिली आहे किंवा कसे हे स्पष्ट होत नाही.

या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १३ च्या संदर्भात कोणतीही माहिती दिली नाही व मुद्दा क्रमांक १२ च्या संदर्भात अपिलार्थीस अंशतः माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीचा समावेश ज्या मोजमाप पुस्तिकेत झाला आहे ती मोजमाप पुस्तिका क्रमांक ७३४ ही गहाळ झाली असल्याचे आयोगास सांगितले. सदर मोजमाप पुस्तिका गहाळ झाल्यानंतर पोलिसाकडे यासंदर्भात तक्रार नोंदविली होती किंवा कसे हा प्रश्न विचारला असता त्यास त्यांनी नकारार्थी उत्तर दिले. येथे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती मिळाल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीस संपूर्ण माहिती न दिल्याची कारणे स्पष्ट करतांना त्यांनी असे सांगितले की, सदर मोजमाप पुस्तिका त्याच्या कार्यालयातील कनिष्ठ अभियंत्याच्या ताब्यात असून त्यांच्याकडून सदर मोजमाप पुस्तिका त्यांच्या

कडे अद्याप प्राप्त झालेली नाही. अपिलार्थीने प्रथमतः दिनांक २०-०७-२००६ रोजी काही माहिती मागविली होती या घटनेस आजमितीस सुमारे दीड वर्ष इतका कालावधी ओलांडूनही कार्यकारी अभियंता यांच्या हाताखाली काम करणा-या कनिष्ठ अभियंत्याकडून, माहितीचा अधिकार अधिनियमातील माहिती तयार देण्यासाठी मोजमाप पुस्तिका उपलब्ध होऊ शकत नाही हे संबंधीत विभागाच्या ढिसाळ प्रशासन व्यवस्थेचे द्योतक आहे असे आयोग मानतो.

संपूर्ण तपासणीची यंत्रणा कोणतीही असली तरी सामान्य नागरिकास त्यांना सार्वजनिक प्राधिकरणाकडून आवश्यक ती माहिती ३० दिवसात उपलब्ध करुन देण्याची तरतूद माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये आहे व त्यांना आवश्यक असलेली माहिती या मुदतीमध्ये प्राप्त होणे हा त्यांचा हक्क आहे व सदर माहिती ३० दिवसात उपलब्ध करुन देणे हे सार्वजनिक प्राधिकरणाचे कर्तव्य आहे. या ठिकाणी अपिलार्थीस अपूर्ण माहिती देऊन संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव पूर्णपणे स्पष्ट केल्याचे दिसून येत आहे. ज्या कनिष्ठ अभियंत्याकडे सदर मोजमाप पुस्तिका उपलब्ध असण्याची शक्यता आहे त्या कनिष्ठ अभियंत्यावर संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी एवढा प्रदीर्घ कालावधी लोटला गेल्यानंतरही कोणतीही कारवाई केली नाही ही बाब तर त्यांच्या कार्यशैलीमध्ये कोठेही कर्तव्य परायणतेचा लवलेश नसल्याचे सिध्द करते. सबब सचिव (जलसंपदा) यांना असे आदेशीत करण्यात येते की, संबधीत जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या वरील प्रमाणे उध्दृत केलेल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबददल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर १ महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. अपिलार्थीस संपूर्ण माहिती मिळण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत

करण्यात येत की, त्यांनी आता अपिलार्थीस उर्वरीत माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस उर्वरीत माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबधीत जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील दर्शविलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबददल त्यांच्यावर सचिव (जलसंपदा) प्रचलीत सेवानियमाप्रमाणे, यथायोग्य प्रशासकीय कारवाई, हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर १ महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ०१-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. आशोक नानासाहेब चंदनशिव (सरपंच), मु. हाणुमंत पिंपरी पो. काळेगाव (घाट), तालुका केज, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ल. पा. (स्था.स्तर)

विभाग, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, ल. पा. (स्था.स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९२४

निर्णय दिनांक ०१-०३-२००८

श्री. काजी नसीरोद्दीन मेहबुब, : अपिलार्थी
मिली कॉलनी, औरंगाबाद रोड,
उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (प्रशासन), उस्मानाबाद, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, उस्मानाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, उस्मानाबाद, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, उस्मानाबाद |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. काजी नसीरोद्दीन मेहबुब व जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, उस्मानाबाद हे

गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक (प्रशासन), जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, उस्मानाबाद श्री. झाल्टे अमर गोवर्धन (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक ०२-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०२-२००६ ते ०२-०२-२००७ या कालावधीतील त्यांनी जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडे दिलेल्या दिनांक २८-०२-२००६ रोजीच्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीबाबत खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" दिनांक २८-२-२००६ रोजी दिलेल्या अर्जावरील झालेल्या कार्यवाही-चा पुर्ण तपशील व त्याच्यावर काय कारवाई केली त्याची आदेशाची नक्कल."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास दिनांक २९-१२-२००६ रोजी प्राप्त झाला.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेता त्यांच्याकडील दिनांक २०-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती दिल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाची सुनावणी न घेतल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या

तरतुदीस अनुसरुन राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आयोगास हे व्दितीय अपील करण्याची कारणे म्हणून -- माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही, अपिलीय अधिकारी यांनी अपिलाची सुनावणी घेतली नाही, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक २०-०३-२००७ रोजी जी माहिती पुरविली आहे ती माहिती अधिकारी म्हणून पुरविली किंवा कसे याचा उल्लेख नाही, त्यांना दिनांक २०-०३-२००७ रोजीच्या पत्राने कळविलेली माहिती त्यांच्या दिनांक ०२-०२-२००७ रोजी अर्जान्वये पुरविलेली नाही -- असे दर्शवून दिनांक २०-०३-२००७ रोजी त्यांना पुरविण्यात आलेल्या माहितीतील उणिवा त्यांनी पुढील प्रमाणे दर्शविल्या आहेत.

"श्री. प्रसाद रविंद्र कुलकर्णी कनिष्ठ लिपीक यांना चौकशी अधिकारी म्हणून कोणी नेमले त्याचा उल्लेख नाही, श्री. प्रसाद रविंद्र कुलकर्णी कनिष्ठ लिपीक यांचा चौकशी अहवाल प्रमाणित नाही, श्री. प्रसाद रविंद्र कुलकर्णी कनिष्ठ लिपीक यांचा अहवाल सहाय्यक निबंधक सहकारी संस्था उस्मानाबाद यांना प्राप्त झाल्यावर काय कारवाई केली त्याचा उल्लेख नाही. जिल्हा निबंधक सहकारी संस्था यांनी या अहवालावर काय कारवाई केली त्याचा उल्लेख नाही. दिनांक २०-०३-२००७ च्या पत्रात संदर्भ म्हणून अपिलार्थीचा दिनांक १६-०३-२००७ चा अर्ज दर्शविला आहे. वास्तविक तो अर्ज नसून ते अपील होते."

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असून त्यांनी आपले म्हणणे आयोगाकडे पत्राव्दारे लेखी स्वरुपात पाठविले आहे. यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अर्जाकडे गांभीर्याने पाहिले नसल्याने त्यांच्यावर योग्य ती कारवाई व्हावी, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती पुरविण्याबाबत आदेश व्हावेत व जन माहिती अधिकारी यांनी अपुरी माहिती दिली तर जन अपिलीय अधिकारी यांनी

सुनावणी घेतली नाही व विहित मुदतीत उत्तर दिले नाही म्हणून त्यांना कठोर शिक्षा देण्याची आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते दिनांक १९-११-२००७ पासून या पदावर कार्यरत आहेत. अपिलार्थीने ज्यावेळेस माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागविली होती त्यावेळी जिल्हा निबंधक सहकारी संस्था उस्मानाबाद हे जन माहिती अधिकारी होते. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २०-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांच्या कडे उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिकारी म्हणून पुरविली आहे. अपिलार्थीचा दिनांक २८-०२-२००६ रोजीचा अर्ज त्यांनी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था उस्स्मानाबाद यांच्याकडे मार्च २००६ या महिन्यात पाठविला होता. (सहाय्यक निबंधकास अपिलार्थीचा अर्ज चौकशीसाठी पाठविण्यात आलेल्या पत्रावर जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने दिनांक लिहिलेला नसल्याचे दिसून येते.) तदनंतर सहाय्यक निबंधक सहकारी संस्था उस्मानाबाद यांनी दिनांक २५-०४-२००६ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये त्यांचे कार्यालयातील लिपीक श्री. प्रसाद रविंद्र कुलकर्णी यांना या तक्रार अर्जासंदर्भात संस्थेस भेट देऊन ८ दिवसाच्या आत अहवाल सादर करण्याचे सूचित केले. सदर चौकशी अहवाल श्री. प्रसाद रविंद्र कुलकर्णी यांच्याकडून सहाय्यक निबंधक कार्यालयास दिनांक २३-०६-२००६ रोजी प्राप्त झाला. तो त्यांनी दिनांक २९-०६-२००६ रोजी जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था उस्मानाबाद यांच्याकडे पाठविला. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांनी केलेल्या अर्जाच्या संदर्भातील माहिती समक्ष घेऊन जाण्याची तयारी दर्शविली असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस या अर्जासंदर्भात काहीही कळविले नाही व ते अपिलार्थीची वाट पाहत राहिले. अपिलार्थीने जिल्हा उप निबंधक कार्यालयाकडे दिनांक १६-०३-२००६ रोजी प्रथम अपील केल्यानंतर मात्र त्यांनी दिनांक २०-०३-२००७ रोजी आवश्यक ती माहिती

अपिलार्थीस पुरविली आहे. अपिलार्थीच्या दिनांक २८-०२-२००६ रोजीच्या अर्जावर त्यांनी कोणतीही कारवाई केली नाही. अपिलार्थीने ज्या संस्थेविरुध्द अर्ज केला आहे त्याची चौकशी जिल्हा पातळीवरील कार्यालयाच्या कार्यकक्षेत येत असल्याने सदर अर्जासंबंधी चौकशी करुन त्याच्यावर निर्णय घेणे हा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय यांच्या कर्तव्याचा भाग आहे. अपिलार्थीपासून माहिती दडविण्याचा त्यांचा कोणताही हेतू नव्हता केवळ अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती मागविल्याने ते अपिलार्थीची वाट पहात राहिले.

वरील घटनाक्रम, सहकारी संस्था खात्याच्या अधिका-याने केलेला युक्तिवाद, अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०२-०२-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्या दिवशी उपलब्ध नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सर्वप्रथम त्यांच्या अर्जासंदर्भात माहिती पुरविण्याच्या संदर्भात ३० दिवसाचे आत निर्णय घ्यावयास हवा होता. तथापि अपिलार्थीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकरे, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला नाही हे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. जर त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यापोटीचे आवश्यक ते शुल्क कळविले असते तर कदाचित त्यांनी सदर माहिती व्यक्तिशः उपस्थित राहून हस्तगत करुन घेतली असती ही देखिल शक्यता नाकारता येत नाही. येथे असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने अर्ज केल्यानंतर त्यांना अपेक्षित असलेली माहिती तयार असून त्यांनी केवळ माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार कारवाई न केल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात ते गाफील

राहिले व अपिलार्थी देखील सदर माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे पुन्हा उपस्थित राहिले नाहीत अथवा असल्यास त्यांनी यासंदर्भात कोणताही पुरावा त्यांच्या अर्जासोबत दिला नाही. जरी वादाच्या प्रयोजनार्थ अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी उपस्थित झाले नाहीत हा जन माहिती अधिकारी यांचा मुद्दा विचारात घेतला तरीही अपिलार्थीने अर्ज केल्यानंतर या अर्जावरील आपला निर्णय जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) प्रमाणे विहित मुदतीत त्यांना कळविणे अभिप्रेत आहे. तथापि या ठिकाणी जन माहिती अधिकारी यांनी अशी कोणतीही कृती न करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव येथे स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या लेखी युक्तिवादातील त्यांचे जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत उत्तर दिले नाही हे म्हणणे येथे खरे ठरते. त्यांनी अपिलार्थीस उत्तर, जन माहिती अधिकारी या नात्याने दिले की जन अपिलीय अधिकारी या नात्याने दिले याचा उल्लेख दिनांक २०-०३-२००७ रोजीच्या पत्रात केला नाही असेही अपिलार्थीचे म्हणणे आहे. अपिलार्थीस माहिती देतांना ती जन माहिती अधिकारी यांच्या सहीने व सही खाली जन माहिती अधिकारी असा स्पष्ट उल्लेख असलेल्या स्वरुपात द्यावयास हवी होती. त्यामुळे अपिलार्थीच्या जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी त्यांना जन माहिती अधिकारी या नात्याने की जन अपिलीय अधिकारी या नात्याने माहिती दिली हे स्पष्ट होत नसल्याचे त्यांचे म्हणणे सिध्द होते. एकदा माहिती दिल्यानंतर सदर माहिती अपिलार्थीस मान्य नसेल तर या अर्जासंबंधात कोठे अपील करावयाचे याचा उल्लेखही या पत्रात असणे आवश्यक आहे. तथापि अशा प्रकारचा कोणताही उल्लेख सदर पत्रात नाही. हाही अपिलार्थीचा मुद्दा येथे सिध्द होत आहे. अपिलार्थीच्या अपील अर्ज जन अपिलीय

अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्याची सुनावणी घेऊन अपिलार्थीस आपला निर्णय देणे अभिप्रेत आहे. सुनावणीमध्ये अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची पूर्ण संधी मिळते व जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांच्यामध्ये जर काही सुसंवाद यापूर्वी साधला गेला नसेल तर तो साधण्याची संधी प्रथम अपिलामध्ये मिळते परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी ही संधी देखील वाया घालविली असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीच्या दिनांक २०-०२-२००६ रोजीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी आजतागायत कोणतीही कारवाई केलेली नाही असे त्यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले. हीच माहिती जर अपिलार्थीस विहित मुदतीत आवश्यक त्या कागदपत्रासह त्यांनी कळविली असती तर अपिलार्थीस व्दितीय अपील करण्याची गरज पडली नसती. अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामध्ये चौकशी अधिकारी म्हणून श्री. प्रसाद रविंद्र कुलकर्णी यांना कोणी नेमले याची माहिती त्यांना मिळाली नसल्याचा उल्लेख केला आहे. तथापि हा मुद्दा त्यांच्याकडील प्रथम अर्जामध्ये नसल्याने या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देणे अपेक्षित नाही. केवळ श्री. प्रसाद रविंद्र कुलकर्णी यांना कोणी नेमले याची माहिती नाही म्हणून माहिती अपूर्ण असल्याचे विधान अपिलार्थीने केल्याचे दिसून येते. तथापि त्यांचा हा मुद्दा आयोग अंशतः अमान्य करत आहे. त्यांनी त्यांच्या दिनांक ०२-०२-२००७ रोजीच्या त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांच्या दिनांक २८-०२-२००६ रोजीच्या तक्रार अर्जासंदर्भात काय आदेश झाले याची प्रत मागितली आहे. तथापि या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी कोणतीच कारवाई न केल्याने त्यांच्या अर्जावर अद्यापही निर्णय प्रलंबीत असल्याचे दिसून येते. थोडक्यात अपिलार्थीने निर्देशीत केल्याप्रमाणे अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपिलामध्ये म्हटल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जावर व अपील अर्जावर गांभीर्याने कारवाई न करुन तद्वतच माहितीचा

अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) च्या तरतुदीचा भंग करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव येथे दर्शविल्याचे दिसून येत आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, सहकार आयुक्त, पुणे यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. अपिलार्थीस संपूर्ण माहिती मिळण्याच्या दृष्टीने संबंधीत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल सहकार आयुक्त, पुणे यांनी त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करावी व तदनंतर १ महिन्याच्या आत

आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ०१-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. काजी नसीरोद्दीन मेहबुब, मिली कॉलनी, औरंगाबाद रोड, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (प्रशासन), उस्मानाबाद, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, उस्मानाबाद, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, बी. जे. रोड, पुणे – ४११ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९४८

निर्णय दिनांक ०१-०३-२००८

श्री. शेख रज्जाक शेख अनवर, : अपिलार्थी
मराठवाडा अध्यक्ष अखिल भारतीय
भ्रष्टाचार निर्मुलन समिती, नांदेड, रा.
बडी दर्गा, छोटा दरवाजा, गाडीपुरा,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा नायब तहसीलदार (महसूल),
तहसील कार्यालय, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शेख रज्जाक शेख अनवर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, नांदेड श्री. अतुल त्र्यंबकराव जटाळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नांदेड श्री. महेश अजबराव वडदकर (यापुढे त्यांना जन

अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल), तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, नांदेड श्री. एन. डब्ल्यू. पैलवाड (त्यांना संबंधीत जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नांदेड श्री. वैभव वि. नावडकर (त्यांना संबंधीत जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २९-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे नांदेड येथील गाडीपुरा भागात पूरग्रस्त म्हणून देण्यात आलेल्या आर्थिक मदतीसंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

"१. यासोबत देण्यात आलेल्या घर नंबर वर व किती कुटूंबाना पूरग्रस्त म्हणून आर्थिक मदत देण्यात आली त्याची तपशील मिळणेबाबद.

| | घर नं. | नांव |
|---|---|---|
| १ | ४-६-३३२ नविन/३२२ जूने | अ. वाहेद खमर अहमद |
| २ | ४-६-३३३ नविन/३२३ जूने | अ. वाहेद शेख उमर |
| ३ | ४-६-३३४ नविन/३२४जूने | अ. वाहेद अ. रफीक |
| ४ | ४-६-३३५ नविन/३२५ जूने | अ. वाहेद अ. खदीर |
| ५ | ४-६-३४१ नविन/३४१ जूने | आजमेरी बेगम म. रफीक |
| ६ | ४-६-३४२ नविन | अ. गनी अ. बुढ्ढान |
| ७ | ४-६-३४३ नविन | अ. गनी अ. बुढ्ढान |
| ८ | ४-६-३४६ नविन | शेख महेमुद शे. नबी |
| ९ | ४-६-३८४ नविन/३७३ जूने | आसेफा बेगम म. ईसाक |
| १० | ४-६-३८७ नविन/३७६ जूने | खैरुनिसा बेगम गफार खान |
| ११ | ४-६-३८८ नविन/३७७ जूने | फतेबी शे. महेमुद |

| | | |
|---|---|---|
| १२ | ४-६-३९१ नविन/३८० जूने | अ. अजीम शे. महमद |
| १३ | ४-६-३९९ नविन/३८८ जूने | मेहमुदअली मासूमअली |
| १४ | ४-६-३२७ नविन | सफेया बेगम म. अ. सोफी |
| १५ | ४-६-२९ नविन/२९६ जूने | म. ईस्माईल म. खाजा |
| १६ | ४-६-२९४/१ | गोरी बेगम म. युसूफ |
| १७ | ४-६-२७८ | म. मुनीर |
| १८ | ४-६-२८३ | गोरी बेगम म. पाशु |
| १९ | ४-६-२०७, ४-६-२१०, ४-६-३३८, ४-६-३३१, ४-६-२३२, ४-६-११८, ४-६-१२९, ४-६-१३०, ४-६-२२४, ४-६-३३३, ४-४-२७८, ४-४-२९७, ४-४-३००, ४-४-३०१, ४-४-३६४ | |

२. वरील घर नंबर वर देण्यात आलेल्या टोकनाची कॉफी

३. वरील घरनंबरचे लोकांना आर्थिक मदत देण्यात आली कि, नुसते अन्नधान्य देण्यात आले.

४. प्रत्येक कुटूंबाची फोटोची झेरॉक्स प्रत मिळणेबाबद.

५. नावाची तपशील प्रत्येक टोकनची मिळणे. ''

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास दिनांक २९-१२-२००६ रोजी प्राप्त झाला.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या कडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५

मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. सदर अपील अर्जाची जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०२-२००८ रोजी सुनावणी घेऊन या अपिलावर आपले आदेश दिनांक २९-०२-२००८ रोजी पारीत केले. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना २ दिवसात माहिती देण्याचे आदेशीत केले.

जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय लागल्यापुर्वीच व्दितीय अपिल करण्याकरिता विहित कालमर्यादेचे बंधन पाळण्याच्या दृष्टीने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीस अनुसरुन राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अद्यापही त्यांना प्राप्त झाली नाही. सदर माहितीची आवश्यकता त्यांना आज देखील आहे. नांदेड जिल्ह्यामध्ये २००६ मध्ये झालेल्या अतिवृष्टी प्रकरणात देण्यात आलेल्या आर्थिक मदतीच्या वाटपामध्ये घोटाळा झाला असल्याचा त्यांना संशय आहे. या संशयाच्या निराकरणाप्रीत्यर्थ अथवा वस्तुस्थितीबाबत निश्चितपणे माहिती अवगत करुन घेण्यासाठी त्यांना सदर माहितीची आवश्यकता आहे. त्यांच्या मते त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर दिनांक ०८-०१-२००८ रोजी रुजू झाले आहेत.

सध्याचे जन माहिती अधिकारी नवीनच असल्याने अपिलार्थीने अर्ज करतेवेळी जे जन माहिती अधिकारी कार्यरत होते त्यांचाही युक्तिवाद आज नोंदवून घेण्यात आला.

संबंधीत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा मूळ माहितीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दिनांक ३०-०१-२००६ रोजी  रोजी संबंधीत लिपिकास अपिलार्थीने मागितलेली माहिती तयार करण्याचे एका पत्राव्दारे सूचित केले होते.  तदनंतर दिनांक ०६-०१-२००७ रोजी त्यांची तेथून बदली झाली.  त्यामुळे त्यांना या प्रकरणातील पुढील घडमोडी सांगता येणार नाहीत.  तथापि तत्कालीन परिस्थितीचे वर्णन त्यांनी आयोगासमोर एका शपथपत्राव्दारे सादर केले आहे.  त्यामध्ये त्यांनी खालील प्रमाणे आपले अभिप्राय दिले आहेत.

“ नांदेड शहरात पंचनामे निराधार लोकांचे करण्यासाठी तलाठी, बिल कलेक्टर व इतर विभागाचे अभियंता यांचे पथक तयार करण्यात आले होते.  अशी एकूण ५० पथके शहरात स्थापन करण्यात आली होती. अशा पथकांनी केलेल्या पंचनाम्यानुसार नांदेड शहरात २४४८४ कुटूंबाना रोख रक्कम, अन्नधान्य व केरोसीनच्या स्वरुपात मदत वाटप करण्यात आली.  रोख रकमेच्या स्वरुपात नांदेड शहरात ११ कोटी ७१ लाख ९१ हजार रक्कम वाटप करण्यात आली आहे.  सदर रक्कम वाटप करतांना पंचनाम्यासोबत निराधार व्यक्तींच्या कुटूंबाचा फोटो व त्यांना टोकन देण्यात आले होते.  निराधार व्यक्तींना मदत वाटपाची प्रक्रिया नांदेड येथे स्टेडीयमवर करण्यात आली होती.  त्या ठिकाणी पोलिस संरक्षणात २० काऊंटरवर २०० कर्मचा-यांच्या मदतीने रोख रक्कम अन्नधान्य व केरोसीनच्या स्वरुपात मदत वाटप करण्यात आली.  तत्पूर्वी अतिवृष्टीनंतर जवळपास ७ दिवस नांदेड शहरात विस्थापीत झालेल्या कुटूंबासाठी ५० ठिकाणी कॅम्प उघडण्यात आले होते.  त्या

ठिकाणी जवळपास ४० ते ५० हजार कुटूंबाना मोफत अन्न पुरविण्याची व्यवस्था तहसिल कार्यालयाने केली होती. यासोबतच मृत जनावरांचे पंचनामे, पडलेल्या घरांचे पंचनामे करण्याचे काम वेगळ्याने सुरु होते. या सर्व कामाचे व्यापक स्वरुप पाहता त्या अनुषंघाने होणा-या तक्रारी सुध्दा अनेक होत्या. तक्रारदारांच्या तक्रारी, लोकप्रतिनिधीचा लोकांना मदत वाटप करण्याचा तगादा तसेच वेळप्रसंगी कर्मचा-यांच्या अंगावर लोक धावून जात होते. मदत वाटपाचे काम हे सतत १६-०८-२००६ ते १४-१०-२००६ पर्यत सुरु होते. तर लोकांच्या आलेल्या तक्रार निवारणांचे काम फेब्रुवारी २००७ पर्यत चालू होते. या सर्व गोष्टींचा विचार करता हे काम अतिशय व्यापक, व क्लीष्ट होते. हे सर्व काम तहसिल कार्यालय नांदेड मधील अधिकारी व कर्मचारी यांनी प्रचंड तणावात पार पाडले आहे. त्यावेळेस जन माहिती अधिकारी म्हणून मी, काम पाहिले आहे. माझ्याकडे मूळ पदभार हा गोदाम व्यवस्थापक म्हणून होता. परंतु ना. तहसिलदार (म.) हे पद रिक्त असल्यामुळे त्याचीही जबाबदारी माझ्याकडे होती. तसेच त्या काळातील लिपीक श्री. नरंगले यांचेकडे नैसर्गिक आपत्ती व निवडणूक शाखेचाही पदभार होता. तसेच पूरपरिस्थितीतील संपूर्ण अभिलेख, तक्रारी व त्यासंबंधीचा सर्व पत्रव्यवहार संबंधीत लिपीक यांचेकडे होता. वरील सर्व कामांच्या व्यापामुळे सदर व्यक्तींचा अर्ज हा नजरचुकीने निदर्शनास आला नाही. त्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला आहे.”

यानंतर सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २७-०२-२००८ रोजीच्या पत्रान्वये (आयोगाच्या सुनावणीच्या ३ दिवस आधी) अपिलार्थीस पत्र लिहून संपूर्ण अभिलेखे पाहण्यासाठी त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहण्यासाठी विनंती दिनांक २९-०२-२००८ रोजी केली. तथापि अपिलार्थी या तारखेस उपस्थित राहिले नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचे दिनांक ०८-०२-२००७ रोजीचे अपील त्यांना दिनांक ०९-०२-२००७ रोजी प्राप्त झाले. तथापि अपिलार्थीच्या या प्रथम अपिलासंदर्भात त्यांना आयोगाच्या सुनावणीच्या संबंधीत पत्र प्राप्त होईपर्यत कोणतीही माहिती नव्हती. त्यामुळे अपिलार्थीच्या या अपील अर्जावर अधिनियमाव्दारे विहित मुदतीत ते निर्णय घेऊ शकले नाही. तथापि त्यांनी दिनांक २९-०२-२००८ रोजी (आयोगाकडील सुनावणीचे २ दिवस आधी) सदर अपिलाची सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दोन दिवसात संपूर्ण माहिती देण्याचे आदेशीत केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीचा प्रथम अर्ज संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर त्यांनी संबंधीत लिपिकास अपिलार्थीने मागितलेली माहिती तयार करण्याचे एका पत्राव्दारे सूचित केल्याचे दिसून येते. तथापि या सुचनांचे पुढे काय झाले याचा मात्र त्यांनी मागोवा घेतल्याचे किंवा त्याचा पाठपुरावा केल्याचे दिसून येत नाही. त्याचबरोबर अपिलार्थीचा अपील अर्जाची दखल देखील जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगाची सुनावणीसाठीची नोटीस त्यांचेकडे गेल्यानंतर घेतली. अपिलार्थीच्या अपील अर्जासंबंधात सदर अपिल अर्ज संबंधीत प्राधिकरणाकडे त्यांच्या कार्यालया-तील कर्मचा-यांकडून विहित मुदतीत सादर केला गेला नाही. यावरुन या संपूर्ण कार्यालयाच्या ढिसाळ प्रशासनाची कल्पना येते. कार्यालयाचे प्रशासन कशाही पध्दतीने चालत असले तरी अपिलार्थीने कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहिती मागणे हा माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांचा हक्क असून त्यांना आवश्यक ती माहिती विहित मुदतीत पुरविणे हे संबंधीत प्राधिकरणाचे कर्तव्य आहे. येथे संबंधीत प्राधिकरणाने अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदत

ओलांडून देखील आपले कर्तव्य पार पाडलेले नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने मागितलेली माहितीतील २ व्यक्तीसंदर्भातील पंचनाम्याच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविल्या. अपिलार्थी यांच्या मते त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध आहे. महसूल विभागाच्या अधिका-यांनी आज सुनावणीत सांगितले की, २००६ सालच्या अतिवृष्टीत नांदेड शहरातील एकूण २४४८४ कुटूंबाना अशा प्रकारची मदत करण्यात आली. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना ज्या स्वरुपात अपेक्षित आहे त्याच स्वरुपात जतन केली गेलेली नाही त्यामुळे त्यांना आवश्यक ती माहिती अपिलार्थीस देण्यासाठी अपिलार्थीचे सहाय्य घ्यावे लागत आहे व त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस तशी विनंती देखील केली होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप व ज्या स्वरुपात ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे हे पाहता या प्रकरणी अपिलार्थीने एक अपवादात्मक बाब म्हणून जन माहिती अधिकारी यांना शोधण्यासाठी सहाय्य करावे असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अर्थात अपिलार्थीने सहाय्य केले नाही म्हणून त्यांना माहिती देता आली नाही असे कारण जन माहिती अधिकारी यांना पुढे करता येणार नाही.

सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या विलंबाचे समर्थन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वरील परिच्छेदामध्ये केले आहे. केवळ संबंधित लिपिकाने अपिलार्थीच्या अर्जावर कोणतीही कारवाई न केल्याने अपिलार्थीस माहिती मिळू शकली नाही व त्यावरील अपिलाचा निर्णय विहित मुदतीत प्राप्त होऊ शकला नाही. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक कर्मचारी /

अधिकारी यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) मध्ये तरतूद आहे हे पाहता व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या शपथपत्रामध्ये विहित केलेली परिस्थिती पाहता असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे इतर सहाय्यक कर्मचारी / अधिकारी या सर्वांना मिळून त्यांनी अपिलार्थीस मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती न पुरवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभाव स्पष्ट केला आहे. त्यांनी उपरोक्त प्रकरणातील अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या विलंबाप्रित्यर्थ ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत. तथापि नांदेड शहरामध्ये आलेल्या महापूरानंतर निर्माण झालेली, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या शपथपत्रात नमूद केलेली परिस्थिती पाहता, या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर विभागीय आयुक्त (महसूल), औरंगाबाद यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य कार्यवाही हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याचे आत करुन तदनंतर एका महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल विभागीय आयुक्त (महसूल), औरंगाबाद यांनी त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करावी व आपला अनुपालन अहवाल तदनंतर १ महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ०१-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख रज्जाक शेख अनवर, मराठवाडा अध्यक्ष अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन समिती, नांदेड, रा. बडी दर्गा, छोटा दरवाजा, गाडीपुरा, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विभागीय आयुक्त (महसूल), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१००८

निर्णय दिनांक ०१-०३-२००८

श्री. गणेश किशनराव धनले, : अपिलार्थी
डी-९५/२, शिवाजीनगर, सातारा परिसर,
गारखेडा, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा सहाय्यक उपवन संरक्षक,
वनविभाग, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप वनसंरक्षक,
औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गणेश किशनराव धनले हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक उपवन संरक्षक, वनविभाग औरंगाबाद श्री. मोहमद फहमद्दीन महेमूद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, औरंगाबाद श्री. ओमप्रकाश सदाशिवराव चंद्रमोरे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २९-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००४-२००५ या कालावधीतील कामासाठी धान्य या योजने खालील खुलताबाद प्रादेशिक वन क्षेत्रातील अस्वीकृत प्रमाणकाबाबतची खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “ कामासाठी धान्य राष्ट्रीय कार्यक्रम अंतर्गत आपल्याकडील कार्यालय पत्र क्रमांक ३२४४ दि. ०६-०१-२००७ चे श्री. आर. पी. पाटील तत्कालीन वनक्षेत्रपाल यांना उद्देशून लिहीलेल्या पत्रकातील संपूर्ण अभिलेख उपलब्ध करुन देणे ज्या प्रमाणकाची रक्कम ३,३०,४१० /- आहे या कालावधीतील का. धा. रा. का. योजने अंतर्गत झालेल्या मजूरावरील संपूर्ण मस्टरचे देयके (प्रमाणके) उपलब्ध करुन त्याच्या झेरॉक्स प्रती देण्यात यावे. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०४-२००७ रोजी यासंदर्भात प्रथम अपील करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०६-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि सदर सुनावणी ठरलेल्या दिवशी अपिलार्थी गैरहजर असल्यामुळे झाली नाही असे जन अपिलीय अधिकारी यांनी सांगितले. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात दिनांक

२८-०६-२००७ रोजी हजर राहण्याचे पत्र त्यांच्या कार्यालयातून दिनांक १९-०६-२००७ रोजी रजिस्टर पोस्टाने पाठविले असल्याचे आज सुनावणीमध्ये म्हटले आहे. तथापि सदर पत्र अपिलार्थीस पोहोचले किंवा कसे याबाबत उपस्थित जन अपिलीय अधिकारी हे आयोगासमोर कोणताही पुरावा दाखवू शकले नाहीत. अपिलार्थीस पत्र पोहोचल्या बद्दल पोस्टाची पावती किंवा त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीची झेरॉक्स त्यांनी आयोगासमोर आयोगाने पूर्वसूचना देऊन देखील दाखल केली नाही त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सुनावणीस खरोखरच बोलाविले होते किंवा कसे याबाबत आयोग साशंक आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीस अनुसरुन राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०६-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत त्यांना माहिती पुरविली नाही अगर कोणता पत्रव्यवहार केला नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलाची सुनावणी घेतली नाही व कोणताही पत्रव्यवहार केला नाही असे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियमाचा भंग केल्यामुळे त्यांच्यावर कायद्यातील तरतुदीप्रमाणे योग्य ती कारवाई करुन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ नुसार मोफत माहिती देण्याची विनंती त्यांनी आयोगास या अर्जामध्ये केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांनी तो मूळ अर्ज त्यांच्या कार्यालयातील रोहयो शाखेकडे दिनांक २९-०३-२००७ रोजी पाठविला. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना सादर करण्यासाठी त्यांच्या हाताखालील कर्मचा-यांना आदेश दिले होते. तथापि माहिती मिळण्याची वाट न पाहता अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०४-२००७ रोजी या माहितीसंदर्भात प्रथम अपील केले होते. यावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०६-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थीने आता त्यांना दिनांक २७-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये माहिती प्राप्त झाल्याचे कळविले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या अपिलावर दिनांक २८-०६-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थीने दिनांक २७-०६-२००७ रोजी माहिती मिळाल्याचे पत्र सादर केले आहे. त्यामुळे त्यांनी सुनावणी घेतली नाही.

वरील घटनाक्रम, वन विभागाच्या अधिका-यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येईल की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २९-०१-२००७ रोजीच्या मूळ माहितीच्या अर्जाव्दारे मागितलेली माहिती त्यांना अधिनियमातील तरतूदीप्रमाणे दिनांक २८-०२-२००७ रोजी अगर तत्पूर्वी प्राप्त होणे अपेक्षित होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद या ठिकाणी दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील दिनांक १८-०४-२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर या अपील अर्जास ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारीत करणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (६) अन्वये अभिप्रेत होते. तथापि त्यांनी मूळात

सुनावणी दिनांक २८-०६-२००७ रोजी ठेवली. या प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणतीही कारवाई न करुन अनुक्रमे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) व १९ (६) चा निःसंशयपणे भंग केल्याचे या ठिकाणी दिसून येत आहे. अपिलार्थीस त्यांनी दिनांक २७-०६-२००७ रोजी निश्चितपणे कोणती माहिती दिली हे विचारले असता सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीस येतांना दिलेली माहिती आणली नाही असे सांगितले. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस निश्तिचपणे कोणती माहिती दिली, सदर माहिती त्यांच्या मूळ अर्जातील मागणीशी सुसंगत आहे किंवा कसे याबद्दल आयोगास कोणतेही अभिप्राय व्यक्त करता येत नाहीत. त्याचबरोबर प्राप्त झालेल्या माहितीच्या अचूकतेवर अभिप्राय करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत त्यामुळे अपिलार्थीस, त्यांना मूळ अर्जाव्दारे अपेक्षित माहिती मिळाली आहे असे अनुमान आयोग काढत आहे. आता प्रश्न फक्त अपिलार्थीच्या माहितीसंबंधात, जी जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने प्राप्त झाली आहे. अधिनियमातील तरतुदीप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणातील प्रत्येक जन माहिती अधिकारी ३० दिवसाच्या आत माहिती देण्यासाठी बांधील आहे. या ठिकाणी जन माहिती अधिकारी यांनी माहितीच्या मूळ अर्जासंदर्भात विहित मुदतीत कोणताही पत्रव्यवहार न करुन, त्यांना माहिती न देऊन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग केल्याचे निःसंशयपणे सिध्द होते. अपिलार्थीचा दिनांक २९-०१-२००७ रोजीचा त्यांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयातील ज्या शाखेशी संबंधीत होती त्या शाखेकडे दिनांक २९-०३-२००७ रोजी वर्ग केला. अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे दिनांक २९-०१-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे त्यांच्या कार्यालयाने अपिलार्थीस दिलेल्या त्यांच्या मूळ अर्जा-

वरील पोच शिक्क्यावरुन दिसून येते. अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये त्यांनी मागितलेली माहिती ज्या कर्मचा-याशी संबंधीत होती त्यांच्याकडे अर्ज पाठविल्यास देखील जन माहिती अधिकारी यांना २ महिने इतका कालावधी लागला. या ठिकाणी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती देण्यासाठी एकूण ३० दिवसाचा कालावधी अनुज्ञेय असतांना अपिलार्थीचा अर्ज संबंधिताकडे केवळ पाठविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी लावलेला हा कालावधी समर्थनीय आहे असे कोणीही सुज्ञजन म्हणणार नाही. जिथे माहिती एक महिन्याच्या आत द्यावयाची तिथे तो अर्ज संबंधिताकडे कार्यालयातल्या कार्यालयात पोहोचण्यास २ महिने लागावा ही माहितीचा अधिकार अधिनियमातील मूळ विहित तरतूदीची जी माहितीचा अधिकार कायद्याचा गाभा आहे, तिची उघड उघड पायमल्ली आहे असे आयोगाचे मत आहे. जी माहिती अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे २८-०२-२००७ रोजी अगर तत्पूर्वी प्राप्त होणे अपेक्षित आहे तीच माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना एकूण ११९ दिवसांचा विलंब या ठिकाणी लागल्याचे निःसंशयपणे सिध्द होते. या विलंबाचे कोणतेही समर्थन ते आज सुनावणीमध्ये करु शकले नाहीत. किंबहुना या प्रकरणी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या विलबाचे कोणतेही समर्थन असू शकत नाही असे आयोगाचे मत आहे.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अशी माहिती दिली की, अपिलार्थीने ज्या कालावधीमध्ये माहिती मागितली होती त्या कालावधीमध्ये ते या पदावर कार्यरत नव्हते. सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या असमर्थनीय विलंबाबाबत त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश

निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील. अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली असल्याचे त्यांनी दिनांक २७-०६-२००७ रोजीच्या उप वनसंरक्षक यांना उद्देशून लिहिलेल्या पत्रामध्ये कबूल केले असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या असमर्थनीय विलंबाबाबत त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

औरंगाबाद<br>
दिनांक ०१-०३-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गणेश किशनराव धनले, डी-९५/२, शिवाजीनगर, सातारा परिसर, गारखेडा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक उपवन संरक्षक, वनविभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ तत्कालीन संबंधीत जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक उपवन संरक्षक, वनविभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत - मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) औरंगाबाद, कार्यालय वनभवन, उस्मानपूरा, रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद)

४ जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१७५

निर्णय दिनांक : ०१-०३-२००८

१ श्री. शेख नवीद शेख रशीद, : तक्रारदार
हर्षनगर, लेबर कॉलनी,
औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तथा शहर अभियंता,
महानगर पालिका, औरंगाबाद.

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. शेख नवीद शेख रशीद (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता, महानगर पालिका औरंगाबाद यांचे प्रतिनिधी अति.शहर अभियंता यांचे स्वीय सहायक श्री. बोईनवाड बालाजी गंगाराम ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी त्यांचेकडील दि. ०३.१२.२००७ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे अशी तक्रार केली आहे की, त्यांनी महानगरपालिका, औरंगाबाद मधील अधिकारी - अतिरिक्त शहर अभियंता श्री. एम.डी.सोनवणे, उपअभियंता श्री. खमर, कनिष्ठ अभियंता श्री. नितीन गायकवाड व ओ.एस.पवार- यांचेविरुध्द केलेल्या तक्रार अर्जासंदर्भातील चौकशी पूर्ण होऊन उपरोक्त

अधिकारी यांनी व संबंधित कंत्राटदारांनी महानगर पालिका,औरंगाबाद अंतर्गत झालेल्या पाच कामामध्ये अनियमितता केल्याचे चौकशी अंती सिध्द झाले असून, या चौकशी प्रकरणाच्या संचिकेतील सर्व कागदपत्रे त्यांना आता त्वरित हवी असल्याने त्यांनी महानगरपालिकेच्या माहिती अधिकारी यांचेकडे दि. २१.०५.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे माहिती मागितली होती, तथापि ती त्यांना मिळाली नाही व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना खोटी माहिती पुरविली.

महानगरपालिकेकडे वारंवार माहिती मागूनही अद्यापि त्यांना माहिती मिळाली नाही, तसेच जी माहिती त्यांना पुरविली ती माहिती खोटी आहे, असे तक्रारदार यांनी आज सुनावणीचे वेळी सांगितले आहे. महानगरपालिकेच्या जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याचे कारणावरुन त्यांनी मनपाच्या जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील न करता माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये थेट राज्य माहिती आयोगाकडे त्यांना आवश्यक ती माहिती मनपा कडून मिळत नसल्याची तक्रार केली आहे. माहितीचा अधिकार अधिनियमाद्वारे, जर जन माहिती अधिकारी यांचा निर्णय तक्रारदारास मान्य नसेल, तर त्यांनी या अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील करावे, अशी तरतुद आहे व जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय मान्य नसल्यास अर्जदारास राज्य माहिती आयोगाकडे कलम १९(३) खाली अपील दाखल करण्याची तरतुद आहे.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी अधिनियमातील कलम १९(१) चा वापर न करता कलम १८ खाली आयोगाकडे थेट तक्रार केली आहे. तक्रारदाराची सदर कृती योग्य नसून त्यांना जर जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेली माहिती चुकीची व असत्य वाटत असेल तर त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल करुन आपल्या गाऱ्हाण्याचा निपटारा करुन घेण्याचा प्रयत्न करावा. यावर संबंधित जन अपिलीय अधिकारी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे जो निर्णय देतील तो जर त्यांना मान्य नसेल, तर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कलम १९(३) च्या तरतुदीनुसार ते आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील. या द्वितीय अपीलावर योग्य तो निर्णय आयोगामार्फत देण्यात येईल.

प्रसंगावशात येथे असे नमुद करण्यात येते की, तक्रारदारास जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती खोटी वाटत असेल, तर त्यांनी महानगर पालिकेच्या संबंधित प्राधिकरणाकडे या चौकशी संदर्भातील नस्त्या पहाणीसाठी उपलब्ध करुन देण्याबाबत अर्ज करावा म्हणजे त्यांच्या शंकांचे निरसन होण्यासाठी त्यांना मदत होईल.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

<u>**आदेश**</u>

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०१-०३-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख नवीद शेख रशीद,हर्षनगर, लेबर कॉलनी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता, महानगर पालिका औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९४९

निर्णय दिनांक ०३-०३-२००८

श्री. हनुमत गोविंदराव महाजन, : अपिलार्थी
भाग्यनगर, बीड,
तालुका जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा विशेष भूसंपादन अधिकारी,
(जायकवाडी प्रकल्प),
तालुका जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अपर जिल्हाधिकारी,
बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. हनुमंत गोविंदराव महाजन व जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, (जायकवाडी प्रकल्प) श्री. शंकर तुकाराम कावळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १८-१०-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे भूसंपादन मोबदल्यासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ आपल्या कार्यालयाचे LNQ/SR/19/96 अवार्ड मध्ये LAR No. 33/2002 मध्ये जिल्हा न्यायाधीश बीड यांनी वाढीव मावेजा दि. २९-०१-२००५ रोजी मंजूर केला असून त्यावर विधी व न्याय विभाग, औरंगाबाद यांनी आदेश नं. २१४८, दि. ०५-०८-०५ रोजी अपील करण्याबाबत या कार्यालयास आदेशित करण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे या कार्यालयाने अपील दाखल केले किंवा नाही त्याचप्रमाणे निधी मागणी प्रस्ताव शासनाकडे पाठविला किंवा नाही असल्यास त्याचे अपील नंबर व न पाठवला असल्यास कोणाच्या चुकीमुळे शासनास विनाकारण १५ टक्के व्याजदर सहन करावा लागत आहे याबाबत माहिती पुरविण्यात यावी. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस खालीलप्रमाणे उत्तर दिले आहे.

“ वरील अर्जाची उत्तरी कळविण्यात येते की, विधी व न्याय विभागाने एलएआर ३३/०२, १००, १०१/०४ मध्ये दिनांक ५-१०-०५ अन्वये अपील करण्याचा निर्णय घेतला आहे. शासकीय अभियोक्ता उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी अपील दाखल केले किंवा नाही याबाबत माहिती घेऊन पहीले अपील क्रमांक कळविण्यात येईल. निधी मागणी प्रस्तावात पहीले अपील क्रमांक नोंदवून मागणी

प्रस्तावात त्रुटीची पुर्तता करुन प्रस्ताव तात्काळ निधी मागणीसाठी सादर करण्यात येत आहे. ”

तथापि सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नसावे असे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जावरुन दिसते. अपिलार्थीस पाठविण्यात आलेल्या या पत्रावर जा. क्र. लिहिलेला नाही याची येथे नोंद घेण्यात येत आहे. उपस्थित जन माहिती अधिकारी हे त्यांच्या कार्यालयातील जावक क्रमांक नोंदवही आयोगासमोर, आयोगाने नोटीसमध्ये पूर्वकल्पना देऊनही हजर करु शकले नाहीत. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचे दिनांक १४-११-२००६ रोजीचे पत्र खरोखरच पाठविले होते किंवा कसे हे कळण्यास मार्ग नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न दिल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची विनामूल्य मागणी केली असून जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४-१२-२००६ रोजी सुनावणी घेऊन दिनांक १४-१२-२००६ रोजी आपले आदेश पारीत केले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित मुदतीत माहिती दिल्याचे कारण नमूद करुन अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती

आयोगाकडे दिनांक २४-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पुरविलेली माहिती अपूर्ण, खोटी व दिशाभूल करणारी आहे असे नमूद करुन जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली.

आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, अपिलार्थीने मागितलेल्या मुद्दयावर माहिती देतांना जन माहिती अधिकारी यांनी शासकीय अभियोक्ता यांनी अपील दाखल केले किंवा नाही याबाबत माहिती घेऊन पहिले अपील क्रमांक कळविण्यात येईल. तथापि ऑक्टोंबर २००५ मध्ये विधि व न्याय विभागाने आदेश देऊनही या अपिलासंदर्भात त्यांनी कोणतीही माहिती अपिलार्थीस दिलेली नाही व फक्त शासकीय अभियोक्ता उच्च न्यायालय औरंगाबाद यांनी अपील दाखल केले किंवा नाही हे अपिलार्थीस कळविले. सदर अपील क्रमांक जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करेपर्यत देखील कळविला नव्हता. थोडक्यात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली असे त्यांनी या अपील अर्जामध्ये नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते सध्याच्या जन माहिती अधिकारी या पदावर दिनांक १०-११-२००७ पासून कार्यरत आहेत. अपिलार्थीने मूळ माहितीचा अर्ज करतेवेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. अपिलार्थीच्या अर्जावर ते त्वरेने कारवाई करीत आहेत व जिल्हा न्यायाधीशाच्या आदेशाविरुध्द उच्च न्यायालयात त्यांच्या खात्यामार्फत अपील करण्यात आले असून

सदर अपिलाचा क्रमांक ३८३/२००६ असा आहे. न्यायालयाच्या निर्णयानुसार वाढीव मागणी संदर्भात त्यांच्याकडे आवश्यक ती कागदपत्रे आता उपलब्ध झाली असून आवश्यक निधीची मागणी शासनाकडे जिल्हाधिकारी बीड यांच्यामार्फत त्वरेने पाठविण्यात येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली प्रथम अर्जातील माहिती त्यांना याच प्रकरणात त्यांनी केलेल्या वेगळ्या अर्जासंदर्भात दिनांक ११-०७-२००७ रोजीच्या पत्रान्व्ये कळविण्यात आली असून अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणाची सुनावणी घेतली त्यावेळी याबाबतची कल्पना दिली आहे.

जन अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित असल्यामुळे त्यांच्यातर्फे कोणताही युक्तिवाद मांडण्यात आला नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, दाखल केलेल्या क्रमांक LNQ/SR/19/96 अवॉर्ड LAR/33/02 या प्रकरणामध्ये जिल्हा न्यायाधीश बीड यांनी वाढीव मावेजा मंजूर केला आहे. त्यावर विधि व न्याय विभाग औरंगाबाद यांनी क्रमांक २१४८, दिनांक ०५-०८-२००५ रोजी अपील करण्याबाबत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास निर्देशीत करण्यात आले होते. या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने अपील दाखल केले किंवा कसे, निधीबाबत प्रस्ताव शासनाकडे पाठविला किंवा कसे याची माहिती, पाठविला गेला नसल्यास शासनास १५ टक्के व्याज दर सहन करावा लागत आहे याबाबतची मागितली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले की, विधि व न्याय विभागाकडून दिनांक ०५-०८-२००५ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये अपील करण्याचा निर्णय घेतला आहे. शासकीय अभियोक्ता उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी अपील दाखल केले किंवा नाही

याबाबत माहिती घेऊन नंतर अपिलार्थीस अपील क्रमांक कळविण्यात येईल व अपील क्रमांक कळविल्यानंतर निधी मागणीचा प्रस्ताव शासनाकडे तात्काळ कळविण्यात येईल असे कळविले. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी हे पत्र दिनांक १४-११-२००६ रोजी पाठविल्याचे दिसून येते. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपील दाखल झाले असून त्याचा अपील क्रमांक ३८३/०६ आहे असे त्यांना आज उच्च न्यायालयाकडील शासकीय अभियोक्त्याकडून कळाल्याचे आयोगास सांगितले. अपील क्रमांक उपलब्ध नसल्याने त्यांना जिल्हा न्यायालयाच्या निर्णयानुसार वाढीव निधीची मागणी वेळेमध्ये करता आली नाही. मात्र आता सदर मागणी ते शासनाकडे त्वरेने पाठविण्यास तयार आहेत. वाढीव निधीची मागणी येत्या १५ दिवसाच्या आत शासनाकडे पोहोचेल अशी व्यवस्था करण्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले.

या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जरी जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद दिला असला तरी अपिलार्थीस त्यांनी पुरविलेली माहिती अपुरी आहे. एकदा जिल्हा न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर व विधि व न्याय विभागाने जिल्हा न्यायालयाच्या आदेशावर अपील करण्याचा निर्णय घेतल्यानंतर याबाबत काय कारवाई झाली याची माहिती जन माहिती अधिकारी यांना नाही. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, केवळ शास्ती लादली जाऊ नये म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या पत्रावर दिनांक १४-११-२००६ अशी मागील तारीख टाकलेली आहे. थोडक्यात या प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या मूळ माहितीपैकी अपील क्रमांक व शासनाकडे जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी पाठविलेल्या प्रस्तावासंदर्भात माहिती मिळू शकली नाही असे दिसून येते. अपिलार्थीस अपील क्रमांक प्राप्त करुन घेण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने कोणतेही सकारात्मक प्रयत्न केल्याचे आयोगास उपलब्ध करुन

देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. याचबरोबर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने विहित मुदतीत शासनाकडे प्रस्ताव न पाठविल्यामुळे शासनाला आता व्याज सह जो जादाचा भुर्दड पडण्याची शक्यता आहे त्यास देखील जबाबदार जन माहिती अधिकारी असेल असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना हेतू पुरःस्सर चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे म्हटले आहे. तथापि याप्रीत्यर्थ त्यांनी कोणताही पुरावा आयोगासमोर सादर केलेला नाही. मात्र या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपील क्रमांक कळविण्याचे आश्वासीत करुनही त्यांना १५ महिने इतका प्रदीर्घ कालावधी लोटल्यानंतरही त्यांनी अपिलार्थीस अपील क्रमांक न कळवून त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव सिध्द करुन स्वतःला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. अपिलार्थीस आश्वासीत करुनही आवश्यक ती माहिती कळविली नसल्याने संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे व त्यामुळे ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आश्वासीत करुनही माहिती न पुरवून दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर सचिव (महसूल) यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. अपिलार्थीस आता मूळ अर्जातील उर्वरीत माहिती देण्याच्या संदर्भात असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी

केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच जन माहिती अधिकारी यांनी ७ दिवसाच्या आत त्यांना विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच जन माहिती अधिकारी यांनी ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर सचिव (महसूल) यांनी प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत करावी. व आपला अनुपालन अहवाल तदनंतर आयोगास १ महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ०३-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. हनुमत गोविंदराव महाजन, भाग्यनगर, बीड, तालुका जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, (जायकवाडी प्रकल्प), तालुका जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (महसूल), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१००६

निर्णय दिनांक ०३-०३-२००८

श्री. संजय यादवराव वाघचौरे, : अपिलार्थी
मु. पो. विशाल निवास, पं. स. समोर,
यशवंतनगर, पैठण, तालुका पैठण,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उपविभागीय अभियंता,
लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, उपविभाग,
पैठण, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
लघुपाटबंधारे स्थानिक स्तर मंडळ,
औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. संजय यादवराव वाघचौरे हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, उपविभाग, पैठण श्री. शिवाजी माधवराव बोरोळे (यापुढे त्यांना जन

माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर मंडळ यांचे प्रतिनिधी सहाय्यक अधीक्षक अभियंता श्री. जगदीश मारोतराव लिहितकर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०७-०९-२००६ रोजी-च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील मौजे सालवडगाव व खंडाळा येथे पाझर तलावाच्या कामासंदर्भातील, सन २००४-०५ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " १. मौजे सालवडगाव तालुका पैठण येथील पाझर तलाव क्र. २ या कामावर एकूण किती खर्च झाला व मजुराची म. सहीत यादी व तसेच
>
> २. मौजे खंडाळा ता. पैठण येथील पाझर तलाव क्र. २, ३ या कामावर एकूण किती खर्च झाला ? मजुराची मस्टरसहीत याबाबत माहिती. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न पुरविल्याने त्यांनी हे प्रथम अपील केले असल्याचे म्हटले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर दिनांक ११-०४-२००७ रोजी सुनावणी घेतली. सुनावणीसंदर्भात निर्णय देतांना त्यांनी श्री. बोराळे उपविभागीय अभियंता यांच्या झालेल्या चुकीमुळे अपिलार्थी हे माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिले असून त्यांच्यावर दिनांक ०८-१०-२००६ पासून रुपये २५०

/- प्रतिदिनी इतका दंड लावण्याचे आदेश त्यांनी या सुनावणीमध्ये दिले. सदर आदेश त्यांनी दिनांक २४-०४-२००७ रोजी पारीत केले आहेत. या सुनावणीमध्ये संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०४-२००७ पर्यत माहिती देण्याचे मान्य केले असल्याचा उल्लेख जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयामध्ये आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या सुनावणीमध्ये कबूल केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १८-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविली आहे.

अपिलार्थीस पुरविण्यात आलेली माहिती अपूर्ण व खोटी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीस अनुसरुन राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०६-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अपूर्ण व खोटी माहिती प्राप्त झाली असल्याचे म्हटले आहे व याप्रीत्यर्थ त्यांनी अधीक्षक अभियंता यांना पाठविलेल्या दिनांक ०५-०५-२००७ च्या पत्राची प्रत सादर केली आहे. या पत्रात त्यांनी असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विचारलेल्या कामावर एकूण किती खर्च झाला, मजुराची यादी दिली यावर गावाचे नाव किंवा पाझर तलावाचा क्रमांक याचा उल्लेख नाही तसेच संबंधीत गावचे सरपंच व ग्रामसेवक यांनी तहसील कार्यालयाकडे दिलेल्या मजुराच्या यादीतील एकही नाव त्यामध्ये नाही. अपिलार्थीने अधीक्षक अभियंता यांना लिहिलेल्या दिनांक ०५-०५-२००७ रोजीच्या पत्रात जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती खोटी व अपूर्ण असल्याच्या त्यांच्या दाव्याच्या समर्थनार्थ वर उल्लेखिल्याप्रमाणे विवेचन केले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली, सर्व माहिती दिनांक १८-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये पुरविली आहे. त्यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये एकूण खर्च, गावाचे नाव, पाझर तलावाचा क्रमांक इत्यादीचा उल्लेख केलेला आहे. अपिलार्थीचा सदर माहिती खोटी व अपूर्ण असल्याबाबतचा युक्तिवाद त्यांना मान्य नाही. त्यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती त्यांनी केलेल्या कामाप्रमाणे असून ती योग्य व परिपूर्ण आहे. केवळ मानसीक त्रास देण्याच्या दृष्टीने अपिलार्थीने आयोगा-कडे व्दितीय अपील सादर केले आहे. अपिलार्थी हे औरंगाबाद जिल्हा परिषदेचे सदस्य असून माहितीचा अधिकार कायद्यातील तरतुदीनुसार ते नेहमी वेगवेगळी माहिती मागत असतात. सदर प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा अर्ज त्यांच्या कडे प्राप्त झाला नव्हता. अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयातील कर्मचा-यावर दबाव टाकून अपिलार्थीचा अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ संबंधीत लिपिकाची मागील तारखेची सही त्यांच्या मूळ अर्जावर घेतलेली आहे. त्यांच्याकडे कार्यभार खुलताबाद येथील उपविभागाचा असून पैठण येथील उपविभागाचा त्यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी निश्चित कोणती माहिती दिली हे विचारले असता सदर माहिती त्यांच्याकडे आज रोजी उपलब्ध नसल्याचे त्यांनी आयोगास सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दिनांक २०-०४-२००७ पर्यत

माहिती देण्याचे सूचित केले होते व त्याप्रमाणे अपिलार्थीस दिनांक १८-०४-२००७ रोजी माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद, व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रथम अपील निर्णयामध्ये त्यांचेकडील सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न पुरविण्यात आल्याची चूक मान्य केल्याचे म्हटले आहे व त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याचे सिध्द झाले असल्याचा उल्लेख त्यांनी आपल्या निकालपत्रात केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या वर्तनाबाबत वर उल्लेख केल्याप्रमाणे त्यांच्या युक्तिवादामध्ये उल्लेख केलेला आहे. तथापि अपिलार्थीस त्यांनी सत्य माहिती दिली हे सिध्द करण्याकरिता आयोगासमोर त्यांनी कोणताही पुरावा सादर केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्याप्रमाणे जर त्यांच्या कार्यालयातील लिपिकाने अपिलार्थीच्या दबावाखाली मागच्या तारखेत सही करुन पोच दिली असेल तर अपिलार्थीस कथित चुकीची माहिती प्राप्त होण्यासाठी ते संबंधीत लिपीक तितकेच जबाबदार ठरतात असे आयोगाचे मत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) प्रमाणे अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्यासाठी जे त्यांचे इतर कर्मचारी / अधिकारी जबाबदार आहेत त्यांना देखील माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे. हे पाहता या प्रकरणी अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यासाठी त्यांच्या कार्यालयातील जे इतर कर्मचारी अधिकारी जबाबदार आहेत असे सर्व कर्मचारी अधिकारी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीनुसार कारवाई होण्यासाठी पात्र ठरत आहेत. अपिलार्थीने

मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता ती फार क्लीष्ट होती किंवा ती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयातील मनुष्यबळ प्रमाणाबाहेर वळवावे लागत होते अशा कोणत्याही बाबी अपिलार्थीस माहिती देण्यामध्ये उद्‌भवणे शक्य नव्हते. अपिलार्थीने मागितलेल्या २ पाझर तलावासंदर्भातील माहितीमध्ये सदर तलावावर काम करणा-या मजुराच्या हजेरीपटाची फक्त झेरॉक्स अपिलार्थीस पुरवावयाची होती. तथापि ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीपेक्षा ६ महिन्यापेक्षा जास्त विलंब लागला आहे. सदर विलंबाचे कोणतेही समर्थन असू शकत नाही असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी यांचा त्यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती बरोबर आहे हा दावा केवळ वादाच्या प्रयोजनार्थ मान्य केला तरी शेवटी त्यांनी अपिलार्थीस ६ महिने इतक्या विलंबाने माहिती दिल्याने सत्य शेवटी उरते. सबब वर उल्लेख केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी व त्यांचे या कामी सहकार्य करणारे त्यांचे सर्व सहकारी या सर्वानी मिळून अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती पुरविण्याप्रीत्यर्थ -- लावलेल्या असमर्थनीय विलंबाबद्दल त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी नुसार प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक " ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) " या लेखाशीर्षाखाली, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ९० दिवसाच्या आत भरावी. संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांच्यामध्ये या शास्तीच्या रकमेची विभागणी संबंधीत अधीक्षक अभियंता स्थानिक स्तर मंडळ, औरंगाबाद यांनी यथायोग्यरित्या करावी व याबाबतचा आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत पाठवावा. सदर शास्तीची रक्कम शासकीय

कोषागारात भरल्याची अधीक्षक अभियंता स्थानिक स्तर मंडळ, औरंगाबाद यांनी खात्री करुन घ्यावी व हे आदेश निर्गमित झाल्यापासून १०० दिवसाच्या आत याबाबतचा आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याचे अधिकार नसतांना देखील जन माहिती अधिकारी यांना दिनांक ०८-१०-२००६ पासून रुपये २५० /- प्रतिदिनी असा दंड लावल्याचा उल्लेख त्यांच्या दिनांक २४-०४-२००७ रोजीच्या आदेशामध्ये दिलेला आहे. जन अपिलीय अधिकारी यांना, जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याचे माहिती अधिकार अधिनियमामध्ये कोणतेही अधिकार प्रदान केले नसल्याने जन माहिती अधिका-यास शास्ती लावणेपुरता मर्यादित भाग, त्यांच्या दिनांक २४-०४-२००७ रोजीच्या निकालपत्रामधून रद्द करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस पुरविलेल्या त्यांच्या दिनांक १८-०४-२००७ रोजीच्या पत्रात दिलेल्या माहितीची सत्यासत्यता अधीक्षक अभियंता लघुपाटबंधारे स्थानिक स्तर मंडळ औरंगाबाद यांनी पडताळून पहावी व अपिलार्थीच्या म्हणण्यात तथ्य आढळल्यास अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत पुरविण्याची व्यवस्था करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अधीक्षक अभियंता लघुपाटबंधारे स्थानिक स्तर मंडळ औरंगाबाद यांनी, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्या दिनांक १८-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस दिलेल्या माहितीतील अचूकता हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत तपासून अपिलार्थीच्या म्हणण्याप्रमाणे त्यात तथ्य आढळल्यास

त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी व त्यांचे या कामी सहकार्य करणारे त्यांचे सर्व सहकारी या सर्वानी मिळून अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती पुरविण्याप्रीत्यर्थ असमर्थनीय विलंब लावल्याबद्दल माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील विवेचनामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करावा.

औरंगाबाद
दिनांक ०३-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संजय यादवराव वाघचौरे, मु. पो. विशाल निवास, पं. स. समोर, यशवंतनगर, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, उपविभाग, पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
वरिष्ठ कोषागार अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१००७

निर्णय दिनांक ०३-०३-२००८

श्री. मनिष केशरलाल खंडेलवाल, : अपिलार्थी
घर नं. ४/४/१२२, रॉक्सी सिनेमा समोर,
पैठणगेट, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्य अभियंता, म. रा. वि. मं.
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य
वितरण कंपनी मर्यादीत, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता (ग्रा. वि.), म. रा. वि. वि. कं. लि. औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक अभियंता (ग्रा.) मंडळ, म. रा. वि. वि. कं. लि. औरंगाबाद

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मनिष केशरलाल खंडेलवाल व जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (ग्रा. वि.), म. रा. वि. वि. कं. लि.

औरंगाबाद हे गैरहजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता (ग्रा.) मंडळ, म. रा. वि. वि. कं. लि. औरंगाबाद श्री. सोमनाथ नामदेवराव पवार (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २६-०३-२००७ रोजी-च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जून ०६ ते ३/०७ या कालावधीतील त्यांच्या औद्योगिक वापराकरिता वापरात असलेल्या विद्युत मीटर दुरुस्तीसंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " ग्राहक क्र. ४९०५१०२५८७८६ स्थाई बंद मिटर चालू करणे योजना जून ०६ ते ऑगस्ट ०६ माहिती.
>
> १. थकीत बिलाच्या रकमेतून व्याज कमी करुन बील न देणे.
>
> २. दिनांक ५-७-०६ रोजी दिलेले बील भरणे. लाईन किती दिवसात चालू करावयास हवी होती. कार्यवाही आजपर्यत काहीच झाली नाही. (९ महिन्यात) का ?
>
> ३. जागेवरील ट्रान्सफर चौका येथे वापरले आहे.
>
> ४. संबंधीत अभियंताना वेळोवेळी भेटल्यावरही व्यवस्थित उत्तर देण्यात येत नसे. ट्रान्सफार्मरनाही सामान नाही. याचे पैसे भरावे लागतील तोंडी उत्तरे देत. लेखी कळवित नाही.
>
> ५. अधिक्षक अभियंता ग्रामीणकडे ७/१२/०६ ला लेखी अर्ज दिला संबंधीत तक्रार अधिका-यानी उप अभियंताशी चर्चा करुन योग्य कार्यवाही करण्याचे सुचविले (प्रत जोडली).
>
> ६. M.E.R.C. सर्कुलर कमर्शिअल क्रमांक ४३ दि. २७/९/०६ प्रमाणे मुद्दा क्र. ६ प्रमाणे सर्व इन्फ्रास्ट्रक्चर खात्याने करावे असे नमूद केले आहे. त्याचा अर्थ मराठीतून कळवावे (मुद्दा क्र. ४ बाबत). "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने सदर माहिती जन माहिती अधिकारी औरंगाबाद परिमंडळ कार्यालय यांच्याकडून मागविली होती. सदर माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये अधीक्षक अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, संचलन व सुव्यवस्था ग्रामीण मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे कळविले. या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार मुख्य अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांच्याकडे दिनांक ०४-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले.

सदर अपिलावर मुख्य अभियंता यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे अथवा अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची कारवाई केल्याचे दिसून येत नाही. तथापि अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जासंदर्भात दिनांक ०५-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती पुरविली. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील सहाय्यक अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांच्याकडून सदर माहिती दिनांक ३०-०५-२००७ रोजी अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीस अनुसरुन राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०६-२००७ रोजी व्दितीय

अपील केले आहे.  यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नाही, जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही असे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे व त्याचबरोबर आयोगाकडे आवश्यक असलेल्या माहितीच्या संदर्भात जादाची माहिती मागणी केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी हे त्यांच्याकडे औद्योगिक ग्राहक म्हणून नोंदणी झाले आहेत.  अपिलार्थीने संदर्भित केलेल्या मिटरवर त्यांना १९९० साली प्रथम विद्युत जोडणी देण्यात आली.  अपिलार्थीचा विद्युत पुरवठा सन २००१ साली त्यांनी थकीत बिलाची रक्कम रुपये ३६३६२ /- ही महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या कार्यालयात विहित मुदतीमध्ये न भरल्याने कायमस्वरुपी खंडीत करण्यात आला. सदर रक्कम अपिलार्थीने दिनांक ०५-०७-२००६ रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या कार्यालयात भरली.  अपिलार्थीचा विद्युत पुरवठा खंडीत केल्यापासून ते अपिलार्थीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या कार्यालयात थकबाकी भरल्यापर्यतच्या कालावधीमध्ये अपिलार्थीस मुळात विद्युत पुरवठा करण्यासाठी ज्या पायाभूत सोई विद्युत कंपनीतर्फे मुलतः उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या त्या विद्युत कंपनीने काढून घेतल्या होत्या.  विद्युत कंपनीच्या परिपत्रक क्रमांक ५०७, दिनांक २०-०८-१९९२ च्या तरतुदीनुसार एखाद्या ग्राहकाचा विद्युत पुरवठा कायमस्वरुपी खंडीत झाल्यानंतर त्याने प्रलंबीत बिलाची रक्कम विद्युत वितरण कंपनीकडे ६ महिन्याच्या आत भरल्यास त्यांना पायाभूत सुविधासाठी सदर जोडणी नव्याने देत असतांना त्यांना कोणतेही अतिरिक्त शुल्क भरावे लागत नाही.

जर हाच कालावधी ६ महिने ते एक वर्ष इतका असेल तर पायाभूत सुविधाच्या अंदाजित किंमतीच्या ५० टक्के इतके अतिरिक्त शुल्क ग्राहकास विद्युत वितरणाच्या कार्यालयात भरावे लागते. मात्र थकबाकी भरण्यास एक वर्षाहून जास्त कालावधी लावणा-या ग्राहकांना विद्यूत जोडणीसाठी आवश्यक असणा-या पायाभूत सुविधाची पूर्ण किंमत कंपनीकडे प्रथमतः भरावी लागते. या प्रकरणात अपिलार्थीचा विद्युत पुरवठा २००१ साली खंडीत झाला होता. तथापि सदर देयकाची थकबाकी त्यांनी २००६ साली भरली असल्याने सदर मिटरच्या पुर्नजोडणीसाठी त्यांना पायाभूत सोईसाठी आवश्यक ती रक्कम त्यांनी विद्युत कंपनीकडे भरणे भाग आहे तथापि अद्यापही सदरची रक्कम त्यांनी न भरल्याने त्यांनी मूळ थकबाकी भरुनही त्यांचा पुरवठा परत चालू करता आला नाही. सदर रक्कम अपिलार्थीने विद्युत कंपनीकडे भरल्यास सदर पुरवठा पुर्ववत करण्यात येईल, असे स्पष्ट करुन त्यांनी त्यांच्या युक्तिवादाच्या अखेरीस अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिली आहे अशी माहिती आयोगास दिली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या ठिकाणी असे दिसून येईल की, अपिलार्थीने मुलतः जन माहिती अधिकारी यांच्या कडे केलेल्या माहितीसाठीच्या अर्जाचे अवलोकन करता अपिलार्थीने काही माहिती मागण्यापेक्षा या अर्जाव्दारे त्यांचा विद्युत पुरवठा पुनश्च चालू करण्यासंदर्भात केलेली तक्रार या अर्जाव्दारे केली असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी अधिकारी यांच्याकडून एकूण ६ मुद्दयावर माहिती मागविली आहे. याबाबत अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ मधील -- लाईन किती दिवसात चालू करावयास हवी होती, कारवाई आजपर्यत काहीच झाली नाही (९ महिने) का व मुद्दा क्रमांक ६ मधील त्याचा अर्थ मराठीतून कळवावा हे २ मुद्दे वगळता

अपिलार्थीस, त्यांनी केलेल्या तक्रारवरील विविध टप्प्याची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिल्याचे दिसून येते. थोडक्यात अपिलार्थीने मागितलेली माहिती बव्हंशी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) प्रमाणे स्पष्ट केलेल्या माहिती या शब्दाच्या व्याख्येशी जुळत नाही. माहिती या शब्दाची व्याख्या माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये खालील प्रमाणे स्पष्ट केलेली आहे.

**कलम २ (च)**

" "माहिती" याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो. "

वरील व्याख्येचे अवलोकन करता अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील वरील परिच्छेदात उध्दृत केलेले दोन मुद्दे वगळता उर्वरीत माहिती "माहिती" चा विषय होऊ शकत नाही असे आयोगाचे मत आहे. एवढे जरी असले तरी अपिलार्थी-च्या मूळ अर्जाची छाननी न करता जन माहिती अधिकारी औरंगाबाद परिमंडळ कार्यालय औरंगाबाद यांनी घाईघाईने अपिलार्थीचा अर्ज संचलन व सुव्यवस्था ग्रामीण मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे पाठवून दिला. या अर्जावर अधीक्षक अभियंता संचलन व सुव्यवस्था ग्रामीण मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे सदर अर्ज प्राप्त झाल्यापासून अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या मुदतीत त्यांनी अपिलार्थीस आपला निर्णय कळवावयास हवा होता. तथापि त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०५-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये सहाय्यक अभियंता विभाग क्रमांक १ औरंगाबाद यांच्याकडून प्राप्त झालेल्या उत्तराची प्रत अपिलार्थीस दिली आहे. अपिलार्थीस सदर माहितीमध्ये अपिलार्थीचा विद्युत पुरवठा परत का चालू

करता येत नाही याचे स्पष्टीकरण संबंधितांनी दिलेले आहे. मात्र अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या मूळ अर्जातील वरील परिच्छेदात उल्लेखिलेल्या परिच्छेदात मुद्दा क्रमांक २ चा भाग व मुद्दा क्रमांक ६ चा काही भाग अद्यापही अनुत्तरीत राहिला असल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या मूळ अर्जावर संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) मध्ये कारवाई न केल्याने संबंधीत जन माहिती अधिकारी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण मंडळ, मुंबई यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर १ महिन्याच्या आत पाठवावा. अपिलार्थीस त्यांनी केलेल्या मूळ अर्जातील माहिती पुरविण्याच्या संदर्भात असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेली उर्वरीत माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेली उर्वरीत माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३.	संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण मंडळ, मुंबई यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक 	०३-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. मनिष केशरलाल खंडेलवाल, घर नं. ४/४/१२२, रॉक्सी सिनेमा समोर, पैठणगेट, औरंगाबाद.

२	जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (ग्रा. वि.), म. रा. वि. वि. कं. लि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता (ग्रा.) मंडळ, म. रा. वि. वि. कं. लि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५	व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, प्रकाशगढ, बांद्रा, मुंबई – ५१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१००९

निर्णय दिनांक ०३-०३-२००८

श्री. शरद माहादू जाधव, : अपिलार्थी
मथुरा नगर, एन-६, ई-१/३०, सिडको,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याध्यापिका,
मातोश्री रमाबाई आंबेडकर हायस्कूल,
सिडको, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमीक),
जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शरद माहादू जाधव (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, मातोश्री रमाबाई आंबेडकर हायस्कूल, सिडको, औरंगाबाद श्रीमती अनिता पापैय्या गोलकोंडा (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमीक), जिल्हा परिषद, औरंगाबाद श्री.

महंमद अब्दुल खालिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २१-०३-२००७ रोजी-च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००३-२००४ या वर्षामध्ये त्यांच्या संस्थेत शिपाई पदावर झालेल्या भरतीसंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " २००३ ते २००४ च्या दरम्यान शिपाई पदाची झालेल्या भरतीची जाहिराती प्रमाणे मुलाखतीस आलेले उमेदवार, त्या उमेदवारांचा पत्रव्यवहाराची माहिती व निवड समितीचे अंतीम अहवालाची प्रत व जाहिरातीची तसेच सदर भरतीतील माहीती देण्यात यावी. सदर शिपाई पदाची भरती कशी झाली हे पद कसे रिक्त झाले व नविन पद कसे निर्माण झाले याबद्दल संपूर्ण माहिती मिळणेबाबत. "

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थीस खालीलप्रमाणे कळविले.

"२००३-०४ च्या दरम्यान शिपाई पदाची झालेल्या भरतीची जाहिरात, मुलाखतीस आलेले उमेदवार, त्या उमेदवाराचा पत्रव्यवहाराची माहिती व निवड समितीचे अंतीम अहवालाची प्रत याबद्दल संपूर्ण माहिती संस्थेच्या स्तरावर होते."

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०५-२००७ रोजी प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमीक), जिल्हा परिषद औरंगाबाद यांना उद्देशून केले आहे. अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज प्राप्त झाल्यानंतर

शिक्षणाधिकारी (माध्यमीक), जिल्हा परिषद यांनी त्यांच्याकडील दिनांक ११-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस ते या प्रकरणामध्ये अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले नसल्याचे कळविले. शिक्षण विभागाकडील पत्र दिनांक २८-१०-२००५ व शिक्षण उप संचालक यांचे पत्र दिनांक ०३-०२-२००६ नुसार संबंधीत संस्थेचे सचिव हे अपिलीय अधिकारी असल्याचे त्यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या या पत्रामध्ये नमूद केले आहे. या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील संबंधीत संस्थेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविले. सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस उद्देशून लिहून त्याची एक प्रत जन माहिती अधिकारी यांना पाठविली आहे. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज संबंधीत संस्थेच्या सचिवाकडे पाठविण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांच्यावर सोपविली होती. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कडील दिनांक २३-०५-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये अपिलार्थीचा अपील अर्ज संबंधीत संस्थेच्या सचिवाकडे पाठविला. संबंधीत संस्थेचे कार्यालय मुंबई येथे आहे.

अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे अथवा यासंदर्भात अपिलार्थीस पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीस अनुसरुन राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०६-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेली माहिती मुदतीमध्ये, त्यांनी विहित केलेली माहिती पुरविली नाही. त्यांना

सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी जाणुन बुजून दिली नाही असे त्यांचे मत आहे. त्यांनी प्रथम अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी वर्तमानपत्राच्या जाहिरातीची प्रत, उमेदवारांना देण्यात आलेली नेमणूक पत्रे संबंधीत कर्मचा-यांना मुलाखतीस बोलाविलेल्या पत्राची प्रत इतकाच तपशील त्यांच्याकडे उपलब्ध आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती संस्थेच्या मुंबई येथील कार्यालयामध्ये असून त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज व शिक्षणाधिकारी (माध्यमीक), जिल्हा परिषद यांच्याकडून प्राप्त झालेले दिनांक ११-०५-२००७ रोजीचे पत्र हे सर्व संबंधीत संस्थेकडे, अपिलार्थीने मागितलेली माहिती संस्थेकडे ठेवली गेली असल्याने, त्यांच्याकडील दिनांक २३-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये पाठविले आहे. संस्थेकडून त्यांच्या दिनांक २३-०५-२००७ रोजीच्या पत्रावर त्यांना कोणतीही सूचना प्राप्त झाली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येईल की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी सुमारे निम्मी माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे माहिती या शब्दाच्या व्याख्येमध्ये बसत नाही. मात्र उर्वरीत माहिती " २००३ ते २००४ च्या दरम्यान शिपाई पदाची झालेल्या भरतीची जाहिराती प्रमाणे मुलाखतीस आलेले उमेदवार, त्या उमेदवारांचा पत्रव्यवहाराची माहिती व निवड समितीचे अंतीम अहवालाची प्रत व जाहिरातीची तसेच सदर भरतीतील माहीती देण्यात यावी. " हा भाग माहिती या शब्दाच्या व्याख्येत बसतो त्यामुळे सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये म्हणजे दिनांक २०-०४-२००७ रोजी अगर तत्पूर्वी देणे भाग होते. तथापि त्यांनी अपिलार्थीस दिलेल्या दिनांक २०-०४-२००७

रोजीच्या पत्रावरुन त्यांनी अपिलार्थीस अप्रत्यक्षपणे माहिती नाकारल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्याकडे अर्ज केल्यानंतर संस्थेकडून आवश्यक ते अभिलेखे प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी काय प्रयत्न केले हे विचारले असता, त्यांनी या कालावधी मध्ये मुंबईला जाऊन संस्थेच्या कार्यालयातून जाहिरातीची प्रत आणली असे सांगितले. किमान या जाहिरातीची प्रत त्यांच्या दिनांक २०-०४-२००७ रोजीच्या पत्राबरोबर का पुरविली नाही हे विचारले असता त्यांनी कोणतेही उत्तर दिले नाही. त्या मुंबईस नक्की कोणत्या तारखेस गेल्या ते त्यांना आठवत नसल्याचे आयोगासमोर सांगितले. थोडक्यात अधिनियमाव्दारे विहित मुदतीमध्ये अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने त्यांनी केलेली कारवाई अपुरी असल्याचे दिसून येते. याचबरोबर संस्थेच्या सचिवा-कडे त्यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडील दिनांक २३-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये पाठविला. या अर्जावर संबंधीत संस्थेच्या सचिवांनी माहिती देण्यासंदर्भात वा अपिलार्थीच्या अपील सुनावणीसंदर्भात कोणतीही कारवाई केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडे जर अपिलार्थीने मागितलेली माहिती उपलब्ध नव्हती तर त्यांनी अपिलार्थीचा अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (i) अन्वये सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर पाच दिवसाच्या आत (दिनांक २६-०३-२००७ पूर्वी) संबंधिताकडे पाठवावयास हवा होता. तथापि अधिनियमातील अशा महत्वाच्या तरतुदींची अंमलबजावणी देखील त्यांनी अंदाजे २७ दिवसाच्या विलंबाने केली आहे. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या नकारात्मक मानसिकतेमुळे अपिलार्थी त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिले असल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. संबंधीत संस्थेने अपिलार्थीने मागितलेली माहिती संस्थेकडे का ठेवली नाही या तपशीलात आयोग जाऊ इच्छित नाही. मात्र अशाच प्रकारच्या इतर कोणत्याही अर्जदाराने या शाळेमध्ये

माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार येथून पुढे माहिती मागितल्यास त्यांना माहिती संस्थेकडे आहे अशा ठराविक साच्यातील उत्तर संबंधीतांकडून प्राप्त होण्याची शक्यता जास्त आहे. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे सदर कर्मचारी / अधिकारी यांना देखील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी म्हणून संबोधावे अशी तरतूद आहे. या प्रकरणी अपिलार्थीचा दिनांक २१-०३-२००७ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २३-०५-२००७ रोजी संस्थेच्या कार्यालयाकडे पाठविला व त्यावर संस्थेच्या कार्यालयाने कोणतीही कारवाई केली नाही ही त्यांची कृती त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतूदीप्रमाणे कार्यवाही करण्यास त्यांना पात्र ठरविते.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी व अपिलार्थीने मागितलेली माहिती ज्या अधिकारी / कर्मचारी यांच्या ताब्यात आहे अशा सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी अपिलार्थीस माहितीचा अधिकारी अधिनियमा-तील तरतुदीनुसार त्यांनी मागितलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचीत ठेवल्याने त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक " ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) " या लेखाशीर्षाखाली हे आदेश निर्गमीत होताच ९० दिवसात भरावी. सदर शास्तीच्या रकमेची विभागणी संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांच्यामध्ये संबंधीत संस्थेचे अध्यक्ष यांनी हे

आदेश त्यांना प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत यथायोग्यरित्या करावी व याबाबतचा आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत सादर करावा. संबंधीत जन माहिती अधिकारी व संस्थेचे या प्रकरणी जबाबदार कर्मचारी / अधिकारी हे सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात भरतील याची शिक्षणाधिकारी (माध्यमीक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी खात्री करावी व याबाबतचा आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्राप्त होण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांनी, हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. सदर माहिती त्यांनी अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावी.

प्रसंगवशात मुख्याध्यापकांना जन माहिती अधिकारी म्हणून नेमून त्यांच्याकडे आवश्यक ते अभिलेखे उपलब्ध न करुन देण्याची पध्दत इतर शिक्षण संस्थांकडून सुध्दा पाळली जात असल्याची शक्यता नाकारता येत नाही. तेव्हा शिक्षण संचालक (माध्यमिक) पुणे यांनी सर्व मान्यताप्राप्त संस्थेच्या मुख्याध्यापकाकडे जन माहिती अधिका-याकडे आवश्यक अभिलेखे उपलब्ध असतील याची खात्री करुन घेण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सूचना त्यांच्या कार्यक्षेत्रातील शिक्षण संस्थांना द्याव्यात व त्यांचे अनुपालन सर्व संस्था करतील हे पहावे. त्यांच्या आदेशाचे पालन न केल्यास संबंधीत शिक्षण संस्थेवर त्यांनी आवश्यक ती यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. सदर आदेश त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (iv) मधील तरतुदी अन्वये देण्यात येत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जबाबदार असणारे संस्थेचे इतर सर्व कर्मचारी / अधिकारी या सर्वांना मिळून, त्यांनी अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील विवेचनात उल्लेख केल्याप्रमाणे करावा.

४. सदर शास्तीच्या रकमेची विभागणी संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांच्यामध्ये संबंधीत संस्थेचे अध्यक्ष यांनी हे आदेश त्यांना प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत यथायोग्यरित्या करावी व याबाबतचा आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत सादर करावा.

५. संबंधीत जन माहिती अधिकारी व संस्थेचे या प्रकरणी जबाबदार कर्मचारी / अधिकारी हे सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात भरतील याची शिक्षणाधिकारी (माध्यमीक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी खात्री करुन घ्यावी.

औरंगाबाद
दिनांक ०३-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शरद माहादू जाधव, मथुरा नगर, एन-६, ई-१/३०, सिडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, मातोश्री रमाबाई आंबेडकर हायस्कूल, सिडको, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमीक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ अध्यक्ष, पीपल्स एज्युकेशन सोसायटी, मुंबई, आनंद भवन, डॉ. दादाभाई नौरोजी मार्ग, फोर्ट, मुंबई – ४०० ०२३ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ शिक्षण संचालक (माध्यमीक) शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, ससून हॉस्पिटल जवळ, पुणे – ०१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९५०

निर्णय दिनांक : ०३ मार्च, २००८

१ श्री. जितेंद्र बाबाराव रोकडे, : अपिलार्थी
संतकृपा निवास, जिंतूर जि.परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा वन परिक्षेत्र अधिकारी, वन विभाग,
जिंतूर ता. जिंतूर जि.परभणी

२ जन अपिलीय अधिकारी,
उप वन संरक्षक अधिकारी,
वन विभाग, परभणी, जि. परभणी

प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी : सहायक वनसंरक्षक, हिंगोली,
नांदेड रोड, खटकाळी, हिंगोली.

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. जितेंद्र बाबाराव रोकडे (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल),जन माहिती अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, हिंगोली श्री. अनंत मोरेश्वर अवचट, वन परिक्षेत्र अधिकारी जिंतूर, श्री. एच.व्ही. वाळके ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत व उपवनसंरक्षक, परभणी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणात अपीलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचे कडील दि. ११.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील कार्यालयाकडील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" मौजे खरदडी येथे वनिकरण विभाग जिंतूर अंतर्गत सन २००० ते २००६ साली कोणकोणत्या स्वरुपाची कामे झाली व कोणकोणती कामे सुरु आहेत ? प्रत्येक कामावर मजुर संख्या किती ? प्रत्येक कामाचे बजेट किती? मजूरांचा रोजगार किती ? लेखी मिळणेबाबत "

सदर माहिती अपिलार्थी यांनी व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात प्राप्त झाला नसल्याचे त्यांनी आयोगासमोर शपथपत्राद्वारे सांगितले आहे.

जन माहिती अधिकारी यांचेकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत मूळ अर्जास प्रतिसाद न मिळाल्यामुळे, अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) मधील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १२.२.२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थी यांच्या अपीलावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांचेकडून त्यांचे अपील अर्जावर कोणताही निर्णय पारित न झाल्याने व्यथित होऊन, अपीलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे कलम १९ (३) अन्वये दि. ३०.४.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नाही, तर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपीलावर कोणताही निर्णय दिला नाही, त्यामुळे त्यांना हे अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर करावे लागले असल्याचे, त्यांनी या अपीलामध्ये म्हटले आहे. आज रोजी झालेल्या युक्तीवादाचे वेळी अपीलार्थी हे गैरहजर आहेत म्हणून त्यांनी आयोगाकडे त्यांचे अपीलाद्वारे सादर केलेले लेखी म्हणणे, हाच त्यांचा युक्तीवाद समजुन सुनावणी घेण्यात येत आहे.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांचे तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते परभणी जिल्हयाचे जन माहिती अधिकारी असून कोणत्याही अर्जदाराने त्यांना माहिती मागितली असता सहा. वन संरक्षक यांचेकडून माहिती गोळा करुन घेऊन त्यांचेमार्फत ती संबंधितांना पुरविली जाते. उपरोक्त प्रकरणी अपीलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्रथम प्राप्त न झाल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित नसल्यामुळे त्यांचेतर्फे कोणताही युक्तीवाद करण्यात आला नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांचा युक्तीवाद व उपलब्ध करुन दिलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीचा दि. ११.१२.०६ रोजीचा मूळ अर्ज प्राप्त न झाल्यामुळे जन माहिती अधिकारी अपिलार्थीस माहिती देऊ शकले नाहीत. जन अपीलीय अधिकारी यांचेकडे अपीलार्थीचे दि. १२.२.२००७ रोजीचा प्रथम अपील अर्ज प्राप्त झाल्यानंतर तरी त्यांनी अपीलार्थीस कोणती माहिती द्यावयाची आहे याची विचारणा तरी केली होती काय, असे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी विचारले असता त्यांनी अपीलार्थीचा कोणताही अर्ज त्यांचे कार्यालयात प्राप्त झाला नसल्याचे आयोगासमोर शपथपत्राद्वारे सांगितले. अपीलार्थीचा मूळ अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त झाला नसेल असे जरी गृहीत धरले तरी, अपीलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे सादर केलेल्या त्यांच्या दि. १२.२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावरुन अपिलार्थीस आवश्यक माहितीचा शोध जन अपिलीय अधिकारी यांना घेता आला असता व अपीलार्थीस कोणती माहिती आवश्यक आहे, हे कळले असते. एवढेच नव्हेतर अपीलार्थीने त्यांचेकडे दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जामध्ये अपीलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीचा उल्लेख देखील केलेला होता. त्यामुळे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी आपले कर्तव्य जर वेळेवर व्यवस्थित पार पाडले असते तर, कदाचित राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करण्याची वेळ अपीलार्थीवर आली नसती. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यासाठी संबंधित जन अपिलीय अधिकारी जबाबदार आहेत, असे आयोगाचे मत आहे. अपीलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय न देऊन, त्यांनी अधिनियमातील कलम १९(६) चा भंग करुन, त्याद्वारे आपले कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेजबाबदारपणा स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांनी दर्शविलेल्या या प्रकरणातील अशा प्रकारच्या बेजबाबदार वर्तनाची सचिव, (वने) यांनी यथायोग्यरित्या दखल घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. आज सुनावणीचे वेळी उपस्थित असलेल्या जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस आवश्यक

असलेली माहिती त्यांचेकडे तयार असल्याचे आयोगास सांगितले. सदर माहितीचे अवलोकन करता, ही माहिती सकृतदर्शनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील सर्व मुद्यांचा समावेश करणारी आहे, असे दिसून येत आहे. सबब, असे आदेशित करण्यात येते की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

प्रसंगावशात परभणी व हिंगोली जिल्हयातील वन विभागात नक्की जन माहिती अधिकारी कोण व जन अपिलीय अधिकारी कोण याचा स्पष्ट बोध आयोगास झाला नाही, त्यामुळे सचिव, (वने) यांनी या महत्त्वाच्या बाबीमध्ये वैयक्तिक लक्ष घालून परभणी व हिंगोली जिल्हयासाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका करण्याची व्यवस्था करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (वने) यांनी उपरोक्त प्रकरणात संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणाची यथायोग्य रित्या दखल घ्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ०३-०३-२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जितेंद्र बाबाराव रोकडे,संतकृपा निवास, जिंतूर जि.परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी

संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा, उपवनसंरक्षक, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (वने), महसूल व वन विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१६०

निर्णय दिनांक : ०३-०३-२००८

१ श्री. अमृत बापूराव कुसळे, : तक्रारदार
एल.आय.सी. कॉलनी,
नागझरी परिसर,
एम.आय.टी. रोड अंबाजोगाई. जि.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तथा मुख्याध्यापक, खोलेश्वर माध्यमिक विद्यालय,
अंबाजोगाई, जि. बीड

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री.अमृत बापूराव कुसळे (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, खोलेश्वर माध्यमिक विद्यालय, अंबाजोगाई जि. बीड श्री. नेलवाडकर लक्ष्मीकांत मनोहरराव ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेविरुध्द त्यांचेकडील दि. ०४.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे अशी तक्रार केली आहे की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार त्यांनी उत्तरवादी यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठविलेला अर्ज उत्तरवादी यांनी स्वीकारण्यास नकार देऊन आपले कर्तव्यात जाणीवपूर्वक कसूर केला आहे. सदर कसुरीबाबत

त्यांचेविरुध्द आयोगातर्फे कडक कार्यवाही करण्याची व तक्रारदारास नुकसान भरपाई देण्याचे आदेशित करण्याची विनंती आयोगास पुढे केली आहे. आपल्या म्हणण्याप्रीत्यर्थ त्यांनी त्यांना प्राप्त झालेल्या बंद पाकीटाची झेरॉक्स प्रत सोबत जोडली आहे.

तक्रारदाराच्या तक्रारीवर उत्तरवादी यांचे असे म्हणणे आहे की, सदर प्रकरण ज्यावेळी घडले त्यावेळी श्री. रा. म. जावळे हे जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते. तक्रारदार यांनी केलेला माहितीसाठीचा अर्ज पोस्टमनने टपालाद्वारे शाळेत आणला होता. तक्रारदारानी पाठविलेले टपाल श्री. रा.म.जावळे यांच्या नावावर असल्यामुळे व दि. ७.११.२००६ ते ११.११.२००६ या कालावधीत श्री. जावळे हे रजेवर असल्याने, सदर पत्राची तामिली श्री.जावळे यांना होऊ शकली नाही. श्री. जावळे हे शाळेत उपस्थित नसल्याने या कालावधीमध्ये पोस्टमन सदर टपाल त्यांना देऊ शकले नाहीत. त्यामुळे त्यांना सदर टपाल प्राप्त होऊ शकले नाही. श्री. जावळे ज्यावेळी शाळेत उपस्थित झाले त्यावेळी त्यांची व पोस्टमन यांची भेट होऊ शकली नाही. मधल्या कालावधीत संबंधित टपाल, टपालखात्याने तक्रारदारास परत पाठविले. तत्कालीन उत्तरवादी श्री. जावळे यांची कृती, तक्रारदार यांच्या म्हणण्यानुसार, तक्रारदारास माहिती न देण्याच्या उद्देशाने त्यांचे हातून, जाणीवपूर्वक घडविलेली आहे, अशी वस्तुस्थिती नाही. आज उपस्थित असलेले उत्तरवादी यांनी तत्कालीन उत्तरवादी श्री. जावळे हे दि. ७.११.२००६ ते ११.११.२००६ या कालावधीत गैरहजर असल्याचा पुरावा म्हणून त्यांनी आयोगास उपस्थितीपटाची झेरॉक्स प्रत सादर केली. सदर हजेरीपत्रावरुन श्री. जावळे हे दिनांक १०.११.२००६ रोजी शाळेला हजर असल्याचे दिसून येते, यावर उत्तरवादी यांना स्पष्टीकरण विचारले असता, त्यांनी असे सांगितले की, त्या दिवशी श्री. जावळे हे सकाळी ११.०० वाजता हजर झाले व पोस्टमन टपाल घेऊन १० वाजताच परत गेला त्यामुळे सदर टपाल श्री. जावळे यांना मिळू शकले नाही. उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादामध्ये तथ्यांश आढळल्याने, तत्कालीन उत्तरवादी यांनी तक्रारदाराचा अर्ज घेण्यासाठी कोणताही असद्हेतूने नकार दिला अथवा टाळाटाळ केली असे आयोगास वाटत नाही. उत्तरवादी यांनी आयोगासमोर केलेल्या खुलाशामध्ये पुढे असेही सांगितले की, तक्रारदारास त्यांना आवश्यक ती माहिती त्यांनी याच विषयावर केलेल्या दुसऱ्या इतर अर्जासंदर्भात दिलेली आहे. त्यांनी आयोगास पुढे असेही सांगितले की, तक्रारदाराच्या गाऱ्हाण्यांचा पूर्णपणे निपटारा करुन, तक्रारदारास आवश्यक ती देयके देखिल अदा करण्यात आली आहेत. तक्रारदारास आवश्यक असलेल्या माहितीच्या दृष्टीने आयोगातर्फे तक्रारदार यांनी केलेल्या माहितीसाठीच्या दि. ३०.१०.२००७ रोजीच्या त्यांच्या प्रथम अर्जाची झेरॉक्स प्रत उत्तरवादी यांना देण्यात आली. उत्तरवादी हे

या अर्जामध्ये तक्रारदाराने मागणी केलेली माहिती तक्रारदारास ७ दिवसाचे आत विनामूल्य देण्यास तयार आहेत, हे पाहता, असे आदेशित करण्यात येते की, उत्तरवादी यांनी तक्रारदारास त्यांनी दि. ३०.१०.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

तक्रारदाराच्या म्हणण्याप्रमाणे उत्तरवादी यांनी तक्रारदाराचा अर्ज न स्वीकारण्याची कृती जाणीवपूर्वक केली असल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने, उत्तरवादी यांचेवर प्रशासकीय कार्यवाही करण्याची तक्रारदार यांची विनंती मान्य करता येणार नाही. तक्रारदारास झालेल्या नुकसानीबद्दल व हानीबद्दल त्यांनी आयोगाकडे कोणताही निश्चित पुरावा सादर न केल्याने तद्वतच ते आज सुनावणीस हजर न राहिल्याने याबाबत आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०३-०३-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अमत बापूराव कुसळे, एल.आय.सी. कॉलनी, नागझरी परिसर, एम.आय.टी.रोड, अंबाजोगाई, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, खोलेश्वर माध्यमिक विद्यालय, अंबाजोगाई जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८८१

निर्णय दिनांक ०४-०३-२००८

श्री. मोमीन इमाम घुडूसाब, : अपिलार्थी
मोमीन गल्ली, मेन रोड, मु. पो. लोहारा,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तहसीलदार, लोहारा,
जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी (महसूल),
उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मोमीन इमाम घुडूसाब हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, लोहारा श्री. वसंत शंकरराव पवार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल) श्री. विकास वामनराव नाईक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ३०-११-२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ०१-०१-२००० ते ०१-११-२००५ या कालावधीतील रोजगार हमी योजना अंतर्गत करण्यात येणा-या गहू वाटपासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “ लोहारा तालुक्यातील दिनांक ०१-०१-२००० ते ०१-११-२००५ पर्यत रोजगार हमी योजनेच्या गहू मागणीपत्र कोणकोणत्या कार्यालयांनी आपल्या कार्यालयास सादर केले त्याच्या छायांकीत प्रती देणे. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. या अर्जामध्ये अपिलार्थी यांनी ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याचा पुरावा सोबत जोडला असल्याचे म्हटले होते.

अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षतः दिनांक ०१-१२-२००५ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या या अर्जावर दिनांक ०५-१२-२००५ रोजी जन माहिती अधिकारी यांनी पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला. त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती संबंधीत कार्यालयाकडून मागणी करणे योग्य होईल असे सूचित केले तसेच याविषयावरील माहिती अपिलार्थीस दुस-या एका प्रकरणासंदर्भात यापूर्वी प्राप्त झाली असल्याचा त्यांनी या पत्रामध्ये उल्लेख केला आहे. थोडक्यात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०५-१२-२००५ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जास सकारात्मक प्रतिसाद दिला नसल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. सदर अपिलाची प्रत आज संबंधीत जन अपिलीय

अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यात आली. या अपील अर्जात त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक २५-०४-२००६ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक ३०-०४-२००६ रोजी पारीत केले. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थी यांनी त्यांना एक वर्षाची माहिती जरी प्राप्त झाली तरी चालू शकेल असे लेखी पत्र दिल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी अपिलार्थीस जानेवारी २००५ ते डिसेंबर २००५ या कालावधी तील माहिती निःशुल्क देण्याचे सूचित केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक ३०-०४-२००६ रोजीच्या अपील निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २९-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये १८९ पृष्ठांची, जानेवारी २००५ ते डिसेंबर २००५ या कालावधीतील माहिती अपिलार्थीस विनामूल्य देऊ केली. अपिलार्थीने सदर माहिती दिनांक ०२-०६-२००६ रोजी हस्तगत करुन घेतली.

अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती मिळण्यापुर्वीच अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नसल्याचे व जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे कारवाई झाली नसल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी जानेवारी २००५ ते डिसेंबर २००५ या एक वर्षाची माहिती निःशुल्क देण्याची विनंती केल्यावरुन त्यांनी अपिलार्थीस सदर माहिती दिनांक २९-०५-२००७ रोजीच्या पत्राने पाठविली. सदर माहिती अपिलार्थीस दिनांक ०२-०६-२००६ रोजी प्राप्त झाली. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असल्याने त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०५-१२-२००५ रोजीच्या पत्रान्वये सदर माहिती सदर यंत्रणेकडून प्राप्त करुन घेण्यासाठी सुचविले होते. अपिलार्थीच्या दिनांक ०५-१२-२००५ रोजीच्या पत्राची प्रत तालुक्यातील त्यांना अभिप्रेत असलेल्या विविध यंत्रणांना दिली होती किंवा कसे याची विचारणा केली असता त्यांनी आयोगास नकारार्थी उत्तर दिले.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना प्राप्त झालेल्या या अपील अर्जावर त्यांनी दिनांक २५-०४-२००६ रोजी सुनावणी घेतली असता सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती मोठी असल्याचे कारण त्यांच्या युक्तिवादामध्ये केल्याने व त्याच वेळी अपिलार्थी यांनी जानेवारी २००५ ते डिसेंबर २००५ या कालावधीतील माहिती त्यांना मिळाली तरी पुरेल असे युक्तिवादामध्ये तोंडी सांगितल्यावरुन व तशा अर्थाची विनंती दिनांक २५-०४-२००६ रोजी अपिलार्थीने त्यांना लेखी केल्यावरुन त्यांनी आदेश देतांना अपिलार्थीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीच्या व्याप्तीमध्ये बदल करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस जानेवारी २००५ ते डिसेंबर २००५ या कालावधीमधील माहिती देण्याचे आदेशीत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या

प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये पूर्णतः नकारात्मक प्रतिसाद दिला आहे. अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती अपिलार्थीने संबंधीत यंत्रणाकडून प्राप्त करुन घ्यावी ही जन माहिती अधिकारी यांनी घेतलेली भूमिका आयोगास मान्य नाही कारण रोजगार हमी योजनेखाली विविध कार्यकारी यंत्रणांना आवश्यक असणारी मागणी प्रथमतः त्यांच्या स्तरावर एकत्रित केली जाते व तदनंतर ती शासनाकडे जिल्हाधिका-यामार्फत पाठविले जाते, असे असतांना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती संबंधीत यंत्रणांकडून प्राप्त करुन घेण्याची सूचित करण्याची त्यांची कृती माहितीचा अधिकार अधिनियमाच्या मूलतत्वाला छेद देणारी आहे असे आयोगाचे मत आहे जर त्यांना अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्राप्त व्हावी अशी इच्छा असती तर अपिलार्थीस लिहिलेल्या दिनांक ०५-१२-२००५ रोजीच्या पत्राच्या प्रती त्यांनी संबंधीत कार्यकारी यंत्रणांना दिल्या असत्या. तथापि येथे जन माहिती अधिकारी यांनी तशी कारवाई केल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर त्यांनी कारवाई केली ती जन अपिलीय अधिकारी यांचे दिनांक ३०-०४-२००६ रोजीचे आदेश त्यांना प्राप्त झाल्यानंतरच. अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०५-१२-२००५ रोजी दिलेल्या पत्रानंतर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०४-२००६ रोजी सुनावणी होईपर्यतच्या मधल्या कालावधीत अपिलार्थीस माहिती देण्याकरिता त्यांनी कोणताही अन्य सकारात्मक प्रयत्न केल्याचे आयोगास येथे आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांचा दिनांक ३०-०४-२००६ रोजीच्या आदेश प्राप्त झाल्यानंतरही त्यांनी अपिलार्थीस दिनांक २९-०५-२००६ रोजी एक वर्षाची माहिती देण्याकरिता एक वर्षाचा कालावधी लावला यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात प्रथमपासूनच कोणतीही सकारात्मक भूमिका घेतली नसल्याचे सिध्द

होत आहे. मुळात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलाच्या सुनावणीमध्ये अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या व्याप्तीमध्ये, एक वर्षाची माहिती उपलब्ध करुन दिली तरी चालेल हा त्यांचा युक्तिवाद देखील जन अपिलीय अधिकारी यांनी विचारात घेण्यासारखा नव्हता. तथापि खुद्द अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांना, त्यांनी, त्यांना जानेवारी २००५ ते डिसेंबर २००५ या एका वर्षाची माहिती देखील चालू शकेल अशी लेखी विनंती करुन आपल्या मूळ माहितीच्या व्याप्तीमध्ये प्रथम सुनावणीच्या वेळी बदल केला. अपिलार्थी च्या विनंतीवरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस बदललेल्या स्वरुपात माहिती दिली. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही त्यांना माहिती प्राप्त झाली नसल्याचे म्हटले आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेला व्दितीय अपील अर्ज दिनांक ०१-०६-२००६ रोजीचा आहे त्याची नोंदणी आयोगाच्या कार्यालयात १०-०६-२००६ रोजी झालेली आहे. अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज केल्यानंतर लागलीच दुस-या दिवशी दिनांक ०२-०६-२००६ रोजी अपिलार्थी यांना आवश्यक असलेली व बदलेली व्याप्ती असलेली माहिती प्राप्त झाली. अपिलार्थीने त्यांना आवश्यक माहिती प्राप्त झाल्याचे, व या प्रकरणासंदर्भात त्यांची काहीही तक्रार नसल्याचे अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडील दिनांक ०३-०६-२००६ रोजीच्या पत्रावर लिहून दिले आहे. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज केल्यानंतर त्यांना दुस-या दिवशी जन माहिती अधिकारी यांच्या कडून माहिती प्राप्त झाली. अपिलार्थीने मूळ अर्जामध्ये मागणी केलेली व तदनंतर सुधारित स्वरुपात मागितलेली माहिती अपिलार्थीस आता प्राप्त झाली असल्याने व सदर माहितीबाबत अपिलार्थी यांची कोणतीही तक्रार नसल्याने आयोगास अपिलार्थीच्या व्दितीय अपील अर्जावर कारवाई करण्याचे कोणतेही कारण आता उरले नाही त्यामुळे अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत

आयोग आला आहे.  अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यासाठी लागलेल्या विलंबाबाबत अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये कोणताही मुद्दा उपस्थित केला नाही. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न देऊन व माहिती देण्याच्यासंदर्भात प्रथम नकारात्मक भूमिका घेतल्याबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून येथून पुढे माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणा-या अर्जावर त्यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन कारवाई करावी अशी सूचना त्यांना देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे या प्रकरणी त्यांनी सुरुवाती-पासून घेतलेल्या नकारात्मक भूमिकेबद्दल सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०४-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोमीन इमाम घुडूसाब, मोमीन गल्ली, मेन रोड, मु. पो. लोहारा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, लोहारा, जिल्हा उस्मानाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८९१

निर्णय दिनांक ०४-०३-२००८

श्री. देशमुख हनुमंत वसंतराव, : अपिलार्थी
व्दारा- कनकदंडे निवास, सरकारवाडा,
अंबावेस, परळी वै. तालुका परळी वै.
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा प्राचार्य, स्वामी विवेकानंद वरिष्ठ
महाविद्यालय, मंठा, तालुका मंठा, जिल्हा
जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा प्राचार्य, स्वामी विवेकानंद वरिष्ठ
महाविद्यालय, मंठा, तालुका मंठा, जिल्हा
जालना

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यालय अधीक्षक, स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय, मंठा, तालुका मंठा, जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी : प्राचार्य, स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय, मंठा, तालुका मंठा, जिल्हा जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. देशमुख हनुमंत वसंतराव (यापुढे

त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय, मंठा यांचे प्रतिनिधी प्रा. गहिलोद किशन रणसिंग (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय, मंठा हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २९-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या स्वतःच्या सेवा व वेतनासंदर्भात १९९३ ते २९-११-२००६ पर्यतच्या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ १. प्रा. देशमुख एच. व्ही. समाजशास्त्र अधिव्याख्याता या पदावर स्थानिक समितीव्दारा १९९३-९४ मध्ये तासिका तत्वावर व १९९४-९५ मध्ये पूर्णवेळ पदावर निवड समिती अहवाल सत्यप्रत.

२. प्रा. देशमुख एच. व्ही. यांना दोन वर्ष सलग अध्यापन सेवा झालेली असतांना कोणत्या विद्यापीठ व शासन नियमानुसार अपात्र ठरविण्यात आले त्या नियमांची सत्यप्रत.

३. प्रा. देशमुख एच. व्ही. यांना तासिका मानधन दिल्याबद्दल पगारपत्रक / व्हाऊचर चेक/इ. वर स्वाक्ष-या (प्रा. देशमुख एच. व्ही. यांच्या) केल्याचा पुराव्याची सत्यप्रत व १९९४-९५ या शै. वर्षात पूर्णवेळ पदावर अध्यापन सेवा वेतन दिल्याबद्दल पगार/व्हाऊचर/चेक इ. वर स्वाक्ष-या (प्रा. देशमुख एच. व्ही. यांच्या) केल्याचा पुराव्याच्या सत्यप्रती.

४. १९९४-९५ या शैक्षणिक वर्षात पूर्णवेळ कार्यरत प्राध्यापकांच्या स्वाक्षरीचे उपस्थितीपटाच्या सत्यप्रती.

५. तासिका तत्वानुसार अधिव्याख्यात्यांना शासनाकडून शै. वर्षात एकूण किती महिन्यांचे मानधन देण्यास परवानगी आहे त्या शासन नियमाची सत्यप्रत.

६. महाविद्यालयात समाजशास्त्र अधिव्याख्याता या पदावर १९९३-९४ व १९९४-९५ या कालावधीत कार्यरत अधिव्याख्यांताचे संपूर्ण नांव व शै. पात्रता इ. लेखी स्वंयस्पष्ट खुलासा.

७. समाजशास्त्र या विषयाकरिता एम. एस. डब्ल्यू (बी+), स. जी. सी. (सेट) समाजशास्त्र आणि पात्रताधारकास ''अधिव्याख्याता'' या पदावर नियूक्ती देता येते किंवा नाही याबाबत लेखी व स्वंयस्पष्ट शासन व विद्यापीठ नियम खुलासा.''

अपिलार्थीने सदर माहिती शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे याच विषयावर दिनांक २७-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने त्यांना अधिनियमातील तरतुदीनुसार शास्ती लावण्याची व अपिलार्थीस सत्य माहिती देण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर, कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती दिली नाही तर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारचा निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीस अनुसरुन राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती दिली नाही, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही असे नमूद करुन त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार आवश्यक ती कारवाई करण्याचे सूचित केले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जावदारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक असून जन माहिती अधिकारी यांना सदर माहिती सत्वर देण्याचे आयोगाने आदेशीत करावे व त्यांनी मूळ अर्ज केल्यानंतर अधिनियमातील कालावधी ओलांडून गेल्यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे योग्य ती कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे कोणताही युक्तिवाद करण्यात आला नाही त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे पाठविलेल्या दिनांक २०-०२-२००८ च्या या विषया संदर्भातील पत्राचा फक्त एकदा उल्लेख केला.

जन अपिलीय अधिकारी हे सुनावणीस उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता येथे असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी दिनांक २९-११-२००६ रोजी केलेल्या अर्जास अधिनियमातील तरतुदीन्वये विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद न देऊन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग केला आहे तर जन अपिलीय अधिकारी यांनी प्राप्त झालेल्या अपील अर्जावर विहित मुदतीत कोणताच निर्णय न देऊन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (६) चा भंग केलेला आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे काही माहिती पाठविली आहे. वास्तविकतः अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस परस्पर देणे अधिनियमातील तरतुदीमध्ये अपेक्षित आहे. राज्य माहिती आयोगाचे कामकाज अर्धन्यायिक स्वरुपाचे असून कोणत्याही अर्जदारांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती घेऊन पुरविणे हे आयोगाचे काम नाही. अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती विहित मुदतीत न देऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांचे उपस्थित प्रतिनिधी हे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात व अपिलार्थीच्या अपील निर्णयावरील कारवाईसंदर्भात आयोगास कोणतीही माहिती देऊ शकत नाही. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी याविषयावर भाष्य करण्यास पूर्णतः असमर्थ आहेत असे आयोगास आढळून आले आहे. त्यांना त्यांच्या महाविद्यालयामध्ये जन माहिती अधिकारी कोण हे देखील आयोगास सांगता आले नाही. एकूणच या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी, कोणत्याही समर्थनीय कारणा-

शिवाय अधिनियमातील विहित कालावधीपेक्षा जास्त कालावधीसाठी वंचित ठेवल्याचे येथे निःसंशयपणे सिध्द होत आहे व त्याचबरोबर त्यांनी स्वतःला माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्यासाठी पात्र ठरविले आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील. अपिलार्थीस त्यांनी केलेल्या मूळ अर्जातील माहिती पुरविण्याच्या संदर्भात असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्याप्रित्यर्थ कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अधिनियमातील विहित कालावधीपेक्षा जास्त कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील.

औरंगाबाद
दिनांक ०४-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. देशमुख हनुमंत वसंतराव, व्दारा- कनकदंडे निवास, सरकारवाडा, अंबावेस, परळी वै. तालुका परळी वै. जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय, मंठा, तालुका मंठा, जिल्हा जालना यांना या निकालपत्रा-तील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय, मंठा, तालुका मंठा, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९५२

निर्णय दिनांक ०४-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| श्री. अशोक वामनराव बनकर,<br>ॲड पैठणे यांचा वाडा, नूतन कॉलनी,<br>औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उपसंचालक भूमी अभिलेख,<br>औरंगाबाद | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जमाबंदी आयुक्त आणि संचालक,<br>भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | कार्यालय अधीक्षक, उपसंचालक भूमी अभिलेख औरंगाबाद प्रदेश औरंगाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : | उपसंचालक भूमी अभिलेख औरंगाबाद प्रदेश औरंगाबाद |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अशोक वामनराव बनकर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कार्यालय

अधीक्षक, उपसंचालक भूमी अभिलेख औरंगाबाद प्रदेश यांचे प्रतिनिधी वरिष्ठ लिपीक श्री. अनिल सिताराम साळूंके (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक भूमी अभिलेख औरंगाबाद प्रदेश यांचे प्रतिनिधी सलंग्न अधीक्षक भूमी अभिलेख सौ. सिमा मा. देशमुख (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०८-०१-२००७ रोजी-च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे १९८३ ते १९८७ या कालावधीतील स्वातंत्र्य सैनिकांच्या आधारे नियुक्त केलेल्या कर्मचा-यांच्या बाबत खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " आपल्या कार्यालया अंतर्गत भरती करण्यात आलेल्या १९८३ ते १९८७ या कालावधीत स्वातंत्र्य सैनिकाच्या बेसवर केलेल्या कर्मचा-यांचे यादी छायांकीत प्रत (३५० कर्मचा-यांची यादी प्रमाणपत्रासह देण्यात यावी). "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती संबंधीत अधीक्षक भूमी अभिलेख व प्राचार्य भूमी अभिलेख प्रशिक्षण शाळा औरंगाबाद यांच्याकडून मागवून एकत्र करण्यात येत असल्याचे अपिलार्थीस कळविले व त्याचबरोबर सदर माहिती प्राप्त होताच अपिलार्थीस ती पुरविण्यात येईल असे कळविले. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही. सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस साध्य पोस्टाने पाठविले होते. सदर पत्र अपिलार्थीस पाठविल्याप्रीत्यर्थ त्यांनी त्यांच्याकडील जावक नोंदवहीची झेरॉक्स प्रत आयोगास दाखविली.

जन माहिती अधिकारी यांच्या जावक नोंदवहीवर अपिलार्थीस सदर दिनांक २९-०१-२००७ रोजीचे पत्र प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीने दिनांक २९-०१-२००७ रोजी सही केल्याचे दिसून येते. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी परत अपिलार्थीस दिनांक २०-०२-२००७ रोजी पत्र पाठवून अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात शोध घेउनही उपलब्ध होत नसल्याचे अपिलार्थीस कळविले.

मध्यंतरीच्या काळात त्यांनी त्यांच्या अधिनस्त जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांच्याकडून अपिलार्थीने मागितलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयाकडील दिनांक २५-०१-२००७, २९-०१-२००७ व ०७-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रयत्न चालू ठेवले होते. त्यास प्रतिसाद म्हणून जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०२-२००७ ते २०-०३-२००७ या कालावधीमध्ये माहिती पाठविली होती.

मध्यंतरीच्या काळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा अपिलार्थीशी यासंदर्भात पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

याच दरम्यान जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांच्याकडून माहिती संकलीत झाली असल्याने सदर माहिती रुपये २०० /- इतक्या शुल्काचा भरणा करुन घेऊन जाण्यासाठी अपिलार्थीस त्यांनी दिनांक २०-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविले. सदर पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस काही माहिती देऊ केली असल्याचे दिसून येत आहे. याचा अर्थ जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस

दिनांक २०-०३-२००७ रोजीच्या पत्रामध्ये देऊ केलेली माहिती पूर्ण नव्हती असे दिसून येते. सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २१-०३-२००७ रोजी पाठविल्याप्रीत्यर्थ त्यांनी त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीची संबंधीत कालावधीची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संदर्भिय दिनांक २०-०३-२००७ रोजीचे पत्र दिनांक २१-०३-२००७ रोजी पाठविले असल्याचे दिसून येते. सदर माहिती त्यांनी अपिलार्थीस देण्यासाठी अपिलार्थीकडे रुपये २०० /- इतके शुल्क त्यांच्याकडे त्यांच्या कार्यालयात भरण्यासाठी विनंती केली होती. तथापि अपिलार्थी यांनी सदर शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरले नाही. तदनंतर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील वरिष्ठ लिपिक श्री. व्ही. जी. काळे जे त्यावेळी सहाय्यक माहिती अधिकारी होते त्यांनी अपिलार्थीस दिनांक १०-०५-२००७ रोजी त्यांनी मागितलेली माहिती समक्ष घेऊन जाण्याविषयी तोंडी सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने त्यांच्या सुचनेप्रमाणे कोणतीही कारवाई केली नाही असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही हवी असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती न दिल्याबद्दल माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार त्यांचेवर शास्ती लावण्यात

यावी.  अपिलार्थी यांनी आयोगास असाही युक्तिवाद केला की, त्यांना अपेक्षित असलेली माहिती घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात वारंवार गेले होते.  तथापि या संदर्भातील पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना त्यांच्या अधिनस्त असलेल्या जिल्हा स्तरावरील कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावी लागणार होती.  अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्या अधिनस्त जिल्हा स्तरावरील सर्व कार्यालयांना दिनांक २५-०१-२००७, २९-०१-२००७ व ०७-०२-२००७ रोजी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसंदर्भात अवगत केले व अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालया-कडून मागवून घेतली.  सर्व संबंधीत कार्यालयाने त्यांच्याकडे ही माहिती १५-०२-२००७ ते २०-०३-२००७ या कालावधीमध्ये पाठविली.  सदर माहिती संकलीत झाल्यानंतर त्यांनी दिनांक २१-०३-२००७ रोजी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे संकलीत करुन सःशुल्क उपलब्ध असल्याचे कळविले.  तथापि अपिलार्थीने या संबंधीत शुल्काचा भरणाही केला नाही व या संदर्भात अपिलार्थी त्यांच्याकडे कधीही उपस्थित झाले नाहीत.

जन अपिलीय अधिकारी हे सुनावणीस वीना परवानगी गैरहजर राहिल्याने त्यांच्यातर्फे कोणताही युक्तिवाद आयोगासमोर करण्यात आला नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या ठिकाणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०८-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती सरळ व सोपी होती.  तथापि जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहितीचे व्यवस्थापन निटपणे केले नसल्याने त्यांना अपिलार्थीस ही माहिती देता आली नाही.  त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २९-०१-२००७, २०-०२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे

अपिलार्थीस नकारात्मक प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीस माहिती देण्याकरिता त्यांनी प्रथमतः दिनांक २५-०१-२००७ रोजी संबंधीत अधिका-याकडे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसंदर्भात प्रथम विचारणा केली तदनंतर १५-०२-२००७ ते २०-०३-२००७ या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या अधिनस्त असलेल्या जिल्हा पातळीवरील अधिका-यांकडून सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाली. सदर माहिती संकलीत होताच अपिलार्थीस सदर माहितीपोटीचे रुपये २०० /- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे त्यांच्याकडील दिनांक २१-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नसल्याचे अपिलार्थी यांनी आज सुनावणी मध्ये सांगितले. तथापि सदर पत्र अपिलार्थीस पोस्टाने पाठविल्याप्रीत्यर्थ पुरावा सादर केला असून सदर पुरावा ग्राह्य धरण्यात येत आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती सर्वसाधारण परिस्थितीत अपिलार्थीस दिनांक ०६-०२-२००७ रोजी अगर तत्पूर्वी प्राप्त होणे हे अधिनियमातील विहित तरतुदीप्रमाणे अभिप्रेत होते. तथापि त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही. जन माहिती अधिका-यास अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या अधिनस्त असलेल्या जिल्हा स्तरावरील वेगवेगळ्या अधिका-यांकडून प्राप्त करुन घ्यावयाची होती त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जिल्हा स्तरावरील जन माहिती अधिकारी यांचे अधिनस्त असलेले अधिकारीही अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देण्यासाठी जबाबदार ठरतात. अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांना सदर माहिती अपिलार्थीस पुरविण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे इतर कर्मचारी / अधिकारी यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) मध्ये तरतूद आहे. ही तरतूद पाहता या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविण्याप्रीत्यर्थ संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांना सहाय्य करणारे

त्यांचे इतर अधिकारी हे सर्व जण जबाबदार ठरत असल्याचे आयोगाचे मत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने जी माहिती मागितली होती ती अपिलार्थीस दिनांक ०६-०२-२००७ रोजी अगर तत्पूर्वी मिळावयास पाहिजे होती. तथापि ती माहिती ४१ दिवस इतक्या विलंबाने देण्यात आली. सदर माहिती देण्यासाठी प्रथमतः तयार नव्हती. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील लिपिकाने, सूचना देऊनही सदर माहिती गोळा केली नाही असे जरी त्यांचे म्हणणे ग्राह्य धरले तरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्यासाठी ४१ दिवसाचा विलंब केलेला आहे हे या प्रकरणी निर्विवादपणे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या या विलंबाचे समर्थन कोणत्याही प्रकारे करता येईल असे आयोगास वाटत नाही.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांना ही माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे इतर सहकारी यांना, अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाबाबत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे (४१ दिवसासाठी) एकूण रुपये १०२५० /- (अक्षरी- रुपये दहा हजार दोनशे पन्नास) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक " ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) " या लेखाशीर्षाखाली, भरावी. संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांच्यामध्ये या शास्तीच्या रकमेची विभागणी उपसंचालक, भूमी अभिलेख, औरंगाबाद यांनी हे आदेश त्यांना प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत करावी. शास्तीची संपूर्ण रक्कम जास्तीत जास्त एकूण ३ हप्त्यामध्ये शासकीय तिजोरीत भरली जाईल असे उपसंचालक भूमी अभिलेख औरंगाबाद यांनी

पहावे.  अपिलार्थीस त्यांनी केलेल्या मूळ अर्जातील माहिती पुरविण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी व त्यांचे अपिलार्थीस माहिती देण्यास जबाबदार असलेले कर्मचारी / अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाबाबत त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे (४१ दिवसासाठी) एकूण रुपये १०२५० /- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी निकालपत्रात केलेल्या विवेचनाप्रमाणे करावा.

औरंगाबाद<br>
दिनांक  ०४-०३-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१  श्री. अशोक वामनराव बनकर, ॲङ पैठणे यांचा वाडा, नूतन कॉलनी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, उपसंचालक भूमी अभिलेख औरंगाबाद प्रदेश औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक भूमी अभिलेख औरंगाबाद प्रदेश औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ वरिष्ठ कोषागार अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९९३

निर्णय दिनांक ०४-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| श्री. संतोष रामप्रसाद कासट,<br>व्दारा सिद्धी कॉम्प्युटर्स, ए -२१, सिद्धी<br>विनायक कॉम्प्लेक्स, सहयोगनगर,<br>बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक<br>बांधकाम विभाग, बीड | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक<br>बांधकाम मंडळ, उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. संतोष रामप्रसाद कासट (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग श्री. वसंत खुशाल बाविस्कर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा

अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ श्री. चंद्रकांत प्रभाकर जोशी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०७-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ०१-०१-१९९८ ते ०७-०२-२००७ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयामध्ये कामाच्या निविदा अंदाजपत्रके टायपिंग प्रिंटींग व बायडिंग इत्यादीसंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

आपल्या कार्यालयामार्फत वेगवेगळ्या कामाच्या निविदा व अंदाजपत्रके इ. प्रकारची कामे केली जातात. यामध्ये संगणकाव्दारे निविदा व अंदाजपत्रके टायपिंग, प्रिंटींग व बाईडींग तसेच अन्य बांधकाम विषयक निविदांचा व अन्य कामांचा समावेश आहे. याबद्दल खालील माहिती पाहिजे आहे.

“ १. वरील कालावधीत किती निविदा काढण्यात आल्या व त्या कोणकोणत्या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दीसाठी देण्यात आल्या. याबाबतची तारीख निहाय माहिती द्यावी. त्या निविदा कोणकोणत्या वृत्तपत्रात छापण्यात आल्या त्या वृत्तपत्रांची नावे द्यावीत. तसेच ज्या ज्या दिवशी वृत्तपत्रात छापल्या त्या तारखेची माहिती द्यावी व छापून आलेल्या निविदेचे झेरॉक्स प्रत द्यावी.

२. प्रत्येक निविदेसाठी किती निविदा पुस्तीका (Tender Booklet) छपाई करण्यात आल्या त्याबद्दलची माहिती व त्याबद्दल दिलेल्या बिलाची प्रत द्यावी. (बिलाची प्रत दोन्ही बाजुंची द्यावी (पुढील व मागील बाजू)).

३. वरील कालावधीत किती अंदाजपत्रके संगणकाव्दारे टायपिंग, प्रिंटींग व बाईडींग करुन घेतली त्याची तपशीलवार माहिती तारीख व बिलाच्या

प्रतसह द्यावी. (बिलाची प्रत दोन्ही बाजुंची द्यावी (पुढील व मागील बाजू)).

४. वरील कामांसाठी देण्यात आलेल्या चेक्सची तपशीलवार माहिती कामाचे स्वरुप, तारीख, तो चेक ज्याला दिला गेला त्याचे नाव, रक्कम, बॅकेचे नांव इत्यादीसह द्यावी.

(कृपया माहिती पाहिजे आहे. परिपूर्ण द्यावी. अपिल करण्याची वेळ येणार नाही याची दखल घ्यावी ही विनंती) ''

अपिलार्थीने सदर माहिती शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये पथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस असे कळविले की, '' आपल्या उपरोक्त संदर्भिय अर्जान्वये मागणी केलेली माहिती अधिक कालावधीची व विस्तृत स्वरुपाची असून ती तयार करण्यासाठी अधिक कालावधी लागणे अपेक्षित आहे. तथापि ही माहिती अधिक कालावधीची व विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे तसेच या कार्यालयातील बहुतांशी कर्मचारी हे निवडणूक कामामध्ये व्यस्त आहेत तरी पण आपणास हवी असलेली माहिती विहीत मुदतीत पाठविण्यात प्रयत्न करण्यात येत आहे. माहिती संकलीत होताच त्याबाबत आपणास कळविण्यात येईल.

तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस परत त्यांच्याकडील दिनांक ०३-०३-२००७ रोजी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात त्यांच्याकडील दिनांक ०३-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती तयार करण्यात आली असून सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात आवश्यक ते शुल्क रुपये १५६६ भरण्याची त्यांनी अपिलार्थीस विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०३-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या सुचनेचे पालन न करता अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-०४-२००७ रोजी सुनावणी घेतली होती. तथापि त्या दिवशी अपिलार्थी हजर झाले नाहीत व त्यांनी आपले म्हणणे फॅक्सव्दारे पाठविले होते. अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०४-२००७ रोजी आपले आदेश पारीत केले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत केले होते.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीस अनुसरुन राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०५-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये अर्जाच्यावरील भागामध्ये अपिलार्थीने सदर अपील अपील कलम १९ (१) केल्याचे म्हटले आहे. तथापि अपिलार्थीचे उपस्थित वकील प्रतिनिधी हे सदर अपील १९ (३) च्या तरतुदीनुसार केले असल्याचे आज आयोगासमोर सांगत आहेत.

आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती दिली नाही, अन्य एका प्रकरणात जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिका-यास अपिलार्थी बरोबर करावयाचा पत्रव्यवहार रजिस्टर्ड पोस्टाने करण्याचे सूचित करुन देखील या प्रकरणी त्यांनी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने पत्रव्यवहार केल्याचे खोटे रेकॉर्ड तयार केले आहे. त्यांनी माहिती मागतांना शिघ्र टपालाव्दारे माहिती मागविली होती.

अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने जन माहिती अधिकारी यांच्या-वर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई करण्याचे आदेशित करण्याचे व त्यांना, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मोफत देण्याचे जन माहिती अधिका-यास आदेशीत करण्याची आयोगास विनंती केली आहे. याच बरोबर या अर्जामध्ये त्यांनी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या जावक जावक नोंदवह्याचे रजिस्टर, टपाल तिकिटांच्या संच यांच्या नोंदवह्या गमन नोंदवह्या इत्यादी माहिती त्यांच्याकडून उपलब्ध करुन घेण्याची आयोगास विनंती केली.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पाठविलेले कथित दिनांक ०३-०३-२००७ रोजीचे माहितीपोटी आवश्यक ते शुल्क रुपये १५६६ /- त्यांच्या कार्यालयात भरण्याच्या सूचना देणारे पत्र त्यांना प्राप्त झालेले नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना ०२ मार्च रोजी अपिलार्थीस माहिती देतांना रजिस्टर्ड पत्राव्दारे पत्रव्यवहार करावा अशी सूचना त्यांनी केली होती. तथापि त्यांनी अपिलार्थीस अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने पत्र पाठविले. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अद्यापही त्यांना प्राप्त झालेली नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांचे कथित दिनांक ०३-०३-२००७ रोजीचे पत्र प्राप्त न झाल्याने ते आवश्यक ती फीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरु शकले नाहीत व परिणामी त्यांना माहिती प्राप्त झाली नाही. विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे शास्ती लावण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक ०७-०२-२००७ रोजीच्या अर्जास त्यांनी दिनांक ०१-०३-२००७

रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती विहित मुदतीत पुरविण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचे कळविले होते व त्याचबरोबर माहिती संकलीत होताच अपिलार्थीस कळविण्याचे आश्वासीत केले होते. तदनंतर त्यांच्याकडील दिनांक ०३-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क रुपये १५६६ /- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि सदर शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीने मागितलेली माहिती आज रोजी त्यांच्या कडे तयार आहे. तथापि अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा न केल्यामुळे ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०३-०३-२००७ रोजी पाठविलेले पत्र अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अपील अर्जावर दिलेल्या पत्त्यावर अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविले आहे. त्यांचे म्हणणे सिध्द करण्याकरिता त्यांनी पोस्टाच्या दिनांक ०३-०३-२००७ रोजीच्या पावतीची सत्यप्रत आयोगासमोर सादर केली. सदर सत्यप्रतीची मूळ प्रत जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर दाखविली तसेच सदर पत्र अपिलार्थीस पाठविल्याबद्दल त्यांच्याकडील मुद्रांक नोंदवहीची सत्यप्रतही आयोगास सादर केली.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडे दिनांक २६-०३-२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अधिनियमाव्छारे विहित केलेल्या मुदतीमध्ये सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दिनांक १८-०४-२००७ रोजी पारीत केले. त्यामध्ये त्यांनी अपिलार्थी कडून माहिती देण्यापोटीचे आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांनी घेऊन अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे आदेशीत केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती

अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०१-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये जो प्रतिसाद दिला आहे तो अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नाही. त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने व बहुतांशी कर्मचारी निवडणूक कामात व्यस्त असल्याने अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी अधिनियमा-तील तरतुदीपेक्षा जास्त वेळ लागणार असल्याचे अप्रत्यक्ष संकेत दिले आहेत. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी असे पत्रे लिहिणे माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीशी विसंगत आहे हे त्यांच्या येथे निदर्शनास आणून देण्यात येत आहे. दिनांक ०१-०३-२००७ चे पत्र पाठविल्यानंतर लगेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०३-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांना हवी असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क रुपये १५६६ /- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. तथापि सदर पत्र अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविल्याचा पुरावा व पोस्टाच्या तिकिटांचा हिशोब जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगासमोर सादर केला आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सदर पत्र पाठविल्याचे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पत्र पाठवून अपिलार्थीस सदर पत्र का प्राप्त होऊ शकले नाही याची अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ उस्मानाबाद यांनी चौकशी करण्याचे अपिलार्थीने सूचित केले आहे. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांनी खोटे रेकॉर्ड तयार केले असल्याचा मुद्दा आयोगासमोर मांडला आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केलेली कागदपत्रे पाहता सदर रेकॉर्ड खोटे असल्याचे आयोगास आढळून आले नाही. अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना रजिस्टर्ड पोस्टाने पत्र पाठवावयास हवे होते कारण अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ उस्मानाबाद यांनी त्यांना तशी

दुस-या एका प्रकरणी सूचना दिली होती. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीशी पत्रव्यवहार कशा स्वरुपात करावा याविषयीच्या अपिलार्थीने उपस्थित केलेल्या मुद्दयासंदर्भात आज रोजी कोणतेही नियम आस्तित्वात नाहीत. तद्वतच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पत्रव्यवहार करतांना पाळावयाची पध्दत ही माहिती अधिका-याच्या कार्यालयातील अंतर्गत प्रशासनाचा भाग असल्यामुळे आयोग त्यात ढवळाढवळ करु इच्छित नाही. आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती तयार आहे व अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयात भरल्यास ती माहिती अपिलार्थीस देण्यास त्यांची तयारी आहे. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने पत्र पाठविल्याचे सिध्द झाल्याने अपिलार्थीस सदर पत्र प्राप्त झाले नाही हे त्यांचे म्हणणे आयोग ग्राह्य धरत नाही. त्यांना आजही माहितीची आवश्यकता असल्यास ते सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ते शुल्क भरुन प्राप्त करुन घेऊ शकतात.

वरील वस्तुस्थिती पाहता अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न भरता विनाशुल्क माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित केली आहे. अपिलार्थीची सदर अपेक्षा चुकीची असल्याने त्यांचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. सबब अपिलार्थीचे व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

प्रसंगावशात येथे जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाचे अवलोकन केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०४-२००७ रोजीच्या आदेशावर स्वतः सही न करता त्यांच्या कार्यालयातील दुस-या कर्मचा-याने / अधिका-याने या आदेशावर सही केली आहे. यापूर्वी देखील संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांच्या अपील ठरविण्याच्या पध्दतीबाबत आयोगाने वेळोवेळी ताशेरे ओढले आहेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशावर त्यांची सही नसल्याने सदर आदेशाची वैधता संपुष्टात आली आहे व त्यामुळे सदर अपील निर्णय आयोग अवैध ठरवीत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद<br>दिनांक ०४-०३-२००८

( वि. बा. बोरगे )<br>राज्य माहिती आयुक्त,<br>खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संतोष रामप्रसाद कासट, व्दारा सिद्धी कॉम्प्युटर्स, ए -२१, सिद्धी विनायक कॉम्प्लेक्स, सहयोगनगर, बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९५१

निर्णय दिनांक : ०४ मार्च, २००८

१ श्री. अनिलकुमार विपिनचंद अजमेरा, : अपिलार्थी
श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियमजवळ, उस्मानाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी
कार्यालय, उस्मानाबाद,

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा अपर जिल्हाधिकारी,
उस्मानाबाद.

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. अनिलकुमार विपिनचंद अजमेरा (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल),जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी श्री. दिनकर जायभाये, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी श्री. संभाजी मुंढे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणात अपीलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचे कडील दि. १५.०९.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडून अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाअंतर्गत एप्रिल, २००६ ते ३१.१०.२००६ या कालावधीमधील जिल्हास्तरीय शासकीय समित्यांचे तपशील मिळणेबाबत खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" १) शासनाकडून अन्न, नागरी पुरवठा ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय .३२ यांचेकडून कोणाच्या स्वाक्षरीने जिल्हास्तरीय शासकीय समितीच्या कमिटीचे गठन झाले होते. त्या परिपत्रकांची प्रत देण्यात यावी. २) मा. जिल्हाअधिकारी यांचे चिटणीस विभाग (डि.सी.ब्रँच येथून आपल्या विभागात पोलीसकडून चारित्र्य बाबतचे शेरे तपासण्यासाठी पाठविण्याकरिता शासकीय समितीच्या सदस्यांच्या नावासहीतची यादी केव्हा आली. ती आपल्या विभागानी मा. जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या कार्यालयात केव्हा पाठविली. तेथून संपूर्ण तपासून आपल्या विभागात केव्हा आली. आल्यानंतर आपल्या विभागानी शासकीय समिती गठन करण्यासाठी शासनाच्या मंजूरीसाठी मा. जिल्हाधिकारी यांच्या स्वाक्षरीने मा. प्रधान सचिव पुरवठा विभाग मंत्रालय मुंबई-३२ यांचेकडे केव्हा पाठविली होती. याबाबतची प्रत देण्यात यावी. तेथून आपणाकडे मंजूरी केव्हा आली. मंजूरीप्रमाणे जिल्हयातील शासकीय समितीच्या सदस्यांच्या नावाचे नियुक्तीपत्र व ओळखपत्र केव्हा दिले. त्याचा तपशील द्यावा जर नियुक्तीपत्र, ओळखपत्र दिली नसेल तर विलंबाची कारणे नमुद करावीत. नियुक्त्या व ओळखपत्रे केव्हा देणार याचाही खुलासा व्हावा. तसेच या समितीच्या सदस्यांची कामकाजाची रुपरेषा, त्यांची कर्तव्ये व शासकीय नियमावली याचाही तपशील देण्यात यावा. "
सदर माहिती अपिलार्थी यांनी व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये विहित केलेल्या मुदतीत कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांचेकडून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीन्वये अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. २५.११.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. या अपीलामध्ये त्यांनी त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती हेतूपुरस्सर न दिल्याबद्दल, कर्तव्यात कसूर केल्याबद्दल त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करुन प्रतिदिनी रु.२५०/- दंड करण्याची जन अपिलीय अधिकारी यांचेकडे विनंती केली होती.

अपीलार्थीचे अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचेकडे दि. ३०.१२.२००६ व १५.१.२००७ रोजी सुनावणी घेऊन या अपीलासंदर्भात निर्णय घेऊन, या संदर्भातील आपला आदेश दि. १९.१.२००७ रोजी पारित केला. या निर्णयामध्ये त्यांनी अपीलार्थीचे अपील मंजूर केले असून, जन माहिती अधिकारी यांनी १० दिवसात अपीलार्थीचे त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे त्यांना सूचित केले आहे. या अपील निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत जन माहिती अधिकारी यांना देण्याचे देखील आदेशित केले आहे. सदर आदेश त्यांनी त्यांचेकडील दि. २०.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये संबंधितांना पाठविला आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी सदर आदेश पारित केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांचेकडील दि. १२.०२.२००७ रोजीच्या पत्रान्वये सदर माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क रु.१०४/- इतके त्यांचे कार्यालयात भरण्याचे सूचित केले होते. जन माहिती अधिकारी यांचे सदर पत्र प्राप्त झाल्यानंतर अपीलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २७.२.२००७ रोजी पत्र देऊन त्यांचे मूळ अर्जाद्वारे अपेक्षित केलेली माहिती तीन दिवसांचे आत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्याची विनंती केली. यावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचेकडील दि. ३.४.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपीलार्थीस निःशुल्क माहिती देण्याचे संदर्भात करावयाच्या कार्यवाहीची माहिती दिली. जन अपिलीय अपिलीय अधिकारी यांचेकडून माहिती सूचना प्राप्त होऊनही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती दिली नाही. मध्यंतरीच्या काळात संबंधित जन माहिती अधिकारी यांची दि. १७.५.२००७ रोजी बदली झाली. त्यांचेनंतर रुजू झालेल्या जन माहिती अधिकारी यांनी तद्नंतर दि. ७.८.२००७ रोजी त्यांचे कार्यालय शिपायामार्फत अपीलार्थीस माहिती पाठविली. सदर माहिती अपीलार्थीस प्राप्त झाली आहे. तथापि यापूर्वीच जन अपिलीय अधिकारी  यांच्या निर्णयानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.४.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. त्या अर्जामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना पाठीशी घातल्याचे नमुद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तीवादाचे वेळी अपीलार्थीतर्फे त्यांचा लेखी युक्तीवाद सादर करण्यात आला. या युक्तीवादामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांना एकूण ४० पानांच्या माहितीसाठी ८० पानांची माहिती देण्यात आली असून सदर माहिती चुकीची,अपूर्ण,अर्धवट व दिशाभूल करणारी

असल्याचे त्यांनी नमुद केले आहे. त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द जिल्हाधिकारी, उस्मानाबाद, विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे तक्रार करुनही संबंधित जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे देखिल यामध्ये निर्देशित केले आहे. माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी ३०१ दिवस इतका विलंब लावल्यामुळे आहे. या विलंबासाठी प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे त्यांना एकूण रु. ७५०००/- दंड यांना लावण्यात यावा व त्यांच्या या दाव्याप्रीत्यर्थ त्यांचा झालेला खर्च रु.१०००/- इतका त्यांना देण्यात यावा, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी अपीलार्थीस दि. ६.८.२००७ रोजी माहिती पुरविली आहे. आयोगाकडे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, श्री. भारत वाघमारे यांचे लेखी म्हणणे प्राप्त झाले असून त्यामध्ये त्यांनी असे नमुद केले आहे की, संबंधित प्रकरणात जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचेकडून त्यांना खुलासा विचारण्यात आला होता, तो त्यांनी दि. २१.१.२००८ रोजी सादर केला होता. याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.१२.२००६ रोजी दिलेल्या उत्तराचे अवलोकन करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी जन अपीलीय अधिकारी यांना लिहिलेल्या दि. १८.१२.२००६ रोजीच्या पत्रामध्ये असे म्हटले आहे की, अपीलार्थी हे त्यांचेकडे दि. १६.९.२००६ रोजी एक बंद पाकीट देऊन गेले व त्या पाकीटाची पुरवठा विभागाच्या आवक-जावक लिपीकाकडून पोच घेऊन गेले. दि. १६.९.२००६ रोजी अपीलार्थी यांनी त्यांचे कार्यालयात जे पाकीट दिले ते फोडून पाहिले असता त्या पाकीटात सोलापूर येथे प्रसिध्द होत असलेले साप्ताहिक आढळून आले. साप्ताहिकाचे नाव " राजनैतिक पत्रिका - आझादी बचाव" असे होते. माहिती अधिकार अधिनियम, २००५ मध्ये अर्जदाराने माहितीसाठीचा अर्ज बंद पाकीटामध्ये देण्याची तरतुद नाही. थोडक्यात, अपीलार्थीस दिनांक १५.९.२००६ रोजीचा माहितीचा अर्ज प्राप्त झाल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी अमान्य करीत आहेत, असे दिसून येते. आयोगाकडे सादर केलेल्या लेखी म्हणण्यामध्ये त्यांनी माहितीचा अधिकार हा जनतेला माहिती मिळणे व कामकाजात पारदर्शकता येणे यासाठी आवश्यक आहे व त्यासाठी त्याचा वापर करणे आवश्यक आहे. एखाद्या अधिकाऱ्याविरुध्द आर्थिक दंड करणे किंवा कारवाई करणे यासाठी माहिती मिळाली असतांनाही पाठपुरावा करणे अभिप्रेत नाही, असे नमुद करुन या प्रकरणात अर्जदाराचा हेतू दुषित असल्याचे आपले म्हणणे त्यांनी मांडले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचे तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाला नसल्याचे त्यांचे म्हणणे त्यांचेकडील सुनावणीमध्ये म्हटले होते. त्यांचे हे म्हणणे लक्षात घेऊन त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपीलार्थीचा मूळ अर्ज त्यांचेकडे पाठविण्यासाठी त्यांचे अपील निर्णयामध्ये आदेशित केले आहे. त्यांच्या अपील निर्णयामध्ये देखील अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांना बंद पाकीट दिले असून, सदर पाकीट उघडून त्यामध्ये माहितीसाठीचा अर्ज आहे किंवा कसे, याची शहानिशा संबंधित जन माहिती अधिकारी यांनी करावयास हवी होती, असे म्हटले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन दिलेली कागदपत्रे यावरुन असे दिसून येते की, अपीलार्थींनी मूलतः माहितीसाठीचा दि. १५.९.२००६ रोजी केलेला अर्ज त्यांनी एका सीलबंद पाकीटात जन माहिती अधिकारी यांचेकडे दिला होता. तथापि जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, या सीलबंद पाकीटामध्ये अपीलार्थीचा दि. १५.९.२००६ रोजीचा अर्ज नसून त्यामध्ये साप्ताहिक राजनैतिक पत्रिका- आझादी बचाव अशा नावाचे वर्तमानपत्र होते. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचा हा मुद्दा केवळ वादाच्या प्रयोजनार्थ जरी ग्राहय धरला तरी त्यांचेकडे जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.१.२००७ रोजी दिलेल्या आदेशाबरोबर अपीलार्थीच्या मूळ अर्ज त्यांना प्राप्त झाला होता.हे सत्य उरत आहे. अपीलार्थीस माहिती सशुल्क द्यावयाची अथवा विनामूल्य, याबाबतचा संदेह देखील जन अपिलीय अधिकारी यांनी, जन माहिती अधिकारी यांना दिलेल्या दि. ३.४.२००७ रोजीच्या पत्राद्वारे दूर करण्यात आला होता. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना अपीलार्थीस द्यावयाची माहिती ही विनामूल्य द्यावी लागणार आहे याची कल्पना दि. ३.४.२००७ रोजीच आली होती. असे असतांनाही, त्यांनी त्यांची त्या पदावरुन दि. १७.५.२००७ रोजी बदली होईपर्यन्त अपीलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या शंकांसंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांचेकडून दि. ३.४.२००७ रोजी स्पष्टीकरण प्राप्त झाल्यानंतर अपीलार्थीस माहिती देण्याची त्यांची इच्छा असती, तर त्यांनी अपीलार्थीस लागलीच माहिती दिली असती. तथापि, त्यांनी या पदावरुन बदली होईपर्यन्त म्हणजेच दि. १७.५.२००७ रोजीपर्यन्त माहिती दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती सरळ व सोपी होती. तिची व्याप्तीही मर्यादित होती, त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देणे संबंधित जन माहिती अधिकारी यांना सहज शक्य होते, यावरुन संबंधित जन माहिती

अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेला ४४ दिवसांचा कालापव्यय पहाता, तो निरर्थक होता व  अपीलार्थीस माहिती देण्याची त्यांची इच्छा नसावी, असे सिध्द होते. या कालावधीमध्ये अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्यासाठी त्यांना कोठूनही व कोणत्याही प्रकारे, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष प्रतिबंध होता, असे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. या नंतर त्यांचे पदावर कार्यरत झालेले जन माहिती अधिकारी यांनी देखील अपीलार्थीस दि. ७.८.२००७ रोजी अपीलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती दिली. थोडक्यात, अपीलार्थीस विनामूल्य माहिती देण्यासंदर्भात दि. ३.४.२००७ रोजी सर्व वस्तुस्थिती स्पष्ट होऊनही त्यांना माहिती मिळण्यासाठी दि.७.८.२००७ या दिनांकाचा वाट पहावी लागली, या संपूर्ण प्रक्रीयेमध्ये ४ महिने ४ दिवस इतका कालावधी व्यपगत झाला. शासकीय अधिकाऱ्यांच्या अशा प्रकारच्या वर्तनाने माहितीचा अधिकार अधिनियमाच्या मूलतत्त्वाला छेद दिला जात आहे, असे आयोगाचे मत झाले आहे. या प्रकरणात तत्कालीन जन माहिती अधिकारी व त्यानंतर अपीलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले कार्यरत जन माहिती अधिकारी या सर्वांना अपीलार्थीस माहिती देण्यास विलंब लावण्याचे कोणतेही कारण दिसून येत नाही. अपीलार्थीस माहिती देण्यास असमर्थनीय विलंब लावून त्यांनी स्वतःला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २०(१) च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे, अशा निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. विलंबाने माहिती देऊनही अपीलार्थीस प्राप्त झालेली माहिती अपूर्ण, दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाल्याचे अपीलार्थींचे म्हणणे आहे. सदर बाब स्पष्ट करतांना अपीलार्थी यांनी असे सांगितले की, त्यांना देण्यात आलेल्या माहितीमध्ये एका पृष्ठाच्या माहितीसाठी दोन पृष्ठे दिली असून त्यांनी अपेक्षित केलेले काही मुद्यांसंदर्भात त्यांना माहिती प्राप्त झाली नाही.  अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती प्राप्त होण्याचे दृष्टीने असे आदेशित करण्यात येते की, सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या असमर्थनीय विलंबाबाबत त्यांना विलंबाच्या कालावधीसाठी प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी खालील लेखाशीर्षाखाली शासकीय कोषागारात करावा.

" ००७० इतर प्रशासनिक सेवा-

६० इतर सेवा-
८०० इतर जमा रकमा-
(१८) माहितीचा अधिकार-००७०-००६-१"

या शास्तीसाठी कर्मचारी/अधिकारीनिहाय विभागणी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी हे आदेश पारित होताच सात दिवसांचे आत करावी व संबंधित जन माहिती अधिकारी हे शास्तीच्या रकमेचा भरणा शासकीय कोषागारात, हे आदेश निर्गमित झाल्यानंतर जास्तीत जास्त पाच हप्त्यात करतील, असे पहावे. शास्तीचे हप्ते संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहे एप्रिल, २००८ पासून माहे ऑगस्ट, २००८ या कालावधीत दरमहा नियमितपणे भरावेत.

अपीलार्थीने या प्रकरणात दाव्याप्रीत्यर्थ झालेला खर्च रु.१०००/- मिळणेबाबत आयोगास केलेल्या विनंतीबाबत कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.
३. अपीलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती विलंबाने देण्यास जबाबदार असलेले सर्व संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर विलंबाचे प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी या निकालपत्रामध्ये दिलेल्या सूचनांप्रमाणे करावा.
४. खर्चाबाबत कोणताही आदेश नाहीत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ०४-०३-२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अनिलकुमार विपिनचंद अजमेरा, श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियमजवळ,

उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा, अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१७०

निर्णय दिनांक : ०४-०३-२००८

१ श्री. अजित एम. देशमुख, : तक्रारदार
द्वारा गजानन किराणा स्टोअर्स,
कारंजा रोड, बीड जि.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड.

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तक्रारदार श्री. वाल्मिक विठ्ठलराव शिरसाठ (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, बीड ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे दोघे आयोगाने पूर्वसूचना देऊनही गैरहजर आहेत.

उत्तरवादी यांच्या गैरहजेरीची आयोगाने गांभीर्याने दखल घेतली आहे.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेविरुध्द त्यांचेकडील दि. ३१.०३.२००६ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे अशी तक्रार केली आहे की, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, बीड यांचेकडून दि. २४.०२.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जाद्वारे माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४(२) मध्ये नमुद केलेल्या १७ बाबीसंबंधी केलेल्या कार्यवाहीची माहिती फीसह कळविण्याची विनंती केली होती. या संबंधी उत्तरवादी यांचेकडून मिळालेली माहिती अर्धवट स्वरुपाची असल्यामुळे, त्यांनी दिनांक ३१.३.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे अशी तक्रार केली आहे की, त्यांनी तक्रारदार यांचेकडून ज्या १७

मुद्यांवर माहिती मागितली होती ती उत्तरवादी यांनी, परिपूर्ण स्वरुपात न देता नोटीस बोर्डवर प्रसिध्द केली आहे व ती कार्यालयात येऊन हस्तगत करावी, असे कळविले होते. ज्यावेळी तक्रारदार यांनी कार्यालयात जाऊन अर्ज दिला त्यावेळीसुध्दा माहिती तयार नव्हती व अद्यापही तयार नाही, अशी तक्रार केली व त्यामुळे उत्तरवादी यांनी कायद्यातील कलम ४ मधील तरतुदीनुसार कार्यवाही न केल्यामुळे त्यांचेविरुध्द कडक कार्यवाही करावी तसेच ठराविक वेळेचे बंधन घालून सदर कार्यवाही पूर्ण करणेबाबत व अर्जदारास झालेल्या नुकसानीबद्दल संबंधित सार्वजनिक प्राधिकरणास, अर्जदाराला नुकसान भरपाई देण्याचे आदेश देण्यात यावे, अशी विनंती केली आहे.

आज रोजी सुनावणीचे वेळी तक्रारदार व उत्तरवादी दोघेही गैरहजर आहेत. त्यामुळे तक्रारदार यांचे लेखी निवेदन व त्यासंबंधीची कागदपत्र पाहिली असता, संबंधित उत्तरवादी यांनी तक्रारदारास पुरविलेली कागदपत्रे ही अपूर्ण आहेत व त्यांच्या कार्यालयाने कायद्यातील तरतुदीनुसार जी १७ कामे करणे अपेक्षित होते, ती पूर्ण केलेली नाही. त्यामुळे तक्रारदाराने केलेल्या तक्रारीमध्ये तथ्य असल्याचे आढळून येते.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता असे आदेशित करण्यात येते की, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसांचे आत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार कलम ४(२) मध्ये स्पष्ट केलेल्या १७ मुद्यांवरील माहिती उत्तरवादी यांचे कार्यालयाने अधिनियमातील तरतुदीप्रमाणे प्रसिध्द करावी, तसेच शिक्षण संचालक (शालेय शिक्षण) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी, उत्तरवादी यांच्या कार्यालयाने कायद्यातील तरतुदीनुसार आवश्यक कार्यवाही विहीत मुदतीत का केली नाही, या संबंधी सविस्तर चौकशी करुन आवश्यक वाटल्यास संबंधितांविरुध्द यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

तक्रारदार यांना पुराव्या अभावी नुकसान भरपाई देणेबाबत कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## **आदेश**

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.
२. उत्तरवादी यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसांचे आत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४(२) मधील तरतुद नुसार १७ मुद्यांवरील आवश्यक माहिती प्रसिध्द करावी.

३. शिक्षण संचालक (शालेय शिक्षण), शिक्षण संचालनालय, म.रा.पुणे यांनी, उत्तरवादी यांनी विहित मुदतीत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४(२) नुसार आवश्यक कार्यवाही का केली नाही, या संबंधी सविस्तर चौकशी करुन आवश्यक वाटल्यास, संबंधितांविरुध्द यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी.

४. नुकसान भरपाईबाबत कोणतेही आदेश नाहीत.

**औरंगाबाद**
**दिनांक ०४-०३-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अजित एम. देशमुख, द्वारा गजानन किराणा स्टोअर्स,कारंजा रोड, बीड जि.बीड

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ शिक्षण संचालक (शालेय शिक्षण), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९५३

निर्णय दिनांक ०५-०३-२००८

१ श्री. ज्ञानेश्वर दगडू बोरसे, : अपिलार्थी
एन-९, ए-११५, ३२/३, शिवनेरी कॉलनी,
सिडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तालुका कृषि अधिकारी, गंगापूर,
तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय कृषि अधिकारी, वैजापूर,
जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. ज्ञानेश्वर दगडू बोरसे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी श्री. प्रबोध रामदास चव्हाण (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी श्री. दत्तात्रय ईजाप्पा गायकवाड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २७-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५ ते २००६ या कालावधीतील त्यांच्या कार्यक्षेत्रातील ‘‘कामासाठी धान्य’’ योजने संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> ‘‘ राष्ट्रीय कामासाठी धान्य कार्यक्रम योजनेच्या कामावर उपस्थित असलेल्या सर्व मजुरांच्या मस्टरच्या सत्यप्रतिलिपी (कुपन व रकमा वाटप सहीत) मिळणेबाबत.’’

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली असून या अर्जामध्ये त्यांनी ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करतेवेळी ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्या-संदर्भात कोणताही पुरावा त्या अर्जासोबत त्यांनी जोडला नाही. अपिलार्थी हे खरोखरच दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे हे जाणून घेण्याच्या दृष्टीने संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद यांना त्यांच्याकडील दिनांक ०५-०१-२००७ रोजीच्या पत्रानुसार अपिलार्थी-च्या ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत यासंबंधी त्यांना त्यांचे अभिप्राय देण्याची विनंती केली आहे तथापि त्यावर अद्याप उत्तर अप्राप्त आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक २५-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-०२-२००७ रोजी सुनावणी घेऊन या सुनावणी संदभातील आपले आदेश दिनांक १२-०२-२००७ रोजी पारीत केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या सुनावणीच्या आदेशामध्ये निर्णय देतांना असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीस माहिती देण्याकरिता आवश्यक असलेले रुपये ८००० /- इतके अनुदान उपलब्ध नसल्याने ते ही माहिती अपिलार्थीस देऊ शकले नव्हते. तथापि त्यांनी सुनावणीच्या वेळेस अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती दाखविण्याचे आश्वासीत केले होते. संबंधीत जन माहिती अधिकारी हे प्रत्यक्षात अपिलार्थीस माहिती देऊ शकत नसल्याने त्यांनी आवश्यक त्या अनुदानाची मागणी त्यांच्या वरिष्ठांना करावी असे या सुनावणी मध्ये ठरले व अनुदान प्राप्त होताच अपिलार्थीस विनामूल्य माहिती द्यावी असे जन अपिलीय अधिकारी यांनी शेवटी सूचित करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपिला-मध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अद्यापपर्यंत कोणती माहिती दिली नसल्याचे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी दिनांक २७-११-२००६ रोजी अर्ज केला होता. तथापि विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीमध्ये त्यांनी मूळ अर्जासोबत दारिद्र्य रेषेखाली कार्ड जोडले नसल्याचा मुद्दा

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे उपस्थित केला गेला नव्हता. जन अपिलीय अधिकारी यांच्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे आवश्यक ते अनुदान उपलब्ध नाही हाच मुद्दा त्यांच्यातर्फे मांडला गेला होता. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पाहण्यासाठी माहिती उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली होती. तथापि सदर नस्तीच्या नुसत्या पाहण्यावरुन त्यातील माहिती अपूर्ण किंवा खरी आहे हे कळाले नसते. त्यांना सदर माहितीच्या परिपुर्ततेबाबत व सत्यतेबाबत खात्री करुन घेण्याकरिता ती झेरॉक्स प्रतीच्या स्वरुपात हवी असल्याने त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी केलेली विनंती मान्य केली नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतरही त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगा-कडे व्दितीय अपील केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा दिनांक २७-११-२००६ रोजी माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे दिनांक २७-११-२००६ रोजीच प्राप्त झाला. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्यासंदर्भातील त्यांचा दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती क्रमांक व वर्ष इतकेच नमूद केले असून यासंदर्भात त्यांनी मूळ अर्जासोबत कोणताही पुरावा जोडला नव्हता. अपिलार्थीचा ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याचा दावा पडताळून पाहण्यासाठी त्यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती औरंगाबाद यांच्याकडे विचारणा केली होती. तथापि संबंधीत गट विकास अधिका-याने त्यांना अद्यापपर्यंत यासंदर्भात कोणतीही माहिती दिली नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात आहे. अपिलार्थीस त्यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपिलाची सुनावणी दिनांक १२-०२-२००७ रोजी झाली. या सुनावणीमध्ये त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी आवश्यक ते अनुदान त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याचा मुद्दा मांडला होता.

यावर जन अपिलीय अधिकारी यांनी अनुदानाची मागणी वरिष्ठ कार्यालयाकडे करुन अपिलार्थीस तात्काळ माहिती देण्याचे आदेश दिले. मुळात अपिलार्थीने मागितलेली माहिती देण्यासाठी एकूण रुपये ८००० /- इतक्या अनुदानाची त्यांना आवश्यकता होती. तथापि सदर अनुदान त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याने ते अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या स्वरुपात ही माहिती देऊ शकले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणी झाल्यानंतर संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली होती. तथापि अपिलार्थीने ती माहिती पाहण्याचे नाकारले. तदनंतर दिनांक २९-०२-२००८ रोजी अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाले असतांना त्यांना आवश्यक त्या माहितीचे अवलोकन करण्याची पुन्हा विनंती केली. तथापि ती माहिती न पाहता अपिलार्थी तेथून निघून गेले. अपिलार्थी यांना अपेक्षित माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये कोणतेही स्वारस्य नसून केवळ अधिका-यांना त्रास देण्याच्या उद्देशाने ते अशा प्रकारची माहिती मागत असतात.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक २५-०१-२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम दिनांक ०५-०२-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि त्या दिवशी जन माहिती अधिकारी उपलब्ध होऊ शकले नाहीत त्यामुळे त्यांनी या प्रकरणाची सुनावणी दिनांक १२-०२-२००७ रोजी घेऊन त्याच दिवशी अपिलार्थीच्या अपील अर्जासंदर्भात आपले आदेश पारीत केले. या आदेशात त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी जन माहिती अधिका-यास, वरिष्ठ कार्यालयाकडून आवश्यक ते अनुदान प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. तथापि जन माहिती अधिकारी यांना वरिष्ठ कार्यालया-कडून अनुदान प्राप्त न झाल्याने ते अपिलार्थीस माहिती देऊ शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येईल की, अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज दिनांक २७-११-२००६ रोजी केला होता. या अर्जावर संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणतीही कारवाई केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. अपिलार्थीच्या अर्जावर त्यांनी दिनांक ०५-०१-२००७ रोजी प्रथम कारवाई केली. अपिलार्थीने त्यांच्या अर्जासोबत ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती आहेत हे दर्शविण्यासाठी कोणतीही कागदपत्रे जोडली नव्हती हा मुद्दा येथे महत्वाचा ठरतो. माहितीसाठी करावयाचा अर्जाचा नमुना व यासंदर्भात करावयाच्या अपील अर्जाचा नमुना अर्ज शासनाच्या दिनांक ११ ऑक्टोंबर २००५ रोजीच्या राजपत्राव्दारे प्रसिध्द झालेल्या अधिसूचनेमध्ये दिला आहे. त्यामध्ये माहितीसाठीचा अर्ज करतांना मुद्दा क्रमांक ४ चे खाली प्रत्येक अर्जदाराला ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्यास पुरावा म्हणून पुराव्याची झेरॉक्स प्रत जोडणे अनिवार्य केले गेले आहे. या प्रकरणातील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्याची तयारी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील दिनांक १२-०२-२००७ रोजीच्या सुनावणीच्या वेळेस केली होती. तथापि सदर माहिती परिपूर्ण नसावी या शंकेमुळे अपिलार्थीने सदर माहिती पाहण्याचे नाकारले हे अपिलार्थीच्या युक्तिवादावरुन स्पष्ट होते. येथे मुळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेला दिनांक २७-११-२००६ रोजीचा अर्ज अपिलार्थीने या अर्जासोबत ते दारिद्र्य रेषेखालील असल्याचे त्यांचे प्रमाणपत्र अथवा इतर पुराव्याच्या सत्यप्रती जोडल्या नसल्याने अपूर्ण व अवैध ठरत आहे. अपिलार्थीचा मूळ अर्जाच अशा प्रकारे अवैध ठरत असल्यामुळे अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले दिनांक ३०-०४-२००७ रोजीचे व्दितीय अपील आपोआप तथ्यहीन ठरुन ते फेटाळण्यायोग्य

आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. वास्तविकता अपिलार्थीचा मूळ अर्ज प्राप्त करुन घेतांना त्यांनी त्यांच्या अर्जासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडली आहेत किंवा कसे याबाबत संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी त्याचवेळी तपासणी केली असती तर अपिलार्थीस आवश्यक त्या कागदपत्राची पुर्तता करुन नंतर त्यांना आवश्यक असणारी माहिती मिळण्याची शक्यता होती. तथापि अपिलार्थीचा मूळ अर्ज नीट न वाचून व अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीच्या अर्जासंदर्भात निर्णय न घेऊन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जाची तपासणी न करुन त्यांनी दर्शविलेल्या हलगर्जीपणाबद्दल त्यांना आता सक्त ताकीद देण्यात येत असून येथून पुढे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील अर्जाची स्विकृती करतांना सदर अर्ज परिपूर्णरित्या भरला आहे किंवा कसे याची त्यांनी खात्री करावे असे सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यास आवश्यक ते अनुदान नसल्याचा मुद्दा जन माहिती अधिकारी यांनी उपस्थित केला आहे. यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ संदर्भातील तरतुदीनुसार अर्जदारांना माहिती देण्यासाठी आवश्यक ते अनुदान त्यांच्याकडील सर्व क्षेत्रीय कार्यालयांना येथून पुढे उपलब्ध होईल अशा पध्दतीने पुढील वर्षासाठी आर्थिक तरतूदीचे नियोजन करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०५-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. ज्ञानेश्वर दगडू बोरसे, एन-९, ए-११५, ३२/३, शिवनेरी कॉलनी, सिडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद  यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९५४

निर्णय दिनांक ०५-०३-२००८

१ श्री. संजय रामचंद्र कांबळे, : अपिलार्थी
कल्पनानगर, कळंब, तालुका कळंब,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
उस्मानाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहाय्यक निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था, उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. संजय रामचंद्र कांबळे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक

निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था श्री. झालटे अमर गोवर्धन (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे प्रतिनिधी लेखापाल श्री. चवरे दत्तात्रय दिगंबर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०२-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे उस्मानाबाद जिल्ह्यामधील नोंदणीकृत मजूर सहकारी संस्थासंदर्भात माहिती खालील प्रमाणे मागविली होती.

" १. नोंदणीकृत मजूर संस्थेची एकूण संख्या.

२. नोंदणीकृत मजूर संस्थेचे नांव, संपूर्ण पत्ता, अध्यक्ष, सचिव व संचालक मंडळासह सर्व सदस्यांची नांवे पत्त्यासह.

३. मजूर संस्था नोंदणीसाठी मजूर असणे आवश्यक आहे काय ? असल्यास मजुराची व्याख्या.

४. मजूर संस्थांना मान्यता प्रदान करतांना संबंधीत मजूर संस्थेतील सदस्य मजूर असल्याची खात्री केली आहे काय ? केली असल्यास सक्षम अधिका-यांने मजूर असल्याचे त्यांना प्रमाणित केले आहे काय ? केले असल्यास त्याचा पुरावा देण्यात यावा.

५. जिल्हा मजूर फेडरेशनच्या (विद्यमान) संचालक मंडळाची यादी व ते मजूर असल्याचा पुरावा."

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा दिनांक ०२-०२-२००७ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये तालुका स्तरावरील सर्व सहाय्यक निबंधकाकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती

त्यांच्या कार्यालयास सादर करण्याची सूचना दिली.  या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक १४-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले.  जन माहिती अधिकारी यांनी याच दिवशी म्हणजेच त्यांच्याकडील दिनांक १४-०३-२००७ रोजीच्या पत्राने जिल्ह्यातील एकूण मजूर सहकारी संस्थांची संख्या व यादी कळवून अपिलार्थीस उर्वरीत मुद्दयावरील माहिती संबंधीत संस्थांकडून घेण्याचे सूचित केले.

अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.  जन अपिलीय अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीने आयोगासमोर असे सांगितले की, अपिलार्थीचा सदर अर्ज यांच्याकडे प्राप्त झाला नाही.  तथापि आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या प्रथम अपिल अर्जाच्या प्रतीवर जिल्हा निबंधक सहकारी संस्था उस्मानाबाद यांच्या कार्यालयातील जावक जावक विभागातील लिपिकाची दिनांक १४-०३-२००७ रोजीची स्वाक्षरी आहे.  यावरुन अपिलार्थीचा अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात पोहोचल्याचे सिध्द होत असून जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाला नाही हे केलेले विधान असत्य ठरत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणताच निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०४-२००७

रोजी व्दितीय अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या दिनांक १४-०३-२००७ रोजीच्या अपिलासंदर्भात त्यांना कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याचे कारण त्यांनी या अपील अर्जात दिले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून जिल्ह्यातील एकूण मजूर सहकारी संस्थांची संख्या व मजूर सहकारी संस्थांची यादी प्राप्त झालेली आहे. सदर माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १४-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाली. त्यांना अपेक्षित असलेली माहिती मिळण्यासंदर्भात त्यांनी तालुका सह निबंधक सहकारी संस्था यांच्याकडून माहिती मिळण्याचा प्रयत्न केला. तथापि त्यांच्याकडूनही फक्त मजूर सहकारी संस्थांची यादी व संख्या प्राप्त झाली. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरीत माहिती त्यांना आजही आवश्यक आहे. सदर माहिती त्यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही प्राप्त झाली नसल्याने त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने केलेल्या दिनांक ०२-०२-२००७ रोजीच्या अर्जावर त्यांनी कारवाई करुन त्यांच्याकडील दिनांक ०७-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांच्या अधिपत्याखालील तालुका सर्व तालुका निबंधकांना अपिलार्थीने मागितलेली माहिती देण्याचे सूचित केले होते. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात सहजपणे उपलब्ध नव्हती. अपिलार्थीने मागितलेली माहिती तालुका निबंधक यांच्या कार्यालयात उपलब्ध होती. तथापि संबंधितांनी त्यांच्याकडे वेळेत माहिती न पुरविल्यामुळे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती विहित मुदतीत पुरविता आली नाही. सहकार आयुक्त यांच्या दिनांक २१-०९-२००५ च्या परिपत्रकानुसार संबंधीत संस्थेचे मुख्य

कार्यकारी अधिकारी / सचिव यांना माहिती अधिकारी म्हणून नियुक्त केले असल्याने त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कडील दिनांक १४-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये संबंधीत मजूर सहकारी संस्थेच्या बाबत माहिती त्यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यासाठी सुचविले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त न झाल्याने त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणतीही सुनावणी घेतली नाही. मजूर सहकारी संस्थांना मान्यता देण्याच्या प्रक्रियेसंदर्भात त्यांना विचारणा केली असता त्यांनी असे सांगितले की, मजूर सहकारी संस्थाचे नोंदणीचे प्रस्ताव जिल्हा निबंधक सहकारी संस्था कार्यालयातून विभागीय सह निबंधक यांच्या कार्यालयास पाठविले जातात. सदर प्रस्तावाची विभागीय सह निबंधक त्यांच्या कार्यालयात छाननी समिती मार्फत तपासणी केली जाते. या छाननी समितीमध्ये विभागीय सह निबंधक हे अध्यक्ष असून संबंधीत जिल्हा उपनिबंधक, मजूर फेडरेशनचे अध्यक्ष, जिल्हा विशेष परिक्षक हे सभासद आहेत. प्रत्येक जिल्ह्याकडून आलेल्या प्रस्तावाची छाननी या समितीमार्फत करुन मजूर सहकारी संस्थांना मान्यता दिली जाते. तदनंतर संबंधीत सहकारी संस्थेची नोंदणी तालुका सह निबंधक यांच्या पातळीवर होते. जिल्हा उपनिबंधकाकडून विभागीय सह निबंधकाकडे एकूण २ प्रतीत प्रस्ताव पाठविले जातात. यापैकी एक प्रत जिल्हा सह निबंधक यांच्या कार्यालयात सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ठेवली जाते व दुसरी प्रत तालुका सह निबंधक यांच्या कार्यालयाकडे पाठविली जाते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०२-२००७ रोजी उस्मानाबाद जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्थाच्या संदर्भात एकूण ५ मुद्दयावर माहिती मागविली होती.

त्यापैकी मुद्दा क्रमांक १ बाबत पूर्ण, मुद्दा क्रमांक २ बाबत अंशतः माहिती जन माहिती अधिकारी व तालुका पातळीवरील सहा. निबंधकाकडून अपिलार्थीस प्राप्त झाली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थीने या माहितीमध्ये मुख्यत्वेकरुन मजूर सहकारी संस्थांना मान्यता देण्यापूर्वी ज्या विविध प्रक्रिया सहकार खात्याकडून तालुका, जिल्हा व विभागीय पातळीवर पार पाडल्या जातात त्यासंदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून अपेक्षिली होती. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या समोर विषद केलेली वेगवेगळ्या टप्प्यावर संस्था मान्यतेसंदर्भात केली जाणारी कारवाई पाहता अपिलार्थीने मागितलेली माहिती ही विभागीय सह निबंधक व सहाय्यक निबंधक व तालुका सहाय्यक निबंधक यांच्याकडे उपलब्ध असणे अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी व तालुका स्तरावरील सहाय्यक निबंधक हे एकाच प्राधिकरणाचे वेगवेगळे भाग असल्याने व सहकारी संस्थेच्या मान्यतेसाठी तयार झालेल्या मान्य प्रस्तावाची नस्ती उपनिबंधकाकडे एक प्रतीत उपलब्ध असल्याने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी त्यांच्या स्तरावर संबंधितांकडून घेऊन ती अपिलार्थीस उपलब्ध करुन देणे योग्य होईल असे आयोगास वाटते. अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांनी तालुका स्तरावर तालुका निबंधक सहकारी संस्था यांना पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस द्यावयास हवी होती. म्हणजे त्यांनी दिनांक १४-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस सूचित केलेली त्यांची कारवाई योग्य ठरली असती तथापि या प्रकरणी अशा प्रकारची कृती त्यांनी केली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मान्यता प्राप्त मजूर सहकारी संस्थेच्या मूळ मान्यतेशी संबंधीत अभिलेख्यामध्ये उपलब्ध असणे आयोगास अभिप्रेत आहे. सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या दिनांक ०२-०२-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश

निर्गमीत होताच त्यांना २० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे प्रशासकीय कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे असद्हेतूपूर्वक टाळले असल्याचे कागदपत्री सिध्द होत नाही. मात्र जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादामध्ये त्यांना तालुका स्तरावरील सहाय्यक निबंधका कडून आवश्यक ती माहिती प्राप्त न होऊ शकल्यामुळे ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत असे आयोगास सांगितले. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस विहीत मुदतीत माहिती प्राप्त न करुन देण्यासंदर्भात सर्व सहाय्यक निबंधकांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याचे सिध्द होत असल्याने ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी ज्या सहाय्यक निबंधकांनी जन माहिती अधिकारी यांना आवश्यक ती माहिती वेळेत न पुरवून त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभाव सिध्द केला आहे त्या सर्वांवर सहकार आयुक्त, पुणे यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी (जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था उस्मानाबाद) यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेळेत तपशील न पाठविल्याबद्दल सर्व संबंधित सहाय्यक निबंधका-वर सहकार आयुक्त पुणे यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपाल अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ०५-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संजय रामचंद्र कांबळे, कल्पनानगर, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद.

२ सहाय्यक निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, उस्मानाबाद यांना या निकालपत्रा-तील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, बी. जे. रोड, पुणे — ४११ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९५५

निर्णय दिनांक ०५-०३-२००८

श्री. शरद विश्वनाथराव व्यापारी, : अपिलार्थी
पोलीस आयुक्त कार्यालय,
मिल कॉर्नर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा विशेष पोलीस महानिरीक्षक
कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विशेष पोलीस महानिरीक्षक,
औरंगाबाद परिक्षेत्र, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : वाचक पोलीस उप अधीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, पद्‌मपूरा, औरंगाबाद परिक्षेत्र, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : विशेष पोलीस महानिरीक्षक, औरंगाबाद परिक्षेत्र, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शरद विश्वनाथराव व्यापारी

(यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा वाचक पोलीस उप अधीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय श्री. प्रल्हाद संपतराव कस्तुरे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक, औरंगाबाद परिक्षेत्र हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २५-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयात ठेवण्यात आलेल्या बिंदू नामावलीसंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ औरंगाबाद परिक्षेत्रातील कार्यरत असलेल्या वरिष्ठ श्रेणी लिपीक यांचे बिंदु नामावली नोंदवहीचा उतारा व सोबतचे तक्त्याप्रमाणे माहिती मिळावी.

बिंदू नामावली, आरक्षण व पदोन्नतीबाबत माहिती मिळणेबाबतचा तक्ता

| अ. क्र. | परिक्षेत्रातील वरिष्ठ श्रेणी लिपिकांचे मंजूर संख्या बळ | संख्याबळानुसार बिंदु नामावलीप्रमाणे प्रवर्गनिहाय आरक्षण | वरिष्ठ श्रेणी लिपिकांचे मंजूर संख्येनुसार प्रवर्गनिहाय वर्गवारी सध्या काय आहे | खालील मुद्दयाबाबत सविस्तर माहिती मिळावी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | | | | परिक्षेत्रातील व. श्रे. लि. संख्येत डीटीएनटी या प्रवर्गांची संख्या ६ असावी अशी धारणा आहे. सध्या ही संख्या ९ आहे. तरी पी. एस. सानप व डी. ए. घुगे यांना त्यांच्यापेक्षा जेष्ठ असलेल्या क. श्रे. लि. ना डावलून पदोन्नती कोणत्या आधारे देण्यात आली ? |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | | | | तसेच परिक्षेत्रातील व. श्रे. लि. संख्येन अनु. जमाती या प्रवर्गाची संख्या ७ असावी अशी धारणा आहे सध्या ही संख्या ८ आहे. तरी एस. बी. तोटे यांना त्यांचेपेक्षा जेष्ठ असलेल्या क. श्रे. लिपीकांना डावलून पदोन्नती कोणत्या आधारे देण्यात आली ? |
| ३ | | | | क. श्रे. लि. दिलीप ल. जोशी हे जेष्ठ असतांना त्यांना डावलून सैयद महंमदअली सैयद अमजदअली यांना ३/२००६ मध्ये व. श्रे. लिपीक पदी पदोन्नती देण्यात आली ती कोणत्या आधारे ? ” |

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०१-२००७ रोजी संबंधीत अधिका-यांना (आस्थापना-२) अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे सादर करण्याची सूचना दिली.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जासंदर्भात व मूळ अर्जासंदर्भात त्यांच्याकडील दिनांक ३०-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या सर्व मुद्दयावरील माहिती दिल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस दिनांक ०४-०५-२००७ रोजी प्राप्त झाला.

तथापि सदर निर्णय प्राप्त होण्यापुर्वीच अपिलार्थीने त्यांना माहिती न मिळाल्या-प्रीत्यर्थ व त्यांच्या अपिलावर निर्णय प्राप्त न झाल्यप्रीत्यर्थ व्यथित होऊन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या त्यांच्या कडील दिनांक ३०-०४-२००७ रोजीच्या पत्रासोबत प्राप्त झालेल्या बिंदु नामावली रजिस्टरच्या उता-यामध्ये त्यांच्या कार्यालयाने २००६ साली झालेल्या पदोन्नतीचा उल्लेख केलेला नाही त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना पाठविलेली माहिती सदोष ठरते. मार्च २००६ या महिन्यामध्ये झालेल्या पदोन्नतीच्या निर्णयाबाबत सदर पदोन्नतीतील नेमणूका कशा झाल्या हे त्यांना जाणून घ्यावयाची इच्छा आहे व त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली याच विषयावरील नस्ती तपासणीसाठी पाहण्याची इच्छा त्यांनी आयोगासमोर व्यक्त केली.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती ज्या शाखेशी संबंधीत होती त्या शाखेकडे त्यांनी विहित मुदतीत सूचना देऊनही संबंधीत शाखेकडून त्यांना अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती मिळाली नाही. संबंधीत शाखेस त्यांनी दिनांक ०५-०३-२००७, १३-०३-२००७ व २६-०३-२००७ रोजी स्मरणपत्रे देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पुरविण्याबाबत सूचित केले होते. तथापि संबंधीत शाखेकडून त्यांना माहिती

प्राप्त न झाल्याने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीस अंतीमतः जन अपिलीय अधिकारी यांनी संपूर्ण माहिती त्यांच्याकडील दिनांक ३०-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिली आहे. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देण्याची कारणे विषद करतांना, कार्यालयाची वार्षिक तपासणी, जुने अभिलेखे शोधणे इत्यादी कामात ते व्यस्त असल्यामुळे त्यांना अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देता आली नाही असे त्यांनी आयोगासमोर स्पष्ट केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता येथे असे दिसून येते की, मुळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक २५-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये मागितलेल्या माहितीपैकी काही माहिती सरळ स्वरुपाची होती जी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत अशी होती तर उर्वरीत माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा अपेक्षित करणारी अशी होती. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाची व्याख्या पुरेशा प्रमाणात स्पष्ट करण्यात आली आहे. यामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कोणत्याही कृतीबाबत अथवा निर्णयाबाबत त्यांनी अपिलार्थीस खुलासा देणे अपेक्षित नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक ५ च्या संदर्भामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना ३ उपप्रश्न विचारले असून त्यांनी दिलेली पदोन्नती कोणत्या अधिनियमाव्दारे दिलेली आहे असे विचारले आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ५ अशा प्रकारे माहिती या शब्दाच्या व्याख्येत बसत नाही. उर्वरीत मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये पुरविली आहे. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना दिलेल्या माहितीमध्ये, त्रुटी आहेत व सदर त्रुटींचे त्यांना

निराकरण करुन मिळावे असे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणी मध्ये अपिलार्थीने मागणी केल्यास त्यांना मार्च २००६ मध्ये दिलेल्या पदोन्नती संदर्भा-तील सर्व नस्त्या पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्याची तयारी आयोगासमोर दर्शविली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून जो खुलासा अपेक्षित आहे तो त्यांना संबंधीत नस्त्यांची पाहणी केल्यानंतर प्राप्त होऊ शकेल असे आयोगाचे मत आहे. यासाठी त्यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे आवश्यक त्या नस्त्यांच्या पाहणीसाठी वेगळा अर्ज करावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे व अपिलार्थीचा अशा प्रकारच्या नस्त्या पाहणीसाठीचा अर्ज संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर ७ दिवसाच्या आत त्यांनी संबंधीत नस्त्या अपिलार्थीस पाहण्यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी नुसार उपलब्ध करुन द्याव्यात असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. संबंधीत नस्त्यांची पाहणी केल्यानंतर अपिलार्थीस काही शंका असतील तर त्यांनी विभाग प्रमुख म्हणून पोलीस महानिरिक्षक, औरंगाबाद परिक्षेत्र औरंगाबाद यांच्याकडे आपल्या गा-हाण्यावर दाद मागावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने दिनांक २५-०१-२००७ रोजी मागणी केलेली माहिती सर्वसाधारण परिस्थितीत त्यांना दिनांक २४-०२-२००७ रोजी अगर तत्पूर्वी प्राप्त होणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ च्या तरतुदीस अनुसरुन अभिप्रेत आहे. तथापि अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे सहज उपलब्ध नव्हती म्हणून त्यांनी संबंधीताकडे वेळीच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती वेळेतच मागविली आहे आणि त्यावर संबंधीत शाखेला वेळोवेळी स्मरणपत्रे देखील दिली आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस माहिती देतांना जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सहाय्यक कर्मचारी / अधिकारी यांना देखील माहिती अधिकारी समजावे अशी तरतूद आहे. हे

पाहता अपिलार्थीस माहिती विलंबाने प्राप्त होण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील आस्थापना-२ चे कर्मचारी जबाबदार असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने खुलासेवजा माहिती विचारुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस यासंदर्भात उत्तरे दिली आहेत हे पाहता अपिलार्थीस माहिती पुरविण्याचा त्यांचा दृष्टीकोन सकारात्मक असल्याचे आढळून येत आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन संबंधितांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे किंवा ही माहिती असद्हेतूपूर्वक दडवून ठेवल्याचे आयोगास आढळून आले नाही तथापि त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता विलंब लावला हे सत्य शेवटी उरते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या विलंबाबत त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून येथून पुढे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या अर्जावर त्वरेने व सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांचे संबंधीत सहाय्यक -- आस्थापना-२ शाखेतील कर्मचा-यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून त्यांनी भविष्यात अशा प्रकारच्या चूका टाळाव्यात असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०५-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शरद विश्वनाथराव व्यापारी, पोलीस आयुक्त कार्यालय, मिल कॉर्नर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा वाचक पोलीस उप अधीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, पद्मपूरा, औरंगाबाद परिक्षेत्र, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक, औरंगाबाद परिक्षेत्र, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९५६

निर्णय दिनांक ०५-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| श्री. भिसे नारायण शामराव,<br>मु. पो. चिंचगव्हाण, तालुका हदगाव,<br>जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, नांदेड<br>पाटबंधारे मंडळ (सिंचनभवन), नांदेड | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे<br>मंडळ (सिंचनभवन), नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. भिसे नारायण शामराव व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ यांचे प्रतिनिधी वरिष्ठ लिपीक श्री. रामचंद्र माधवराव बतिनवार हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २२-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे रोजंदारी आस्थापनेवर ‘‘लघुटंकलेखक’’ व ‘‘टंकलेखक’’ दोन्ही या पदावरील नेमणुकीसंदर्भात जानेवारी १९९१ ते २२-०१-२००७ या कालावधीतील माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

> ‘‘ रोजंदारी आस्थापनेवर ‘‘लघुटंकलेखक’’ व ‘‘टंकलेखक’’ या पदावर कर्मचा-याची नेमणूक करता येते किंवा नाही याबाबत मार्गदशन करणे याविषयी शासनाचे परिपत्रक, आदेश व नियमावली आणि आपल्या कार्यालयाने ठरवलेली नियमावली यांच्या सत्यप्रती मिळणेबाबत. ’’

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. सदर अपिलाची जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे वा या संदर्भात अपिलार्थीशी त्यांनी पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना त्यांच्या दिनांक २२-०१-२००७ रोजीच्या अर्जासंदर्भात कोणतीही माहिती दिली नाही किंवा याबाबत काहीही कळविले नसल्याचे नमूद केले आहे. तद्वतच जन

अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २१-०२-२००७ रोजीच्या अपिलावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही निर्णय दिला नसल्याचे म्हटले आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अनुक्रमे माहिती अर्जावर व अपील अर्जावर कोणतीही कारवाई केली नसल्याने त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करुन अपिलार्थीस माहिती देण्यास त्यांना भाग पाडावे अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे तिघेही गैरहजर आहेत. तथापि जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील प्रतिनिधी वरिष्ठ लिपीक श्री. रामचंद्र माधवराव बतिनवार हे त्यांचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी हजर आहेत. वरील प्रकरणा संदर्भात त्यांना काहीही माहिती नाही असे त्यांनी आयोगासमोर कबूल केले. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने माहितीसाठीच्या केलेल्या दिनांक २२-०१-२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताच प्रतिसाद दिला नाही तर जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या दिनांक २१-०२-२००७ रोजीच्या अपिलावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताच निर्णय अपिलार्थीस दिला नाही.

या दोन्ही अधिका-यांच्या अशा प्रकारच्या कृतीमुळे त्यांनी (जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी) अनुक्रमे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) व १९ (६) चा भंग केल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी येथे उल्लेखिल्याप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७

(१) चा भंग केला असल्याने ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीस माहिती न पुरविल्याबद्दल संबंधीत जन माहिती अधिकारी यांना त्यांनी या प्रकरणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग करुन त्याव्दारे अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अधिनियमातील विहित तरतुदीपेक्षा जास्त कालावधीसाठी माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून एक महिन्याच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील. त्याचबरोबर उपरोक्त प्रकरणी त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपवाईबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस सचिव, (जलसंपदा) यांना का करण्यात येऊ नये याचाही खुलासा त्यांनी हे आदेश प्राप्त होताच एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी संदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत निर्णय न देऊन व त्याव्दारे अधिनियमातील कलम १९ (६) चा भंग करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे याची नोंद सचिव (जलसंपदा) यांनी यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात संबंधीत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांनी

मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच त्यांना ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमातील विहित तरतुदीप्रमाणे मागणी केलेली माहिती विहित मुदतीत न पुरविल्याबद्दल त्यांना एकूण रुपये २५००० /- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच एक महिन्याच्या आत सरळ आयोगास सादर करावा. आयोगाने निश्चित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास हेच आदेश अंतीत करण्यात येतील.

३. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस सचिव (जलसंपदा) यांना आयोगातर्फे का करण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच एक महिन्याच्या आत आयोगास सरळ सादर करावा. सदर खुलासा विहित मुदतीत प्राप्त न झाल्यास त्यांचे या प्रकरणी काहीही म्हणणे नाही असे समजून हेच आदेश अंतीम करण्यात येतील.

४. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक ०५-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. भिसे नारायण शामराव, मु. पो. चिंचगव्हाण, तालुका हदगाव, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ (सिंचनभवन), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ (सिंचनभवन), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९५७

निर्णय दिनांक : ०५-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. गिरवलकर मधुकर चनबसअप्पा,<br>माणिकनगर, परळी वैजिनाथ<br>जि. बीड | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा सचिव, प्रगती सेवाभावी संस्था,<br>धर्मापूरी ता.परळी (वै),<br>जि. बीड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अध्यक्ष, प्रगती सेवाभावी संस्था,<br>धर्मापूरी ता. परळी (वै),<br>जि. बीड | | |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गिरवलकर मधुकर चनबसअप्पा (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल) गैरहजर आहेत, जन माहिती अधिकारी तथा सचिव, प्रगती सेवाभावी संस्था धर्मापूरी, श्री. शिवानंद श्रीमंतअप्पा सलगरे ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर

आहेत, तर अध्यक्ष, प्रगती सेवाभावी संस्था,धर्मापूरी (त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणात अपीलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचे कडील दि. १२.०३.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे, त्यांच्या संस्थेसंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" (१) आपण सचिव झाल्यापासून किती बैठका घेतल्या ? असल्यास बैठकीचे इतिवृत्त,सूचनाच्या सत्यप्रती (२) बँकेत खाते उघडले आहे काय ? असल्यास कोणत्या बँकेत व त्याबाबतच्या ठरावाची सत्यप्रत (३) सध्या संस्थेचे कार्यालय कोठे आहे ? नोंदणी ठिकाणी कि इतर ठिकाणी बदलले असल्यास कोणाच्या परवानगीने किंवा कोणत्या ठरावाच्या आधारे त्याच्या सत्यप्रती अथवा स्वयंस्पष्ट खुलासा (४) संस्थेमार्फत कोणत्या शासकीय यंत्रणा राबवल्या जातात काय ? असल्यास ते करतांना घेतलेल्या ठरावाच्या सत्यप्रती आपण सचिव झाल्यापासून आजतागायतच्या ताळेबंदाच्या सत्यप्रती (५) ताळेबंदास मंजूरी घेतलेल्या कार्यकारी मंडळाच्या ठरावाच्या सत्यप्रती"

अपीलार्थी यांनी सदर माहिती शीघ्र टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपीलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाला नसल्याचे त्यांनी आज सुनावणीमध्ये शपथपत्राद्वारे सांगितले. जन माहिती अधिकारी यांचेकडून माहितीचा अधिकार अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने व त्यांचा मूळ माहितीचा अर्ज स्वीकृत करण्याचे जन माहिती अधिकारी यांनी नकारला असल्याचे वाटल्यावरुन, अपीलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(१) अन्वये दि. २०.३.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील सादर केले. अपीलार्थीच्या या अपीलअर्जावर संस्थेच्या जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली असल्याचे अथवा अपीलाचे संदर्भात पत्रव्यवहार केला असल्याचे त्यांनी आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. अपीलार्थी यांचे मते त्यांनी त्यांचा अपीलअर्ज जन अपिलीय अधिकारी यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवून देखिल, जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपील अर्ज स्वीकारण्यास नकार दिला. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचेकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपीलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ७.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचेवर शास्ती लावण्याची विनंती

आयोगास करुन त्यांना अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य पुरवावी, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी गैरहजर, असल्यामुळे त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपिल अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

सुनावणीचे वेळी प्रगती सेवाभावी संस्थेचे सचिव, श्री. शिवानंद श्रीमंतअप्पा सलगरे हे हजर आहेत. आपल्या युक्तीवादामध्ये त्यांनी सर्वप्रथम संस्थेची माहिती देतांना आयोगास असे सांगितले की, त्यांच्या संस्थेचे नाव 'प्रगती सेवाभावी संस्था' असे असून संस्थेचे मुख्यालय बीड जिल्हयामध्ये परळी तालुक्यातील धर्मापूरी येथे आहे. समाजातील निराधार मुलांच्या जेवणाची व राहण्याची सोय या संस्थेमार्फत केली जात असून या मुलांना शाळेत १२ वी इयत्तेपर्यंत शिक्षण देण्याची व्यवस्था संबंधित संस्था करीत असते. संस्थेमध्ये दाखल झालेल्या मुलांची परीक्षा फी, कपडेलत्ते व औषधोपचार इ. सर्व बाबींवरील खर्च या संस्थेमार्फत केला जातो. सदर कार्यवाही पार पाडण्याकरिता त्यांना प्रति विद्यार्थी प्रतिमाह एकूण रु.७५०/- प्रमाणे अनुदान शासनाच्या महिला व बाल कल्याण विभागामार्फत प्राप्त होत असते. अपिलार्थीच्या अर्जासंदर्भात आपल्या युक्तीवादामध्ये त्यांनी पुढे असेही स्पष्ट केले की, अपिलार्थीचा दि. १२.३.२००७ रोजीचा मूळ अर्ज त्यांचेकडे प्राप्त झालेला नाही. यापूर्वी दुसऱ्या एका प्रकरणात याच अपिलार्थी यांनी त्यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाकीट पाठविले असता, त्या पाकीटामध्ये कोणतीही कागदपत्रे दिसून आली नव्हती. अपिलार्थीने प्रथम ज्यावेळी त्यांचेकडे अर्ज पाठविला, त्यावेळी ते परराज्यात असल्याने मुख्यालयी उपस्थित नव्हते. त्यामुळे कदाचित सदर पत्र अपीलार्थीस परत गेले असावे, असे त्यांना वाटते. आता अपीलार्थीने मागितलेली माहिती त्यांना ७ दिवसात विनामूल्य देण्याची त्यांची तयारी आहे.

उपस्थितांनी केलेला युक्तीवादामधील खुलाशामध्ये व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, प्रगती सेवाभावी संस्था या संस्थेमध्ये अद्यापही जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका केल्या गेलेल्या नाहीत. संदर्भिय सेवाभावी संस्थेतर्फे सध्या ८० निराधार मुलांचे पालनपोषण करण्यात येत असून शासनाकडील महिला व बालकल्याण विभागामार्फत ते करीत असलेल्या या कामाबाबत दरमहा रु.७५०/- प्रति विद्यार्थी या प्रमाणे अनुदान प्राप्त होत आहे व त्यायोगे संस्थेस त्यांचे कार्य करण्यासाठी शासनाकडून भरीव अर्थसहाय्य प्राप्त

होत आहे. त्याचप्रमाणे सदर संस्था धर्मादाय आयुक्त यांचेकडे नोंदणीकृत झालेली आहे. या दोन्ही कारणांमुळे सदर संस्था माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २ (ज)(घ)(दोन) मध्ये स्पष्ट केलेल्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याने, सदर संस्था सार्वजनिक प्राधिकरण ठरते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अधिसूचित होऊन दोन वर्षे इतका प्रदीर्घ कालावधी लोटूनही सदर संस्थेमध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका केल्या नाहीत, ही बाब दुदैवी म्हटली पाहिजे. कदाचित, त्यांना संबंधित प्रशासकीय विभागाकडून योग्य ती सूचना प्राप्त झाली नसावी, असे आयोगास वाटते. सबब सचिव ( महिला व बालकल्याण विभाग) मंत्रालय, मुंबई यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्त्याखालील अशा प्रकारच्या सर्व संस्थांमधून (ज्यांना शासनातर्फे अशाप्रकारे भरीव अर्थसहाय्य केले जाते) जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांचे आत, नेमणूका करण्याबाबत त्यांनी आवश्यक ते आदेश जारी करावे. जेणेकरुन, जनसामान्यांना अशा प्रकारच्या संस्थांच्या कारभारासंबंधी आवश्यक ती माहिती प्राप्त होऊ शकेल व माहितीचा अधिकार अधिनियमाचा मूळ हेतू साध्य होऊ शकेल. अपिलार्थीस माहिती देण्याचे दृष्टीने संस्थेचे सचिव यांना असे आदेशित करण्यात येते की, अपीलार्थी यांनी, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

मूलतः संस्थेचे जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांच्या नेमणूका केल्या गेल्या नसल्याने त्यांचेवर कार्यवाहीचे कोणतेही आदेश नाहीत. मात्र या प्रकरणी सचिव, महिला व बाल कल्याण विभाग, मंत्रालय यांनी वैयक्तिक लक्ष घालून वर निर्देशित केल्याप्रमाणे अशा प्रकारच्या सर्व संस्थांमध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका होतील असे पाहून, या सूचनांचे पालन न करणाऱ्या संस्थांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी, असेही त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. सचिव (महिला व बाल कल्याण), मंत्रालय, मुंबई यांनी उपरोक्त संस्था व त्यांच्या अधिपत्त्याखालील अशाच उर्वरित संस्थांमध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील

तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका होतील, असे पहावे.

३. सचिव, प्रगती सेवाभावी संस्था यांनी, अपीलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ०५-०३-२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गिरवलकर मधुकर चनबसअप्पा,माणिकनगर, परळी वैजिनाथ जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा सचिव, प्रगती सेवाभावी संस्था, धर्मापूरी ता. परळी (वैजिनाथ) जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ सचिव, महिला व बाल कल्याण विभाग, मंत्रालय मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/४४
निर्णय दिनांक : ०५-०३-२००८

१ श्री. वाल्मिक विठ्ठलराव शिरसाठ, : तक्रारदार
'गुरुप्रसाद', लासूर रोड,
गंगापूर जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम(पश्चिम) विभाग,
औरंगाबाद

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तक्रारदार श्री. वाल्मिक विठ्ठलराव शिरसाठ (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग औरंगाबाद यांचे प्रतिनिधी उपकार्यकारी अभियंता श्री. मधुकर भुजंगराव देशपांडे ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेविरुध्द त्यांचेकडील दि. १४.०८.२००७ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे अशी तक्रार केली आहे की, आयोगाने दि. ०५.०५.२००७ रोजी सात दिवसांचे आत विनामूल्य माहिती पुरविण्याचे आदेशित करुनही उत्तरवादी यांचेकडून त्यांना गंगापूर येथील कार्यालय वगळता उर्वरित माहिती अद्यापही प्राप्त न झाली नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १८ (२) नुसार त्यांचेवर कार्यवाही करावी, अशी त्यांनी अर्जात पुढे विनंती केली आहे.

उपरोक्त प्रकरणी आज रोजी सुनावणीचे वेळी, तक्रारदार यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांना उत्तरवादी यांचेकडून अपूर्ण माहिती मिळाल्याने संबंधितांविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८(२) प्रमाणे चौकशीची कार्यवाही करण्यात यावी.

उत्तरवादी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी आयोगाने दि. ५.५.२००७ रोजी आदेशित केल्याप्रमाणे, तक्रारदारास दि. १५.५.२००७ रोजी त्यांचेकडे माहिती उपलब्ध असल्याचे पत्र दिले होते. त्यापत्रास अनुसरुन तक्रारदार यांनी, सर्व माहिती दि. १८.५.२००७ रोजी त्यांचेकडून हस्तगत करुन घेतलेली आहे. उत्तरवादी यांनी त्यांच्या म्हणण्यापृष्ठयर्थ आयोगास सादर केलेल्या पुराव्यामध्ये तक्रारदारास त्यांनी वैजापूर, गंगापूर(पूर्व), गंगापूर (पश्चिम), कन्नड (पूर्व), कन्नड (पश्चिम) या सर्व उपविभागाची माहिती दिल्याचे, त्याचबरोबर तक्रारदारास सदर माहिती प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ उत्तरवादी यांचे दिनांक १५.५.२००७ रोजीच्या कार्यालयीन पत्राच्या स्थळप्रतीवर तक्रारदार यांनी दि. १८.५.२००७ रोजी सही केली असल्याचे दिसून येत आहे, हे पाहता तक्रारदारास उत्तरवादी यांचेकडून पूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याचे दिसून येते. तथापि आता तक्रारदारास या प्राप्त माहिती संदर्भात काही तक्रार असल्यास, त्यांनी अधीक्षक अभियेंता, सा.बां.मंडळ,औरंगाबाद यांचेकडे संपर्क साधावा व अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांनी या प्रकरणी तक्रारदारास खरोखरीच अपूर्ण माहिती मिळाली आहे किंवा कसे, याबाबत चौकशी करुन, तक्रारदारास जर संपूर्ण माहिती प्राप्त झाली नसेल तर, त्यांनी संबंधितांविरुध्द प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित करावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०५-०३-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. वाल्मिक विठ्ठलराव शिरसाठ,'गुरुप्रसाद', लासूर रोड,गंगापूर जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९५८

निर्णय दिनांक १०-०३-२००८

१ श्री. संभाजी शिवाजीराव चव्हाण, : अपिलार्थी
रा. हिंगणी (बु.), तालुका बीड,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, बीड
तालुका जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. संभाजी शिवाजीराव चव्हाण हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बीड श्री. राजेंद्र रामराव भारती (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,

जिल्हा परिषद, बीड यांचे प्रतिनिधी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बीड श्री. राजेंद्र रामराव भारती हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २७-१०-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

" मौजे हिंगणी (बु.) येथील ग्रामपंचायतच्या कामात गैरव्यवहार झालेले आहेत. त्यासंदर्भात खालील नमूद माहिती द्यावी.

"१. मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, बीड यांचे पत्र दि. २७-०९-२००६ अन्वये आपणास शिवकालीन पाणी साठवण योजने अंतर्गत झालेल्या गैरव्यवहाराबद्दल पोलीस गुन्हा नोंद करणेबाबत आपणास आदेशीत करण्यात आलेले आहे. सदर पत्र प्राप्त झाल्यानंतर आपण या संदर्भात काय कार्यवाही केलेली आहे. त्या कार्यवाहीची / आदेशांची तसेच पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दिली असल्यास त्या फिर्यादीची प्रत द्यावी.

२. मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, बीड यांचे पत्र दि. २७-०९-२००६ अन्वये आपणास सं. ग्रा. रो. यो. अंतर्गत हौद बांधकाम रु. ५,००० /- काम न करता उचलल्याबद्दल संबंधितांवर पोलीस गुन्हा नोंद करणेबाबत कळविलेले आहे. सदर पत्र प्राप्त झाल्यानंतर आपण यासंदर्भात काय कार्यवाही केलेली आहे. त्या कार्यवाहीची / आदेशांची तसेच पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दिली असल्यास त्या फिर्यादीची प्रत द्यावी.

३. मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, बीड यांचे पत्रान्वये आपणास अंगणवाडी शौचालय बांधकाम न करता रु.

४,५०० /- नियमबाह्य रित्या उचलून हातावर ठेवल्याबद्दल पोलीस गुन्हा नोंद करणेबाबत कळविलेले आहे. सदर पत्र प्राप्त झाल्यानंतर आपण या संदर्भात काय कार्यवाही केलेली आहे. त्या कार्यवाहीची / आदेशांची तसेच पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दिली असल्यास त्या फिर्यादीची प्रत द्यावी.

४. मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, बीड यांचे पत्र दिनांक ०८-०१-२००६ अन्वये आपण ग्रामपंचायतच्या अभिलेख्याची तपासणी करुन मुल्यांकन वगळता तफावतीच्या रकमेची वसूली करणेबाबत कळविलेले आहे. सदर पत्र प्राप्त झाल्यानंतर आपण या संदर्भात काय कार्यवाही केलेली आहे. त्या कार्यवाहीची / आदेशाची प्रत द्यावी.

५. दि. १२-१०-२००६ रोजी मी माझ्या वकीलांमार्फत आपणास फौजदारी गुन्ह्यासंदर्भात नोटीस दिलेली आहे. सदर नोटीस प्राप्त झाल्यानंतर त्या अनुषंगाने आपण काय काय कार्यवाही केली. त्या कार्यवाहीच्या / आदेशांच्या प्रती द्याव्यात."

अपिलार्थीने सदर माहिती शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक ३०-१०-२००६ रोजी प्राप्त झाला.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस ८० पृष्ठांची माहिती दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थीने रुपये १२० /- इतके शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचे भरल्याचे या पत्रावरुन दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक २६-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले.

या अपिलामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना एकूण ३ मुद्दयावर (मुद्दा क्रमांक १, २ व ३) दिशाभूल करणारी माहिती दिली असून मुद्दा क्रमांक ४ व ५ मधील माहिती त्यांना प्राप्त झाली नाही. या अपील अर्जामध्ये पुढे त्यांनी असेही म्हटले आहे की, अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीतील पृष्ठ क्रमांक ०१ ते ७० पर्यतच्या पृष्ठांमध्ये दिलेली माहिती मुळात अपिलार्थीने मागितलेली नाही. सदर माहिती म्हणजे मुल्यांकनाच्या प्रमाणपत्राच्या प्रती आहेत तर अपिलार्थीने शिवकालीन पाणी साठवण योजना, संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना या योजनेखाली झालेल्या कामामध्ये झालेल्या गैरव्यवहाराबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गट विकास अधिकारी यांना संबंधीत पोलीसात गुन्हा नोंद करण्यासंबधी आदेशीत केलेल्या कारवाई संबंधी त्यांनी माहिती मागविली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना ही माहिती न देता पूर्णतया वेगळी म्हणजे दिशाभूल करणारी माहिती दिली आहे. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी त्यांना हेतूपूर्वक माहिती देण्याचे टाळले व त्यांच्या कर्तव्यात कसूर केल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली होती. तद्वतच त्यांनी माहिती मिळण्यापोटी भरलेली रक्कम रुपये १२० /- त्यांना परत करण्याचे आदेशीत करण्याची विनंतीही त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांना केली होती.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जाची सुनावणी दिनांक १५-०१-२००७ रोजी घेऊन आपले आदेश दिनांक १९-०१-२००७ रोजी पारीत

केले आहेत. या सुनावणी आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक या दोघांना मिळून अपिलार्थीस माहिती देण्यासाठी ३९ दिवस इतका विलंब लावल्यामुळे त्यांच्यावर प्रत्येकी रुपये ४८७५ प्रमाणे एकूण रुपये ९७५० /- इतकी शास्ती लावण्याची शिफारस आयोगास केली आहे. अपिलार्थीच्या इतर मागण्या-संदर्भात त्यांच्या अपिलामध्ये कोणतेही भाष्य नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती करुन अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे आदेशीत करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

याच वेळी जन माहिती अधिकारी हे सुनावणीसाठी ०१५-३० वाजता आयोगासमोर उपस्थित झाले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते सध्याच्या पदावर ऑगस्ट २००७ पासून कार्यरत आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-०१-२००७ रोजी दिलेला निर्णय योग्य आहे असे त्यांचे मत आहे. उपस्थित जन माहिती अधिकारी हेच जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधीत्व करत असल्याने त्यांचेही जन अपिलीय अधिकारी म्हणून वरीलप्रमाणे म्हणणे आहे असे त्यांनी सांगितले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गट विकास अधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात शिवकालीन पाणी साठवण योजना, संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना या योजनांतर्गत झालेल्या कामातील गैरव्यवहाराबद्दल संबंधीत पोलीसात गुन्हा नोंद करण्याबाबत आदेशीले होते. त्या आदेशासंदर्भात गट विकास अधिकारी यांनी काय कारवाई केली व जर फिर्याद दिली असेल तर फिर्यादीची प्रत मागितली होती. तसेच शौचालय बांधकामात गैरव्यवहार करुन बांधकाम न करता रुपये ४५०० /- नियमबाह्य उचलल्यामुळे त्यांनी गट विकास अधिका-यांना गुन्ह्याची नोंद करण्यबाबत सूचित केले होते त्याबाबत केलेल्या कारवाईची माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून मागितली होती. परंतु त्यांनी अपिलार्थीस कोणतीही पुरविली नाही. येथे असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या सुचनेनसार त्यांच्या कार्यालयात सदर माहिती प्राप्त होण्यासाठी रुपये १२० /- इतके शुल्क देखील भरले होते. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देण्यात आलेली माहिती ८० पृष्ठांची असून अपिलार्थीस दिलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता ती अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीपेक्षा ती पूर्णतया भिन्न होती असे दिसून येते. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सहाय्यक यांना देखील जन माहिती अधिकारी समजावे अशी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) मध्ये तरतूद आहे. येथे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सहाय्यकहे देखील जन माहिती अधिकारी यांच्याइतकेच जबाबदार आहेत असे आयोगाचे मत आहे. थोडक्यात त्यांनी अपिलार्थीस चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे

सिध्द होत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन त्यांचा निर्णय दिनांक १९-०१-२००७ रोजी दिला आहे. त्याचे अवलोकन करता ते देखील याच निर्णयाप्रत आल्याचे दिसून येते. त्यांना जन माहिती अधिकारी यांना व त्यांचे सहाय्यक यांना शास्ती लावण्याचे अधिकार नसल्याने त्यांनी शास्ती लावण्याची आयोगाकडे शिफारस केली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या निष्कर्षाशी आयोग पूर्णपणे सहमत असून या प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांनी अपिलार्थीस चुकीची व दिशाभूल करणारी माहिती देऊन त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणेचा अभाव स्पष्ट केला आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावामुळे ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरले आहेत.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याने व अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अद्यापपर्यतही दिली नसल्याने त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक " ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) " या लेखाशीर्षाखाली, भरावी. सदर शास्तीचा भरणा त्यांनी शासकीय कोषागारात जास्तीत जास्त पाच हप्त्यामध्ये करावा. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थी यांच्याकडून माहिती

देण्यापोटीचे घेतलेले शुल्क रुपये १२० /- त्यांना हे आदेश निर्गमीत होताच २४ तासाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी परत करावे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी हे शास्तीची रक्कम जास्तीत जास्त पाच हप्त्यात भरतील याची त्यांनी खात्री करुन घ्यावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास येथून पुढे दरमहा नियमितपणे पाठवावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याने व अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अद्यापपर्यंतही दिली नसल्याने त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करावा.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी हे शास्तीची रक्कम जास्तीत जास्त पाच हप्त्यात भरतील याची

खात्री करुन घ्यावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास येथून पुढे दरमहा नियमितपणे पाठवावा.

५. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थी यांच्याकडून माहिती देण्यापोटीचे घेतलेले शुल्क रुपये १२० /- हे त्यांना हे आदेश निर्गमीत होताच २४ तासाच्या आत परत करावे.

औरंगाबाद
दिनांक १०-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संभाजी शिवाजीराव चव्हाण, रा. हिंगणी (बु.), तालुका बीड, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बीड तालुका जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा कोषागार अधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९५९

निर्णय दिनांक १०-०३-२००८

१ श्री. दत्तात्रय ज्ञानोबा घुमरे, : अपिलार्थी
रा. पारगाव घुमरा, तालुका पाटोदा,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमीक),
जिल्हा परिषद, बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमीक),
जिल्हा परिषद, बीड

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. दत्तात्रय ज्ञानोबा घुमरे हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमीक), जिल्हा परिषद, बीड श्री. ज्ञानोबा तुकाराम सोनवणे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमीक), जिल्हा परिषद, बीड यांचे प्रतिनिधी जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमीक), जिल्हा परिषद, बीड हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०४-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५-२००६ या कालावधीतील श्री बंकटस्वामी शिक्षण संस्थेच्यासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

"१. सन २००५ ते २००६ पर्यत घेण्यात आलेल्या अप्रोल प्रस्तावासंदर्भातील माहिती सत्यप्रतीत द्यावी.

२. अप्रोल संदर्भात मिळालेल्या मान्यतेची सत्यप्रत द्यावी.

३. सन २००५ ते २००६ या वर्षात जी अप्रोल मान्यता घेण्यात आली त्यासंदर्भात शिक्षणाधिका-यांची नोटींग फाईल सत्यप्रतीत द्यावी."

अपिलार्थीने सदर माहिती शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहीत केलेल्या मुदतीत कोणताच प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक ०१-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत या अपिलावर कोणताही निर्णय घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आज सुनावणीच्या वेळी आयोगासमोर सादर केलेल्या कागदपत्रावरुन त्यांनी अपिलार्थीच्या या अपिलावर त्यांचा निर्णय दिनांक ०७-०३-२००८ रोजी पारीत केल्याचे दिसून येते. या अपील निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, राज्य माहिती आयोगाकडे

दिनांक २७-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, जन अपिलीय अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई करण्याचे सूचीत करुन अधिनियमातील कलम ७ (६) मधील तरतुदीन्वये त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना उशीर झाला हे त्यांना मान्य आहे. अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०७-०३-२००८ रोजी पोस्टाने विनामूल्य माहिती पुरविली आहे. संबंधीत संचिका त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याने व संबंधीत संस्थेच्या मुख्यध्यापकाकडून आवश्यक ती कागदपत्रे न मिळाल्याने त्यांना ही माहिती पुरविण्यास विलंब लागला. अपिलार्थीस मुदतीत माहिती न देण्यामागे त्यांचा कोणताही असद्हेतू नव्हता किंवा त्यांनी जाणीवपूर्वक अशा प्रकारची टाळाटाळ केलेली नाही. यापुढे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी खालील अर्जाचा ते विहित मुदतीत व सकारात्मक पध्दतीने निपटारा करतील असे आश्वासन या युक्तिवादाच्या शेवटी त्यांनी आयोगास दिले.

जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगाकडे त्यांचा युक्तिवाद लेखी स्वरुपात सादर केला असून त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना दिनांक ०७-०३-२००८ रोजी पुरविण्यात आली असून त्यांनी दिनांक ०८-०३-२००८ रोजी अपिलार्थीच्या अपिलावर निर्णय घेतला असल्याचे नमूद केले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०४-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना सर्वसाधारण परिस्थितीत दिनांक ०३-०१-२००७ रोजी अगर तत्पूर्वी प्राप्त होणे अपेक्षित होते. तथापि अपिलार्थीस सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०३-२००८ रोजीच्या पत्रान्वये दिली. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीपेक्षा त्यांना अपेक्षित असलेली माहिती देण्यासाठी एक वर्ष व दोन महिने इतका विलंब लावल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादाच्या वेळी असे सांगितले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती शैक्षणिक वर्ष २००५-२००६ मधील शाळेच्या वैयक्तीक मान्यतेच्या संबंधात होती. तथापि एका वर्षाच्या कालावधीमध्ये संबंधीत संचिका त्यांच्या कार्यालयात उपलब्ध न झाल्याने अपिलार्थीस त्यांना विहित मुदतीतमध्ये माहिती देणे शक्य झाले नाही. तथापि अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांनी संबंधीत शाळेचे मुख्याध्यापक यांच्या कार्यालयातील संचिकेतून व्यक्तिशः प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस दिनांक ०७-०३-२००८ रोजी पोस्टाने पाठविली. येथे असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांचा अर्ज त्यांच्याकडे दाखल झाल्यापासून एका वर्षाहून जास्त कालावधीमध्ये त्यांना माहिती देण्यासंदर्भात कोणतीही सकारात्मक कारवाई केल्याचे दिसून येत नाही. आयोगाच्या सुनावणीची त्यांना नोटीस प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात काही कारवाई करुन अपिलार्थीस ती आयोगाकडील सुनावणीच्या तीन दिवस आधी पाठविली. त्यांनी प्रयत्न करुन संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकाकडून ही माहिती प्राप्त करुन अपिलार्थीस पाठविली असे त्यांचे म्हणणे आहे. त्यांना ही कारवाई अपिलार्थीचा अर्ज

त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर एका महिन्याच्या आत सहज करता आली असती तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. सदर प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंबंधी दिलेला प्रतिसाद पूर्णतया नकारात्मक होता असे म्हटल्यास ते वावगे होणार नाही. जरी त्यांनी आता अपिलार्थीस माहिती दिली असली तरी ती अधिनियमातील विहित तरतुद टळून गेल्यानंर एक वर्ष दोन महिने इतक्या विलंबाने दिलेली आहे हे पाहता त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव या प्रकरणी दर्शविल्याचे स्पष्ट होत आहे.

सबब अधिनियमातील कलम २० (२) च्या तरतुदीस अनुसरुन असे आदेशीत करण्यात येते की, शिक्षण संचालक, पुणे यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच दोन महिन्याचे आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. शिक्षण संचालक, यांनी, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे हे आदेश निर्गमीत होताच दोन

महिन्याच्या आत यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक १०-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दत्तात्रय ज्ञानोबा घुमरे, रा. पारगाव घुमरा, तालुका पाटोदा, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमीक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमीक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षण संचालक (माध्यमिक), शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, ससून हॉस्पिटल जवळ, पुणे – ४११ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/११७

निर्णय दिनांक : १०-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. केरबा विठ्ठलराव गाढवे,<br>मु.पो.वरुडा ता.जि.उस्मानाबाद. | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्यादित, ढोकी<br>ता. जि.उस्मानाबाद | : | उत्तरवादी |

## विवेचन

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. केरबा विठ्ठलराव गाढवे, (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) हे हजर आहेत व जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी साखर कारखाना मर्यादित, ढोकी जि. उस्मानाबाद ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उत्तरवादी हे सुनावणीसाठी आयोगाने पूर्वकल्पना देऊनही गैरहजर आहेत. याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेविरुध्द त्यांचेकडील दि. २८.१०.२००६ रोजीच्या अर्जान्वये एक तक्रार केली आहे. सदर तक्रारीची राज्य माहिती आयोगाचे मुंबई कार्यालयात दि. १६.०३.२००७ रोजी नोंदणी झालेली आहे. या तक्रारीमध्ये तक्रारदार यांनी असे म्हटले आहे की, त्यांनी

माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत नमुना 'अ' मधील अर्ज दि. १३.१०.२००६ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने उत्तरवादी यांच्याकडे पाठविला होता. सदर अर्ज उत्तरवादी यांचे कार्यालयाकडे दि. १४.१०.२००६ रोजी पोहचला, तथापि दि. १४.१०.२००६ ते २५.१०.२००६ संबंधित अधिकारी हजर नाहीत, असा शेरा पोस्टमनने पाकीटावर नोंदविला. शेवटी दि. २६.१०.२००६ रोजी "घेण्यास टाळाटाळ, मुदत संपली, पाठविणारास परत", असे नोंदवून सदर अर्ज त्यांच्याकडे परत प्राप्त झाला. तक्रारदार यांनी त्यांच्या म्हणण्यापृष्टयर्थ संबंधित लिफाफ्याची व पोस्टमनच्या अभिप्रायाची झेरॉक्सप्रत त्यांचे अर्जासोबत जोडली आहे. आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी उत्तरवादी हजर नाहीत, तथापि या प्रकरणात राज्य माहिती आयोगाने उत्तरवादी यांचेकडे त्यांचेकडील दि. २४.१२.२००७ रोजीच्या पत्रान्वये तक्रारदाराच्या तक्रारीवर स्वयंस्पष्ट अहवाल १५ दिवसांचे आत सादर करण्याचे उत्तरवादी यांना सूचित केले होते. तथापि सुमारे अडीच महिन्यांचा कालावधी लोटल्यानंतर देखिल उत्तरवादी यांचेकडून कोणतीही कार्यवाही केल्याबाबतचा कोणताही खुलासा प्राप्त झाल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. उत्तरवादी यांची, तक्रारदाराच्या माहितीच्या अर्जावर व तक्रारदाराने केलेल्या तक्रारीवर आपले अभिप्राय आयोगाकडे विहित मुदतीत न पाठविण्याची व आयोगाकडील सुनावणीस विनापरवानगी गैरहजर राहण्याची त्यांची कृती, चुकीची आहे.

तक्रारदाराने आज असा युक्तीवाद केला की, उत्तरवादी हे माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्ज स्वीकारीत नसतील तर ते माहिती काय देणार म्हणून उत्तरवादी यांचेविरुध्द कार्यवाही करावी. तक्रारदाराचे म्हणण्यामध्ये, जरी सकृतदर्शनी तथ्यांश दिसून आला तरी, उत्तरवादीस एक अखेरची संधी म्हणून त्यांचा अहवाल सादर करण्याकरता मुदत देणे इष्ट होईल, असे आयोगास वाटते.

सबब असे आदेशित करण्यात येते की, उत्तरवादी यांनी तक्रारदाराच्या माहितीसाठी सदर अर्ज यापुढे त्यांना प्राप्त झाल्यास तात्काळ स्वीकारावा व अशा प्रकारच्या तक्रारीची पुनरावृत्ती होणार नाही, याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे आयोगाच्या दि. २४.१२.२००७ रोजीच्या पत्रानुसार तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारीवर आपला स्वयंपूर्ण अहवाल आयोगाकडे हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांचे आत प्राप्त होईल, अशी व्यवस्था करावी. सदर अहवाल विहित मुदतीत प्राप्त न झाल्यास उत्तरवादी यांचेविरुध्द व्यक्तिशः प्रशासकीय कार्यवाही करण्याची शिफारस संबंधित प्राधिकरणाकडे केली जाईल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२. आयोगाच्या दि. २४.१२.२००७ रोजीच्या पत्रानुसार तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारीवर उत्तरवादी यांनी आपला स्वयंपूर्ण अहवाल आयोगाकडे हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांचे आत प्राप्त होईल, अशी व्यवस्था करावी.

३. उत्तरवादी यांनी तक्रारदाराचा माहितीचा सदर अर्ज यापुढे त्यांना प्राप्त झाल्यास तात्काळ स्वीकारावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक १०-०३-२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. केरबा विठ्ठलराव गाढवे, मु.पो.वरुडा ता.जि.उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, तेरणा शेतकरी साखर कारखाना म. ढोकी ता. जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९६०

निर्णय दिनांक ११-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. बशिरखान हाजीखान,<br>शिवशंकर नगर गृहनिर्माण संस्था, प्लॉट नं. ३०, शिवाजीनगर जवळ, गारखेडा परिसर, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा उपनिबंधक सहकारी संस्था, तालुका कार्यालय, अंजुमन बंगला, क्रांती चौक, अदालत रोड, औरंगाबाद | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, शक्ती सहकार बिल्डींग, कार्तिकी हॉटेलसमोर, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. बशिरखान हाजीखान (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था तालुका कार्यालय औरंगाबाद श्री. ब्रिजेश लक्ष्मणराव जाधव (यापुढे

त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था औरंगाबाद श्री. अनिलकुमार एम. दाबशेडे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व त्रयस्त पक्ष श्री. खंडागळे हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १०-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे शिवशंकर गृहनिर्माण संस्था म. याचे माजी चेअरमन कासलीवाल व सेक्रेटरी सुंदरसिंग नानूसिंग जाधव यांच्या विरुध्द दिनांक २२-०२-१९९३ च्या तक्रारीसंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबत खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

" १. माजी चेअरमन कासलीवाल व सेक्रेटरी सुंदरसिंग नानूसिंग जाधव यांच्या दिनांक २२-०२-९३ च्या लेखी तक्रारीवरुन कोनती कार्यवाही केली ? नसल्यास का नाही केली या विषयी माहीती बाबत.

२. श्री. खंडागळे यांनी चेअरमन नसतांना रु. १७४३९२५ /- ची अफरातफर केल्याबाबत. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक १०-११-२००६ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ११-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देण्यात आला. या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक ११-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले.

सदर अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०२-२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दिनांक ०९-०२-२००७ रोजी पारीत केले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थी यांचे अपील मान्य करुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १०-११-२००६ रोजीच्या अर्जासदंर्भात त्यांच्या कडील उपलब्ध असलेली परिपूर्ण माहिती त्यांना देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशातील सुचनेप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-०२-२००७ रोजीच्या पत्राने अपिलार्थीस असे कळविले की, श्री. खंडागळे यांनी चेअरमन नसतांना रुपये १७,४३,९२५ /- च्या अफरातफरीची चौकशी करण्यासाठी चौकशी अधिकारी यांची नेमणूक केली होती. चौकशी अधिकारी यांनी वेळोवेळी संस्थेच्या चेअरमन व सचिव यांना रेकॉर्ड उपलब्ध करुन देण्याची मागणी केलेली होती. परंतु रेकॉर्ड उपलब्ध झाले नसल्याने या संदर्भात चौकशी करता आली नाही. म्हणून सदर संस्थेवर प्रशासक नेमण्याची कारवाई करण्यात आली.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानुसार जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे नमूद करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती

अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नसून जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आवश्यक ती माहिती पुरविली नाही. जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतर त्यांना दिलेली कागदपत्रे ही संबंधितांनी केलेल्या रुपये १७,४३,९२५ /- या आफरातफरीशी संबंधीत नाहीत. संबंधितांनी केलेल्या आफरातफरीची चौकशी होऊन संबंधितांकडून त्यांची वसुली व्हावी अशी अपेक्षा त्यांनी त्यांच्या युक्तिवादात केली आहे.

त्रयस्त पक्ष श्री. खंडागळे यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी हे संस्थेचे सभासदही नसतांना त्यांनी संस्थेच्या जमिनीचे प्लॉट वाटपा-संदर्भात खोटी कागदपत्रे तयार केली. अपिलार्थीने केलेल्या कथित अफरातफरी-बाबत तालुका न्यायालयात दावा दाखल केला असून या दाव्याची सुनावणी सदर न्यायालयामध्ये चालू आहे व हे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या प्रथम अर्जास त्यांनी विहित मुदतीत प्रतिसाद देऊन अपिलार्थीस दिनांक ११-१२-२००६ रोजी आवश्यक असलेली माहिती पुरविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश दिल्यानंतर देखील त्यांनी दिनांक २२-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणाची पार्श्वभूमी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केली. त्यांनी असे सांगितले की, या प्रकरणी अपिलार्थीने शिवशंकर गृहनिर्माण सहकारी संस्थेसंदर्भात माहिती मागितली होती. या संस्थेचे माजी चेअरमन श्री. कासलीवाल व सेक्रेटरी श्री. सुंदरसिंग नानूसिंग जाधव यांच्याविरुध्द दिनांक २२-०२-१९९३ ची निनावी तक्रार त्यांच्या कार्यालयास प्राप्त झाली होती. या तक्रार अर्जावर कोणती कारवाई केली याची माहिती अपिलार्थीस हवी आहे. प्राप्त झालेली तक्रार निनावी असतांना देखील विभागीय सह निबंधक औरंगाबाद यांच्या कार्यालयामार्फत

तक्रारीमधील मुद्दयांची चौकशी करण्यात आली. चौकशीत या प्रकरणी या संस्थेचे सर्व रेकॉर्ड जप्त करुन संबंधितांवर सी.आय.डी. मार्फत कारवाईचे आदेश दिले होते. सदर शिफारशीस अनुसरुन या संस्थेचे दोन वेळेस लेखा परिक्षण करण्यात आले. तथापि त्यात तक्रारीमध्ये म्हटल्याप्रमाणे कोणतीही अनियमितता आढळून आली नाही. याच प्रकरणी संबंधीत अपिलार्थीने दिनांक १४-०२-२००८ रोजी त्यांचेकडे परत अर्ज दिला असता जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था औरंगाबाद यांनी या संस्थेच्या पुर्नलेखा परिक्षणाचे आदेशही दिनांक २८-०२-२००८ रोजी पारीत केले आहेत. अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये त्यांनी श्री. खंडागळे यांनी चेअरमन नसतांना रुपये १७,४३,९२५ /- इतक्या रक्कमेचा अफरातफर केल्याबाबत अर्जाची माहिती मागविली आहे. याबाबत अभिप्राय देतांना जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, सदर संस्थेचे पुर्नलेखापरिक्षण करण्यासंदर्भात त्यांनी दिनांक २८-०२-२००८ रोजी आदेश पारीत केले असून त्याची प्रत अपिलार्थीस देण्यात आली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ११-१२-२००६ रोजी म्हणजेच अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत आवश्यक ती माहिती दिलेली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये २ मुद्दयावर माहिती मागविली आहे. याबाबत पहिल्या मुद्दयावरील माहिती त्यांनी प्रश्नार्थक स्वरुपात विचारली आहे. या मुद्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संस्थेवर प्रशासकीय कारवाई करण्यात आलेली होती असे कळविले. अपिलार्थीच्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ मध्ये अपिलार्थीस नेमके काय म्हणावयाचे याचा नेमका स्पष्ट बोध होत नाही. अपिलार्थीने आज रोजी आयोगासमोरील केलेल्या युक्तिवादावरुन त्यांना श्री. खंडागळे हे चेअरमन असतांना त्यांनी केलेल्या रुपये १७,४३,९२५ /- च्या

अफरातफरीबाबत माहिती मिळावी असे दिसते. श्री. खंडागळे यांच्याकडून सदर रक्कम वसूल व्हावी असे त्यांना वाटत असल्याचे त्यांनी आयोगासमोर केलेल्या युक्तिवादावरुन दिसून येते. अपिल अर्जातील या मुद्दयावर देखील जन माहिती अधिकारी यांनी त्यांना त्यांच्या कडील दिनांक ११-१२-२००६ व दिनांक २२-०२-२००७ या पत्राव्दारे योग्य ते उत्तर दिल्याचे आढळून येते. अपिलार्थीने श्री. खंडागळे हे चेअरमन नसतांना केलेल्या अफरातफरी बाबत माहिती विचारली आहे. श्री. खंडागळे यांनी चेअरमन नसतांना केलेल्या कथित अफरातफरीचा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी दुरान्वये देखील संबंध येऊ शकत नाही. श्री. खंडागळे यांनी केलेली कथित अफरातफर ही ते नेमके सार्वजनिक प्राधिकरणाच्या कोणत्या पदावर कार्यरत असतांना केली व कोणत्या नात्याने केली हे अपिलार्थीच्या मूळ अर्जावरुन कळून येत नाही. जर अपिलार्थीस श्री. खंडागळे संस्थेचे चेअरमन असतांना केलेल्या अफरातफरीबाबत माहिती हवी होती तर त्यांनी त्याप्रमाणे मूळ अर्जात उल्लेख करावयास हवा होता. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहितीचा एकूण सूर पाहिल्यानंतर अपिलार्थीस श्री. खंडागळे या संस्थेचे चेअरमन असतांना त्यांनी केलेल्या कथित कारवाईबाबत काय कारवाई झाली याबाबत माहिती हवी असल्याचे दिसून येते. यासंदर्भात देखील जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध नसल्याबाबत अपिलार्थीस कळविले आहे. रेकॉर्ड उपलब्ध झाले नाही, रेकॉर्ड उपलब्ध न झाल्यामुळे चौकशी करता आली नाही हे त्यांनी अपिलार्थीस दिनांक २२-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. अपिलार्थीने विचारलेल्या माहिती संदर्भात आयोगाने वरील प्रमाणे केलेले निरिक्षण पाहता अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती मिळाल्याचे दिसून येते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीवरुन ती कोठेही

दिशाभूल करणारी असल्याचे आयोगास वाटत नाही. सबब अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल फेटाळण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ११-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बशिरखान हाजीखान, शिवशंकर नगर गृहनिर्माण संस्था, प्लॉट नं. ३०, शिवाजीनगर जवळ, गारखेडा परिसर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, तालुका कार्यालय, अंजुमन बंगला, क्रांती चौक, अदालत रोड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, शक्ती सहकार बिल्डींग, कार्तिकी हॉटेलसमोर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९६१

निर्णय दिनांक ११-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अविनाश बालराज नगरे,<br>रंगार गल्ली, काद्राबाद,<br>जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा उपविभागीय अभियंता,<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),<br>उपविभाग अंबड, जिल्हा जालना | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग,<br>जालना | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अविनाश बालराज नगरे हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक तर), उपविभाग अंबड श्री. ईश्वर नारायण राजपूत (यापुढे त्यांना जन

माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग श्री. रघुविर गणपतराव यादव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ३१-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ०१ एप्रिल २००६ ते ३० जून २००६ या कालावधीतील त्यांच्या उपविभागातर्फे केलेल्या पाझर तलावावरील मजुरांची खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> " पाझर तलाव (१) हस्त पोखरी पा. त. क्र. ४ (२) हनुमंतनगर पा. त. क्र. ४ (३) शिराढोण पा. त. क्र. ४ (४) नांदीवाडी पा. त. क्र. ४ (५) घुलेवाडी पा. त. क्र. ४ वरिल पाझर तलावाच्या कामावरिल मजुरांची संपूर्ण माहिती, नावसह, संपूर्ण पत्ता, ओळखपत्रांचे झेरॉक्स प्रत, तसेच मस्टरची झेरॉक्स प्रत मिळणेबाबत. "

अपिलार्थीस सदर माहिती कशी द्यावी याचा उल्लेख अपिलार्थीने या अर्जामध्ये केलेला नाही.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी रुपये ५००० /- इतक्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात करण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये मूळ रक्कम २०,००० /- इतकी लिहिली असून सदर रक्कम खोडून रुपये ५००० /- इतकी जन माहिती अधिकारी यांनी केली आहे. सदर खाडाखोडीवर कोणाच्याही सह्या नाहीत.

सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-१२-२००६ रोजी पत्र पाठवून त्यांना माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीच निश्चित किती शुल्क भरावयाचे आहे याची विचारणा केली व तद्वतच

त्यांना आवश्यक असलेल्या प्रतीचे विवरण प्राप्त झाले नसल्याने सदर माहितीच्या प्रतीचे विवरण जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केली. या पत्रावरुन असे दिसून येते की, याच माहितीसंदर्भात कार्यकारी अभियंता यांचे दिनांक २०-११-२००६ रोजी अपिलार्थीस पत्र प्राप्त झाले असून त्यामध्ये अपिलार्थीस रुपये २०,००० /- इतक्या शुल्काचा भरणा करण्याचे सूचित केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक ०५-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. यामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना प्रथमतः रुपये ५००० चा भरणा करावा असे कळविले. तदनंतर पाठपुरावा केल्यानंतर रुपये २०,००० /- चा भरणा करावा असे कार्यकारी अभियंता यांनी कळविले, माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली. माहितीचा अधिकार कायद्याचे उल्लंघन केले व त्यांना माहितीपासून वंचित ठेवले असे म्हटले आहे.

सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी जन माहिती अधिकारी यांना रुपये २०,००० /- च्या प्रतीचे अपिलार्थीस विवरण देण्यास त्यांच्याकडील दिनांक १९-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविल्याचे दिसून येते. या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या पत्रास जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०४-२००७ रोजी व्दितीय अपील

केले.  या अपिलामध्ये त्यांनी, जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी ठेवली नाही व त्यांच्या अर्जासंदर्भात त्यांना कोणतेही आदेश प्राप्त झाले नसल्याचे म्हटले आहे.  या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १०-०३-२००८ रोजी त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती दिली असून ती अपिलार्थीस प्राप्त झाली आहे व या माहितीबाबत त्यांच्याकडून आक्षेप नाही.  अपिलार्थीच्या तशा अर्थाच्या दिनांक १०-०३-२००८ रोजीच्या पत्राची झेरॉक्स प्रत त्यांनी आयोगासमोर सादर केली आहे.  अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी प्रथमतः रुपये ५००० /- व नंतर रुपये २०,००० /- कळविण्याची कारणे जन माहिती अधिकारी यांना विचारली असता त्यांना यासंदर्भात समाधानकारक खुलासा करता आला नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांच्याकडील दिनांक ११-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क रुपये २०,००० /- चा भरणा करण्याविषयी दिनांक ०६-११-२००६ रोजीच्या पत्राने कळविले होते.  त्यांनी अपिलार्थीकडून या पत्रावर अभिप्राय अपेक्षित केले होते.  तथापि अपिलार्थीकडून कोणतेही अभिप्राय त्यांच्याकडे प्राप्त न झाल्याने ते या प्रकरणी सुनावणी घेऊ शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या

प्रकरणी असे दिसून येते की, एखाद्या अर्जदाराने माहितीसाठीचा अर्ज संबंधीत शासकीय प्राधिकरणाकडे सादर केल्यानंतर या अर्जदारास माहिती कशी देता येणार नाही, माहिती देण्यासंदर्भात कशी टाळाटाळ करता येईल याचे मुर्तीमंत उदाहरण या प्रकरणाशी संबंधीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगा-समोर ठेवले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २४-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये रुपये ५००० /- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस अंदाजे किती पृष्ठांची माहिती देण्यात येईल, माहितीचा प्रती पृष्ठ दर याचा उल्लेख केला नाही. सदर रक्कम रुपये ५००० /- वरुन रुपये २०,००० /- वर इतकी कार्यकारी अभियंता यांच्याकडून वाढविण्यात आली. सदर रक्कमेचे समर्थन आज जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी या दोघांपैकी कोणालाही करता आले नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसाठीच्या प्रती अंदाजे ४०० इतक्या होत्या. सदर माहितीच्या झेरॉक्स प्रती व अपिलार्थीने विचारलेली इतर अनुषंगीक माहिती पाहता जास्तीत जास्त अंदाजे रुपये १५०० /- ची मागणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस करणे उचित ठरले असते. तथापि या प्रकरणी अपिलार्थीस माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क भरण्या-करिता ना उप अभियंता यांनी अपिलार्थीच्या अर्जाची पाहणी केली ना कार्यकारी अभियंता यांनी पाहणी केली. अपिलार्थीकडून त्यांनी माहिती देण्यापोटीचे आकारलेले शुल्क निःसंशयपणे अवाजवी होते असे या ठिकाणी दिसून येते. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता ही माहिती अपिलार्थीने प्रथम अर्ज करण्यापूर्वीच्या ३ महिन्यातील आहे त्यामुळे तर अपिलार्थीस ही माहिती देणे जन माहिती अधिकारी यांना फार अवघड होते असे निश्चितपणे म्हणता येणार नाही. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही सकारात्मक प्रयत्न केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात

आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. आता अपिलार्थीस दिनांक १०-०३-२००८ रोजी म्हणजे त्यांनी मूळ अर्ज केल्यापासून अंदाजे पावनदोन वर्षे इतक्या विलंबाने माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येते. अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली असल्याने व त्यावर त्यांचे समाधान झाले असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत. तथापि माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार कोणत्याही भारतीय नागरिकाने सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहितीची मागणी केल्यास ती ३० दिवसाच्या आत पुरवण्यात येईल या मूळ तत्वाची जन माहिती अधिकारी यांनी पूर्णतः पायमल्ली आपल्या कृतीव्दारे केल्याचे दिसून येते. त्यांच्या या कृतीवरुन माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतुदीसंबंधी त्यांच्या मनात असलेला अनादर स्पष्ट होतो असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीस या प्रकरणी माहिती देण्यापोटी विहित मुदतीपेक्षा जास्त कालावधी लावून त्यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपवाई सिध्द केल्याचे दिसून येते असे आयोगाचे मत आहे.

सबब सचिव (जलसंपदा) यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी व तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा. अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल

मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल सचिव (जलसंपदा) त्यांनी त्यांच्यावर हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी व तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ११-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अविनाश बालराज नगरे, रंगार गल्ली, काद्राबाद, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रा-तील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९६२

निर्णय दिनांक ११-०३-२००८

१ श्री. शेषराव एकनाथ टेकाळे, : अपिलार्थी
रा. कुपटी (मा.), तालुका माहूर,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तालुका कृषि अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, माहूर,
तालुका माहूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय कृषि अधिकारी,
उपविभाग कृषि कार्यालय, किनवट,
जिल्हा नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, माहूर, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, माहूर, जिल्हा नांदेड

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शेषराव एकनाथ टेकाळे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कृषि

अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, माहूर श्री. बापुराव नामदेवराव वेबंडे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, माहूर, जिल्हा नांदेड श्री. अशोक माधवराव पिंपळगावकर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २६-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे २५-१२-२००५ ते ०१-०६-२००६ या कालावधीतील श्री. धर्मराज आत्माराम यांना अतिवृष्टी अनुदान धनादेश दिल्या-संदर्भातील माहिती खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> “१. मुळ लाभार्थी आत्माराम विश्वनाथ यांचे मंजूर अनुदान चेक क्र. १२१४६७ रक्कम ७५०० /- दि. २५-१२-०५ उचल नंतर परत उक्त अनुदानाचा चेक यांना अनुदान कोणत्या नियमानुसार, कोणत्या अधिका-याची मान्यता आदेश बाबत कागदपत्रांची छायांकीत प्रत मिळणेबाबत.
>
> २. मुळ लाभार्थी आत्माराम विश्वनाथ यांना जारी केलेल्या धनादेश उचल केल्यानंतर आपल्या कार्यालयाची फसवणूक झाली अशी तक्रार असतांना सदर तक्रारीबाबत काय कार्यवाही केली कोणता निर्णय घेण्यात आला त्या कागदपत्राची छायांकीत प्रत मिळणेबाबत.
>
> ३. अतिवृष्टी अनुदान रक्कम वसूल करुन त्या रक्कमेबाबत कार्यालयाची फसवणूक झाल्यास फसवणूक करणा-या विरुध्द कोणती कार्यवाही करण्यात येते याबाबतच्या शासन निर्णय प्रत मिळणेबाबत.”

अपिलार्थीने सदर माहिती स्पीड पोस्टाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिली असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांच्या तालुक्यात स्पीड पोस्टाची सेवा उपलब्ध नसल्याने त्यांनी सदर पत्र अपिलार्थीस साध्या पोस्टाव्दारे पाठविले होते. सदर पत्र अपिलार्थीस पाठविल्यापृष्ठ्यर्थ त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीची झेरॉक्स प्रत सादर केली आहे. यावरुन त्यांनी सदर पत्र अपिलार्थीस साध्या पोस्टाने पाठविल्याचे दिसते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

सदर अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०९-२००६ रोजी त्यांच्या कार्यालयात ठेवली होती. तथापि सुनावणीच्या दिवशी अपिलार्थी हे उपस्थित न राहिल्याने अपिलार्थीचे अपील जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात उपस्थित होताच त्यांना पुन्हा योग्य ती माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत करुन, निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांनी हा निर्णय अपिलार्थीस त्याच दिवशी कळविल्याचे त्यांच्या कार्यालयातील झेरॉक्स प्रतीवरुन दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २९-०९-२००६ रोजीच्या आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०३-२००७ रोजी

व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे आयोगास लेखी युक्तिवाद सादर करण्यात आला. अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या लेखी म्हणण्याव्दारे त्यांनी आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांच्या, माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही कारवाई केली नाही. संबंधिताच्या कार्यालयामध्ये माहिती अधिकारी हा फलक लावलेला नाही, एकच अतिवृष्टी अनुदान धनादेश संबंधितांकडून २ वेळा दिला गेला असल्याने संबंधितावर कारवाई व्हावी अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे. त्याचबरोबर मयत इसमाची ओळख पटवून संबंधीत पोलीस पाटलाव्दारे जो चेक दिला त्याच्याबद्दल पोलीस पाटलावरही कारवाई करावी अशी त्यांनी शेवटी विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, सन २००५-२००६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमध्ये कै. आत्माराम विश्वनाथ यांचे नांवे प्राप्त झालेले अनुदान संबंधीत गावचे पोलीस पाटील यांच्या संमतीने, कै. आत्माराम विश्वनाथ यांची गेल्या २० वर्षापासून कास्त करणारे, श्री. भारत लांडगे यांना दिले होते. तथापि नंतर कै. आत्माराम विश्वनाथ यांचे वारसपुत्र श्री. धर्मराज आत्माराम यांनी तक्रार केल्यावरुन सदरील अनुदान श्री. भारत लांडगे यांच्याकडून परत घेतले व ते कै. आत्माराम विश्वनाथ यांचे वारसपुत्र धर्मराज आत्माराम यांच्याकडे आवश्यक ती कारवाई करुन दिनांक ०१-०६-२००६ रोजी हस्तांतरीत केले. सदरील अनुदान, कार्यालय प्रमुखाने संबंधीत गावचे पोलीस पाटील यांचे संमतीने अदा केले. वारसदारांना वाटप करावयाच्या अनुदानाविषयी कसल्याही प्रकारच्या मार्गदर्शक सूचना त्यांच्याकडे नाहीत. त्यामुळे शासनाची फसवणूक झाल्याचे लक्षात येताच

त्यांनी या प्रकाराची दुरुस्ती करुन योग्य त्या व्यक्तीस सदर सानुग्रह अनुदान वितरीत केले ही सर्व माहिती त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १४-०८-२००६ रोजीच्या पत्रामध्ये साध्या पोस्टाव्दारे पाठविली. त्यांच्याकडे स्पीड पोस्टची सुविधा नसल्याने ही माहिती साध्या पोस्टाने पाठविली होती. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये पुढे असेही सांगितले की, याच प्रकाराबाबत त्यांनी दिनांक १८-०१-२००६ रोजी त्यांच्या अर्जान्वये मराठवाडा ग्रामीण बॅकेकडे माहिती मागविली असता त्यांनी ती अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०७-०२-२००७ च्या पत्राव्दारे दिलेली आहे. सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली असून आता माहिती मागण्याची इच्छा नसल्याचे अपिलार्थी यांनी त्यांना दिनांक १९-०१-२००६ रोजी लिहून दिले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे दिनांक १२-०९-२००६ व दिनांक ०८-११-२००६ रोजी त्यांच्या दिनांक २६-०६-२००६ रोजीच्या मूळ अर्जासंबंधात दोनदा अपील केले होते. यापैकी त्यांच्या दिनांक १२-०९-२००६ रोजीच्या अपील अर्जास अनुसरुन त्यांनी त्यांच्या कार्यालयात दिनांक २९-०९-२००६ रोजी सुनावणी ठेवली होती व सदर सुनावणीचे पत्र त्यांनी अपिलार्थीस पाठविले होते. तथापि सदर सुनावणीस ते गैरहजर असल्याने त्यांनी एकतर्फा निर्णय घेऊन अपिलार्थीस ते जन माहिती अधिकारी कार्यालयात ज्यावेळी हजर राहतील त्यावेळी त्यांना माहिती देण्याचे आदेशीत करुन अपील निकाली काढले आहे. त्यांच्या कार्यालयामध्ये माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची नांवे दर्शविणारे मोठ्या आकाराचे फलक कार्यालयाच्या दर्शनी भागात लावलेले आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २६-०७-२००६ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या

मुदतीमध्ये प्रतिसाद दिला आहे. तथापि सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले. तथापि सुनावणीचे पत्रही अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाच्या जावक नोंदवहीची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली आहे. यावरुन त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जावर व अपील अर्जावर योग्य तो प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. या प्रकरणी शासनातर्फे मंजूर झालेले सानुग्रह अनुदान वेगळ्या व्यक्तीस प्रदान झाल्याने व सदर अनुदानाची रक्कम त्या व्यक्तीकडून परत घेऊन नंतर ती योग्य त्या व्यक्तीस दिली गेली आहे. त्यामुळे या प्रकरणी शासनाचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही चुकीच्या व्यक्तीस अनुदान देण्याची कारवाई ज्या कर्मचा-याच्या हातून घडली त्या कर्मचा-यास कृषि विभागाच्या अधिका-यांनी तोंडी समज दिल्याचे त्यांनी आयोगास केलेल्या निवेदनामध्ये म्हटले आहे. यावरुन या प्रकरणाची कारवाई पूर्ण झाली असल्याचे दिसून येते. चूक केलेल्या संबंधीत कर्मचा-यावर शासनाच्या सेवानियमाप्रमाणे प्रशासकीय कारवाई करण्याचे व सदर निर्णय पूर्णतः प्रशासकीय स्वरुपाचा असल्याने व यासंदर्भात हस्तक्षेप करण्याची अधिकारिता आयोगास नसल्याने संबंधितांनी चूक करणा-या कर्मचा-यांना दिलेल्या तोंडी समज या कार्यवाहीबाबत आयोगाचे कोणतेही अभिप्राय नाहीत. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २६-०७-२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीस माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी जाणीवपूर्वक टाळाटाळ केल्याचे आयोगाच्या निदर्शनास न आल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल

निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २६-०७-२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक ११-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेषराव एकनाथ टेकाळे, रा. कुपटी (मा.), तालुका माहूर, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९६३

निर्णय दिनांक ११-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. गिते अरुण उत्तमराव,<br>मु. वागबेट, पो. बेलंबा, तालुका परळी<br>वैजनाथ, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याध्यापिका, साईनाथ माध्यमिक<br>विद्यालय, वागबेट तालुका परळी वैजनाथ<br>जिल्हा बीड | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा सचिव तानाजी मालुसरे शिक्षण<br>प्रसारक मंडळ, वागबेट, तालुका परळी<br>वैजनाथ, जिल्हा बीड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गिते अरुण उत्तमराव, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, साईनाथ माध्यमिक विद्यालय, वागबेट तालुका परळी वैजनाथ जिल्हा बीड व जन अपिलीय अधिकारी तथा सचिव तानाजी मालुसरे

शिक्षण प्रसारक मंडळ, वागबेट, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड हे सर्व गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०४-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेसंदर्भात, शाळा स्थापन झाल्यापासून ते अर्जाच्या दिनांकापर्यतच्या कालावधीतील माहिती खालील प्रमाणे मागविली होती.

“ अ) आपली शाळा स्थापनेपासून आजपर्यत वर्षनिहाय-

(१) तपासणी अहवालाच्या सत्यप्रती (२) संच मान्यतांच्या व वैयक्तीक मान्यतांच्या सत्यप्रती (३) ऑडिट रिपोर्टसच्या सत्यप्रती (४) कर्मचारी सेवा जेष्ठता यादी (५) वेळापत्रकांच्या सत्यप्रती (शिक्षकनिहाय) (६) लॉगबुक, हालचाल रजिस्टर, आवक जावक रजिस्टर व रजा नोंदवहीच्या सत्यप्रती (७) शालेय समितीच्या वर्षनिहाय कार्यकारणीच्या व त्यांनी घेतलेल्या प्रत्येक बैठकीच्या बैठकनिहाय इतिवृत्त घेतलेल्या प्रत्येक निर्नयाच्या सत्यप्रती (८) आपल्या शाळेतील प्रत्येक कर्मचारी नियुक्तीच्या वेळी वर्तमानपत्रातील जाहिरातीसह सेवायोजन कार्यालय व समाजकल्याण कार्यालय यांचेशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या व इतर कायदेशीर अटींच्या पालनांच्या सत्यप्रती (९) ३० सप्टेंबर व ३१ मार्चच्या सांख्यिकी अहवालांच्या सत्यप्रती (१०) शिक्षक-पालक संघाच्या प्रोसिडिंग रजिस्टरच्या सत्यप्रती (११) शिक्षक हजेरीपटाच्या सत्यप्रती (१२) शासनाकडून (समाजकल्याणकडून) विविध योजनांव्दारे शिष्यवृत्ती मिळालेल्या विद्यार्थ्यांची यादी व शिष्यवृत्ती वाटप रजिस्टरच्या सत्यप्रती (१३) शालेय साहीत्य खरेदीच्या (चिकटबुकाच्या) पावत्यांच्या सत्यप्रती (१४) मृतसाठा रजिस्टरच्या सत्यप्रती (१५) विना अनुदान काळामध्ये

शाळेतील कर्मचा-यांना बॅकेमार्फत दरमहा वेतन दिले आहे काय ? असल्यास पगार वाटप रजिस्टरच्या सत्यप्रती (१६) कॅशबुकच्या सत्यप्रती.

ब) आपल्या शाळेतील सर्व कर्मचा-यांनी कोणत्या तारखेपासून व्यवसाय कर भरलेला आहे व आयकर विवरणपत्र भरलेले आहेत ?

क) अनुदान निर्धारणाच्या फाईल्सच्या सत्यप्रती

ड) आजपर्यत संस्थेने / मु. अ. ने किती कर्मचा-यांना सेवेतून कमी केले आहे याची कारणे पुरावेसह द्यावीत.

इ) संस्थेविरुध्द / आपल्या विरुध्द किती कर्मचा-यांनी कोर्टात केसेस दाखल केलेल्या आहेत त्याची कारणे काय आहेत व सदर केसेसबाबत आपली भूमीका / मत काय आहे ?

फ) आजपर्यत वेतनेत्तर अनुदानाच्या प्राप्तीच्या पत्रव्यवहारासह वर्षनिहाय तपशील द्यावा.

ग) शाळेच्या जागेचा नकाशा, इमारत बांधकाम परवाना किंवा किरायाने असल्यास भाडेपत्राच्या व कराराच्या सत्यप्रती.

ह) शालेय खर्च भागविणे कामी आपण आजपर्यत वर्षनिहाय कोणाकोणा कडून रक्कम घेतली याबाबत रक्कम देणाराचे नाव, पद, दिनांक व रक्कमेसह तपशील.

आय) संस्था सचिव / अध्यक्ष व मु. अ. यांचे संयुक्त व वैयक्तिक खाते कोणकोणत्या बॅकेत आहेत ? त्या पासबुकाच्या अद्यावत नोंदीसह सत्यप्रती. ज) मुलांसाठी व मुलींसाठी (स्त्री व पुरुष) स्वतंत्र मुतारी व स्वच्छतागृह आहेत काय ? असल्यास नकाशासह पुरावा द्यावा तसेच शालेय क्रिडांगणाबाबत क्षेत्रफळ व नकाशासहीत माहिती द्यावी.

ल) आपली शाळा अल्पसंख्यांक आहे काय ? पुरावा द्यावा.”

अपिलार्थीने सदर माहिती शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

सदर अर्ज अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे पोस्टाने पाठविला होता. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर अर्ज अपिलार्थीस परत आल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिका-याकडून अपिलार्थीने पाठविलेला माहितीसाठीचा अर्ज न स्विकारल्याने अपिलार्थीने याबाबत जन अपिलीय अधिकारी याच्या निदर्शनास आणून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

तथापि अपिलार्थीचा हा अपील अर्ज देखील जन अपिलीय अधिकारी यांच्या कडून विनाकार्यवाही परत आल्याचे दिसून येते. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांचा अपील अर्ज दोनदा पाठविला होता परंतु दोन्ही वेळेस सदर अपील अर्जाची तामिली न होता तो मूळ प्रतीत अपिलार्थी यांच्याकडे परत प्राप्त झाला आहे.

वरील सर्व प्रकाराने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती दिली नाही व त्यांच्या माहितीसाठीच्या व अपील अर्जावर स्विकृती रजिस्टरचे पाकीट तसेच परत पाठवून दिल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे तिघेही गैरहजर आहेत. अपिलार्थीने आयोगाकडे सादर

केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे वेगळ्या निवेदनाव्दारे आयोगास पोस्टाने पाठवून दिले आहे. या निवेदनातील त्यांचे सादर केलेले म्हणणे त्यांचा युक्तिवाद समजण्यात येत आहे.

अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, अपिलार्थीने मूळ माहितीसाठीचा व अपील अर्ज अनुक्रमे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक ०४-०९-२००६ व २५-०९-२००६ राजी पाठविला होता. तथापि जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचा माहितीसाठीचा व अपील अर्ज स्विकृत करण्यास नकार दिल्याने ते माहितीपासून वंचित ठेवले गेले व त्यांना अद्याही त्यांनी मागितलेल्या माहितीची आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी या दोघांनीही एकाच प्रकारचे म्हणणे सादर केले आहे. त्यामध्ये त्यांनी असा उल्लेख केला आहे की, अपिलार्थीस यापुर्वीच्या दिनांक १६-०५-२००५ रोजी केलेल्या अर्जानुसार सर्व माहिती पुरविली आहे. तथापि अपिलार्थी माहिती प्राप्त होऊनही पुन्हा पुन्हा त्याच त्याच माहितीची मागणी करत असतात. अपिलार्थीस यापूर्वी सर्व माहिती दिली आहे. अपिलार्थीचे टपाल त्यांनी जाणीवपूर्वक नाकारले नाही. अपिलार्थी हे माहितीचा अधिकाराखाली त्यांच्याकडे पैसे मागत असतात व जर पैसे दिले नाही तर त्यांना माहितीचा अधिकाराचा आधार घेऊन ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न करतात. अपिलार्थी व त्यांचे सहकारी हे पंचायत समिती, तहसील कार्यालय, शिक्षण विभाग इत्यादी कार्यालयात जाऊन माहितीचा अधिकाराखाली अधिका-यांना व लोकांना पैसे मागत असतात. त्यांनी माहितीसाठी पैसे मागितल्यामुळे त्यांच्याविरुध्द त्यांनी फिर्याद दाखल केली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे त्यांना माहिती देता येत

नाही तसेच अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना मानसीक त्रास देत असतात व माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीच्या संदर्भात त्यांची भूमिका अपिलार्थीशी नेमकी सहकार्याची राहील.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, याच अपिलार्थीने याच जन माहिती अधिका-याकडे केलेल्या दिनांक २१-१२-२००५ रोजीच्या अर्जासंदभात राज्य माहिती आयोगाने दिनांक १६-१०-२००७ रोजी सुनावणी घेऊन आपला निर्णय दिला आहे. अपिलार्थीने या अर्जामध्ये मागितलेली बव्हंशी माहिती ही पूर्वी दिनांक २१-१२-२००५ च्या अर्जामध्येही मागितल्याचे दिसून येते. या अर्जासंदर्भात निर्णय देतांना आयोगाने जन माहिती अधिका-याने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती इतर संस्थांकडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरविण्याचे सूचित केले होते. त्याचबरोबर आयोगाने सदर संस्थेस अपिलार्थीस माहिती पुरविण्यामध्ये स्वारस्य नसल्याचा निष्कर्ष काढून संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल संस्थेने प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याचे आदेशीत केले होते. अपिलार्थीच्या विचाराधीन प्रकरणात असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या स्वरुपाची आहे व ती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी एकाच प्रकारचा खुलासा आयोगास सादर केला आहे. आयोगास खुलासा सादर करतांना त्यांनी आज सुनावणीच्या दिवशी आयोगास त्यांच्याकडील दिनांक ३०-०९-२००६ रोजीच्या पत्राचा फॅक्स पाठविला आहे. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ३०-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २००० /- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित

केल्याचे म्हटलेले आहे. सदर दिनांक ३०-०९-२००६ रोजीचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी पाठविले किंवा कसे याबाबतचा कोणताही पुरावा जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेला नाही. त्याचबरोबर सदर पत्र प्राप्त झाल्याचा अपिलार्थीच्या अर्जात उल्लेख नाही त्यामुळे सदर पत्र म्हणजे जन माहिती अधिकारी यांनी पाश्चत बुध्दीने पाठविलेले पत्र आहे असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून आलेला हा फॅक्स म्हणजे त्यांच्या पाश्चात बुध्दीने पाठविलेले पत्र असे आयोग मानतो. कारण त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या म्हणण्यामध्ये माहितीपोटी लागणा-या शुल्काच्या रुपये २०००/- च्या मागणीचा उल्लेख वेगळ्या अक्षरात केलेला दिसून येतो. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या वर केलेल्या पत्रापृष्ट्यर्थ काही कागदपत्रे सादर केली आहेत. अपिलार्थी कसेही असले तरी ते भारताचे नागरिक असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ च्या तरतुदीप्रमाणे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून सार्वजनिक माहिती मागण्याचा हक्क आहे व अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत देणे हे जन माहिती अधिकारी यांचे अधिनियमातील कलम ७ प्रमाणे कर्तव्य आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगाकडे केलेला लेखी युक्तिवाद त्यांच्या अपिलार्थीस माहिती न देण्याच्या कृतीचे समर्थन करु शकत नाही.

सबब संबंधीत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०४-०९-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल

मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०४-०९-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक ११-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गिते अरुण उत्तमराव, मु. वागबेट, पो. बेलंबा, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, साईनाथ माध्यमिक विद्यालय, वागबेट तालुका परळी वैजनाथ जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव तानाजी मालुसरे शिक्षण प्रसारक मंडळ, वागबेट, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१५६

निर्णय दिनांक : ११-०३-२००८

१ श्री. उत्तमराव नारायणराव देशमुख, यावल : तक्रारदार
(सध्या रा. छुट्टाकी बजारियॉं, लष्कर,
ग्वालियर, मध्यप्रदेश.)

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तथा तलाठी, जुनी चावडी, मेनरोड यावल,
ता.यावल जि. जळगाव

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तक्रारदार श्री. उत्तमराव नारायणराव देशमुख (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा तलाठी, यावल जि. जळगाव ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेविरुध्द त्यांचेकडील दि. २८.०९.२००६ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे एक तक्रार केली आहे. सदर तक्रारीची आयोगाचे मुंबई येथील कार्यालयात दि. ५.१०.२००६ रोजी नोंद झालेली आहे.

या तक्रार अर्जामध्ये तक्रारदार यांनी असे नमुद केले आहे की, त्यांनी उत्तरवादी यांचेकडून त्यांनी १९९४ मध्ये दिलेल्या वारसा हक्काचे प्रमाणपत्राची नोंद ज्या कागदपत्राच्या आधारे घेतली त्याची माहिती देण्याची विनंती त्यांच्या दि. ६.९.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे केली होती. त्याचप्रमाणे उपसंचालक, भूमी अभिलेख, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडूनही सि.स.क्र.८६५ मधील त्यांचे मालकीच्या जमिनीच्या

फेरफारीसंबंधी माहिती त्यांच्या दि. १४.७.२००६ च्या पत्राद्वारे मागितली होती. सदर माहिती त्यांना उशिराने देण्यात आली, तसेच जी माहिती देण्यात आली, ती खोटया कागदपत्रांच्या आधारे तयार केली असल्याचे नमुद करुन संबंधितांवर कडक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. याबाबत तक्रारदाराच्या तक्रारीचे निश्चित स्वरुप कळत नसल्याने त्यांना त्यांची निश्चित तक्रार काय आहे, यासंबंधी विचारणा केली असता, त्यांनी असे सांगितले की, यावल मधील सि.स.क्र.८६५ मधील मालकी हक्कामध्ये बदल करण्यासाठी ज्या कागदपत्रांचा आधार संबंधित कार्यालयाने घेतला, त्या कागदपत्रांच्या प्रतीची त्यांनी मागणी केली होती, सदर कागदपत्रे त्यांना दि. ७.२.२००८ रोजी आयोगाकडील प्रथम प्रस्तावित सुनावणीचे वेळी उत्तरवादी यांचेकडून प्राप्त झाली. सदरच्या मूळ कागदपत्रांवर त्यांची सही नसून, त्यांच्या खोटया सहया करुन बनावट कागदपत्रांच्या आधारे, तलाठी कार्यालयाने वारसा प्रमाणपत्र दिलेले आहे. उपसंचालक, भूमी अभिलेख नाशिक यांचे कार्यालयाने या कागदपत्रांच्या आधारे नवीन मालकी हक्काची नोंद केलेली आहे. मूळात ज्या प्रतिज्ञापत्राच्या आधारे, वारसा प्रमाणपत्र दिले आहे ते प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे यावर तक्रारदार यांनी सही केलेली नसून, त्या कार्यालयाने बनावट कागदपत्रे तयार करुन, त्यांच्या मालमत्तेच्या मालकीहक्कामध्ये फेरफार केला आहे व त्यामुळे संबंधितांविरुध्द कारवाई करण्यात यावी या संबंधी त्यांनी वेळोवेळी उपसंचालक, भूमी अभिलेख नाशिक व जिल्हाधिकारी जळगाव यांचेकडे समक्ष संपर्क साधूनही या प्रकरणात कार्यवाही करण्यात आली नाही व त्यांना संबंधितांकडून कोर्टात दाद मागावी,असे तोंडी सांगण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणी त्यांनी न्यायालयातही प्रकरण दाखल केलेले आहे. यावरुन त्यांची मूळ तक्रार बनावट कागदपत्रांच्या आधारे मालकी हक्कामध्ये फेरफार केल्यासंबंधी आहे, असे दिसते.

या प्रकरणी उत्तरवादी यांचेकडून वस्तुस्थितीबाबत खुलासा विचारला असता, त्यांनी त्यांचे लेखी निवेदन सादर केले व त्यामध्ये त्यांनी असे स्पष्ट केले आहे की, तक्रारदार यांनी दि. ६.९.२००६ रोजीच्या त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जाद्वारे, उत्तरवादी यांच्या कार्यालयाने दि. ६.१.९४ रोजी दिलेल्या वारसा दाखल्यासंबंधी मूळ कागदपत्रांच्या नकला मिळण्याबाबत विनंती केली होती. यावर तत्कालीन तलाठी यांनी दि. २५.९.२००६ रोजीच्या पत्राद्वारे संबंधित कागदपत्रे, अर्ज व प्रतिज्ञापत्र यांचा आढळ होत नाही, असे कळविले. दि. २२.९.२००७ रोजी तक्रारदार यांनी पुन्हा तीच कागदपत्रे मिळण्याबाबत नव्याने अर्ज केला. त्यावेळी पुन्हा उत्तरवादी (सध्याचे तलाठी) जे दि. १.६.२००७ पासून कार्यरत होते, त्यांनी संबंधित कागदपत्रांचा शोध घेतला असता त्यांनाही संबंधित कागदपत्रे उपलब्ध न झाल्याने या कागदपत्रांचा आढळ

होत नसल्याबाबत तक्रारदार यांना त्यांनी दि. ११.१०.२००७ रोजी पुन्हा कळविले. त्यानंतर सदर कागदपत्रांच्या शोध उत्तरवादी कार्यालयाने सुरुच ठेवला व त्यांना अखेरीस दि. २८.१.२००८ रोजी ही कागदपत्रे सापडली. त्यानंतर त्यांनी तक्रारदार यांना दूरध्वनीवरुन माहिती नेण्याबाबत कळविले व सदर माहिती त्यांनी दि. ७.२.२००८ रोजी या तक्रारीच्या प्रथम सुनावणीचे वेळी पुरविली. सदर माहिती न देण्यामध्ये तक्रारदारास कोणताही त्रास देण्याचा त्यांचा हेतू नव्हता, असेही त्यांनी त्यांच्या निवेदनामध्ये नमुद केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंचा युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन दिलेली कागदपत्रे पाहता,असे दिसून येते की, या प्रकरणी तक्रारदार यांना त्यांच्या दि. ६.९.२००६ रोजी माहितीच्या अर्जाद्वारे मागितलेली माहिती, उत्तरवादी  यांनी दि. ७.२.२०००८ रोजी म्हणजे सुमारे १ वर्ष ५ महिने इतक्या विलंबाने माहिती पुरविली आहे. तसेच सदर कागदपत्रे ही बनावट कागदपत्रे असल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे. तक्रारदार हे एकाचवेळी तलाठी कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, उपसंचालक भूमी अभिलेख कार्यालय यांचेकडे त्यांचे जमिनीचे मालकीहक्काबाबत पाठपुरावा करीत असल्याचे दिसते. त्यांना संबंधित कार्यालयाकडून योग्य प्रतिसाद मिळाला नसल्याची त्यांची भावना आहे. मालकी हक्कासंबंधी जी मूळ कागदपत्रे उपलब्ध करुन दिली आहेत, ती बनावट असल्यासंबंधीची तक्रार गंभीर स्वरुपाची आहे. संबंधित कागदपत्र, त्यांचे कार्यालयात उपलब्ध असूनही सुमारे १ वर्ष ४ महिने इतक्या विलंबाने पुरवून त्यांनी स्वतःस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे.सबब तक्रारदाराने मागितलेली माहिती अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने दिल्याबद्दल संबंधित उत्तरवादी यांच्यावर रु. २५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार मात्र) इतकी शास्ती लावण्यात येत आहे, या शास्तीची विभागणी, आवश्यक वाटल्यास, जिल्हाधिकारी, जळगाव यांनी संबंधित  जबाबदार कर्मचाऱ्यामध्ये, हे आदेश पारित होताच सात दिवसांचे आत करावी व संबंधित उत्तरवादी हे शास्तीच्या रकमेचा भरणा शासकीय कोषागारात, खालील लेखाशीर्षाखाली, हे आदेश निर्गमित झाल्यानंतर जास्तीत जास्त पाच हप्त्यात करतील, असे पहावे. शास्तीचे हप्ते संबंधित उत्तरवादी यांनी माहे एप्रिल, २००८ पासून दरमहा नियमितपणे भरावेत.

" ००७० इतर प्रशासनिक सेवा-
६० इतर सेवा-
८०० इतर जमा रकमा-
(१८) माहितीचा अधिकार-००७०-००६-१"

तसेच या प्रकरणी कथित बनावट कागदपत्रांसंबंधी, जिल्हाधिकारी जळगाव यांनी तलाठी कार्यालयाने ज्या मूळ कागदपत्रांच्या आधारे वारसा प्रमाणपत्र दिले गेले आहे, त्यासंदर्भात व ज्या कथित बनावट कागदपत्रांच्या आधारे उपसंचालक, भूमी अभिलेख, नाशिक यांच्या कार्यालयाने मालकीहक्कामध्ये फेरफार केला आहे, त्याबाबत उपसंचालक, भूमी अभिलेख, नाशिक यांनी सविस्तर चौकशी करुन, आवश्यक असल्यास संबंधिताविरुध्द योग्य ती कारवाई त्वरित करावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२. उत्तरवादी यांचेवर त्यांनी तक्रारदारास विलंबाने माहिती पुरविण्याबद्दल एकूण रु.२५०००/- एवढी शास्ती लावण्यात येत आहे. जिल्हाधिकारी, जळगाव यांनी हे आदेश पारित होताच सात दिवसांचे आत, आवश्यक वाटल्यास, शास्तीच्या रकमेची विभागणी संबंधित कर्मचाऱ्यांमध्ये करावी व संबंधित उत्तरवादी हे शास्तीच्या रकमेचा भरणा शासकीय कोषागारात, हे आदेश निर्गमित झाल्यानंतर जास्तीत जास्त पाच हप्त्यात करतील, असे पहावे. शास्तीचे हप्ते संबंधित उत्तरवादी यांनी माहे एप्रिल, २००८ पासून दरमहा नियमितपणे भरावेत.

**औरंगाबाद**
**दिनांक ११-०३-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. उत्तमराव नारायणराव देशमुख, रा. देखमुख वाडा,यावल ता.यावल हल्ली मुक्काम छट्टाकी बजारियॉ, लष्कर, ग्वालियर, मध्यप्रदेश,

२ जन माहिती अधिकारी तथा तलाठी, यावल, जि. जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जिल्हाधिकारी, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ उपसंचालक, भूमी अभिलेख, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९६४

निर्णय दिनांक : ११-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. रणजित नामदेवराव चव्हाण,<br>मु.पो.पिंपरखेडा, ता. आष्टी, जि.बीड | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा आगार प्रमुख, राज्य परिवहन महामंडळ,<br>आष्टी, जि. बीड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ,<br>बीड जि. बीड | | |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. रणजित नामदेवराव चव्हाण (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल) गैरहजर आहेत तर, जन माहिती अधिकारी तथा आगार प्रमुख, राज्य परिवहन महामंडळ, आष्टी, जि. बीड श्री. प्रकाश किसनराव नाईक ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, बीड श्री. भगवान महादेव शेळके ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणात अपीलार्थी यांनी त्यांचेकडील दि. ३१.१.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील बसेस विषयी दिनांक १५.१.२००७ ते ३०.१.२००७ या कालावधीतील ४ मुद्यांवर माहिती खालील प्रमाणे मागविली होती.

"१) २६.१.२००७ रोजी किती बसेस ग्रामीण भागात पाठविण्यात आल्या ?

२) कोणकोणत्या बसेस बंद होत्या, तपशील देणे.

३) आष्टी व कडा विभागाच्या शाळा विद्यार्थ्यांची व त्रिमासिक पासेस किती आहे.

४) चालक व वाहकांच्या मासिक सुटया किती आहेत ? "

अपीलार्थी यांनी सदर माहिती पोस्टाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दि. १७.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते.

सदर माहिती अपीलार्थीस पोहोचल्याप्रित्यर्थ रजिस्टर्ड पोस्टाची पावती जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविली. जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपीलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २३.२.२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. या अपीलअर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली माहिती अपूर्ण असल्याचे नमुद करुन त्यांना शास्ती लावण्याची मागणी केली आहे व कलम ७(६) प्रमाणे उर्वरित माहिती मोफत देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना जन अपिलीय अधिकारी यांना आदेश देण्याची विनंती केली आहे. अपीलार्थीच्या अपीलअर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.४.२००७ रोजी सुनावणी घेतली. सदर सुनावणीमध्ये त्यांनी अपीलार्थीस मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ४ चे स्पष्टीकरण दिले. सदर स्पष्टीकरणाने अपिलार्थीचे समाधान झाले असल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे अपील निर्णयामध्ये म्हटले आहे. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी माहिती देतांना कोणताही निष्काळजीपणा दाखविला नाही, असा अभिप्राय त्यांनी या निकालपत्रामध्ये दिला आहे. या अभिप्रायासह त्यांनी अपीलार्थीची, जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची मागणी अमान्य केली. या निर्णयाची प्रत त्यांनी अपिलार्थीस दि. ११.५.२००७ रोजी पाठविली. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दि. ११.५.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. या द्वितीय अपीलअर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०(१) व कलम २०(२) अनुसार कार्यवाही करण्याची आदेशित करण्यासंदर्भात विनंती केली आहे. अधिनियमातील कलम ७(६) प्रमाणे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करावे अशी आयोगास विनंती केली.

आज रोजी झालेल्या युक्तीवादाचे वेळी अपीलार्थी गैरहजर असल्यामुळे त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपीलातील त्यांचे लेखी म्हणणे, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपीलार्थीचा दि. ३१.१.२००७ रोजीच्या मूळ अर्ज त्यांना दि. १.२.२००७ रोजी प्राप्त झाला. नंतर त्यांनी अपीलार्थीस आवश्यक ती माहिती त्यांच्याकडील दि. १७.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये पोस्टाने पाठविली आहे. सदर माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्यानंतर अपीलार्थीने त्यांचेशी परत संपर्क न साधता जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २३.२.२००७ रोजी सरळ अपील केले. त्यांनी अपीलार्थीस दि. १७.२.२००७ रोजी दिलेली माहिती बरोबर असून या माहितीतील मुद्दा क्र. ४ चा अर्थ अपीलार्थीस समजला नसल्याने अपीलार्थीस सदर माहिती चुकीची वाटली. अपीलार्थीचा हा संभ्रम जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २७.४.२००७ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी दूर केला. त्याप्रमाणे अपीलार्थींनी त्यांना समाधानकारक माहिती प्राप्त झाल्याचे दि. २७.४.२००७ रोजी लिहून दिले आहे. अपीलार्थी यांनी दरम्यानच्या कालावधीत दि. ११.४.२००७ रोजी अपील केले असल्याने, अपीलार्थींचे सदर अपील फेटाळावे.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे  युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीत माहिती दिलेली असून ती बरोबर आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस पुरविलेली माहिती अपीलार्थीस नीट समजली नव्हती. ती अपीलार्थीस त्यांचेकडील दि. २७.४.२००७ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये समजून सांगितली. सदर माहितीचा अर्थ समजल्यानंतर अपीलार्थीने समाधान व्यक्त केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन दिलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणात असे दिसून येईल की, जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद

दिलेला आहे. अपीलार्थीच्या मूळ माहितीतील मुद्दा क्र. ४ः —चालक-वाहकाच्या मासिक सुटया किती आहेत, या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहिती विषयी संभ्रम असल्याने ही माहिती अपूरी असल्याचे अपिलार्थीस वाटले असावे.

अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांचेकडील सुनावणीचे वेळी आपल्या माहितीची व्याप्ती वाढवून अतिरिक्त माहिती जन अपिलीय अधिकारी यांचेकडून प्राप्त करुन घेतली आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांचा कोणत्याही टप्प्यावर अपिलार्थीस माहिती न देण्याचा कोणताही असद्हेतू असावा, असे आयोगास वाटत नाही. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचा अर्थ काढण्याबाबत अपिलार्थी संभ्रमित राहिल्याने व अपिलार्थीचा संभ्रम जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील झालेल्या सुनावणीच्या वेळी दूर केल्यामुळे अपीलार्थीस पूर्णतः माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येते, अपीलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी कोठेही हेतूपूरस्सर टाळाटाळ केल्याचे अथवा अपिलार्थीपासून सत्य माहिती दडवल्याचे कोठेही निःसंशयपणे सिध्द होत नसल्यामुळे त्यांचेविरुध्द कार्यवाहीचे कोणतेही आदेश नाहीत. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांचेकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त झाल्याने व त्यांचेवर वर म्हटल्याप्रमाणे कोणतीही कार्यवाही करणे उचित असल्याचे आयोगास वाटत नसल्याने अपीलार्थीने केलेले द्वितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

सबब अपीलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले विचाराधीन अपील फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ११-०३-२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रणजित नामदेवराव चव्हाण,मु.पो.पिंपरखेडा, ता. आष्टी, जि.बीड

२ जन माहिती अधिकारी तथा आगार प्रमुख, राज्य परिवहन महामंडळ,
आष्टी, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, बीड जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९६५

निर्णय दिनांक १२-०३-२००८

१ श्री. विकासकुमार बागडी, : अपिलार्थी
नाथगल्ली, सदर बाजार,
जालना – ४३१ २०३

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ,
औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. विकासकुमार बागडी व त्रयस्त पक्ष श्री. डोणगावकर, कार्यकारी अभियंता हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ श्री. गुलाब नामदेव सोनवणे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात

येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ श्री. जगदीश मारोतराव लिहितकर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २३-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे कार्यकारी अभियंता श्री. डोणगावकर यांच्या संबंधात दिनांक ३१-०५-२००६ ते जानेवारी २००७ या कालावधी तील माहिती खालील प्रमाणे मागविली होती.

> " कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे (स्था.) जालना येथे कार्यरत असलेले कार्यकारी अभियंता श्री. डोणगावकर यांच्या विरुध्द पो. स्टे. कदिम जालना येथे C.R. No. II 3039/2006 अनुसार रिपोर्ट क्र. 5/06 दिनांक ३१-५-२००६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आले आहे. २) विभागीय आयुक्त कार्यालय पत्र क्र. 1281 दि. २०-९-२००६ रोजी दिलेली तक्रार. ३) जिल्हाधिकारी लोकशाही दिन ४-९-२००६ रोजी दिलेली तक्रार अनुसार आपल्या कार्यालयामार्फत कोणती कारवाई करण्यात आली व सद्धा कार्यकारी अभियंता डोणगावकर कोणत्या ठिकाणी कामावर आहे व सदर गुन्ह्याबद्दल डोणगावकर यांच्या सेवा पुस्तक मध्ये नोंद करण्यात आली का ? सखोल माहिती देण्यात यावी. "

अपिलार्थीने सदर माहिती शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीच्या माहितीच्या अर्जाची छायांकीत प्रत कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) जालना यांच्याकडे पाठवून अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसंदर्भात आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती त्यांना

जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०९-०३-२००७ पर्यत सादर करण्याचे सूचित केले.

अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताच प्रतिसाद जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक २२-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी आदेश देऊनही सहाय्यक माहिती अधिकारी व कार्यकारी अभियंता यांनी माहिती दिली नसल्याचे जन अपिलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११-०४-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक २३-०४-२००७ रोजी पारीत केले. सदर अपील निर्णयामध्ये त्यांनी संबंधीत कार्यकारी अभियंता यांना एक दिवसाचा दंड रुपये २५० /- इतका लावण्याचे आदेशीत केले आहे. या आदेशाचे अवलोकन करता असे दिसून येईल की, या सुनावणीच्या वेळी कनिष्ठ लिपीक श्री. एस. आर. देशपांडे यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती दिनांक १०-०४-२००७ रोजी जावक केल्याचे व सदर माहिती दिनांक १३-०४-२००७ पर्यत पुन्हा पाठविण्याचे जन अपिलीय अधिकारी यांना आश्वासीत केले आहे. संबंधीत कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयातील लिपिकाने आश्वासीत करुन देखील अपिलार्थीस माहिती न प्राप्त झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देण्यात आली नसल्याचे नमूद केले आहे. तद्वतच त्यांना कार्यकारी अभियंता श्री. डोणगावकर यांच्याबाबत माहिती पाहिजे असल्याचे त्यांनी त्यांच्या लेखी अर्जामध्ये नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते अधीक्षक अभियंता लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांच्या कार्यालयात सहाय्यक अधीक्षक अभियंता या पदावर कार्यरत आहेत. अधीक्षक अभियंता यांना तांत्रिक व प्रशासकीय बाबतीत सहाय्य करण्याचे त्यांचे काम आहे. अपिलार्थीने त्यांच्याकडे मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याने त्यांनी अपिलार्थीचा अर्ज, ही माहिती ज्या कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयामध्ये असणे अपेक्षित आहे त्यांच्या कार्यालयास पाठविला. तथापि त्या कार्यालयाने अद्याप पावेतो त्यांना अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी कोणतीही माहिती न दिल्यामुळे त्यांना अपिलार्थीस ही माहिती पुरविता आली नाही. जर ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर त्यांनी संबंधीत कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयामध्ये जाऊन सदर माहिती हस्तगत करण्याचे काही प्रयत्न केले होते काय किंवा संबंधीत कार्यकारी अभियंता यांना या प्रकरणात स्मरणपत्रे पाठविली होती किंवा कसे असे विचारले असता जन माहिती अधिकारी यांनी यावर नकारार्थी उत्तर दिले.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडे दिनांक २३-०३-२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यावर त्यांनी दिनांक ११-०४-२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक २३-०४-२००७ रोजी पारीत केले आहे. जन माहिती अधिकारी यांना दंड लावण्याचे अधिकार त्यांना नाहीत याची सुनावणीच्या वेळी त्यांना माहिती नसल्याने त्यांनी चुकीने जन माहिती अधिकारी यांना रुपये २५० /- दंड लावला आहे. यापुढे त्यांच्याकडे प्राप्त होणा-या अपिलाची सुनावणी घेतांना योग्य ती काळजी घेतली

जाईल असे त्यांनी आयोगास आश्वासीत केले. त्यांनी घेतलेल्या सुनावणीच्या वेळी कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयातील कनिष्ठ लिपीक श्री. एस. आर. देशपांडे यांनी प्रस्तुत माहिती दिनांक १०-०४-२००७ रोजी पाठविली असे विधान केले आहे. तथापि या संदर्भातील कोणताही पुरावा प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी त्यांच्या कडे मागूनही त्यांनी सादर केला नव्हता. याच सुनावणीमध्ये श्री. एस. आर. देशपांडे कनिष्ठ लिपीक यांनी अपिलार्थीस दिनांक १३-०४-२००७ पर्यत पुन्हा माहिती देण्यात येईल असे आश्वासीत केले होते. तथापि आजतागायत त्यांनी माहिती दिलेली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या दिनांक २३-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधीत होती. आज रोजी सुनावणीस श्री. डोणगावकर यांना बोलाविले असता ते सुनावणीस उपलब्ध होऊ शकले नाहीत. अपिलार्थी यांना, तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री. डोणगावकर यांच्याविरुध्द पोलीस स्टेशन, कदिर पोलीस स्टेशन, जालना येथे दिनांक ३१-०५-२००६ रोजी दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यासंदर्भात तसेच विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडे अनुक्रमे २०-०९-२००६ व ०४-०९-२००६ रोजी दिलेल्या तक्रारीवर काय कारवाई करण्यात आली याची माहिती व तसेच श्री. डोणगावकर सध्या कोणत्या ठिकाणी कामावर आहेत व सदर गुन्ह्याबद्दल त्यांच्या सेवापुस्तकात नोंद करण्यात आली आहे किंवा कसे याची माहिती व श्री. डोणगावकर यांच्याविरुध्द पोलीस स्टेशनमध्ये दाखल झालेल्या गुन्ह्यासंदर्भात होत असलेल्या चौकशीबद्दलची सद्यस्थिती, हवी असल्याचे दिसून येते. या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेली माहिती कलम ८ च्या तरतुदीस छेद देते किंवा कसे हा प्रश्न अनुत्तरीत राहिला आहे. जर अपिलार्थीस माहिती देण्यासाठी नियमातील

एखादी तरतूद जन माहिती अधिका-यास बंधनकारक असेल तर त्यांनी अपिलार्थीच्या अर्जावरील निर्णय अपिलार्थीस त्यांचा अर्ज प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत तसे कळवावयास पाहिजे होते. तथापि येथे असे दिसून येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत निर्णय कळविला गेला नाही. संबंधीत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), जालना यांच्याकडून प्रथमतः माहिती उपलब्ध करुन घ्यावयाची होती व तदनंतर ती, त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, अपिलार्थीस देणे अपेक्षित होते. त्यांनी अपिलार्थीचा अर्ज संबंधीत कार्यकारी अभियंता यांच्याकडे दिनांक ०९-०३-२००७ रोजी पाठविला. वास्तविकता या प्रकरणी त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (a) (i) प्रमाणे कारवाई करणे या ठिकाणी अधिक उचीत झाले असते. तथापि त्यांनी स्वतः संबंधीत माहिती प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस माहिती देण्याचा मार्ग अवलंबिला तथापि त्यांना यामध्ये यश आल्याचे दिसून येत नाही. आज सुनावणीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २, ३ विभागीय आयुक्त कार्यालयाचे पत्र व जिल्हाधिकारी लोकशाही दिनाचे पत्र त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाले नाही. जर हे पत्र त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाले नव्हते तर त्याप्रमाणे त्यांनी आपला निर्णय अपिलार्थीस माहितीचा अधिकार अधिनियम कलम ७ च्या तरतुदीनुसार कळविणे भाग होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केल्याचे दिसून येत नाही. थोडक्यात वेगवेगळ्या कारणांमुळे अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्या-पासून वंचित राहिले असे या प्रकरणी दिसून येते. अपिलार्थीस अशा प्रकारे त्यांच्याकडून मागितलेल्या माहितीपासून वंचित ठेवले गेले. संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांना सहाय्य करणे अपेक्षित असलेले संबंधीत कार्यकारी अभियंता हे

या प्रकरणी निश्चित पणे दोषी आहेत असे आयोगाचे मत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी व त्यांना सहाय्य करणारे त्यांचे इतर कर्मचारी / अधिकारी यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे हे पाहता या प्रकरणामध्ये अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न देण्यासाठी जन माहिती अधिकारी व संबंधीत कार्यकारी अभियंता हे दोघेही जबाबदार ठरतात. अपिलार्थीच्या मूळ अर्जावर या जन माहिती अधिका-यानी अपिलार्थीस कोणताही निर्णय अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कळविला नाही अथवा माहिती दिली नाही.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांना सहाय्य करणारे इतर कर्मचारी / अधिकारी या सर्वांनी मिळून अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा जास्त कालावधीकरिता वंचित ठेवल्याने त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये प्रतिदिन रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची कर्मचारी / अधिकारी निहाय विभागणी अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करावी. संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांनी या शास्तीचा भरणा शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक " ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) " या लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त ५ हप्त्यामध्ये करावा, संबंधीत जन माहिती अधिकारी हे शास्तीची रक्कम नियमीतपणे कोषागारात भरतील याची अधीक्षक अभियंता लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांनी खात्री करावी व आपला अनुपाल अहवाल यापुढे दरमहा शास्तीची रक्कम

पूर्णपणे वसूल होईपर्यत आयोगास पाठवावा. या प्रकरणी असेही दिसून येते की, कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांच्या कार्यालयातील लिपीक श्री. एस. आर. देशपांडे यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या दिनांक ११-०४-२००७ रोजीच्या सुनावणीच्या वेळी सदर माहिती अपिलार्थीस पाठविल्याचे असत्य विधान केले होते. त्यांच्या अशा प्रकारच्या असत्य विधानाबद्दल अधीक्षक अभियंता लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांनी त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन याबाबत आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर १५ दिवसाच्या आत सादर करावा. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीच्या अर्जावर संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यासंदर्भात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीप्रमाणे हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत यथायोग्य कारवाई करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल मान्य करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहिती त्यांना देण्यासंदर्भात, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी प्रमाणे हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत यथायोग्य कारवाई करावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांना सहाय्य करणारे इतर कर्मचारी / अधिकारी या सर्वांनी मिळून अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून

अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा जास्त कालावधीकरिता वंचित ठेवल्याने त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये प्रतिदिन रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

४. शास्तीची कर्मचारी / अधिकारी निहाय विभागणी अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करावी.

५. संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी हे शास्तीची रक्कम नियमीतपणे कोषागारात भरतील याची अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांनी खात्री करावी व आपला अनुपालन अहवाल यापुढे दरमहा शास्तीची रक्कम पूर्णपणे वसूल होईपर्यत आयोगास पाठवावा.

६. कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांच्या कार्यालयातील लिपीक श्री. एस. आर. देशपांडे यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील सुनावणीमध्ये केलेल्या असत्य विधानाबद्दल अधीक्षक अभियंता लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांनी त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्या-पासून २ महिन्याच्या आत करुन याबाबत आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर १५ दिवसाच्या आत सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक १२-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विकासकुमार बागडी, नाथगल्ली, सदर बाजार, जालना – ४३१ २०३.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ वरिष्ठ कोषागार अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९६६

निर्णय दिनांक १२-०३-२००८

१ श्री. मनोहर माधवराव थोरात, : अपिलार्थी
नांदेड जिल्हा सरचिटणीस लोकभारती
(पार्टी), घर नंबर २-२-१२४, देगावचाळ,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, लोहा, तालुका लोहा,
जिल्हा नांदेड.

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, लोहा, तालुका लोहा,
जिल्हा नांदेड.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मनोहर माधवराव थोरात (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, लोहा श्री. देशमुख आहेमद मोहियोद्दीन (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय

अधिकारी तथा तहसीलदार, लोहा श्री. झंपलवाड नरसिंग गंगाराम (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व त्रयस्त पक्ष श्री. दशरथ नागनाथराव रुद्रकंठवार हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २०-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एप्रिल २००५ ते ऑक्टोंबर २००६ या कालावधीतील लोहा तालुक्यातील अर्धघाऊक रॉकेल विक्रेते श्री. दशरथ नागनाथराव रुद्रकंठवार परवाना क्रमांक ८५/९८ यांना शासनाकडून वितरण केल्या गेलेल्या रॉकेलच्या कोट्यासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> " लोहा तालुक्यातील अर्धघाऊक रॉकेल विक्रेते दशरथ नागनाथ रुद्रकंठवार परवाना क्रमांक ८५/९८ यांना शासनाकडून वितरण केलेल्या रॉकेलचा महिनेवारी रॉकेल वितरण व स्टॉकची सत्यप्रती तसेच त्यांना संलग्न असलेल्या किरकोळ रॉकेल परवानेधारक यांना वितरण केलेल्या रॉकेलची वितरण तपशील व स्टॉक रजिस्टराच्या सत्यप्रती तसेच त्यांच्याकडून किरकोळ रॉकेल हॉकर्सना रॉकेलच्या दिलेल्या पावतीचा (रक्कमेची) पावतीच्या सत्यप्रती मिळणेबाबत. "

अपिलार्थीने सदर माहिती साधारण टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये श्री. दशरथ नागनाथराव रुद्रकंठवार यांना त्यांच्याकडील रॉकेल वाटप रजिस्टर, स्टॉक रजिस्टर पावती बुकाच्या सत्यप्रतीची मागणी केलेली सदर माहिती २ दिवसात देण्याचे सूचित केले तथापि त्यांना संबंधीत विक्रेत्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांना अपिलार्थीच्या प्रथम अर्जास अधिनियमाव्दारे विहीत केलेल्या मुदतीत कोणताच प्रतिसाद देता आला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीच माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक २४-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यास जाणुन बुजून विलंब व टाळाटाळ केल्याचे नमूद केले आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांनी अपील दाखल करुनही त्यांना माहिती देण्यास संबंधीत प्राधिकरणाकडून जाणुनबुजून टाळाटाळ व विलंब होत असल्याचे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना आता आवश्यक ती माहिती संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली आहे. सदर माहिती त्यांना निश्चितपणे केव्हा प्राप्त झाली हे त्यांना सांगता येत नाही.

त्रयस्थ पक्ष श्री. रुद्रकंठवार यांना माहिती देण्यासाठी त्यांनी लावलेल्या विलंबाबाबतची कारणे विचारली असता त्यांनी संबंधीत कागदपत्रे या कालावधीमध्ये त्यांच्या वकीलाकडे असल्याने त्यांना ती संबंधीत जन माहिती अधिकारी यांना विहित मुदतीत पुरविता आली नाही असे सांगितले. सदर कागदपत्रे त्यांना वकीलाकडून

प्राप्त झाल्यानंतर त्यांनी जून २००७ मध्ये अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना सादर केली आहे व जन माहिती अधिकारी यांनी ती अपिलार्थीस जून २००७ मध्ये दिल्याचे सांगितले.

याचवेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. अहमद मोहिद्दीन देशमुख हे हजर झाले. त्यांनी अपिलार्थीस सदर माहिती जून २००७ मध्ये पुरविल्याचे सांगितले. सदर माहिती अपिलार्थीस प्रत्यक्षतः प्राप्त झाली असल्याचे अपिलार्थीने आज आयोगा-समोर कबूल केले आहे. अपिलार्थीने आपल्या युक्तिवादामध्ये पुढे असे स्पष्ट केले की, जरी त्यांना आवश्यक ती माहिती मिळाली असली तरी ती विलंबाने मिळाली असून या विलंबाप्रीत्यर्थ संबंधीतांवर योग्य ती कारवाई व्हावी.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. देशमुख यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज ज्यावेळेस केला त्यावेळी त्यांचेकडे नायब तहसीलदार (पुरवठा) या पदाचा अतिरिक्त कार्यभार होता. त्याचा मूळ कार्यभार नायब तहसीलदार (निवडणूक) हा होता. जादा कामाचा भार असल्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जाकडे दुर्लक्ष झाले असल्याचे त्यांनी सुनावणीमध्ये कबूल केले. अपिलार्थीने अर्ज केला त्यावेळी त्यांच्याकडे एकूण ३ कार्यभार होते (नायब तहसीलदार महसूल, पुरवठा व निवडणूक). अशा प्रकारच्या विविध प्रकारच्या कार्यबाहुल्यामुळे त्यांना अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती विहित मुदतीत पुरविता आली नाही. अपिलार्थीने अपेक्षित केलेल्या माहितीपैकी काही माहिती ही रुद्रकंठवार यांच्याशी संबंधीत होती. श्री. रुद्रकंठवार यांच्याकडून त्यांनी ३०-११-२००६ व ३१-०१-२००७ रोजी ती माहिती मागविली होती. श्री. रुद्रकंठवार यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दिनांक ०३-०२-२००७ रोजी श्री. रुद्रकंठवार यांना दंडनीय कारवाईचा इशारा देखील दिला

होता.  बरेच प्रयत्न करुनही श्री. रुद्रकंठवार यांनी माहिती न दिल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती पुरविता आली नाही.

सध्याचे जन माहिती अधिकारी श्री. नरसिंग गंगाराम झंपलवाड यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी १०-१०-२००७ रोजी जन माहिती अधिकारी या पदाचा कार्यभार घेतला.  अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील यापुर्वीचे असल्याने त्यांना या प्रकरणासंबंधी पुरेशी माहिती नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस एप्रिल २००५ ते ऑक्टोंबर २००५ या कालावधीतील श्री. रुद्रकंठवार या रॉकेल विक्रेत्याच्या स्टॉक रजिस्टरच्या प्रती हव्या होत्या.  अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्याच्या प्रथम अर्जात केलेल्या माहितीचे पृथःकरण केले असता त्यामध्ये असे दिसून येईल की, श्री. रुद्रकंठवार यांना शासनाकडून वितरण केलेल्या रॉकेलचा महिनेवारी रॉकेल पुरवठा व स्टॉक रजिस्टरच्या सत्यप्रती तसेच त्यांना संलग्न असलेल्या इतर किरकोळ रॉकेल विक्रेत्यांना वितरीत करण्यात आलेल्या रॉकेल परिमाणाची माहिती हवी होती.  अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीपैकी प्रथम भाग जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध होता कारण शासनामार्फत वितरीत करण्यात आलेले रॉकेल हे जिल्हाधिकारी व तहसीलदार यांच्यामार्फत केले जाते.  जन माहिती अधिकारी यांच्या मते जिल्हाधिकारी हे त्यांच्या स्तरावर रॉकेलचा पुरवठा वेगवेगळ्या विक्रेत्यास सरळ वितरीत करत असतात व त्याची एक प्रत संबंधीत तहसीलदार यांना दिली जाते. यावरुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी काही माहिती संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्या काळामध्ये निश्चितपणे उपलब्ध असणार यात शंका नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी उर्वरीत माहिती श्री. रुद्रकंठवार यांच्या स्तरावर

असल्याने अपिलार्थीस ती माहिती विहित मुदतीत पुरविता आली नाही.  तद्वतच त्यांच्याकडे एकाच वेळी उर्वरीत २ जादा कार्यभार होते हाही मुद्दा आयोग येथे विचारात घेत आहे.  जन माहिती अधिकारी हे त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत का देऊ शकले नाहीत याची विचारणा केली असता त्यांनी त्यांच्याकडे असलेले जादा कार्यभार हेच कारण आयोगासमोर सांगितले.  जन माहिती अधिकारी यांच्या जादा कार्यभाराचा मुद्दा जरी विचारात घेतला तरी त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस उपलब्ध असलेली माहिती देण्यासाठी या घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर व कोणत्याही प्रकारे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.  त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात लावलेल्या अशा प्रकारच्या थंड प्रतिसादावरुन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर जिल्हाधिकारी, नांदेड यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.  जन माहिती अधिकारी यांच्या कडून अपिलार्थीस आता आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्याने व त्यावर अपिलार्थीचे समाधान झाले असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल

मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर जिल्हाधिकारी, नांदेड यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

औरंगाबाद
दिनांक १२-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मनोहर माधवराव थोरात, नांदेड जिल्हा सरचिटणीस लोकभारती (पार्टी), घर नंबर २-२-१२४, देगावचाळ, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९६८

निर्णय दिनांक १२-०३-२००८

१ श्री. शे. निजामोद्दीन शेख गयासोद्दीन : अपिलार्थी
मु. पो. खिर्डी तालुका खुलताबाद,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तहसीलदार, खुलताबाद,
जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी (महसूल),
वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शेख निजामोद्दीन शे. गयासोद्दीन हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद सौ. शोभा नागनाथ ठाकूर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल),

वैजापूर, जिल्हा औरंगाबाद श्री. सोरमारे पिराजी लक्ष्मण (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २२-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे २००५ ते २००६ या कालावधीतील त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, विभागीय आयुक्त कार्यालय यांच्याकडे केलेल्या अर्जासंदर्भात संबंधितांनी दिलेल्या निर्णयाच्या प्रतीची खालील प्रमाणे मागणी केली आहे.

“ १. जा. क्र. २००६/गृहशाखा/दंड/कावि/२६८० दंडाधीकारी कार्यालय, औरंगाबाद दि. ४-९-०६ चे पत्र.

२. जा. क्र. २००६/गृहशाखा/दंड/कावि/२७८४ जिल्हादंडाधीकारी कार्यालय, औ,बाद दि. १४-९-०६ चे पत्र.

३. जा. क्र. २००६/मशाका/२/जमाबंदी/कावि/७९२ जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद दि. २१-९-०६ चे पत्र.

४. जा. क्र. २००६/मशाका/३/जमीन/२/कावि/१६५७ विभागीय आयुक्त कार्यालय, औ, बाद दि. ८-८-०६ चे पत्र.

५. दि. २३-९-०६ चा अर्ज गट क्र. ११४ खिर्डी शिवारातील जमिनीची वहिती नोंद २००५-०६ वर्षाची निजामोद्दीन या नावे लावण्याबाबतचा.

६. जि. लो. दिन ४-९-०६ टो. न. ११२५ चा अर्ज. चौकशी अहवाल, निर्णयाच्या प्रती, प्रत्येक पत्राप्रमाणे, चौकशी केली आहे काय ? सोबत १ ते ७ प्रमाणे अर्ज व पत्र जोडले आहेत. ”

अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक

असलेल्या माहितीपोटी लागणारे शुल्क रुपये ७० त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तदनंतर दिनांक १०-०१-२००७ रोजी परत अपिलार्थीस त्यांनी शुल्क भरण्या-संदर्भात पत्र दिल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्या सुचनेवरुन अपिलार्थीने दिनांक २५-०१-२००७ रोजी त्यांच्या कार्यालयात चलनाव्दारे रुपये ८० /- इतक्या शुल्काचा भरणा केला. त्याच दिवशी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक ०८-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले.

सदर अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-०३-२००७ रोजी ठेवली होती. तथापि सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर राहिले या सुनावणीत अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०४-२००७ रोजीच्या आदेशान्वये आपले निर्णय पारीत केले असून त्यामध्ये जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यास उदासीन दिसत असल्याचे अनुमान काढून त्यांना नियमानुसार एक आठवड्याच्या आत अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेशीत केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सदर माहिती व्यक्तिशः हस्तगत करुन घेण्यासाठी दिनांक २१-०४-२००७ रोजीचे पत्र दिले. सदर पत्र अपिलार्थीस दिनांक २१-०४-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिलेल्या पोचसहीवरुन दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९

(३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे ज्या दिवशी व्दितीय अपील दाखल केले त्याच दिवशी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथम अपिलावर निर्णय दिला आहे हे येथे लक्षात घेणे गरजेचे आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असून त्यांनी आपले म्हणणे एका वेगळ्या निवेदनामार्फत आयोगास पाठविले असून त्यामध्ये अद्यापही त्यांना, त्यांनी २ ते ३ वेळा जन माहिती अधिकारी खुलताबाद यांना भेटूनही आवश्यक ती माहिती प्राप्त झाली नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नाही व माहिती देण्याप्रित्यर्थ गैरवाजवी फी आकारली याबद्दल त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीन्वये योग्य ती कारवाई करुन त्यांना न्याय द्यावा अशी त्यांनी यामध्ये विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस माहिती घेऊन जाण्यासाठी त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये रजिस्टर टपालाव्दारे माहिती मागितली असता त्यांना माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी वैयक्तीकरित्या का बोलावण्यात आले या प्रश्नावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणतेही समाधानकारक उत्तर नसल्याचे आयोगास आढळून आले. अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज ज्यावेळी त्यांच्याकडे केला त्यावेळी या पदावर त्या कार्यरत नसल्यामुळे अपिलार्थीची बाजू ऐकण्यासाठी अपिलार्थीस बोलाविले असे त्यांचे म्हणणे आहे. अपिलार्थी यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, विभागीय आयुक्त कार्यालय व लोकशाहीदिन येथे या विषयासंदर्भात तक्रारी केल्या असून तो एकच विषय गट नंबर ११४ मौजे खिर्डी तालुका खुलताबाद येथील वहिती बाबतचा असून सदर प्रकरणी

जिल्हा सत्रन्यायालयाने स्थगन आदेश दिलेले आहेत. अर्जदार हे या प्रकरणात लोकशाहीदिन, विभागीय लोकशाहीदिनाचे वेळी या विषयावर वारंवार अर्ज करत असतात. अशा प्रकारच्या त्यांच्या कृतीव्दारे त्यांनी शासनास वेठीस धरले आहे. न्यायालयाची स्थगीती असल्याने त्यांच्या या प्रकरणात अंतीम निकाल दिला गेला नाही असे त्यांनी दिनांक ९/१०-१०-२००७ च्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी हे खिर्डी गट नंबर ११४ च्या मालकी हक्कासंबंधात वारंवार त्यांच्याकडे अर्ज करत असतात व या प्रकरणात जिल्हा व सत्रन्यायालयात स्थगन आदेश दिले असून सदर भुखंडामध्ये अपिलार्थीस प्रवेश करण्यास कोर्टाने मनाई केली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने एकाच विषयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय व विभागीय आयुक्त कार्यालयाकडे दिलेल्या ६ वेगवेगळ्या अर्जावर चौकशी अहवाल व निर्णयाच्या प्रतीची मागणी केली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती न देता अपिलार्थीस याच विषयावर केलेल्या वेगवेगळ्या अर्जावरील माहिती दिनांक ०९-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिली आहे. अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास केल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून एकूण ४ पृष्ठांची माहिती देण्यात आली. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कडून दिल्या गेलेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, सदर कथित माहिती ही अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी पूर्णतया विसंगत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या शुल्क भरण्याच्या सुचनेला त्वरीत प्रतिसाद देऊनही अपिलार्थीस हवी असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या

कडून प्राप्त झाली नाही हे माहितीचा अधिकार अधिनियमाचे खरोखरीच दुर्दैव आहे असे येथे म्हटल्यास फारसे वावगे ठरणार नाही. या प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती न देता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीची निश्चितपणे दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिसून येते. त्याच बरोबर अपिलार्थीने टपालाने माहिती मागितली असता अपिलार्थीस संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१-०४-२००७ रोजी माहिती व्यक्तिशः हस्तगत करुन घेण्याचे कळविण्याची जन माहिती अधिकारी यांची कृती तर या सर्वांवर कळस करणारी ठरते. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०२-०४-२००७ दिलेल्या अपिलाच्या निर्णया-मध्ये देखील जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात उदासीन असल्याबाबतचा निष्कर्ष काढला आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या निष्कर्षाशी आयोग पूर्णपणे सहमत आहे. याच आदेशामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांनी अपिलार्थीस एक आठवड्याच्या आत माहिती देण्याचे आदेशीत केले होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २१-०४-२००७ रोजी पत्राने माहिती व्यक्तिशः घेऊन जाण्याचे आदेशीत केले. यावरुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस खरोखरच माहिती द्यावयाची होती किंवा कसे याबाबत संदेह वाटावा इतपत परिस्थिती निर्माण झाली आहे. या प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात दाखविलेली नकारात्मक मानसिकता, विशेषतः अपिलार्थीने माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे आवश्यक ते शुल्क भरुनही त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पुरविण्याची जन माहिती अधिकारी यांची कृती, त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभाव स्पष्ट करते. त्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी हे येथे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस निश्चितपणे पात्र ठरत आहेत.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, सचिव (महसूल) यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर,त्यांनी उपरोक्त प्रकरणी वरील प्रमाणे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल, प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा. अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती देण्यासंदर्भात असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी व त्यामुळे माहिती प्राप्त करुन घेण्यासंदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरलेले शुल्क रुपये ८० /- त्यांना हे आदेश निर्गमीत होताच २४ तासाच्या आत परत करावेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल मान्य करण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांनी, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे

आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

४. जन माहिती अधिकारी यांनी, माहिती प्राप्त करुन घेण्यासंदर्भात अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात भरलेले शुल्क रुपये ८० /- त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच २४ तासाच्या आत, परत करावेत.

औरंगाबाद
दिनांक १२-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शे. निजामोद्दीन शे. गयासोद्दीन मु. पो. खिर्डी तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (महसूल) मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९६९

निर्णय दिनांक १२-०३-२००८

१ श्री. लक्ष्मण माणिकराव चंदनशिव, : अपिलार्थी
व्दारा- बी. एन. चंदनशिव,
श्री. छत्रपती राजश्री शाहु अर्बन को. ऑप.
जालना रोड, बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उपविभागीय अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),
उपविभाग धारुर, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग,
बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. लक्ष्मण माणिकराव चंदनशिव व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग, बीड हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय

अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक तर), उपविभाग धारुर जिल्हा बीड श्री. हनमंत हरिबा साखरे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०१-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. हनुमंत पिंपरी तालुका केज येथील कोल्हापूर पध्दतीचा बंधारा क्रमांक २ च्या अपूर्ण कामाबाबतची खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

"१. ठेकेदाराने को. प. बं. क्र. २ चे काम आहे त्या परीस्थीतीत अंतीम करन्याबाबत उपविभागास, विभागीय कार्यालयास अर्ज दीलेला असल्यास त्याची सत्यप्रत.

२. विभागीय कार्यालय (स्था.स्तर) बीड यांचे पत्र क्र. लेखा-२/३१५९ दि. २१-७-०५ ची सत्यप्रत.

३. डिवाटरींगसाठी वापरलेल्या इंजीनच्या लॉगबुकच्या सत्यप्रती.

४. को. प. बं. २ (दोन) चे काम पूर्ण झाल्यानंतर होणारा एकूण पाणीसाठा.

५. त्यानंतर सींचनाखाली येनारे क्षेत्र हे. आर.

६. शेती उत्पन्नामध्ये होनारी टक्के वाढ अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार.

७. काम पूर्ण करुन देन्याबाबत २००० इ. स. पासुन ठेकेदाराला केलेल्या पत्रव्यवहाराच्या सत्यप्रती (उपविभागीय व विभागीय कार्यालयाने)."

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक ३ ची माहिती वगळता

उर्वरीत माहिती अपिलार्थीस पुरविल्याचे दिसून येते. मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात सदर माहिती उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या या पत्रामध्ये म्हटले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक २५-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. यामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती मिळाली नसल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०२-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले आहे की, "आपणास दिनांक १५-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये आपण मागितलेली माहिती पुरविली होती. तथापि पुन्हा हवी असलेली जी माहिती विभागीय कार्यालयाकडून आपणास अपेक्षित आहे त्याबाबत ती प्रत्यक्षपणे येऊन ती प्राप्त करुन घ्यावी." अपिलार्थीच्या अपील अर्जावर कशाच प्रकारे कारवाई करण्यात येऊ नये याचे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेले म्हणजे उत्तम नमुना आहे असे येथे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही असे आयोगास वाटते.

जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेली कथित माहिती व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या वरील प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले.

या अपिलामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी त्यांनी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा अर्ज दिनांक ०१-१२-२००६ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दिनांक २७-१२-२००६ च्या पत्रान्वये मुद्दा क्रमांक ३ वगळता उर्वरीत सर्व माहिती दिलेली आहे. मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात त्यांनी असे सांगितले की, संबंधीत कामाकरिता वापरण्यात आलेले इंजिनचे लॉगबुक त्यांच्याकडे उपलब्ध नाही. अपिलार्थी हे त्यांनी अर्जात दिलेल्या पत्त्यावर राहत नसल्याने त्यांच्याशी पत्रव्यवहार करतांना त्यांना नेहमी अडचण येते. माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्या कार्यालयाकडे फारच पत्रव्यवहार वाढल्याने अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने माहिती पाठविण्याकरिता त्यांच्याकडे तिकिटे उपलब्ध नसल्याने त्यांनी अपिलार्थीस सदर माहिती सध्या पोस्टाने पाठविली आहे. जानेवारी २००७ मध्ये ते स्वतः अपिलार्थीस माहिती देण्यासाठी गेले असता अपिलार्थी सदर पत्त्यावर माहिती देण्यासाठी उपलब्ध होऊ शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रतिसाद देऊन त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. तथापि सदर माहिती अपिलार्थीस त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील करेपर्यंत मिळाली नव्हती असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. पोस्टाच्या तिकिटाअभावी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी रजिस्टर

पोस्टाने माहिती पाठविण्याची विनंती करुन देखील जन माहिती अधिकारी यांनी त्यांना साध्या पोस्टाने माहिती पाठविली आहे. अपिलार्थीस माहिती पाठविल्याप्रीत्यर्थ त्यांनी त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीची झेरॉक्स प्रत आयोगासमोर सादर केली आहे. यावरुन त्यांनी आयोगास सदर पत्र पाठविल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केलेल्या कागदपत्रातील जावक नोंदवहीतील झेरॉक्स प्रतीवरील नोंदी संशयास्पद वाटत आहेत तद्वतच पोस्टाच्या तिकिटांचा तुटवडा हे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस साध्या पोस्टाने माहिती पाठविल्याप्रीत्यर्थ दिलेले कारण समर्थनीय वाटत नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडण करण्याकरिता अपिलार्थी आयोगासमोर हजर नाहीत हे पाहता जन माहिती अधिकारी यांना केवळ संशयाचा फायदा देण्याच्या दृष्टीने त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती पुरविली असे ग्रहीत धरण्यात येत आहे. अपिलार्थीस सदर माहिती आतापर्यंत प्रत्यक्षात प्राप्त झाली नसल्याने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस सदर माहिती परत एकदा अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य पाठवावी. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अशी माहिती दिली की, या कामाकरिता जमिनीतील पाण्याचा उपसा करण्याकरिता वापरलेले इंजिन संबंधीत कंत्राटदाराचे होते त्यामुळे या इंजिनच्या लॉगबुकच्या प्रती त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत. जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद योग्य वाटतो. अपिलार्थीस माहिती देतांना त्यांनी या मुद्दयाचा समावेश त्यांच्या पत्रामध्ये करावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने सदर माहिती घेऊन ते अपिलार्थीच्या त्यांनी दिलेल्या हनुमंत पिंपरी येथील पत्त्यावर गेले होते तथापि अपिलार्थी या पत्त्यावर त्यांना उपलब्ध झाले नाहीत व तसे त्यांनी शपथपत्राव्दारे कबूल केले आहे हे पाहता त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे योग्य ते प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे.

आयोगास जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली कागदपत्रे अत्यंत अस्पष्ट आहेत. आयोगास वाचता न येणा-या स्वरुपात कागदपत्रे सादर केल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांना सक्त ताकीद देण्यात येत असून येथून पुढे अशा प्रकाराची पुनरावृत्ती टाळावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक १२-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. लक्ष्मण माणिकराव चंदनशिव, व्दारा- बी. एन. चंदनशिव, श्री. छत्रपती राजश्री शाहु अर्बन को. ऑप. जालना रोड, बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग धारुर, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९७०

निर्णय दिनांक : १२-०३-२००८

१ श्री. महंमद वसीम म.एकबाल सौदागर, : अपीलार्थी
रा. समिराबाग,खडक पुराच्या पाठीमागे,
नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा मुख्याध्यापक, कुरेशिया हायस्कुल, बारा ईमाम
रोड, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा शिक्षणाधिकारी (माध्य)
जिल्हा परिषद, नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. महंमद वसीम महमंद एकबाल सौदागर (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कुरेशिया हायस्कुल बारा ईमाम रोड, नांदेड श्री. हाशमी एस.ईमादोद्यीन (त्यांना यापुढे जन

माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांचे प्रतिनिधी अधीक्षक श्री. आर.बी.शिंदे (त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणात अपीलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि. ०५.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेच्या ताब्यात असलेल्या मालमत्तेवरील बांधकामासंदर्भात सन २००१ ते २००५ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहितीची मागणी केलेली होती.

" आपल्या शाळेच्या ताब्यात असलेली मालमत्ता क्रमांक ७-१-१५१ मस्जीदे बाराइमाम, आशुरखाना या जागेत आपल्या शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी एकूण ११ खोल्यांचे बांधकाम करण्यात आलेले आहे. हे बांधकाम करण्यासाठी आपल्या संस्थेच्या संचालक मंडळाच्या ठरावाची सत्यप्रत तसेच या बांधकामाचा खर्च केलेल्या रक्कमेची तपशील तसेच सदरील बांधकामासाठी महानगर पालिका नांदेड यांच्याकडून रितशीर बांधकाम परवानगीची सत्यप्रत मिळणेबाबत."
अपीलार्थी यांनी सदर माहिती साधारण टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने त्यांचा अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविला होता. तथापि सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त झाला नाही, असे त्यांनी आयोगासमोर सुनावणीमध्ये सांगितले व तसे त्यांनी आयोगासमोर शपथपत्राद्वारे कबूल केले आहे. जन माहिती अधिकारी यांचेकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २४.१.२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. सदर अपिल जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २९.१.२००७ रोजी प्राप्त झाले आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपीलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७.२.२००७ रोजी त्यांच्या कार्यालयात सुनावणी आयोजित केली होती. सदर सुनावणी प्रत्यक्षात झाली किंवा कसे, हे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन ज्ञात होत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधींना या प्रथम अपीलाच्या सुनावणीबाबत विचारले असता, त्यांनी सुनावणीसंबंधी आदेश पारीत केले नसल्याचे आयोगासमोर सांगितले. जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी कोणतेच आदेश पारित केले नसल्याने व्यथित होऊन अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १०.४.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी जन अपिलीय

अधिकारी यांनी सुनावणी घेतली नसल्याचे कारण या द्वितीय अपीलासंदर्भात देऊन त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपीलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्या दि. ५.१२.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही हवी आहे. सदर माहिती त्यांना अद्यापही प्राप्त न झाल्याने संबंधितावर योग्य ती कार्यवाही करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे. जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १७.२.२००७ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि. २०.२.२००७ पर्यन्त माहिती देण्याचे कबूल केले होते, तथापि कबूल करुनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिलेली नाही. म्हणून अपिलार्थी यांनी दि. २१.२.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांना पुन्हा पत्र लिहून त्यांना अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याचे अवगत केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या सुनावणीसंदर्भात आपले आदेश पारित केले नसल्याने व त्यांना अद्यापही माहिती मिळाली नसल्याने, त्यांनी आयोगाकडे या मुद्यासंदर्भात अपील केलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. ५.१२.२००६ रोजीचा अर्ज त्यांचेकडे मूळात प्राप्त झाला नव्हता. दि. १७.२.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे झालेल्या सुनावणीचे वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाची प्रत जन माहिती अधिकारी यांना देण्याची सूचना केली होती. व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस आवश्यक ती माहिती ३ दिवसांचे आत देण्याची सूचना केली होती. तथापि अपिलार्थीचा अर्ज त्यांचेकडे अद्यापपावेतो प्राप्त न झाल्याने ते अपिलार्थीस माहिती देऊ शकले नाहीत. आयोगाकडून द्वितीय अपिलाचे सुनावणीसंदर्भात त्यांना ज्यावेळी पत्र प्राप्त झाले, त्यावेळी त्यांना प्रथमतः अपिलार्थीच्या प्रथम अर्जाची प्रत प्राप्त झाली. त्यानुसार अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस ७ दिवसांचे आत विनामूल्य देण्यास ते तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधीने असा युक्तीवाद केला आहे की, त्यांचे कडील दि. १७.२.२००७ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तीन दिवसांचे आत माहिती देण्याची तोंडी सूचना दिली होती. या सुनावणीसंदर्भात त्यांनी कोणतीही लेखी कागदपत्रे तयार केलेली नाहीत अथवा सुनावणीचे आदेशही पारित केले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंचा युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पहाता, असे दिसून येते की, अपिलार्थीचा प्रथम अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाला नाही व तसे त्यांनी आयोगासमोर शपथपत्राद्वारे सादर केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांचेकडे झालेल्या सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचेकडील अर्जाची प्रत जन माहिती अधिकारी यांना देण्याची सूचना केली होती. तथापि या अर्जाची प्रत अपीलार्थी यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणी नंतरही जन माहिती अधिकारी यांना दिली नाही. त्यामुळे अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती हवी आहे, याचा प्रथम उलगडा जन माहिती अधिकारी यांना आयोगाच्या सुनावणीचे वेळी त्यांना पाठविलेल्या पत्रावरुन झाला. आता ते अपिलार्थीस मूळ अर्जात मागणी केलेली माहिती ७ दिवसांचे आत विनामूल्य देण्यास तयार आहेत. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात स्वयंप्रेरणेने सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे दिसत नाही. त्याचबरोबर अपिलार्थी यांना प्रथम अपीलाचे सुनावणीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी सूचना देऊनही त्यांचा मूळ माहितीचा अर्ज त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे पाठविला नाही, हेही तितकेच खरे आहे.

या प्रकरणात जन अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थीच्या अपील अर्जासंदर्भात केलेली कृती बरोबर नाही, असे आयोगाचे मत आहे. अपीलार्थीचे अपील त्यांचेकडे दाखल झाल्यानंतर त्यांनी अपीलार्थी व जन माहिती अधिकारी यांना एकत्र बोलावून अपीलामध्ये लेखी निर्णय पारित करणे, या प्रकरणी अभिप्रेत असते. तथापि अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही जन अपिलीय अधिकारी यांनी केलेली नाही. त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी यथायोग्य नोंद घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस आता माहिती प्राप्त होण्याच्या दृष्टीने, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी, अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली, संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच त्यांना सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस, त्यांनी मूळ माहितीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक १२-०३-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. महंमद वसीम म.एकबाल सौदागर,रा. समिराबाग,खडकपूराच्या पाठीमागे, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कुरेशिया ऊर्दू हायस्कूल, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/२१

निर्णय दिनांक : १२-०३-२००८

१ श्री. राजेश पोचीराम मनुरे, : तक्रारदार
रा.इंदिरानगर, धर्माबाद
ता. धर्माबाद जि.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : उत्तरवादी
तथा तहसीलदार,बिलोली
जि. नांदेड.

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी तथा ना.तहसीलदार, बिलोली जि.नांदेड श्री. नारायण केरबा कदम ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हजर आहेत तर तक्रारदार श्री. राजेश पोचीराम मनुरे, (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) गैरहजर आहेत..

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेविरुध्द त्यांचेकडील दि. २०.०६.२००७ रोजीच्या अर्जान्वये अशी तक्रार केली आहे की, त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार उत्तरवादी यांचेकडे वेळोवेळी ग.क्र.१०९ व ग.क्र.१८२ च्या संदर्भात जमीनीच्या फेरफारच्या नकला मिळण्याकरता अर्ज केला होता. तथापि उत्तरवादी यांचेकडून त्यांना माहिती प्राप्त झाली नाही. माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे दि. ७.४.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपीलाची सुनावणी दि. ७.५.२००७ रोजी होऊन तक्रारदारास ७ दिवसांचे आत माहिती देण्याचे संबंधित अधिकाऱ्याने उत्तरवादीस आदेशित केले गेले होते. या आदेशास अनुसरुन त्यांना दि. २२.५.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडून ग. क्र. १८२ च्या फेरफार संदर्भात माहिती प्राप्त झाली होती तथापि

ग.क्र. १०९ च्या संदर्भात अद्यापही माहिती प्राप्त झाली नाही. ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी उत्तरवादी यांचे कार्यालयात वेळोवेळी तोंडी विनंती केली. तथापि त्यांचे विनंतीस उत्तरवादी यांच्या कार्यालयाकडून कोणतोही दाद मिळाली नाही. या तक्रार अर्जामध्ये त्यांनी न्याय मिळवून देण्याची आयोगास विनंती केली आहे.

तक्रारदाराच्या तक्रारीवर उत्तरवादी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तीवाद केला की, तक्रारदारानी त्यांचेकडे मूलतः ग.क्र.१०९ व ग.क्र.१८२ च्या फेरफाराच्या नकलांची मागणी केली होती. याबाबत त्यांनी दि. २२.५.२००७ रोजी ग.क्र.१८२ च्या फेरफाराची नक्कल देण्यात आली असून ग.क्र.१०९ च्या संदर्भात आवश्यक त्या फेरफाराची प्रत त्यांचे कार्यालयात बराच शोध घेऊनही उपलब्ध झाली नाही. सदर फेरफार रजिस्टर त्यांनी उपविभागीय अधिकारी, देगलूर यांचे कार्यालयात दि. १३.७.९८ रोजी सादर केले होते. तथापि सदर रजिस्टर देगलूर येथील कार्यालयातून त्यांचे कार्यालयात परत आले किंवा कसे हे त्यांना माहिती नव्हते. आज दि. १२.३.२००८ रोजी आयोगाचे कार्यालयात ते उपस्थित झाले असतांना त्यांना उत्तरवादी यांचे कार्यालयातून असा दूरध्वनी संदेश प्राप्त झाला की, श्री. मनुरे यांचे ग.क्र.१०९ च्या संदर्भात फेरफार रजिस्टर आता तहसील कार्यालयात सापडले असून श्री. मनुरे यांना अपेक्षित असलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे. सदर माहिती तक्रारदारास २ दिवसांचे आत विनामूल्य देण्यास उत्तरवादी तयार आहेत. तसे शपथपत्रही त्यांनी आयोगास सादर केले आहे.

उपरोक्त प्रकरणी असे दिसून येते की, उत्तरवादी यांचे कार्यालयातील अभिलेख्यांचे त्यांनी व्यवस्थापन योग्य त्या पध्दतीने न केल्याने तक्रारदार हे त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीपासून विनाकारण वंचित राहिलेले आहेत.केवळ माहितीच्या योग्य त्या व्यवस्थापनाअभावी या प्रकरणी तक्रारदारास अपेक्षित असलेली माहिती प्राप्त न झाल्याचे येथे सिध्द होत आहे. तथापि या प्रकरणी तक्रारदारास माहितीसाठी जाणून-बुजून त्रास देण्याचा किंवा त्यांचेपासून माहिती दडविण्याचा उत्तरवादी यांचा हेतू होता, असेही या ठिकाणी सिध्द होत नाही. कारण त्यांनी तक्रारदार यांनी मागितलेली माहिती त्यांनी देण्यासंदर्भात त्यांचे कार्यालयात कसून शोध घेण्याचा प्रयत्न केल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते, हे पाहता, संबंधित उत्तरवादी यांनी त्यांचेकडील अभिलेखांच्या व्यवस्थापनासंदर्भात निश्चित स्वरुपाची कार्यप्रणाली अवलंबावी, अशी त्यांना सूचना करण्यात येत आहे व या प्रकरणी त्यांनी लावलेल्या विलंबाबाबत त्यांना आयोगातर्फे त्यांना सक्त ताकीद देण्यात येत असून, त्यांनी येथून पुढे त्यांचेकडे प्राप्त झालेल्या माहितीच्या अर्जा संदर्भात त्यांनी विशेष दक्ष राहावे, अशा त्यांना सूचना देण्यात येत आहेत,

त्याचबरोबर तक्रारदार यांना त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जाद्वारे त्यांनी मागणी केलेली माहिती देण्यासंदर्भात उत्तरवादी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी तक्रारदारास उर्वरित माहिती आता तीन दिवसाचे आत विनामूल्य पुरवावी.

प्रसंगावशात् असेही आढळून आले आहे की, तक्रारदाराच्या मूळ तक्रार अर्जावर आयोगाने उत्तरवादी यांचेकडे त्यांचेकडील दि. १.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये १५ दिवसांचे आत अहवाल मागविला होता. तथापि आयोगाच्या या पत्रासही उत्तरवादी यांनी कोणतीही दाद दिली नसल्याचे दिसून येत आहे. आयोगाने त्यांच्या पाठविलेल्या दि. १.११.२००७ रोजीच्या पत्रावर संबंधित उत्तरवादी यांनी कोणतीही कार्यवाही न करुन आपले कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांनी आयोगास अहवाल पाठविण्यासंदर्भात दर्शविलेल्या निष्काळजीपणा व बेजबाबदारपणा याबाबत त्यांचेवर महसूल आयुक्त (औरंगाबाद) यांनी यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश त्यांना प्राप्त होताच एक महिन्याचे आत करुन तद्नंतर पंधरा दिवसांच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२. तक्रारदार यांना त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित सर्व माहिती उत्तरवादी यांनी तक्रारदारास ३ दिवसाचे आत विनामूल्य पुरवावी.

३. आयोगाने पाठविलेल्या दि. १.११.२००७ रोजीच्या पत्रावर संबंधित उत्तरवादी यांनी कोणतीही कार्यवाही न करुन आयोगास अहवाल पाठविण्यासंदर्भात दर्शविलेल्या निष्काळजीपणा व बेजबाबदारपणा याबाबत महसूल आयुक्त,औरंगाबाद विभाग यांनी संबंधितांवर हे आदेश त्यांना प्राप्त होताच एक महिन्याच्या आत यथायोग्य प्रशासकीय

कार्यवाही करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास तद्नंतर पंधरा दिवसांचे आत पाठवावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२-०३-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजेश पोचीराम मनुरे,रा. इंदिरानगर, धर्माबाद जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, बिलोली जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९७१

निर्णय दिनांक १३-०३-२००८

१ श्री. सरदार हरजीतसिंग तिरथसिंग सहानी, : अपिलार्थी
घर नं. ५-१-५५, उस्मानपुरा,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा पोलीस उप आयुक्त,
पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा पोलीस आयुक्त,
पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहाय्यक पोलीस आयुक्त, शहर विभाग, पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : पोलीस उप आयुक्त (परिमंडळ), पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सरदार हरजीतसिंग तिरथसिंग सहानी हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,

शहर विभाग, पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद श्री. मोहसीनखान मोईनोद्दीन खान (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (परिमंडळ), पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद श्री. माधव तांबडे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २३-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज क्रमांक ८०/२००६ मध्ये जी चौकशी / कारवाई केली त्याची दिनांक २८-०७-२००६ ते २३-०१-२००७ या कालावधी तील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " अर्ज क्रमांक ८०/२००६ मध्ये जी चौकशी / कार्यवाही केली त्याची माहिती द्यावे. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने केलेल्या या अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक २७-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले.

सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०५-२००७ रोजी प्राप्त झाला. या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१-०६-२००७ रोजी घेतली. या सुनावणीच्या वेळी अर्जदारास आवश्यक असलेली माहिती जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे देण्यात आली. सदर माहिती अपिलार्थीस दिनांक ०१-०६-२००७ रोजी प्राप्त झाली आहे. प्राप्त झालेल्या माहितीची पोच अर्जदाराने जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक ०१-०६-२००७ रोजी दिली आहे.

तद्वतच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिलेल्या जबानीमध्ये त्यांची या अपील प्रकरणी कोणतीही तक्रार नसल्याचे नमूद केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणी होण्यापूर्वीच अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आता अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना दिनांक ०१-०६-२००७ रोजी प्राप्त झाल्याने अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे. या प्रकरणी आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही व त्याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा दिनांक २७-०२-२००७ रोजीचा अर्ज दिनांक २५-०५-२००७ रोजी पोहोचला आहे. सदर विलंब निश्चितपणे समर्थनीय नाही. या विलंबामुळे अपिलार्थी हे त्यांना माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिल्याचे दिसून येते. सबब या दोन्ही टप्प्यावर झालेल्या विलंबाशी संबंधीत असलेले संबंधीत असलेले कर्मचारी / अधिका-यावर पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा असे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी व त्यांना सहाय्य करणारे त्यांचे कर्मचारी / अधिकारी यांच्यावर पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांनी उपरोक्त प्रकरणी, माहिती प्राप्त होण्यापासून अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहीत केलेल्या मुदतीपेक्षा जास्त कालावधीकरिता वंचित ठेवण्यासंदर्भात जबाबदार असलेल्या कर्मचारी / अधिकारी यांचेवर त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

औरंगाबाद
दिनांक १३-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सरदार हरजीतसिंग तिरथसिंग सहानी, घर नं. ५-१-५५, उस्मानपुरा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, शहर विभाग, पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (परिमंडळ), पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ पोलीस आयुक्त, पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९७४

निर्णय दिनांक १३-०३-२००८

१ सौ. चंद्रभागाबाई गंगाधरराव दहिवाल, : अपिलार्थी
ॲडीटनगर (हनुमान मंदिर जवळ),
पाथरी रोडचे बाजुला, परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तहसीलदार, सेनगाव,
जिल्हा हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी (महसूल),
हिंगोली, जिल्हा हिंगोली

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी सौ. चंद्रभागाबाई गंगाधरराव दहिवाल या गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सेनगाव, जिल्हा हिंगोली श्री. मुक्त्यारसिंग रामराव ठेंग (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), हिंगोली, जिल्हा हिंगोली यांचे प्रतिनिधी तलाठी श्री. सुरेश नेमीचंद भागवते (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०९-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मयत किसनराव मल्हारीराव टेहरे रा. जयपूर तालुका सेनगाव यांच्या जमिनीसंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

"१. मयत श्री किसनराव मल्हारीराव टेहरे रा. जयपूर ता. सेनगाव यांचे नांवे ई. स. १९८९ (नोव्हेंबर ८९) ला मौजे एलतुरा व मौजे जयपूर ता. सेनगाव येथे त्यांचे नांवे असलेल्या जमीनीच्या सात बारा देणे.

२. मयत श्री किसनराव मल्हारीराव टेहरे रा. जयपूर यांचे नांवे असलेल्या जमीनींचा फेरफार मृत्युनंतर मयताचा मुलगा श्री दिगंबरराव किसनराव टेहरे यांचे नांवे कोणत्या आधारे केला त्याविषयीचे सर्व प्रमाणपत्र व माहीती देणे.

३. मयत श्री किसनराव मल्हारीराव टेहरे रा. जयपूर यांच्या मृत्युनंतर त्यांच्या वारसास वारसा हक्क प्रमाणपत्र दिलेले आहे का दिलेले असल्यास वारसा हक्क प्रमाणपत्र कोणत्या प्रमाणपत्राच्या आधारे दिले त्याविषयीची सर्व माहीती व प्रमाणपत्र देणे.

४. ई. स. २००६ मध्ये मयताच्या नांवे (श्री मल्हारीराव किसनराव टेहरे) आलेले ३ कापसाचे धनादेश कोणास दिले व कोणत्या आधारे दिले त्याविषयीची सविस्तर माहीती देणे."

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड पोस्टाव्दारे अपेक्षिली होती.

मध्यंतरीच्या काळात दिनांक ०९-०२-२००७ रोजी अपिलार्थीने संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांनी मागणी केलेली माहिती पुनःश्च मागविल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या या अर्जास अधिनियमाव्दारे विहीत केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद न दिला गेल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक २०-०२-२००७ रोजी प्रथम अपिल केले. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०३-२००७ रोजी सुनावणी घेऊन या अर्जासंदर्भात आपले आदेश दिनांक २९-०३-२००७ रोजी पारीत केले आहेत. या आदेशाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस हवी असलेली माहिती नियमानुसार देण्याबाबत तात्काळ कारवाई करण्याचे सूचित केले आहे व तसेच माहिती न दिल्यास होणा-या परिणामाची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांच्यावर राहील असेही त्यांनी या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या निदर्शनास आणले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही अपिलार्थीस कोणतीच माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती आजतागायत मिळाली नसल्याने त्या राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करीत आहेत, त्यांनी मागितलेली माहिती ही त्यांच्या वडिलाच्या मालकीच्या जमिनीसंदर्भात असून त्यांचे भाऊ वडिलाच्या जमिनीत, वडील मयत झाल्यानंतर त्यांना देय असलेला हिस्सा देत नसल्यामुळे व या जमिनीवर आपला हक्क सिध्द करण्याच्या दृष्टीने त्यांना या माहितीची आवश्यकता आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी ह्या गैरहजर आहेत. तथापि त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या अर्जामध्ये, अपिलार्थीस हव्या असलेल्या भुखंडाच्या ७/१२ नकलेचा सर्व्हे नंबर व फेरफार क्रमांक नमूद न केल्याने त्यांना अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देता आली नाही. सदरचा तपशील त्यांनी अपिलार्थीकडे त्यांच्याकडील दिनांक १५-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये मागितला होता. तथापि अर्जदाराने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसंदर्भात संबंधीत जमिनीचा सर्व्हे नंबर व फेरफार नंबर त्यांना न कळविल्यामुळे त्यांना अपिलार्थीस माहिती देता आली नाही. त्यांनी अपिलार्थीस तपशील पुरविण्याचे कळवून सुध्दा अपिलार्थीने त्यांना तपशील न कळविता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे व आयोगाकडे अनुक्रमे प्रथम व व्दितीय अपील केले आहे. अपिलार्थीने त्यांना हव्या असलेल्या माहितीबाबत सविस्तर माहिती कार्यालयास दिली तर ते अपिलार्थीस हवी असलेली माहिती तात्काळ देण्यास तयार आहेत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितील मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात त्यांनी आयोगास असे सांगितले की, ३ टक्के कापसाचे धनादेश त्यांच्या कार्यालयाने वितरीत केले नाहीत त्यामुळे ह्यासंबंधीची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. सदर धनादेश संचालक, कॉटन फेडरेशन कार्यालय, हिंगोली यांच्या सेनगाव येथील कार्यालयामार्फत देण्यात आलेले होते.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी या प्रकरणात दिनांक २३-०३-२००७ रोजी प्रथमतः सुनावणी ठेवली होती. तथापि या सुनावणीच्या वेळेस अर्जदार या गैरहजर होत्या. जन माहिती अधिकारी यांनी लेखी म्हणणे सादर करण्यास संधी देण्याची जन अपिलीय अधिकारी यांना

विनंती केली. सदर विनंती जन अपिलीय अधिकारी यांनी मान्य करुन या प्रकरणात दिनांक २६-०३-२००७ ही पुढील तारीख देण्यात आली. दिनांक २६-०३-२००७ रोजी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे दोन्ही गैरहजर असल्यामुळे सुनावणीची पुढील तारीख २९-०३-२००७ ही ठेवण्यात आली होती. सदर सुनावणीच्या वेळेस अर्जदार व जन माहिती अधिकारी हे दोन्ही गैरहजर राहिल्यामुळे त्यांनी दिनांक २९-०३-२००७ रोजी या संदर्भातील आपले आदेश पारीत केले आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ०९-०१-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे एकूण ४ मुद्दयावर माहिती मागविली होती. याबाबत मुद्दा क्रमांक ४ त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत नव्हता. अर्जदाराने मागितलेली माहिती जर आपल्या कार्यालयाशी संबंधीत नसेल तर काय कारवाई करणे जरुरी आहे याचे विवेचन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (i) मध्ये केलेले आहे. त्याप्रमाणे या ठिकाणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक ४ संदर्भात माहिती देण्यास कापूस फेडरेशनच्या जन माहिती अधिका-यास सूचित करावयास हवे होते व त्या जन माहिती अधिका-यास लिहिलेल्या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस द्यावयास हवी होती. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती न करुन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (i) च्या तरतुदीचा भंग केला आहे. एवढेच नव्हे तर अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी जे ३ मुद्दे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत होते त्यासंदर्भात माहिती देण्यासाठी त्यांनी अपिलार्थीशी जो प्रथम कथित पत्रव्यवहार केला आहे तो देखील दिनांक १५-०२-२००७ रोजी म्हणजेच अपिलार्थीस माहिती देण्याची विहित मुदत व्यपगत झाल्यानंतर केला आहे. यावरुन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार न करुन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग केल्याचे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १५-०२-२००७ रोजी पाठविलेले पत्र खरोखरच पाठविले होते किंवा कसे याबाबत आयोगाच्या मनात संभ्रम आहे कारण जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस त्यांनी पत्र पाठविल्यापुष्ट्यर्थ कोणताही पुरावा त्यांना आयोगाने त्यांच्या नोटीसीव्दारा सूचित करुनही, आज सादर करु शकले नाहीत व त्याचबरोबर त्यांनी हा मुद्दा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या प्रथम सुनावणीच्या वेळी देखील उपस्थित केला नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या प्रथम अर्जावर त्यांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे सुरुवातीपासूनच नकारात्मक भूमिका घेतल्याचे आयोगास आढळून आले आहे. त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०३-२००७ रोजी त्यांचे म्हणणे लेखी स्वरुपात सादर करण्याची विनंती केली. सदर विनंती मान्य होऊन जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी दिनांक २६-०३-२००७ रोजी ठेवली. तथापि दिनांक २६-०३-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांनी आपले लेखी म्हणणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर केलेले नाही. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १५-०२-२००७ रोजी पत्र पाठविले नसावे या आयोगाच्या संशयास पुष्टी मिळते. अन्यथा या पत्राचा उल्लेख जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीमध्ये त्यांनी निश्चितपणे केला असता. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये त्यांना ज्या भुखंडासंदर्भात माहिती हवी होती त्या भुखंडाचा सर्व्हे नंबर व फेरफार नंबर त्यांना दिला नसल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती पुरविता आली नाही. तथापि त्यांचा हा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे. कारण प्रत्येक गावामध्ये भुखंडधारकाचे नाव व भूखंड क्रमांक त्यांचे नावाप्रमाणे संबंधीत गावच्या तलाठ्याच्या

८-अ रजिस्टरमध्ये नोंदविलेले असते त्यामुळे तलाठ्याकडे ७/१२ चा उतारा मागतांना कोणत्याही अर्जदारास अनुक्रमांकाच्या जमिनीचा सर्व्हे नंबर, फेरफार क्रमांक माहिती असणे अनिवार्य नाही. तलाठ्याकडे ठेवलेल्या ८-अ रजिस्टरमधून भुखंडधारकाच्या नावावरुन संबंधीत तलाठी ७/१२ चे उतारे देऊ शकतात. अपिलार्थीने मागितलेली माहिती ही सरळ व सोपी होती. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तात्काळ कारवाई करण्याचे सूचित केले होते. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाकडे देखील या प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.

वरील विवेचन पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना हवी असलेली माहिती प्राप्त होण्यापासून विनाकारण प्रदीर्घ कालावधीकरिता वंचित ठेवल्याचे दिसून येते. त्यांच्या या कृतीव्दारे त्यांनी अपिलार्थीचा माहिती मागण्याचा हक्क, जो त्यांना भारतीय संसदेने दिला आहे तो हिरावून घेण्याचा अप्रत्यक्षपणे प्रयत्न केला आहे असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीस माहिती न देऊन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यास स्वतःला पात्र ठरविले आहे असे आयोगाचे मत आहे. त्यांनी आयोगासमोर अपिलार्थीस माहिती न देण्यासंदर्भात केलेला युक्तिवाद आयोगास मान्य नाही कारण त्यांना अपिलार्थीस जर खरोखरीच माहिती द्यावयाची इच्छा असती तर व त्याव्दारे अधिनियमातील तरतुदीचे पालन करण्याची इच्छा असती तर संबंधीत गावच्या तलाठ्याकडील ८-अ रजिस्टरवरुन भुखंडधारकाच्या नावावरुन आवश्यक ती माहिती ते अपिलार्थीस देऊ शकले असते. त्यांच्या अपिलार्थीस माहिती न देण्याच्या कृती व्दारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभावही स्पष्ट केला आहे असे येथे दिसून येत आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे इतर कर्मचारी / अधिकारी ज्यांना जन माहिती अधिकारी समजावे अशी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) मध्ये तरतूद आहे या सर्वांना त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून अधिनियमातील विहीत कालावधीपेक्षा जास्त कालावधीकरिता वंचित ठेवल्याबद्दल माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची कर्मचारी / अधिकारी निहाय विभागणी उपविभागीय अधिकारी (महसूल), हिंगोली यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करावी. सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी शासकीय कोषागारात, लेखा शिर्ष संकेतांक " ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) " या लेखाशीर्षाखाली, येथून पुढे जास्तीत जास्त पाच हप्त्यात भरावी असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी हे नियमीतपणे भरतील असे उपविभागीय अधिकारी (महसूल), हिंगोली यांनी नियमितपणे पहावे व यासंदर्भातील आपला अनुपालन अहवाल एप्रिल २००८ पासून आयोगास, दरमहा सदर शास्तीची रक्कम पूर्णतः शासकीय कोषागारात भरेपर्यत पाठवावा. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ४ बाबत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत हे आदेश त्यांना प्राप्त होताच ३ दिवसाच्या आत संचालक, कॉटन फेडरेशन, हिंगोली यांच्याकडे पाठवावी व सदर माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस प्राप्त होईल अशी कारवाई करुन अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे इतर सर्व सहाय्यक कर्मचारी / अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती मिळण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीपेक्षा जास्त कालावधीसाठी वंचित ठेवल्याने त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी निकालपत्रात दिलेल्या सुचनेनुसार तीन हप्त्यामध्ये करावा.

४. शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी हे नियमीतपणे भरतील हे उपविभागीय अधिकारी (महसूल), हिंगोली यांनी पहावे व यासंदर्भातील आपला अनुपालन अहवाल एप्रिल २००८ पासून आयोगास

दरमहा सदर शास्तीची रक्कम पूर्णतः शासकीय कोषागारात भरेपर्यत पाठवावा.

औरंगाबाद
दिनांक     १३-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. चंद्रभागाबाई गंगाधरराव दहिवाल, ॲडीटनगर (हनुमान मंदिर जवळ), पाथरी रोडचे बाजुला, परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सेनगाव, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), हिंगोली, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, कॉटन फेडरेशन, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत : तहसीलदार, सेनगाव, जिल्हा हिंगोली)

५ जिल्हा कोषागार अधिकारी, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९९४

निर्णय दिनांक १३-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. रुपेश दौलतराव पाडमुख,<br>विभागीय प्रतिनिधी, दै. दर्शन समीक्षा<br>वृत्तसेवा कै. कुसूमताई चव्हाण मार्ग,<br>शिवाजीनगर, नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर,<br>जिल्हा नांदेड | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. रुपेश दौलतराव पाडमुख (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर श्री. विठ्ठल यशवंतराव बिरादार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय

अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड श्री. सुनिल अण्णासाहेब वांढेकर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०५-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील माहूर उपविभागासंदर्भात दिनांक २१-०९-२००६ ते ०२-०२-२००७ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

" १. दिनांक २१ सप्टेंबर २००६ पासून ते ०२ फेब्रुवारी २००७ एल. ओ. सी. किती आली व कशा प्रकारे वापरण्यात आली.

२. प्रत्येक महिन्यांच्या व्हाऊरची प्रत देणे.

३. प्रत्येक व्हाऊचर जे एम. बी. मध्ये लिहिले त्या एम. बी. ची प्रत मिळणे.

४. डिझेलच्या व्हाऊचरच्या प्रती तसेच ज्या गाडीसाठी डिझेल वापरले त्या गाडीच्या लॉगबुकची प्रत मिळणे(०१-०४-०६ ते ३१-०१-०७). "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

सदर पत्र जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०२-२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील पत्र दिनांक ०७-०२-२००७ नुसार अपिलार्थीने विचारलेली माहिती माहूर उपविभागाशी संबंधीत असल्यामुळे उपविभागीय अभियंता माहूर यांच्याकडे अपिलार्थीच्या मूळ अर्जाची छायांकीत प्रत पाठवून अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयास १५ दिवसाच्या आत दोन प्रतीमध्ये सादर करण्याची सूचना दिली. या पत्रामध्ये त्यांनी उपविभागीय अभियंता माहूर यांना, त्यांनी विलंबाने माहिती दिल्यास भविष्यात होणा-या दंडात्मक कारवाईची कल्पना दिल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहीत केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक ०९-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले.

संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणतीही सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. तथापि त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस, त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्यासंदर्भात आदेशीत करण्यात येत असल्याचे म्हटले आहे व त्याचबरोबर अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध होऊ शकेल असे त्यांना निर्देशीत केले आहे. या पत्राची प्रत त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दिलेली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणा-या अपिलाची सुनावणी कशी असू नये याचे संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेले पत्र म्हणजे उत्तम नमुना आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी लिहिलेल्या पत्रावर जन अपिलीय अधिकारी यांची सही नसून त्यांच्याकरिता त्यांच्या कार्यालयातील इतर कर्मचा-याने सही करुन अपिलार्थीस त्यांच्या अपिलावर कथित निर्णय दिला आहे. अपिलार्थीच्या अपील अर्जावर आवश्यक त्या पध्दतीचे जन अपिलीय अधिकारी यांनी पालन केलेले दिसून येत नाही. आदेश पत्रावर जन अपिलीय अधिकारी यांची सही नसल्याने त्यांचे अपिलार्थीस पाठविलेले दिनांक १७-०४-२००७ रोजीचे पत्र अवैध ठरवण्यात येत आहे. या जन अपिलीय अधिका-याच्या अशा प्रकारच्या वर्तनाची आयोगाने त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या वेगवेगळ्या व्दितीय अपिलावर सुनावणी घेतांना यापूर्वी देखिल सखेद नोंद घेतली आहे.

त्यांच्या अशा प्रकारच्या सदोष कार्यपध्दतीची नोंद सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांनी यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०५-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अर्जामध्ये त्यांनी, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना विहित मुदतीमध्ये न पुरविल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. तथापि सदर अपिलावर निर्णय घेतांना जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना समक्ष न बोलविता एकतर्फी निर्णय कळविला असे नमूद करुन त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी या अपिल अर्जामध्ये कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना अपील निर्णय घेतांना सुनावणीस न बोलविल्याने त्यांना आवश्यक त्या माहितीसाठी आयोगाकडे धाव घ्यावी लागली. सदर माहिती त्यांना अद्यापही प्राप्त झाली नाही व या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती उपविभागीय व विभाग स्तरावरील असून त्यांच्या स्तरावरील (विभागीय) माहिती त्यांनी तयार ठेवली होती. तथापि माहूर उपविभागाकडून त्यांना उशिराने माहिती प्राप्त झाल्याने त्यांनी ती अपिलार्थीस उशिरा पुरविली. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे हा विलंब लागला असे त्यांचे म्हणणे आहे. अपिलार्थीने अपेक्षित केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-०५-२००७ रोजी त्यांच्या कार्यालयाच्या प्रतिनिधीमार्फत

पाठविली असता अपिलार्थीने सदर माहिती घेण्यास नकार दिला. अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती घेण्यास नकार दिल्यामुळे सदर माहिती अपिलार्थीस दिनांक १६-०५-२००७ रोजी रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात आली होती. तथापि अपिलार्थीने सदर रजिस्ट्री स्विकारण्यास नकार दिल्याने सदर रजिस्ट्री पोस्टामार्फत त्यांच्या कार्यालयास दिनांक २२-०५-२००७ रोजी परत प्राप्त झाली. त्यांच्या म्हणण्यापृष्ठ्यर्थ त्यांनी आयोगास ज्या पाकिटात माहिती पाठविली होती त्या पाकिटाची प्रत दाखविली असून या पाकिटावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १६-०५-२००७ रोजी माहिती पाठविल्याचे दिसून येते. सदर पाकिटावर पोस्टाची पावती डकविली असून या पाकिटावर रुपये १०५ /- इतक्या किंमतीची तिकिटे डकविल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविलेला हा पुरावा आयोग ग्राह्य धरत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अशा प्रकारच्या माहीती अस्वीकृत करण्याच्या कृतीची कल्पना अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना दिनांक २८-०५-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये दिलेली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे माहितीसाठी कधीही संपर्क साधला नाही. अपिलार्थीच्या अपील अर्जावर तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०५-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती जरी विस्तृत स्वरुपाची असली तरी ती माहिती अर्ज केल्यापासूनच्या नजिकच्या कालावधीतील असल्यामळे ती अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत पुरविणे जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांना अशक्य नव्हते. अपिलार्थीने मागितलेल्या ४ मुद्दयावरील माहितीपैकी २ मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्या

कार्यालयात सहज उपलब्ध होती तर एम. बी. च्या प्रती व गाडीच्या लॉगबुकच्या प्रती याची माहिती उपविभागाकडे उपलब्ध होती. जन माहिती अधिका-यास ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग माहूर यांचे सहाय्य घेणे आवश्यक होते. मुळात उपविभागाकडून दिनांक ०५-०५-२००७ रोजी माहिती जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दिनांक ०७-०५-२००७ रोजी त्यांच्या कार्यालयाच्या प्रतिनिधीमार्फत ती अपिलार्थीस पाठविली. सदर माहिती अपिलार्थीस दिनांक ०७-०५-२००७ रोजी त्यांच्या कार्यालयातील प्रतिनिधी मार्फत पाठविल्यासंदर्भात जन माहिती अधिकारी आयोगाकडे आज कोणताही पुरावा सादर करु शकले नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे, त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-०५-२००७ रोजी माहिती पाठविली होती हे म्हणणे आयोग ग्राह्य धरत नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १६-०५-२००७ रोजी रजिस्टर पोस्टाने माहिती पाठविल्याचा पुरावा सादर केल्याने त्यांनी अपिलार्थीस दिनांक १६-०५-२००७ रोजी रजिस्टर पोस्टाने माहिती पाठविली असल्याचे येथे सिध्द होत आहे. अपिलार्थीने दिनांक ०५-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती सर्वसाधारण परिस्थितीत अधिनियमातील तरतुदीप्रमाणे त्यांना उशिरात उशिरा दिनांक ०४-०३-२००७ रोजी अगर तत्पूर्वी प्राप्त होणे आवश्यक होते. तथापि सदर माहिती अपिलार्थीस प्रथमतः दिनांक १६-०५-२००७ रोजी पाठविण्यात आली. या तारखेस जन माहिती अधिकारी यांचेकडे आवश्यक ती माहिती उपलब्ध होती असे ग्राह्य धरल्यास या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाने मागणी केलेली माहिती पाठविण्यास एकूण ७३ दिवसांचा विलंब लावल्याचे सिध्द होत आहे. सदर विलंबाचे समर्थन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची "विस्तृत व्याप्ती" असे दिले आहे. तथापि अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे अवलोकन केल्यास, सदर माहिती अपिलार्थीने अर्ज

केल्यापासूनच्या नजिकच्या कालावधीतील आहे व अशा प्रकारची बहुतांश माहिती सर्व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दर महिन्याच्या महालेखापांकडे पाठविण्यात येणा-या लेख्यामध्ये समाविष्ट केलेली असते, असे दिसून येते. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देणे हे काम जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांना फार अवघड वा जिकिरीचे होते असे आयोग मानत नाही. जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगापुढे स्पष्ट केलेले विलंबाचे समर्थन स्विकारत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदी अन्वये जन माहिती अधिकारी यांना अर्जदारास माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे इतर कर्मचारी / अधिकारी यांना देखील जन माहिती अधिकारी समजावे अशी तरतूद आहे. हे पाहता या प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे कर्मचारी अधिकारी हे सर्व जण अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्यास जबाबदार ठरतात.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांना सहाय्य करणारे त्यांचे इतर सर्व कर्मचारी / अधिकारी यांच्यावर त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाबाबत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये त्यांचेवर विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे (७३ दिवसाकरिता) एकूण रुपये १८२५० /- (अक्षरी- रुपये आठरा हजार दोनशे पन्नास फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची कर्मचारी / अधिकारी निहाय विभागणी अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करावी. सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी शासकीय कोषागारात, लेखा शिर्ष संकेतांक “ ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा

अधिकार (००७०-०१६-१) ” या लेखाशीर्षाखाली, येथून पुढे जास्तीत जास्त तीन हप्त्यात भरावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी हे नियमीतपणे भरतील हे अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांनी पहावे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पोस्टाने पाठवून देखील अपिलार्थीस ती माहिती काही कारणाने प्राप्त होऊ शकली नाही. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज तयार आहे. अपिलार्थीने त्यांच्याकडे मूळ अर्जात विनंती केल्याप्रमाणे सदर माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता ते ज्यावेळी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहतील त्यावेळी त्यांना ही माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल मान्य करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. अपिलार्थी यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः हजर राहून त्वरीत उपलब्ध करुन घ्यावी.

३. जन माहिती अधिकारी व इतर सर्व सहाय्यक यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी ७३ दिवसांचा विलंब लावल्याबद्दल त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- यप्रमाणे एकूण १८२५० /- (अक्षरी- रुपये आठरा हजार दोनशे पन्नास फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर

शास्तीचा भरणा त्यांनी निकालपत्रातील दिलेल्या सुचनेनुसार तीन हप्त्यामध्ये करावा.

४. अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांनी सर्व संबंधितांनी सदर शास्तीचा भरणा नियमीतपणे केल्याचा अहवाल एप्रिल २००८ पासून शास्तीची पूर्ण रक्कम शासकीय कोषागारात भरेपर्यंत (जून २००८ अखेरपर्यंत) नियमितपणे आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक १३-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रुपेश दौलतराव पाडमुख, विभागीय प्रतिनिधी, दै. दर्शन समीक्षा वृत्तसेवा कै. कुसूमताई चव्हाण मार्ग, शिवाजीनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (सार्वजनिक बांधकाम), मंत्रालय, २ रा मजला, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हा कोषागार अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९७५

निर्णय दिनांक : १३-०३-२००८

१ श्री. मधुकर हिराजी मुळे, : अपीलार्थी
शिवाजी रोड, मुळे गल्ली,
रा. पूर्णा ता. पूर्णा जि. परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद,
पूर्णा जि. परभणी

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मधुकर हिराजी मुळे (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद,पूर्णा यांचे प्रतिनिधी लिपीक श्री. महादेव गंगाधरअप्पा नगरे ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद श्री. सोमनाथ गुंजाळ (त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणात अपीलार्थी यांनी त्यांचेकडील दि. २०.०९.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे पूर्णा शहरामध्ये चालू असलेल्या बांधकामाबाबत एप्रिल,२००६ ते २०.९.२००६ या कालावधीतील माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

" १) सानेगुरुजी वाचनालयाच्या बाजूस जे दोन दुकानाचे बांधकाम चालू आहे.
त्या बांधकामास नगर परिषदने परवानगी दिली का ? परवानगी दिली असेल
तर परवानगीची प्रत द्या. नसेल तर का, व

२) ती जागा (प्लॉट) कोणाच्या नावाने आहे (जागा मालकाचे नाव).

३) जागा मालकाने त्या जागेचा कर भरला का ? भरला असेल तर कधीपासुन
व किती भरला दिनांकासह,

४) त्या जागेचा उल्लेख असलेला शहराचा मूळ नकाशाची प्रत. "

अपीलार्थी यांनी सदर माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपीलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनचेकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपीलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २२.११.२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपीलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ६.१२.२००६ रोजी घेऊन अपील आदेश दि. १९.१.२००७ रोजी पारित केले आहेत. या आदेशामध्ये अपीलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन अपीलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्या क्र. ४ संदर्भातील माहिती अपिलार्थीस विनामूल्य व पूर्ण स्वरुपात ७ दिवसांचे आत देण्याचे संबंधित जन माहिती अधिकारी यांना त्यांनी आदेशित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊन देखिल जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती न दिल्याने व्यथित होऊन अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.११.२००६ रोजी द्वितीय अपील केले आहे. त्यामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपीलार्थीने असा युक्तीवाद केला की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपीलावर दि.१९.१.२००७ रोजी दिलेला निर्णय त्यांना अंशतः मान्य आहे. तथापि त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र.४ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी

त्यांना अद्यापपर्यन्त माहिती पुरविली नाही. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या माहितीच्या अर्जामध्ये मुद्दा क्र.४ द्वारे-त्यांनी संदर्भित केलेल्या जागेचा समावेश असलेल्या शहराच्या मूळ नकाशाची प्रत मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी दि. ४.१२.२००६ रोजी पुरविलेल्या माहितीमध्ये मुद्या क्र. ४ च्या संदर्भातील माहिती अधिकृत नव्हती, कारण या नकाशावर नगर परिषदेच्या कोणत्याही अधिकाऱ्याची सही नव्हती तसेच त्यांनी उल्लेख केलेल्या प्लॉटचे निश्चित ठिकाण जन माहिती अधिकारी यांनी दाखविले नव्हते. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या मुद्दा क्र. ४ ची अधिकृत माहिती त्यांना अद्यापही हवी आहे.

जन माहिती अधिकारी यांचे तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांनी विलंबाने माहिती दिली आहे. तसेच अपीलार्थीस आवश्यक असलेली नोंद ते अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या नकाशावर विनामूल्य करुन  सदर नकाशा साक्षांकित करुन देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांचेकडून असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांचेकडे घेतलेल्या प्रथम अपिलाचे सुनावणी संदर्भात योग्य ते आदेश दि. १९.१.२००७ रोजी पारित केले असून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ ची संपूर्ण स्वरुपात ७ दिवसांचे आत माहिती विनामूल्य पुरविण्याची सूचना केली होती.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंचा युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पहाता, या प्रकरणात असे दिसून येते की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २०.९.२००६ रोजीच्या प्रथम अर्जावर माहितीचा अधिकार अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. २२.११.२००६ रोजी प्रथम अपीलअर्ज केला आहे व सदर माहिती त्यांनी अपिलार्थीस, दि. ६.१२.२००६ रोजी ठेवण्यात आलेल्या प्रथम अपीलाच्या सुनावणीचे दोन दिवस अगोदर म्हणजे दि. ४.१२.२००६ रोजी माहिती दिली. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपिल अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,२ व ३ वर केलेले भाष्य त्यांना मान्य नसल्याचे म्हटले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ४.१२.२००६ रोजी पुरविलेल्या माहितीवर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे अपील निर्णयामध्ये अपीलार्थीच्या माहितीतील मुद्दा क्र. १,२ व ३ वर भाष्य केले आहे. सदर अपिल निर्णयाचे अवलोकन करता असे आढळून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी मुद्दा क्र. १,२, व ३ वर केलेले भाष्य बरोबर आहे, कारण,  जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जासंदर्भात दिलेल्या

माहितीशिवाय दुसरी कोणतीही माहिती सत्य असू शकणार नाही, असे आयोगाचे मत आहे.अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे पूर्णा शहरातील एका भूखंडावर झालेल्या कथित अनधिकृत बांधकामासंदर्भात,त्याच्या मालकीहक्क व मालमत्ता कराचे संदर्भात काही माहिती मागितली होती. तथापि अपीलार्थीने संदर्भित केलेल्या भूखंडावर पूर्णा नगर परिषदेने बांधकामाची कोणतीही परवानगी दिली नव्हती व सदर भूखंड रिकामा असल्यामुळे त्यांचे मिळकतीवरील नोंद नगर परिषदेच्या कार्यालयात झालेली नव्हती, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली दि. ४.१२.२००६ रोजीची माहिती बरोबर आहे, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीने मागितलेल्या मुद्दा क्र. ४ची माहिती -अपिलार्थीने संदर्भित केलेल्या भूखंडाचा समावेश असलेल्या शहराच्या नकाशाची अधिकृत प्रत-अशी होती.या मुद्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ४.१२.२००६ रोजी दिलेली माहिती पाहता सदर नकाशा नगर परिषदेच्या संबंधित कोणत्याही अधिकाऱ्याने साक्षांकित केलेला नाही. अपिलार्थीने संदर्भित केलेला प्लॉट या नकाशावर कोणत्याही प्रकारे/पध्दतीने दर्शविलेला नाही. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्या क्र.४ च्या संदर्भात कोणतीही माहिती दिली नाही, असे म्हणणे जास्त योग्य होईल, असे वाटते.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि.१२.३.२००८ रोजी (आयोगाकडील सुनावणीच्या एक दिवस आधी) सदर नकाशाची पूर्ण प्रत दिल्याबद्दल व ती प्राप्त झाल्याबद्दल अपिलार्थीच्या कार्यालयाची पोच आयोगास सादर केली आहे.सदर माहिती नगर परिषद, पूर्णा यांनी त्यांच्याकडील जा.क्र.९४७ दि. १२.३.२००८ रोजी दिली आहे. नगर परिषदेने त्यांचे कार्यालयाच्या पत्राचा जा.क्र.'भारतीय किसान संघटना' या अपिलार्थीच्या संघटनेच्या लेटरहेडवर दिलेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी सदर कृतीद्वारे कार्यालयीन संकेतांचे उल्लंघन केल्याचे येथे दिसून येत आहे. दि. १२.३.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या नकाशाचे अवलोकन करता सदर नकाशा देखिल नगर परिषदेच्या कोणत्याही अधिकारी/कर्मचाऱ्याने साक्षांकित केलेला नाही. तसेच अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेला भूखंडाची नोंद या नकाशामध्ये दाखविलेली नाही, असे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील मुद्या क्र. ४ चे बाबतीत दिलेल्या अशाप्रकारच्या माहितीमुळे, अपिलार्थीस दिलेली माहिती अद्यापही अपूर्ण ठरत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि. १९.१०.२००६ रोजी देय असलेली माहिती दि. ४.१२.२००६

रोजी म्हणजेच एकूण ४५ दिवसांच्या विलंबाने दिल्याचे दिसून येत आहे. या विलंबाचे समर्थन जन माहिती अधिकारी हे आज आयोगासमोर करु शकले नाहीत. एवढे असतांनाही त्यांनी दि. ४.१२.२००६ व १२.३.२००८ म्हणजेच द्वितीय अपीलाचे सुनावणीपर्यन्त अपिलार्थीस अर्धवट माहिती दिल्याचे सिध्द होते. अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती प्रथम देण्यास जन माहिती अधिकारी यांनी एकूण ४५ दिवसांचा असमर्थनीय विलंब लावल्याचे या प्रकरणी सिध्द होते. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो परिपूर्ण अशी माहिती दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या या ४५ दिवसांच्या असमर्थनीय विलंबाबाबत त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- या प्रमाणे एकूण ११,२५०/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी खालील लेखाशीर्षाखाली शासकीय कोषागारात माहे एप्रिल, २००८ ते ऑगस्ट,२००८ या कालावधीमध्ये जास्तीत जास्त ५ हप्त्यात करावा.

" ००७० इतर प्रशासनिक सेवा-
६० इतर सेवा-
८०० इतर जमा रकमा-
(१८) माहितीचा अधिकार-००७०-००६-१"

जन माहिती अधिकारी हे शास्तीचा भरणा नियमितपणे करतील, असे संचालक, नगर परिषद, संचालनालय, मुंबई यांनी पहावे व या संदर्भातील आपला अहवाल त्यांनी आयोगास माहे एप्रिल,०८ च्या पुढे दरमहा नियमितपणे शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात पूर्णपणे भरेपर्यन्त पाठवावा. अपिलार्थीस पूर्ण माहिती देण्याचे दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपीलार्थीस त्यांनी दि. १२.३.२००८ रोजी दिलेल्या नकाशा साक्षांकित करुन त्यावर अपीलार्थी यांनी संदर्भित केलेल्या जागेचा उल्लेख करुन तो अपिलार्थीस हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीन दिवसांचे आत विनामूल्य पुरवावा.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

४. अपील अंशतः मान्य.

५. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या ४५ दिवसांच्या असमर्थनीय विलंबाबाबत त्यांचेवर विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- या प्रमाणे एकूण

रु.११,२५०/- शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वर उल्लेखिल्याप्रमाणे शासकीय कोषागारात करावा.

६. अपीलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली मुद्दा क्र.४ ची माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या जागेचा उल्लेख असलेल्या, शहराच्या मूळ नकाशाची साक्षांकित प्रत, अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक १२-०३-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मधुकर हिराजी मुळे, शिवाजी रोड, मुळे गल्ली, रा. पूर्णा ता. पूर्णा जि. परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पूर्णा, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई-३० यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१०३

निर्णय दिनांक : १३-०३-२००८

१ श्री. मनोहरराव किशनराव तरटे, : तक्रारदार
शारदाश्रम कॉलनी, पैठणगेट, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : उत्तरवादी
तथा उपआयुक्त (प्रशासन),
महानगर पालिका, औरंगाबाद

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त (प्रशासन) महानगर पालिका,औरंगाबाद श्री. मारोती यादवराव कांबळे ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हजर आहेत तर तक्रारदार श्री. मनोहरराव किशनराव तरटे, (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेविरुध्द त्यांचेकडील दि. १८.१०.२००७ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे अशी तक्रार केली आहे की, राज्य माहिती आयोगाने त्यांनी दि. २९.८.२००७ रोजी दिलेल्या आदेशाचे उत्तरवादी यांनी अद्यापिही पालन केलेले नाही. सदर आदेशाद्वारे तक्रारदारास द्यावयाची माहिती उत्तरवादी यांनी त्वरित द्यावी व ज्या जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी केली नाही, अशा जन माहिती अधिकाऱ्यावर आयोगाचा अवमान केल्याप्रकरणी योग्य ती कार्यवाही करावी, अशी त्यांनी या तक्रारअर्जामध्ये शेवटी विनंती केली आहे. सदर तक्रारीची नोंद राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयात दि. १८.१०.२००७ रोजी झालेली आहे.

तक्रारदार यांनी या प्रकरणी मूळात औरंगाबाद महानगरपालिकेकडे दि. ९.३.२००६ रोजी एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितली होती. तक्रारदाराच्या या माहितीच्या अर्जासंदर्भात राज्य माहिती आयोगाकडे त्यांनी केलेल्या द्वितीय अपील अर्जावर दि. २८.८.२००७ रोजी सुनावणी होऊन तक्रारदाराचे अपील अंशतः मान्य करण्यात आले होते. आयोगाने उत्तरवादी

यांना दिलेल्या दि. २८.८.२००७ रोजीच्या आदेशामध्ये उत्तरवादी यांना, तक्रारदारास त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती सात दिवसांचे आत देण्याचे आदेशित केले होते. तथापि तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना त्यांचे मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ बाबत कोणतीच माहिती प्राप्त झाली नाही व मुद्दा क्र. ४ व ५ संदर्भात त्यांना प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे. या संदर्भात उत्तरवादी यांना विचारणा केली असता त्यांनी असा युक्तीवाद केला की, तक्रारदार यांनी त्यांचेकडे मागितलेली माहिती, त्यांनी त्यांचेकडील दि. ३१.८.२००७ रोजीच्या पत्रान्वये तक्रारदारास पूर्णतः दिली असून, सदर माहिती तक्रारदारास दि. ३.९.२००७ रोजी प्राप्त झाली. सदर माहिती तक्रारदारास प्राप्त झाल्याप्रित्यर्थ त्यांनी तक्रारदाराची पोच आयोगास सादर केली.

तक्रारदार यांनी मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. ३ च्या संदर्भातील माहिती त्यांनी वेबसाईटवर प्रसिध्द करुन दि. ६.१२.२००७ रोजी तक्रारदार यांना १७ मुद्यांमध्ये उपलब्ध करुन देण्यात आली असल्याचे कळविले. सदर संकेतस्थळाचा पत्ता ‘Aurangabad Mahapalika.org’ असा आहे.उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन, त्यांनी तक्रारदार यांना आयोगाने आदेशित केल्याप्रमाणे सर्व माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत आहे. उत्तरवादी यांनी जरी तक्रारदारास आता माहिती उपलब्ध करुन दिली असली तरी ती आयोगाने आदेशित केल्यानंतर बऱ्याच विलंबाने उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत आहे. तक्रारदारास माहिती देण्यासंदर्भात लावलेल्या विलंबाबाबत राज्य माहिती आयोगातर्फे उत्तरवादी यांना ताकीद देण्यात येत असून यापुढे भविष्यात राज्य माहिती आयोगाच्या आदेशाचे तंतोतंत अनुपालन करावे, अशी त्यांना सूचना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

७. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १३-०३-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मनोहरराव किशनराव तरटे,शारदाश्रम कॉलनी, पैठणगेट, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त (प्रशासन),महानगर पालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९७६

निर्णय दिनांक १४-०३-२००८

१ श्री. शरद कुलकर्णी, : अपिलार्थी
४, आर्या टावर्स, ए डी सी ए मैदानाजवळ,
एन-२, सिडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा कार्यकारी अभियंता,
गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास
महामंडळ, सिंचन भवन, जालना रोड,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, गोदावरी मराठवाडा
पाटबंधारे विकास महामंडळ, सिंचन भवन,
जालना रोड, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शरद कुलकर्णी हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ श्री. प्रकाश दगडूजी वझे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, गोदावरी

मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ श्री. एकनाथ बापुराव जोगदंड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २९-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एप्रिल १९९९ ते सप्टेंबर २००६ या कालावधीतील निम्न दुधना सेलू कार्यकारी अभियंता अतिरिक्त पदभारासंदर्भात एकूण १० मुद्दयावर खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

" १. का. अ. चा अतिरिक्त पदभार देण्याबाबत शासनाचे व महामंडळाचे ध्येय धोरण काय ? या ध्येय धोरणाबाबतची संबंधीत परिपत्रके.

२. महामंडळ अंतर्गत विभागात कार्यरत एकही का. अ. निम्न दुधनाचा पदभार सांभाळण्यास समर्थ नाही का ?

३. सर्वश्री देशमुख, नेमाडे, लिहितकर, पगार या त्या त्या वेळच्या का. अ. ना निम्न दुधना सेलूत कर्तव्य पूर्तीत वेळेप्रसंगी पदभार घेतांना व देतांना श्री. शेंद्रे यांनी प्रत्येक वेळी दहशत निर्माण केली. त्यांच्या गंभिर चौकशा वरिष्ठाकडे व शासनाकडे प्रलंबीत असतांना त्यांचेवर शिस्तभंगाची अथवा कायदेशीर कार्यवाही करुन बडतर्फ करण्याऐवजी त्याला निम्न दुधनाचा अतिरिक्त पदभार दिला जातो. यामागील सबळ कारणे काय ?

४. गोदावरी महामंडळा बाहेरील मॅनेजमेंट डिव्हीजनच्या का. अ. ला निम्न दुधना या मंडळा अंतर्गत विभागाचा गेल्या सहा सात वर्षापासून अतिरिक्त पदभार देण्याची सबळ कारणे ?

५. शासनाचे आदेशानुसार निम्न दुधना सेलू येथील का. अ. च्या रिक्तपदी श्री. डी. बी. पांडे नामक का. अ. ची बदली दोन महिन्यापेक्षा जास्त कालावधीपूर्वी झाली. तरीपण संबंधीत अ. अ. श्री. घोटे व मु. अ तथा

मुख्य प्रशासक कडा यांनी श्री. शेंद्रे कडील निम्न दुधना सेलुचा अतिरिक्त पदभार परत घेवून किंवा श्री. पांडे यांना देण्याबाबत लेखी ताकीद दिली नाही. यामागील सबळ कारणे काय ? असे कृत्य शासनाचा अवमान करणेत होत नाही का ?

६. अंदाजे दोन महिन्याचे वेतन व भत्ते श्री. पांडे यांना द्यावी लागणार त्याची भरपाई शासनाने कुणाकडून वसूल करायची ? कारण पांडे यांनी दोन महिन्यात शासनाचे काही कामच केले नाही ?

७. श्री. शिंद्रे यांनी निम्न दुधनात अतिरिक्त पदभारात केलेल्या कामाची यादी, निधी खर्चाचा तपशील व केलेल्या कामाच्या गुणवत्ता पडताळणी अहवाल.

८. उर्मट, मगरुर व भ्रष्टाचारी का. अ. श्री. शेंद्रे यांच्यावर गंभीर चौकशी प्रकरणाचा भार असतांना त्यांना शासन / महामंडळ पोसते, याची सबळ कारणे ?

९. शासनाच्या वतीने नुकताच जाहीर पूनवर्सन निधीच्या अंदाजे १२/१३ कोटीच्या कामातील शेंद्रेसह वरिष्ठाचा सहभाग हेच शेंद्रेकडे अतिरिक्त पदभार ठेवण्याचे महत्वाचे कारण आहे काय ?

१०. अ. अ. व मु. अ. तथा मु. प्र. कडा यांच्या पातळीवर ही अतिरिक्त पदभाराचा प्रश्न (श्री. पांडे यांना चार्ज देण्याचा प्रश्न) सुटला नाही तेव्हा गोदावरी महामंडळाचे काअच्या दरबारात या प्रश्नावर काय करायचे ठरले ? अद्याप निर्णय होऊन चार्ज का झाला नाही ? हा शासनाच्या आदेशाचा अवमान नाही का ?”

वरिल नमूद सर्व माहिती देऊन संदर्भिय कायद्याचा सन्मान करावा.

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने मागितलेली माहिती मुख्य अभियंता कार्यालयाशी संबंधीत असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा सदर अर्ज त्यांच्याकडील दिनांक ०४-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक लाभक्षेत्र विकास जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांच्याकडे पाठविला.

जन माहिती अधिकारी यांचे दिनांक ०४-१०-२००६ रोजीचे पत्र प्राप्त झाल्या-नंतर संबंधीत मुख्य अभियंता यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २७-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक १, ५, ९ व १० च्या संदर्भातील माहिती प्राप्त करुन घेण्याप्रीत्यर्थ आवश्यक ते शुल्क रुपये ४८ /- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक २, ३, ४ व ६ ची माहिती शासनाशी संबंधीत असल्याचे व मुद्दा क्रमांक ७ ची माहिती निम्न दुधना प्रकल्प सेलू येथून उपलब्ध करुन घेण्यास अपिलार्थीस सूचित केले. संबंधितांना अशा प्रकारच्या सूचना देण्यात येत असल्याचेही त्यांनी या पत्रामध्ये नमूद केले आहे. सदर पत्र अपिलार्थीस दिनांक ०१-११-२००६ रोजी प्राप्त झाले. मुख्य अभियंता यांच्याकडून प्राप्त झालेल्या सुचनेप्रमाणे अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क रुपये ४८ /- जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरल्याचे त्यांनी आयोगास सांगितले. तथापि अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क नेमके कोणत्या दिवशी व कोणत्या क्रमांकाने भरले याची त्यांना आयोगास माहिती देता आली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक ३१-०१-२००७ रोजी प्रथम अपिल केले. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही. तथापि अपिलार्थीच्या अपील अर्जासंदर्भात त्यांनी त्यांच्या कडील दिनांक ०१-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस हवी असलेली माहिती त्यांच्या दिनांक ०६-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये पाठविली असल्याचे कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांचे दिनांक ०६-०२-२००७ रोजीचे पत्र पाहिले असता त्यांनी मुद्दा क्रमांक ७ च्या संदर्भातील माहिती वगळता इतर सर्व मुद्दयावर अपिलार्थीस त्यांचे अभिप्राय कळविल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी मनमानी वर्तन, केंद्रीय माहिती अधिकाराचे उल्लंघन व भ्रष्ट व बेकायदेशीर कामाचे समर्थन केल्याचे प्रथम दर्शनी दिसून येत असल्यामुळे त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) अन्वये कारवाई करण्याचे आदेशीत करुन त्यांना अधिनियमातील कलम ७ (६) प्रमाणे त्यांनी मूळ अर्जाव्दारे अपेक्षित केलेली माहिती विनामूल्य मिळावी असे आदेश देण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत व त्यांनी त्यांचा युक्तिवाद त्यांच्या दिनांक १०-०३-२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास सादर केला आहे. त्यामध्ये त्यांना अपेक्षित असलेली माहिती व प्राप्त झालेली माहिती आधारहीन व दिशाहीन असल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर कलम २० (१) नुसार जास्तीत जास्त दंडात्मक कारवाई करण्याची व जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०

(२) नुसार शिस्तभंगाची कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. याच युक्तिवादामध्ये त्यांनी शेवटी त्यांना या प्रकरणी झालेल्या अनावश्यक खर्चाची रक्कम जन माहिती अधिकारी यांनी त्यांना देण्याबाबत व उर्वरीत माहिती त्यांना विनामूल्य देण्याबाबत जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (६) नुसार आदेशीत करण्याची आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २५-०२-२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २, ३, ४, ६ ची माहिती दिलेली आहे. मुद्दा क्रमांक १, ५, ९ व १० च्या संदर्भातील माहिती मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक लाभक्षेत्र विकास यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २७-१०-२००६ रोजी दिली आहे. मुद्दा क्रमांक ७ च्याबाबत अपिलार्थीने मागितलेली माहिती कार्यकारी अभियंता निम्न दुधना प्रकल्प सेलू यांच्या कार्यालयाशी संबंधीत असल्याने ती अपिलार्थीस तात्काळ हस्तांतरीत करण्याची सूचना त्यांनी संबंधितांना दिलेली आहे. मुद्दा क्रमांक ७ च्या संदर्भात देखील कार्यकारी अभियंता निम्न दुधना प्रकल्प सेलू यांनी कारवाई करुन अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ११-०३-२००८ रोजीच्या पत्रान्वये सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी रुपये ३२ /- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा दिनांक ३१-०१-२००७ रोजीचा अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला. तथापि अशा अपील अर्जावर कशा प्रकारची कारवाई करावयाची हे त्यांना ज्ञात नसल्याने व अशा प्रकारचा अर्ज त्यांच्याकडे प्रथमच आला असल्याने त्यांनी अपिलार्थीस दिनांक ३१-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक तो प्रतिसाद दिला आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील क्षेत्रीय अधिका-याच्या पदभारासंदर्भात दिनांक २९-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये एकूण १० मुद्दयावर माहिती मागविली होती. सदर १० मुद्यांचे अवलोकन केले असता त्यातील मुद्दा क्रमांक ७ व १ वगळता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना प्रश्नार्थक स्वरुपात व त्यांचा खुलासा, स्पष्टीकरण अपेक्षित असलेली माहिती विचारल्याचे दिसून येते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीचे स्वरुप सर्वसाधारणपणे – पदभार सांभाळण्यास समर्थ नाहीत काय, या मागील सबळ कारणे कारणे काय, अतिरिक्त पदभार देण्याची सबळ कारणे, अशी कृती शासनाचा अवमान करणे होत नाही काय, श्री. पांडे यांना द्याव्या लागणा-या २ महिन्याच्या वेतनाची भरपाई शासनाने कोणाकडून करावी, उर्मट मगरुर कार्यकारी अभियंता श्री. शेंद्रे यांना शासन / महामंडळ पोसते याची सबळे कारणे, अतिरिक्त पदभार ठेवण्याचे महत्वाचे कारण काय, उपरोक्त पदभार कार्यकारी अभियंता श्री. शेद्रे कडे ठेवण्याची कारणे कोणती, महामंडळाच्या दरबारात या प्रश्नावर काय करायचे ठरले आहे, अद्याप निर्णय होऊन चॉर्ज का झाला नाही, हा शासनाच्या आदेशाचा अवमान नाही का -- अशा प्रकारचे होते.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये माहिती या शब्दाची व्याख्या खालील प्रमाणे स्पष्ट केली आहे.

<u>कलम २ (च)</u>

**“माहिती” याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने**

**(मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.**

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारलेल्या माहितीतील १० पैकी ८ मुद्दे वरील व्याख्येशी सुसंगत नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात अपिलार्थीस मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक लाभक्षेत्र विकास जलसंपदा विभाग यांनी दिनांक २७-१०-२००६ रोजी माहिती दिलेली आहे. सदर माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत प्राप्त झाल्याचे दिसून येते, मात्र मुद्दा क्रमांक ७ च्या बाबत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २७-१०-२००६ च्या पत्राने दिलेले प्रथम उत्तर योग्य नाही कारण माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (i) मधील तरतुदीन्वये अर्जदाराने मागितलेली माहिती संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसेल तर त्यांनी अर्जदाराचा संबंधीत अर्ज योग्य त्या प्राधिकरणाकडे सदर अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाचे आत पाठवून त्याची प्रत अपिलार्थीस देणे या तरतुदीमध्ये अभिप्रेत आहे. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारची कोणतीही कारवाई केली असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. मुद्दा क्रमांक ७ च्या बाबतीत अपिलार्थीस कार्यकारी अभियंता निम्न दुधना प्रकल्प सेलू यांच्याकडील दिनांक ११-०३-२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद प्राप्त झाला. अपिलार्थीने या प्रकरणी दिनांक २९-०९-२००६ रोजी प्रथम अर्ज केला असता त्यांना कोणत्याही परिस्थितीत दिनांक २८-१०-२००६ रोजी अगर तत्पूर्वी त्यांनी मागितलेल्या माहिती संदर्भात आपला निर्णय संबंधितांनी कळविणे आवश्यक होते. तथापि अपिलार्थीस विहित मुदत टळून गेल्यानंतर एक वर्ष ४ महिने व १२ दिवस इतक्या विलंबाने त्यांना

आवश्यक असलेली माहिती मिळण्यासंदर्भात प्रथम अवगत करण्यात आले. अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने प्रतिसाद देऊन अधिनियमातील तरतुदीचा जन माहिती अधिकारी यांनी भंग केल्याचे येथे दिसून येते. अपिलार्थीने मुद्दा क्रमांक ७ व्दारे विचारलेली माहिती गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाच्या क्षेत्रीय कार्यालयाशी संबंधीत आहे. सदर क्षेत्रीय कार्यालय व जन माहिती अधिकारी यांचे कार्यालय हे एकाच प्राधिकरणाचे दोन वेगवेगळे भाग आहेत त्यामुळे अपिलार्थीने मागितलेली मुद्दा क्रमांक ७ शी संबंधीत माहिती त्यांना देणे हे संबंधीत जन माहिती अधिकारी यांचे माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदी नुसार कर्तव्य आहे असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीस एक वर्ष व काही दिवस इतक्या विलंबाने प्रतिसाद देऊनही त्यांच्याकडे माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क रुपये ३२ /- जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्यास लावण्याची संबंधीत कार्यकारी अभियंता यांची कृती तर सर्वथा बेकायदेशीर आहे असे आयोगाचे मत आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ७ ची माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीच्या उर्वरीत ८ मुद्दया संदर्भातील माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील माहिती या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याने ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी देणे अभिप्रेत नाही हे उघड आहे.

उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३१-०१-२००७ रोजीच्या अपील अर्जासंदर्भात केलेली कारवाई चुकीची असून त्यांनी या प्रकरणी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी या दोघांनी एकत्र बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून त्यावर आपला निर्णय पारीत करणे हे ‘‘अपील ठरविणे’’ या प्रक्रियेत अभिप्रेत आहे याची त्यांना

येथे जाणीव करुन देण्यात येत आहे. त्यांनी केलेल्या या चुकीची त्यांनी इतःपर पुनरावृत्ती करु नये याची त्यांना येथे जाणीव करुन देण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची अधिकारिता आयोगास नसल्याने अपिलार्थीची जन अपिलीय अधिकारी यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्याची विनंती आयोग फेटाळून लावत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी हेतूपुरस्सर विलंब लावल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाईचे आदेश नाहीत. तथापि त्यांनी येथून पुढे माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या माहितीसाठीच्या अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत व सकारात्मक कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस आता विलंबाने माहिती प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीकडून जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी जर काही शुल्क प्राप्त करुन घेतले असेल तर ते त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच २४ तासाच्या आत अपिलार्थीस परत करावे. (या प्रकरणी अपिलार्थीकडून केव्हा व किती शुल्क घेतले याचा तपशील जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाही). अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या अपील अर्जामध्ये त्यांना झालेल्या अनावश्यक खर्चाची रक्कम देण्याबाबत विनंती केली आहे. तथापि या प्रकरणी त्यांना झालेल्या खर्चाबाबत त्यांनी कोणताही पुरावा आयोगास सादर केलेला नाही व आज सुनावणीस देखील अपिलार्थी हे गैरहजर आहेत हे पाहता त्यांचा हा मुद्दा पुराव्या अभावी फेटाळून लावण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ७ ची माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून माहिती देण्यासाठी जर काही शुल्क प्राप्त करुन घेतले असेल तर ते त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच २४ तासाच्या आत अपिलार्थीस परत करावे.

औरंगाबाद<br>
दिनांक १४-०३-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शरद कुलकर्णी, ४, आर्या टावर्स, ए डी सी ए मैदानाजवळ, एन-२, सिडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, सिंचन भवन, जालना रोड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, सिंचन भवन, जालना रोड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९७७

निर्णय दिनांक १४-०३-२००८

१ श्री. गोपालरेड्डी पि. कोनरेड्डी : अपिलार्थी
रा. कुंभार गल्ली जवळ, बाळापूर,
तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, धर्माबाद,
तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सा. प्र.),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गोपालरेड्डी पि. कोनरेड्डी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, धर्माबाद श्री. चंद्रकांत पांडुरंग सोनवणे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय श्री. सोमनाथ गुंजाळ (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १२-१०-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे बाळापूर येथील मालमत्ता अपिलार्थीच्या नावावर परिवर्तीत करण्यासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

" वरील विषय नमुद केल्याप्रमाणे मौजे बाळापुर येथिल त्याचे वडीलाचे हिस्सेस असलेल्या प्रस्तुत मालमत्ता दि. ०९-०२-०४ अन्वये घर क्र. ७४२, ६२२ प्लॉट क्र. ९४६, ९३६ दोन जुने मातीचे घरे दोन जुने (परडा) खुल्या जागा, या प्रलबित अर्जाचे अपीलकर्ता गोपालरेड्डी कोनरेड्डी कोटावाड हयाचे प्रस्तुत मालमत्ता नाव परिवर्तन करावे म्हणून धर्माबाद नगर पालीका धर्माबाद श्रीमान मुख्याधिकारी कार्यालयात अपील केले आहे. हे कि, अपीलकर्ता गोपालरेड्डी कोनरेड्डी कोटावाड व अक्षेपकर्ता १) गगारेड्डी कोनय्या कोटावाड, २) श्रीमती विजयलक्ष्मी गगारेड्डी कोटावाड ३) अध्यक्ष जिल्हा परिषद मौजे बाळापुर हयाचे मुख्याधिकारी स्थरावरील सुनावणी. वरील तिनी अक्षेपकर्ताना कोणत्या तारखेना, कोणत्या दिवशी, कोणत्या वेळेस आपल्या स्थरावरील सुनावणी नोटीस धर्माबाद नगरपालीकेने काढलेली आहे. जर अपीलकर्ता गोपालरेड्डी कोनरेड्डी कोटावाड व अक्षेपकर्ता श्रीमती गगारेड्डी कोनय्या कोटावाड २) श्रीमती गगारेड्डी कोटावाड व ३) अध्यक्ष जिल्हा परिषद मौजे बाळापुर ह्या तिन्ही अक्षेपकर्तांना मुख्याधिकारी स्थरावरील सुनावणी तारीख, दिवस, वेळ आपल्या स्थरावरील सुनावणी नोटीस काढण्यात आले नसेल तर धर्माबाद नगर पालीका का काढली नाही. श्रीमान मुख्याधिकारी आपल्या स्थरावरील धर्माबाद नगर पालीका धर्माबाद यांनी मला न्याय का करण्यात आली नाही. व अपीलकर्ता श्रीमान गोपालरेड्डी कोनरेड्डी कोटावाड याच्या (अपीलावर) दि. ०९-०२-०४ या अर्जावर व

अक्षेपकर्ता १) गगारेड्डी कोनय्या कोटावाड व २) श्रीमती विजयलक्ष्मी गगारेड्डी कोटावाड व ३) जिल्हा परिषद अध्यक्ष मौजे बाळापुर हयांचे मुख्याधिकारी स्थरावरील सुनावणी तारीख, दिवस, वेळ आपल्या स्थरावरील सुनावणी नोटीसचे अंतिम निकाल काय झाला. मला न्याय देऊन हयाची सविस्तर माहिती दयावी.

२) अपीलकर्ता श्रीमान गोपालरेड्डी कोनरेड्डी कोटावाड व अक्षेपकर्ता श्रीमान गगारेड्डी कोनय्या कोटावाड २) श्रीमती विजयलक्ष्मी गगारेड्डी कोटावाड व ३) जिल्हा परिषद अध्यक्ष मौजे बाळापूर हयाचे मुख्याधिकारी स्थरावरील घर क्रमांक ७४१, ७४२, २८८, ६२२, १-७३८, प्लॉट क्रमांक ९४२, ९३६, ९४६ व जिल्हा परिषद, केंद्रिय प्राथमिक शाळा मौजे बाळापुर हयाचे इ. स. १९६२-६३ ते आजपर्यत (२००६) संपूर्ण वर्षोनिहाचे तपशिल उताराचे तसेच मालक नाव म्हणून भोगवटदार नाव म्हणून मालकी हक्क नाव म्हणून वरील प्रस्तुत मालमता करुन घेण्यासाठी श्रीमान मुख्याधिकारी साहेब धर्माबाद पालीका धर्माबाद कडे सादर केल्या कागदपत्राचे रजिस्टर्ड दस्तऐवज साक्षांकीत प्रतचे

मला न्याय देऊन सविस्तर माहिती दयावी. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहीत केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न दिल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०२-२००७ रोजी प्रथम अपिल केले आहे.

अपिलार्थीच्या सदर अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे दिनांक १६-०४-२००७ रोजी अंतीम सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीचे आदेश दिनांक १६-०४-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी पारीत करुन त्याव्दारे अपिलार्थीचे अपील मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दिनांक १२-१०-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे सूचित केले.

तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०३-२००७ रोजी व्दितीय अपील सादर केले. या अपिलाव्दारे त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना बाळापूर येथील घर क्रमांक ७४१, ७४२, २८८, ६२२ १-७३८, प्लॉट क्रमांक ९४२, ९३६, ९४६ व जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा मौजे बाळापूर याच्या सन १९६२-६३ ते २००६ पर्यतच्या कालावधीतील वर्षनिहाय मालमत्ता अभिलेख्याच्या सत्यप्रतीची आवश्यकता आहे. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अद्यापही प्राप्त झाली नाही. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याबद्दल त्यांच्यावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीनुसार कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १३-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती दिलेली आहे. ते या पदावर दिनांक ०७-०८-२००७ पासून कार्यरत आहेत. अपिलार्थीने ज्यावेळी माहिती मागितली त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. त्यांनी

अपिलार्थीस अपिलार्थीने मागितलेली माहिती रजिस्टर पोस्टाने दिनांक १२-०६-२००७ रोजी पाठविली असता अपिलार्थीने सदर माहिती स्विकृत करण्यास नकार दिला.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने याच विषयावर संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे ४ वेगवेगळ्या केलेल्या अर्जासंदर्भात त्यांनी एकच सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक १६-०४-२००७ रोजी पारीत केले आहेत. सदर आदेशात त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मुळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ४ मुद्दयावर त्यांच्याकडे दिनांक १२-१०-२००६ रोजीच्या अर्जान्वये माहिती मागितली आहे. यामध्ये बहुतांश माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपात असून जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्पष्टीकरण व खुलासे अपेक्षित करणारी आहे असे दिसून येते. मात्र त्यांच्या मूळ अर्जातील त्यांनी संदर्भित केलेल्या मालमत्तेच्या संदर्भातील अभिलेख्याची माहिती ही सरळ स्वरुपाची असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागितलेली बहुतांश माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) अन्वये स्पष्ट केलेल्या माहिती या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. असे जरी असले तरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम माहितीच्या अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीमध्ये निर्णय घेऊन तो अपिलार्थीस कळविणे हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार त्यांना अनिवार्य होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती न करुन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग केल्याचे दिसून येते. अपिलार्थीने

मागितलेल्या माहितीपैकी जी माहिती "माहिती" या अधिनियमातील व्याख्येशी सुसंगत आहे अशी माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १३-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे देऊ केली असल्याचे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक १३-०४-२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता असे दिसून येईल की, यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली मालमत्तेच्या तपशीलाचा एकत्रित गोषवारा दिला आहे तर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडील मालमत्ता अभिलेख्यामधील संबंधीत पृष्ठाच्या झेरॉक्स प्रती हव्या आहेत. जन माहिती अधिकारी यांना उपरोक्त प्रमाणे माहिती देण्यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशीत करुनही त्यांनी कोणतीही सकारात्मक कारवाई केल्याचे या ठिकाणी आयोगास आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाचे अवलोकन केले असता त्यांनी देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरविली नाही असा निष्कर्ष काढला आहे. राज्य माहिती आयोग जन अपिलीय अधिकारी यांच्या या निष्कर्षाशी पूर्णपणे सहमत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी घेतलेल्या नकारात्मक भूमिकेतून त्यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे.

सबब त्यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर संचालक नगरपालिका प्रशासन मुंबई यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १२-१०-२००६ रोजी अर्जाव्दारे मागणी केलेल्या

माहितीपैकी जी माहिती “माहिती” या शब्दाच्या व्याख्येत बसते अशी संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच त्यांना ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व जी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे अशी संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर संचालक नगरपालिका प्रशासन, मुंबई यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक १४-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गोपालरेड्डी पि. कोनरेड्डी रा. कुंभार गल्ली जवळ, बाळापूर, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त तथा संचालक, नगर परिषद संचालनालय, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस, वरळी, मुंबई– ४०० ०३० यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९७८

निर्णय दिनांक १४-०३-२००८

१ श्री. रविंद्र काशिनाथ उबाळे, : अपिलार्थी
स्नेहनगर, सुभाष रोड, मोतीमहल च्या मागे,
बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा पुरवठा अधिकारी, तहसील कार्यालय,
बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. रविंद्र काशिनाथ उबाळे, जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अधिकारी, तहसील कार्यालय, बीड व जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, बीड हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १५-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ०१-०१-२००१ ते १५-१२-२००६ या कालावधीतील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील स्वस्त धान्य

दुकानदारांना पुरविण्यात येणा-या धान्य, रॉकेल संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

“ १. आपल्या कार्यालयामार्फत किती स्वस्त धान्य दुकानांना माल पुरवला जातो.

२. बीड तालुक्यातील किती स्वस्त धान्य दुकानांना रॉकेल पुरवठा केला जातो व किती प्रमाणात.

३. स्वस्त धान्य दुकानावरिल देण्यात येणा-या मालाचे स्वरुप (गहू, साकर, दाळ, तांदूळ) वगैरे याची रितसर महीणावर माहीती द्यावी. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्रय रेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद करुन या अर्जासोबत ते दारिद्रय रेषेखालील व्यक्ती असल्याबाबतच्या मुख्याधिकारी, नगर परिषद बीड यांनी त्यांना दिलेल्या दिनांक १८-०४-२००३ च्या प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-१२-२००६ रोजी पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविल्याचे दिसून येते. तथापि त्यांनी सदर पत्र अपिलार्थीस पोस्टाने न पाठविता त्यांच्या शिपायामार्फत दिनांक ०५-०१-२००७ रोजी पाठविले. सदर शिपाई दिनांक ०५-०१-२००७ रोजी अपिलार्थी यांच्या घरी गेला असता अपिलार्थी घरी उपलब्ध नव्हते त्यामुळे सदर पत्र अपिलार्थीच्या घरातील व्यक्ती श्रीमती राधिका उबाळे यांच्याकडे दिले. सदर पत्र अपिलार्थीच्या घरातील व्यक्तीने प्राप्त करुन घेतल्याप्रित्यर्थ त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या अभिलेख्यावर पोच स्विकृती दिली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी माहिती देऊनही अपिलार्थीस ती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०१-२००७ रोजी प्रथम अपिल केले आहे.

अपिलार्थीच्या सदर अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीस अपिलाची सुनावणी न घेण्याची कारणे विचारली असता त्यांनी अपिलार्थीस सदर माहिती अपिलार्थीच्या अपील अर्जापुर्वीच दिली असल्याने सदर सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी घेतली नसल्याचे आयोगास सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या दिनांक १५-१२-२००६ रोजीच्या अर्जावर कोर्ट फी स्टॅम्प चिकटविला नाही एवढे असूनही त्यांनी त्यांच्या दिनांक २७-१२-२००६ रोजीच्या पत्राने अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे. सदर माहिती अपिलार्थीच्या घरातील व्यक्तीस दिनांक ०५-०१-२००७ रोजी प्राप्त झालेली आहे. अपिलार्थीने

व्यक्तिशः माहिती मागवूनही ते त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाले नाहीत आणि त्यांनी त्यांच्या कार्यालयातील शिपायामार्फत अपिलार्थीकडे दिनांक ०५-०१-२००७ रोजी माहिती पाठविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मुळात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अनुक्रमे माहितीसाठीचा अर्ज व त्यावरील अपील अर्ज यावर अनुक्रमे रुपये १० /- व रुपये २० /- किंमतीचे कोर्ट फी स्टॅम्प डकविले नाहीत त्यामुळे अपिलार्थीचा मूळ अर्ज व त्यावरील अपील अवैध ठरत आहे. मात्र अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जावर रुपये २० /- किंमतीचे कोर्ट फी स्टॅम्प डकविले आहेत. या प्रकरणात असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित मुदतीत आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे सदर माहिती ते व्यक्तिशः घेऊन जाणार असल्याचे जन माहिती अधिकारी यांना कळविले होते. परंतु जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे केलेल्या युक्तिवादामध्ये, अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती घेऊन जाण्याचे त्यांच्या अर्जात नमूद करुन देखील सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाले नाहीत हा मुद्दा पाहता व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती देण्यासंदर्भात दिलेला प्रतिसाद पाहता अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे या निर्णयाप्रत आयोग आला आहे. अपिलार्थीस जर अजूनही त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये स्वारस्य असेल तर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ७ दिवसाच्या आत व्यक्तिशः उपस्थित राहून सदर माहिती हस्तगत करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जावर व प्रथम अपील अर्जावर कोर्ट फी स्टॅम्प चिकटविला नसल्यामुळे वा इतर कोणत्याही प्रकारे अपिल शुल्क भरले नसल्याने अपिलार्थीच्या अर्जाची व प्रथम अपिलाची वैधता संपुष्टात आली आहे व त्याचबरोबर त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती पुरविलेली आहे हे पाहता अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १४-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रविंद्र काशिनाथ उबाळे, स्नेहनगर, सुभाष रोड, मोतीमहल च्या मागे, बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अधिकारी, तहसील कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९७९

निर्णय दिनांक १४-०३-२००८

श्री. मोमीन इमाम घुडूसाब, : अपिलार्थी
मोमीन गल्ली, मेन रोड, मु. पो. लोहारा,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तहसीलदार, लोहारा,
जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी (महसूल),
उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मोमीन इमाम घुडूसाब हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, लोहारा श्री. वसंत शंकरराव पवार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल) यांचे प्रतिनिधी तलाठी श्री. लक्ष्मण दशरथराव वाघमारे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ३०-११-२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे लोहारा तालुक्यातील संजय गांधी निराधार योजना व इंदिरा गांधी स्वालंबन योजनेसंदर्भात दिनांक ०१-०१-२००० ते ०१-११-२००५ या कालावधीतील एकूण दोन मुद्दयावर खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

"१. लोहारा तालुका दिनांक ०१-०२-२००० ते दिनांक ०१-११-२००५ पर्यत सं. गां. यो. इं. गां. यो. श्रावणबाळ, राष्ट्रीय आर्थिक मदत, या योजनांसाठी आलेला वर्षनिहाय निधीचा तक्ता देणे व वरील योजनांसाठी वर्षनिहाय लाभार्थ्यांची यादी एकूण, कमी झालेले, वाढलेले लाभार्थी व कॅटेगिरीसह यादी देणे.

२. वरील सर्व योजनांसाठी आलेला निधी कसा वाटप केला याची माहिती देणे, वर्षनिहाय, बाबवार माहिती देणे."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. या अर्जामध्ये अपिलार्थी यांनी ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले असून अर्जासोबत सदर प्रत जोडल्याचे देखील त्यांनी नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-१२-२००५ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला असून अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीप्रित्यर्थ त्यांनी माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे आवश्यक ते शुल्क रुपये २९२८ /- इतके चलनाव्दारे त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०४-२००६

रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जात त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०४-२००६ रोजी अंतीम सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ३०-०४-२००६ रोजी पारीत केले. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस निःशुल्क माहिती देण्याचे सूचित करुन सदर माहिती अपिलार्थीने तहसीलदार लोहारा यांच्या कार्यालयातून हस्तगत करण्याचे अपिलार्थीस सूचित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशीत करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे त्यांच्या दिनांक ०१-०६-२००६ रोजीच्या व्दितीय अपिलाची नोंदणी दिनांक १०-०६-२००६ रोजी केली आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३०-११-२००५ रोजीच्या अर्जासोबत ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याबाबत कोणताही पुरावा जोडला नव्हता त्यामुळे त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिनांक ०८-१२-२००५ रोजी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी रुपये २९२८ /- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्यासाठी सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिलावर सुनावणी होत असतांना त्यांच्याकडील

ग्रामविकास अधिकारी लोहारा बु. यांचे दिनांक १४-१०-२००५ चे ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडले असल्याचे त्यांना प्रथम आढळले. तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०४-२००६ रोजी आदेशीत केल्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संपूर्ण माहिती २०९ पानांची तयार करुन ठेवली होती व त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २९-०५-२००६ रोजीच्या पत्राने कळविले देखील होते. सदर माहिती अपिलार्थीस दिनांक ०२-०६-२००६ रोजी प्राप्त झाली व ही माहिती त्यांना प्राप्त झाल्याप्रित्यर्थ त्यांनी त्यांच्या कार्यालयातील दिनांक १९-०५-२००६ च्या पत्रावर पोच सही दिलेली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक ०१-०४-२००६ रोजीच्या अपील अर्जावर त्यांनी दिनांक २५-०४-२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दिनांक ३०-०४-२००६ रोजी पारीत केले आहेत. सुनावणीमध्ये अपिलार्थीने आपल्या माहितीची व्याप्ती कमी करुन फक्त जानेवारी २००५ ते डिसेंबर २००५ या कालावधीपुरती त्यांची अपेक्षित माहिती सिमीत ठेवली. त्याप्रमाणे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना बदललेल्या कालावधीपुरती मर्यादित माहिती देण्यासाठी सूचित केले होते. (दिनांक ३०-०४-२००६ रोजीच्या आदेशान्वये)

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने सर्व प्रथम जन माहिती अधिकारी यांच्या कडे दिनांक ०१-०१-२००० ते ०१-११-२००५ या ५ वर्षाच्या कालावधीतील माहिती मागविली होती. याच अर्जासोबत त्यांनी ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ति असल्याबाबत चा पुरावा जोडल्याचे म्हटले होते. तथापि प्रत्यक्षतः त्यांनी सदर पुरावा त्यांच्या मूळ अर्जासोबत जोडला नव्हता असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे व सदर

प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील सुनावणीसाठी गेले असता या अपील अर्जासोबत अपिलार्थीने ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याचा पुरावा जोडला आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीत त्यांना ५ वर्षाच्या माहिती ऐवजी एक वर्षाची माहिती मिळाली तरी पुरेल अशी जन अपिलीय अधिकारी यांना लेखी विनंती केल्याने तसे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनाक ३०-०४-२००६ रोजीच्या आदेशाव्दारे अपिलार्थीस एक वर्षाची माहिती देण्याबाबत सूचित केले. (जानेवारी २००५ ते डिसेंबर २००५) त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २९-०५-२००६ रोजी सदर माहिती तयार असल्याबाबत अवगत केले. माहिती तयार असल्याचे कळाल्यानंतर त्यांनी दिनांक ०२-०६-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती हस्तगत करुन घेतली आहे. तथापि या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने सदर माहिती हस्तगत करुन घेण्याआधीच एक दिवस राज्य माहिती आयोगाकडे देखील त्यांच्याकडील दिनांक ०१-०६-२००६ रोजीच्या अपील अर्जान्वये व्दितीय अपील दाखल केले होते. सदर अपिलाची नोंदणी मुंबई येथील कार्यालयात दिनांक १०-०६-२००६ रोजी झाली आहे. थोडक्यात अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केल्यानंतर दुस-या दिवशी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येते. आज सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर आहेत त्यामुळे अपिलार्थीस आता त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात फारसे स्वारस्य उरले नसावे असे अनुमान काढण्यास हरकत नाही. याहीपेक्षा महत्वाची गोष्ट अशी की, ते दारिद्र्य रेषेखालील असल्याचा पुरावा ग्रामविकास अधिकारी लोहारा यांच्याकडून दिनांक १४-१०-२००५ रोजी प्राप्त करुन घेतला होता. या प्रमाणपत्रामध्ये १९९७-९८ च्या यादीप्रमाणे अपिलार्थीचा दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याचा क्रमांक २८ आहे. तथापि या प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी

अधिक तपास केला असता त्यांना गट विकास अधिकारी पंचायत समिती लोहारा यांच्याकडून त्यांचे दिनांक १२-०३-२००८ रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे. या पत्रावरुन असे दिसून येते की, सन २००२ ते २००७ च्या दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींच्या यादीमध्ये अपिलार्थीचे नाव समाविष्ठ नाही. सदर वस्तुस्थिती गट विकास अधिकारी पंचायत समिती लोहारा यांनी तहसीलदार यांना उद्देशून लिहिलेल्या या पत्रामध्ये स्पष्ट केली आहे हे पाहता अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागण्याच्या वेळेस दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती नव्हती हे सिध्द होत आहे त्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त करुन घेण्याचा हक्क पोहोचत नाही असे आयोगाचे मत आहे. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिनांक २९-०५-२००६ रोजी देऊ केलेली होती. या परिस्थितीत अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

सबब वरील प्रमाणे परिस्थिती लक्षात घेता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १४-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोमीन इमाम घुडूसाब, मोमीन गल्ली, मेन रोड, मु. पो. लोहारा,

जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, लोहारा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९८०

निर्णय दिनांक : १४-०३-२००८

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल : अपीलार्थी
रा. मिलकॉर्नर, बसस्टँड रोड
नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा नायब तहसीलदार, (पुरवठा)
तहसील कार्यालय धर्माबाद,
जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा तहसीलदार, धर्माबाद
जि.नांदेड

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, धर्माबाद श्री. रामराव मकाजी कांबळे ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) धर्माबाद (त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी म्हणून संबोधण्यात येईल)

व अपिलार्थी श्री.मुदखेडकर महंमद एकबाल (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल) गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणात अपीलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचे कडील दि. २०.११.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे एप्रिल, २००५ ते ऑक्टोबर, २००६ या कालावधीतील अर्धघाऊक रॉकेल विक्रीच्या स्टॉक वितरणासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" धर्माबाद तालुक्यातील अर्धघाऊक रॉकेल विक्रेते किशन व्यंकन्ना दमकोंडलवार, परवाना क्र. ६४/९८ यांना शासनाकडून वितरण केलेल्या रॉकेलची महिनेवारी रॉकेल वितरण व स्टॉकची सत्यप्रती तसेच त्यांना संलग्न असलेले किरकोळ रॉकेल परवानेधारक यांना वितरण केलेल्या रॉकेलची वितरणाची तपशील व स्टॉक रजिस्टरच्या सत्यप्रती तसेच त्यांच्याकडून किरकोळ रॉकेल हॉकर्सना रॉकेलच्या दिलेल्या पावतीची (रकमेची) पावतीच्या सत्यप्रती मिळणे बाबत. "

अपीलार्थी यांनी सदर माहिती सर्वसाधारण टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपीलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपीलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २४.१.२००७ रोजी प्रथम अपिल केले. या अपीलामध्ये त्यांनी मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

अपीलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३.१०.२००७ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिली. सदर माहिती अपीलार्थीस दि. ३.१०.२००७ रोजी प्राप्त झाल्याप्रित्यर्थ व सदर माहितीबाबत कोणतीही तक्रार राहिलेली नसल्याबद्दल अपिलार्थी यांनी दि. ३.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे लिहून दिलेले या प्रकरणी दिसून येत आहे. येथे असेही दिसून येते की, अपीलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २४.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केल्यानंतर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(६) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थीच्या अपिल अर्जावर दि. २३.२.२००७ रोजी अगर तत्पूर्वी आपला निर्णय देणे अपेक्षित होते. तथापि सदर सुनावणी घेण्यासाठी जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीपेक्षा सुमारे आठ महिने इतका जास्त विलंब लावलेला आहे. जन अपिलीय अधिकारी यांचेकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताच निर्णय पारित न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदीअन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १०.४.२००७ रोजी द्वितीय अपिल सादर केले आहे. या द्वितीय अपिल अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवलेली दिसून येत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपीलार्थी हे गैरहजर असल्याने त्यांनी आयोगाकडे सादर केलेले त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा लेखी युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते या पदावर माहे जुलै,२००७ पासून कार्यरत आहेत. अपिलार्थीने माहितीचा प्रथम अर्ज केला त्या वेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. माहे जुलै, २००७ मध्ये  पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी ऑगस्ट,२००७ मध्ये त्यांचे कार्यालयातील संबंधित जन माहिती अधिकारी नायब तहसीलदार यांना, अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी बोलावण्याची सूचना दिली होती. तथापि अपिलार्थीस व्यक्तीशः बोलावूनही ते त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाले नाहीत. त्यानंतर सदर अपीलाची दि. ३.१०.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली व त्या दिवशी त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे व या माहिती संदर्भात अपिलार्थीची कोणतीही तक्रार राहिलेली नसल्याबाबत अपिलार्थीने दि. ३.१०.२००७ रोजी लेखी कबूली दिली आहे. अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्याप्रित्यर्थच्या त्यांच्या या विधानाची सत्यप्रत त्यांनी आयोगासमोर सादर केलेली आहे.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणात असे दिसून येते की, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल अर्ज करेपर्यन्त त्यांना मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती प्राप्त झाली नव्हती. त्यांच्या दि.२४.१.२००७ रोजीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुमारे आठ महिने इतका विलंबाने सुनावणी घेतली. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(६) च्य तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे प्रथम अपिल अर्ज प्राप्त झाल्यानंतर या अपिलावर एक महिन्याचे आत निर्णय घेणे अनिवार्य आहे. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न देऊन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(६) च्या तरतुदीचा भंग केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती दिली नाही.त्यानंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील तरतुदीनुसार प्रथम अपिल केले असता, त्यांचेवर जन अपिलीय अधिकारी यांनी देखिल

विहित मुदतीत कोणताही निर्णय न देऊन माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(६) च्या तरतुदीचा भंग केला आहे. येथे अपिलार्थीस, त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून संबंधित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेली बेपर्वाई, त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट करते, असे आयोगाचे मत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या बेफिकीर कार्यशैलीची यथायोग्य नोंद महसूल आयुक्त, औरंगाबाद यांनी घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकाऱ्यास त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्याचे दृष्टीने संबंधित जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती देण्यासंदर्भात लावलेल्या विलंबाबाबत, त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु. २५०/-प्रमाणे एकूण रु.२५,०००/- (अक्षरी रु.पंचवीस हजार) शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा हे आदेश निर्गमित होताच एक महिन्याचे आत आयोगास सरळ सादर करावा, असे आदेशित करण्यात येत आहे. विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास हेच आदेश अंतीम करण्यात येतील. अपिलार्थीस आता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून दि. ३.१०.२००७ रोजी माहिती प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहिती पासून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ द्वारे विहित केलेल्या कालावधीपेक्षा जास्त कालावधीसाठी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्यामुळे त्यांचेवर विलंबाचे प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच एक महिन्याचे आत आयोगास सरळ सादर करावा, विहित मुदतीत त्यांचा

खुलासा प्राप्त न झाल्यास हेच आदेश अंतीम करण्यात येतील.

**औरंगाबाद**
**दिनांक १४-०३-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल,रा. मिलकॉर्नर रोड, बसस्टँड रोड नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, धर्माबाद जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, धर्माबाद जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१७

निर्णय दिनांक : १४-०३-२००८

१ श्री. देहरे उत्तम रामनाथ : तक्रारदार

न्यू कुतूबपूरा,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ गेट

जवळ,औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी

तथा प्रबंधक,

पी.ई.एस. अभियांत्रिकी महाविद्यालय,

औरंगाबाद

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. देहरे उत्तम रामनाथ (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, पी.ई.एस.महाविद्यालय, औरंगाबाद श्री. सोनटक्के मोहन दिगांबर ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये त्यांचेकडील दि. १९.६.२००७ रोजीच्या अर्जान्वये अशी तक्रार केली आहे की, आयोगाने जन माहिती अधिकारी यांना दिनांक ५.५.२००७ रोजी च्या आदेशाद्वारे दंडित करुन तक्रारदारास सात दिवसांचे आत विनामूल्य माहिती उपलब्ध करण्याचे आदेश देऊनही त्यांनी उत्तरवादी यांना दि. १५.५.२००७ रोजी अर्धवट व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे. त्यांच्या म्हणण्यापृष्टयर्थ

त्यांनी त्यांच्या या अर्जामध्ये एकूण २० कर्मचाऱ्यांची नावे देऊन त्यांच्या स्थायी/अस्थायी आदेशाच्या प्रती तक्रारदारास देण्यात आली नसल्याचे म्हटले आहे व संबंधित कर्मचाऱ्यांच्या आदेशाच्या प्रती त्वरित देण्याचे उत्तरवादी यांना आदेशित करावे, अशी आयोगास विनंती केली आहे.

तक्रारदाराच्या तक्रारीतील मूळ माहिती संदर्भात उत्तरवादी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, तक्रारदार यांना, उत्तरवादी यांनी आयोगाने त्यांच्याकडील दि. ५.५.२००७ रोजीच्या आदेशामध्ये निर्देशित केल्याप्रमाणे सर्व माहिती दिलेली आहे. तक्रारदार यांनी दि. १९.६.२००७ रोजी केलेल्या तक्रार अर्जातील त्यांना देण्यात आलेली माहिती अर्धवट व दिशाभूल करणारी आहे, असे जे म्हटले आहे, ते पूर्णपणे असत्य आहे. तक्रारदार यांनी निर्देशित केलेले कर्मचारी अस्थायी व रोजंदारी आस्थापनेवर आहेत. त्यांचे नियुक्ती आदेश संस्थेकडून निर्गमित झालेले नाहीत.त्यामुळे त्यांचे आदेशाच्या प्रती तक्रारदार यांना देणे शक्य नाही व ज्या स्थायी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत संस्थेने आदेश दिले होते, त्या कर्मचाऱ्यांच्या स्थायी पदावरील नियुक्तीच्या आदेशाच्या सत्यप्रती त्यांनी तक्रारदारास पुरविल्या आहेत. तक्रारदार यांनी तक्रारीमध्ये नमुद केलेल्या सय्यद अरिफोद्यीन या कर्मचाऱ्यासंदर्भात उत्तरवादी यांनी असा युक्तीवाद यांनी असा युक्तीवाद केला आहे की, श्री. सय्यद अरीफोद्यीन यांच्याबाबतीत त्यांना प्रथम साईट मिस्तरी म्हणून नियुक्ती आदेश दिले होते. नंतर त्या नियुक्तीमध्ये बदल करुन त्यांना शिपाई या पदावर नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहेत. या दोन्हीही आदेशाच्या छायाप्रती त्यांनी तक्रारदारास दि. १०.५.२००७ रोजी दिलेल्या आहेत. तक्रारदारास पुरविलेल्या माहितीमध्ये सय्यद अरीफोद्यीन हे संस्थेत शिपाई म्हणून कार्यरत असल्याने सय्यद अरीफोद्यीन शिपाई या पदाशी संबंधित माहिती देण्यात आली होती, त्यामुळे सदर माहितीने तक्रारदाराची दिशाभूल होते, असे नाही. त्याचबरोबर काही कर्मचारी हे रोजंदारी कर्मचारी म्हणून कार्यरत असल्याने त्यांना नियुक्तीचे आदेश दिलेले नाहीत. त्यामुळे त्यांचे नियुक्ती आदेशाची प्रत तक्रारदारास देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. उत्तरवादी यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये असेही नमुद केले की, तक्रारदार हे, जी माहिती अस्तित्त्वात नाही, त्या माहितीची मागणी करीत आहेत.

उत्तरवादी यांचा युक्तीवाद व तक्रारदार यांनी केलेली तक्रार पाहता असे दिसून येते की, तक्रारदार यांच्या दि. १९.६.२००७ रोजीच्या अर्जामध्ये एकूण २० कर्मचाऱ्यांची नावे दिली असून या सर्व कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती आदेशाच्या प्रती तक्रारदारास हव्या असल्याचे या तक्रारीवरुन दिसून येते. तर उत्तरवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे यातील जे कर्मचारी स्थायी आस्थापनेवर नियमितपणे नेमले गेले आहेत, त्यांच्या आदेशाच्या प्रती तक्रारदारास यापूर्वीच दिल्या आहेत व उर्वरित कर्मचाऱ्यांना नियुक्तीचे आदेश दिले

नसल्याने त्यांना ही माहिती तक्रारदारास देता येणे शक्य नाही. उत्तरवादी यांचा हा युक्तीवाद आयोग मान्य करीत आहे. तथापि तक्रारदारास त्यांनी अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती मिळण्याचे दृष्टीने उत्तरवादी यांना असे आदेशित करण्यात येते की, तक्रारदार यांनी निर्देशित केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती संबंधीची कर्मचारीनिहाय सद्यस्थिती त्यांनी तक्रारदारास हे आदेश प्राप्त होताच विनामूल्य कळवावी, जेणेकरुन त्यांना पुरविलेल्या माहितीमध्ये कोणतीही संदिग्धता राहणार नाही.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १४-०३-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. देहरे उत्तम रामनाथ, न्यू कुतूबपूरा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ गेटजवळ, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, पी.ई.एस.अभियांत्रिकी महाविद्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती